द्वितीय वर्ष वाणिज्य

सत्र - III (CBCS)

व्यावसायिक कायदे

विषय कोड : UBCOMFSIII.7

© UNIVERSITY OF MUMBAI

प्राध्यापक सुहास पेडणेकर
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्राध्यापक रविंद्र द. कुलकर्णी
प्र-कुलगुरु,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्राध्यापक प्रकाश महानवार
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रकल्प समन्वयक : : **प्रा. राजश्री पंडित**
सहाय्यक प्राध्यापक आणि सहाय्यक संचालक,
प्रभारी वाणिज्य विभाग प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

अभ्यास समन्वयक : : **प्रा. विनायक विजय जोशी**
सहाय्यक प्राध्यापक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

संपादक : **प्रा. अर्चना अहेर**
एम. आय. टी. कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, पूणे

लेखक : **प्रा. व्हि.एच. कोपर**
घरकूल, मुंबई गोवा रोड,
पंचायत समिती ऑफिस समोर,
शिवाजी नगर, चिपळूण,
जि. रत्नागिरी - ४१५६०५

मार्च २०२२, मुद्रण १

प्रकाशक : संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई -४०० ०९८.

अक्षर जुळणी व मुद्रण : मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

अनुक्रमणिका

क्रमांक	अध्याय	पृष्ठ क्रमांक
	घटक १ - करारासंबंधिचा कायदा १८७२	
१.	भारतीय करार संबंधीचा कायदा १८७२ कायद्याचा परिचय	०१
२.	कराराचे प्रकार - करारांची विविध गटात विभागणी	१०
३.	प्रस्ताव (कलम २ अ) व स्वीकृती (कलम २ ब)	२१
४.	प्रस्ताव व स्वीकृती कळविणे	३०
५.	करार करण्यास पात्रता - सक्षम व्यक्ती (कलम १० ते १२)	३५
६.	प्रतिफल (कलम २(२५))	४१
७.	मुक्त संमती आणि व्यर्थनीय करार (कलम १३ ते १९)	४८
८.	कायदेशीर उद्दिष्ट्ये व व्यर्थ ठराव किंवा करार (कलम २३ ते ३०)	६१
	घटक २ - विशिष्ट प्रकारचे करार	
९.	खास किंवा विशिष्ट प्रकारचे करार नुकसान भरपाईचे करार व हमीचे करार	७०
१०.	निक्षेपाचे करार	७९
११.	तारणा संबंधीचा करार (Contracts of Pledge) (कलम १७२ ते १७९)	९०
१२.	प्रतिनिधित्वाचा कायदा (Law of Agency)	९५
	घटक ३ - मालविक्रीचा कायदा १९३०	
१३.	माल विक्रीचा कायदा १९३०	१०८
१४.	प्रमुख व दुय्यम अटी (Conditions and Warranties) कलम ११ ते १७	११६
१५.	विक्री करारात मालकी हक्काचे हस्तांतर (Transfer of Property) (कलम १८ ते २६)	१२३
१६.	अदत्त विक्रेता (Unpaid Seller)	१२८
	घटक ४	
१७.	चलनक्षम दस्तऐवजासंबंधीचा कायदा (१८८१)	१३२

❖❖❖❖

द्वितीय वर्ष वाणिज्य
व्यावसायिक कायदे
अभ्यासक्रम

१) करारा संबंधीचा कायदा १८७२ :

- **व्याख्या (कलम २) :**

ठराव, करार, प्रस्ताव, स्वीकृती प्रतिफल (Consideration) बाद ठराव, व्यर्थनीय ठराव.

- करारासाठी आवश्यक गोष्टी
- कराराचे प्रकार, यथाविधीकरार, व्यर्थ करार, व्यर्थनीय करार, संभाव्य करार, तादृश्य करार.
- संपर्क, स्वीकृती, करार रद्द करणे (कलम ३ ते ५)
- करार करण्यास पात्रता (कलम १० ते १२)
- प्रतिफल (कलम २ व २५)
- मुक्त सम्मती
- व्यर्थ ठराव

२) विशिष्ट प्रकारचे करार :

- नुकसान भरपाईचे करार (कलम १२४-१२५)
- हमीचे करार (कलम १२६ ते १२६, १३२ ते १४४)
- निक्षेप व तारणाचे करार (कलम १४८, १५२ ते १५४, १६२)
- तारण (कलम १७२, १७८, १७८अ, आणि १७९)
- प्रतिनिधी (कलम १८२ ते १८५, २०१ ते २०९)

३) मालविक्रीचा कायदा १९३० :

- विक्री कराराची कार्य पद्धत (कलम ४ ते १०)
- विक्री व विक्रीचा ठराव यातील फरक
- विक्री व भाडेखरेदीचा करार
- प्रमुख व दुय्यम अटी (११ ते १७)
- विक्रेता व ग्राहक यांच्यामध्ये मालकी हक्कातील बदल (कलम १८ ते २६)
- अदत्त विक्रेत्याचे अधिकार

४) चलनक्षम दस्त ऐवजाचा कायदा १८८१ :

- चलनक्षम दस्तऐवज, आवश्यक बाबी (कलम १३)
- वचन चिट्ठी व हुंडी (कलम ४, ५, १०८ ते ११६)
- चेक, चेकच्या अनादरासाठी दंड (कलम ६, १२३ ते १३१अ, १३८ ते १४७)
- इतर तरतूदी (कलम ८ ते १०, २२, ९९ ते १०२, ११८ ते १२२, १३४ ते १३७)
- धारक (कलम ८) यथाविधी धारक (कलम ९) यथाविधी, पैसे अदा करणे, दस्तऐवजाची मुदत पूर्ती (कलम २२) अनादराची नोंद (कलम ९९) अनादराबद्दलची तक्रार (कलम १०० ते १०२)

❖❖❖❖

१

भारतीय करार संबंधीचा कायदा १८७२
कायद्याचा परिचय

घटक रचना :

१.० उद्दिष्टये

१.१ विषय परिचय

१.२ ठरावाचा (Agreement) अर्थ

१.३ कराराचा अर्थ

१.४ वैध करारासाठी आवश्यक गोष्टी (कलम १०)

१. ५ प्रश्न

१.० उद्दिष्टये

या प्रकरणाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्यांना पुढील गोष्टींची माहिती होईल.

- कायद्याचा अर्थ
- ठरावाचा अर्थ व ठरावाचे प्रकार
- कराराचा अर्थ व वैध करारासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी

१.१ विषय परिचय

१.१.१ प्रस्तावना :

कायदा याचा अर्थ असे नियम, जे नियम देशातील सर्व समाजाला मान्य आहेत. जे नियम पाळले नाही तर शिक्षा किंवा दंड होऊ शकतो. कायदा हा शब्द व्यापक अर्थाने वापरला जातो. यात विविध प्रकारच्या नियमांचा समावेश होतो. माणसांच्या विविध क्षेत्रातील कृती संबधी नियम असतात तसेच जनता व सरकार यांच्या कृती संबधीही नियम असतात.

१.१.२ कायद्याची व्याख्या :

सायमंड यांच्या मते कायदा म्हणजे समाजातील लोकांना न्याय मिळावा म्हणून केलेले नियम. या नियमांना समाजाची मान्यता असते.

हॉलंड यांच्या मते व्यक्तींच्या कृती संबंधी सरकारने केलेले नियम.

ऑस्टिन हास यांच्या मते कायदा म्हणजे वागणूकीचे नियम ज्याची सरकार अंमलबजावणी करते.

भारतीय करार कायदा हा उद्योग व व्यवसायातील दैनंदिन व्यवहारातील विविध करारांत नियमन करण्यासाठी पास केला गेला. या मध्ये सर्वसाधारण करार व खास करार यांच्या संबंधी नियम आहेत.

हा करार कायदा १ सप्टेंबर १८७२ रोजी अमलात आला. हा कायदा जम्मू व काश्मीर राज्या व्यतिरिक्त संपूर्ण भारतातील जनतेला लागू आहे. कायद्यात सुरुवातीलाच म्हटले आहे की करारा संबंधी काही नियम करण्यासाठी हा कायदा करण्यात आला.

व्यवसाय संबंधीच्या करारात या कायद्याला खूप महत्त्व आहे. आपल्या दैनंदिन जीवनात मुख्यत: व्यापार व उद्योगात या कायद्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. भागीदारी संबंधीचा कायदा, माल विक्रीचा कायदा, महाराष्ट्र सहकारी सोसायटींचा कायदा, चलनक्षम दस्तऐवज संबंधीचा कायदा, कंपनी कायदा, ग्राहक संरक्षण कायदा या सर्व कायद्यामध्ये करारे करावीच लागतात. परंतु त्यात इतर गोष्टींचाही विचार आवश्यक असल्यामुळे त्यांच्यासाठी सरकारने स्वतंत्र कायदे पास केलेले आहेत.

१.१.३ व्यावसायिक कायद्याचा अर्थ :

व्यावसायिक कायद्याचाची व्याख्या अशी करण्यात येते की व्यवसायाशी संबंधित उलाढालींना लागू होणारे कायदे म्हणजे व्यावसायिक कायदे अशा कायद्यामुळे व्यवसाय करणे सोपे जाते व काही तंटे निर्माण झालेच तर ते तंटे या कायद्यांच्या मदतीने मिटविणे सहज शक्य होते.

व्यापारात व दैनंदिन व्यवहारात आश्वासने दिली जातात. कोणीतरी काही देऊ केले तर त्याचा स्विकार करण्यासाठी आश्वासने दिली जातात. दिलेली आश्वासने काही वेळा पाळली जातात तर काही वेळा नाही. करारासंबंधीचा कायदा अशा प्रकारे फक्त कायदेशीर बंधनकारक असणाऱ्या आश्वासना संबंधी विचार करतो. दैनंदिन जीवनात आपण बरीच आश्वासने देतो. त्यातली काही आश्वासने पाळणे नैतिकदृष्टया आवश्यक असले तरीही ती पाळण कायद्यानी सक्तीच नसत. अशा आश्वासनांचा विचार हा कायदा करीत नाही. दैनंदिन जीवनात अशा प्रकारे दिलेली काही आश्वासने पाळणे कायद्याने सक्तीचे नसते अशा अश्वासनांच रुपांतर करारात होत नाही उदा. अ, ब ला त्याच्याकडे मेजवानींला येण्याच आश्वासन देतो परंतु प्रत्यक्षात हजर राहत नाही. अशावेळी अ च्या विरुद्ध ब ला कोर्टात जाऊन झालेल्या अन्नाच्या नासाडीची किंमत मागता येत नाही. करारा संबंधीचा कायदा फक्त कायदेशीर आश्वासनांचीच दखल घेतो. अशा प्रकारे या कायद्याखाली विशिष्ट व्यक्ती विरुद्धच कारवाई करता येते. एकूण कोणावरही नाही. (jus in personal and jus in rem) म्हणजेच करारामुळे फक्त संबंधित व्यक्ती विरुद्धच कोर्टात जाण्याचा अधिकार दुसऱ्या पक्षाला प्राप्त होतो. परंतु काही गोष्टीसाठी जगातील कोणा विरुद्धही कोर्टात जाता येत (Right in rem)

उदाहरणे :

1) अमितनी आपली कार रु २ लाखाला बलरामला विकली. तर आता बलराम कडून रु. २ लाख वसूल करण्याचा अमितला अधिकार आहे. हा अधिकार फक्त

अमितलाच आहे. आणि तोही त्याला फक्त बलराम विरुद्धच आहे. याला इंग्रजित jus in rem असे म्हणतात.

2) सावित्रीनी कार खरेदी केली आणि ती तिची मालक बनली. तिला ती कार शांतपणे म्हणजे दुसऱ्या कोणालाही भीक न घालता हवी तशी वापरु शकते. तिच्या या अधिकारावर जगातील इतर कोणालाही आक्षेप घेता येणार नाही. सावित्रीच्या या अशा अधिकाराला jus in rem म्हणतात.

१.२ ठरावाचा अर्थ

१.२.१ अर्थ.

करारासंबंधीच्या कायद्यातील कलम २ (इ) मध्ये ठरावाची व्याख्या पुढील प्रमाणे आहे.

’प्रतिफलासाठी कोणीही एकमेकांना दिलेल अश्वासन (एक किंवा अनेक) म्हणजेच ठराव म्हणजे एखाद्या गोष्टीवर एकमत होणे. इथे एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला काही आश्वासन देऊ करतो किंवा एखादी गोष्ट करण्याची इच्छा व्यक्त करतो व ती दुसरी व्यक्ती त्याला संमती देते यातून ठराव निर्माण होतो. उदा. राम शिवाला त्याला सिनेमाला घेऊन जाण्याची इच्छा व्यक्त करतो व शिवा त्यासाठी तयार होतो किंवा संमती देतो. यातून ठरावाची निर्मिती होते. या उदाहरणात राम हा इच्छा प्रकट करणारा ठरतो. तर शिवा हा त्याचा स्वीकार करणारा ठरतो.

इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की फक्त दोघांनी आश्वासन देऊन ठरावाची निर्मिती होत नाही. एका व्यक्तीने आपली इच्छा प्रकट केली पाहिजे आणि दुसऱ्या व्यक्तीने त्याला संमती दिली पाहिजे. तरच ठरावाची निर्मिती होते. म्हणजेच ठराव याचा अर्थ एक किंवा अनेक आश्वासने म्हणजे ठराव = आश्वासन + त्यांची स्वीकृती.

ठराव म्हणजे फक्त एकच आश्वासन नव्हे तर काही आश्वासनांचा समूह ही असू शकतो. आधीचेच उदाहरण पुढे नेल तर राम शिवाला सिनेमाला नेतो म्हणतो व शिवा सिनेमा सुटल्यावर रामाला जेवायला नेण्याच आश्वासन देतो. या गोष्टीला दोघंही संमती देतात आणि त्यातून ठरावाची निर्मिती होते.

ठरावाची व्याप्ती तशी मोठी आहे. व्यक्ती अनेक प्रकारचे म्हणजे कायदेशीर किंवा बेकायदेशीर ठराव किंवा अशक्य ठराव करु शकते. परंतु व्यक्ती अशाप्रकारे कोणतेही ठराव करु शकत असली तरीही त्यांच पालन झाल नाही म्हणून त्याला दुसऱ्या व्यक्ती विरुद्ध कोर्टात दाद मागता येत नाही, उदा. वरील उदाहरणात जर शिवा सिनेमागृहावर आला नाही म्हणून राम त्याच्यावर कोर्टात केस घालू शकत नाही, म्हणून ठराव म्हणजे कोर्टात जाऊन अंमलबजावणी करता येण्यासारखीच आश्वासने. ज्या ठरावाची आपण कोर्टात जाऊन अंमलबजावणी करुन घेऊ शकतो त्यालाच करार म्हणतात. करारामध्ये व्यक्तीला आपण दिलेल आश्वासन पाळणे बंधनकारक आहे.

म्हणून करार = आश्वासन + संमती + अंमलबजावणीची शक्यता.

अंमलबजावणी म्हणजे काय?

अंमलबजावणी म्हण़जे असा ठराव ज्यामुळे काही कायदेशीर हक्काची निर्मिती होते. त्यातील कोणा एका व्यक्तीने आश्वासन पाळले नाही तर त्याच्याविरुद्ध कोर्टात दाद मागता येते.

१.२.२ ठरावाचे प्रकार

1) वैध ठराव (Valid Agreement)

कायदेशीर रित्या अंमलबजावणी करणे शक्य असलेले ठराव म्हणजे वैध ठराव होय.

2) व्यर्थ ठराव (Void Agreement)

(कलम २ (ग) नुसार जे ठराव कायदेशीररित्या अंमलात आणता येत नाहीत अशा ठरावांना व्यर्थ ठराव म्हणतात. व्यर्थ ठरावांना कायदेशीर अस्तित्वच नाही आणि त्याचा परिणाम शुन्य. त्यामुळे कुठलेही अधिकार किंवा जबाबदारीची निर्मिती होत नाही. उदाहरणार्थ. बेकायदेशीर ठराव हे व्यर्थ ठराव आहेत. असे ठराव कायदेशीररित्या अंमलात आणता येत नाहीत. कारण ती सामाजिक धोरणाच्या विरुद्ध असतात. उदा. व्यापारावर बंधने आणाणरे, लग्नाला प्रतिबंध करणारे किंवा कायदेशीर कोर्टात दाद मागण्यास प्रतिबंध करणारे ठराव इत्यादी.

3) अंमलबजावणी योग्य ठराव

(कलम २ (ह) नुसार जे ठराव कायद्याने अंमलात आणता येतील अशा ठरावांना करार म्हणतात.

4) व्यर्थनीय ठराव

व्यर्थनीय ठराव म्हण़जे करारातील दोन पक्षापैकी फक्त एकालाच ती व्यर्थ ठरविण्याची मुभा असते. दुसऱ्या पक्षाला नाही. हे करार एका पक्षाने व्यर्थ ठरविण्यापर्यंत कायदेशीर व वैध करारच असतात.

5) कायद्याच्या मदतीने अंमलात आणता न येणारे ठराव (Unenforceable Agreement)

असे ठराव हे कायदेशीरच असतात परंतु कोर्टाच्या मदतीने ती अंमलात आणणे शक्य नसते. कारण त्यात काही तांत्रिक दोष असतात. उदा. तिकिट न लावलेली किंवा अपुऱ्या रकमेच तिकिट लावलेली वचन चिठ्ठी. अशा ठरावाना कायदेशीर मान्यता असते परंतु कोर्ट त्यांची अंमलबजावणी करु शकत नाही कारण त्यांना पुरेशा रकमेच तिकीट लावलेल नसत.

6) **बेकायदेशीर ठराव**

असे ठराव समाज विघातक असतात. ते मुळातच व्यर्थ असतात. असे ठराव सर्वसाधारणपणे गुन्हे करण्यासाठी असतात. ती समाज विघातक असतात. असे ठराव करणारी व्यक्ती भारतीय दंड विधानाखाली (Indian Penel Code) दंड किंवा/ व शिक्षेस पात्र ठरतात.

१.३ कराराचा अर्थ

१.३.१ अर्थ

हा करारासंबंधीचा कायदा कायदेशीर करारांच्या अंमलबजावणीसाठी आहे. तसेच हा कायदा अशा ठरावांचा अर्थ लावण्यास मदत करतो. हा कायदा म्हणजे व्यापार किंवा व्यवसाय विषयक कायद्यांचा पाया आहे. कारण व्यवसायातील अनेक व्यवहार हे करारा मार्फतच पूर्ण केले जातात.

पोलक्क यांच्या मते 'कायद्याने अमलात आणणे शक्य असलेले सर्व ठराव म्हणजे करार होय.' या व्याख्येत मुख्यता दोन गोष्टी आहेत.

- ठराव
- कायद्याने अंमलात आणण्याची पात्रता म्हण़जेच करार † ठराव + कायद्याने अंमलबजावणीची शक्यता.

न्यायालय अंमलात आणु शकणारे सर्व ठराव हे करार होय. जे ठराव कोर्ट अंमलात आणू शकत नाहीत ते करार नव्हेत. उदा. अ व ब मध्ये ठरल की सी ला सुरीने भोसकायच आणि त्याची संपत्ती आपआपसात वाटून घ्यायची.

पुढील परिस्थितीत ठरावाच रुपांतर करारात होते.

1) कायद्याने व्यर्थ न ठरविलेले ठराव

2) ठरावाच उद्दिष्ट कायद्यात बसणार आहे.

3) ठरावाला म्हणजेच संबंधित पक्षांनी स्वेच्छ़ेने ठरावाला संमती दिलेली आहे.

4) संबंधित व्यक्ती करार करणायस पात्र आहेत.

5) ठरावापोटी मिळणार प्रतिफल (Consideration) कायद्याला धरुन आहे.

6) दैनंदिन जीवनात आपण सर्वजण जाणता किंवा न जाणता सतत करार करीतच असतो.

उदा.

अ) दुकानातून वस्तू खरेदी करणे

ब) सिनेमा पाहायला जाणे.

क) रेल्वेने प्रवास करणे.

ड) भल्या पहाटे दूध किंवा वर्तमानपत्र विकत घेणे इत्यादी.

१.४ वैध करारासाठी आवश्यक गोष्टी (कलम १०)

कोणताही करार वैध ठरण्यासाठी कलम नं. १० मधील सर्व आवश्यक गोष्टीची पूर्तता होणे आवश्यक आहे. त्या कलमाने वैध कराराची व्याख्या पुढील प्रमाणे कलेली आहे. 'सर्व ठराव जेव्हा ठरावातील संबंधित सर्व व्यक्ती करार करण्यास पात्र असतात व ते आपली मुक्त संमती देतात व ठरावातील प्रतिफल कायदेशीर असते आणि ठरावाच उद्दिष्ट ही कायदेशीर असते व असे करार कायद्याने अवैध म्हणून घोषित केलेले नाही".

वैध करारासाठी आवश्यक गोष्टी :

१) प्रस्ताव (Offer) व त्याची स्वीकृती :

करार वैध ठरण्यासाठी प्रथम एका पक्षाने कायदेशीर प्रस्ताव मांडला पाहिजे आणि दुसऱ्या पक्षाने त्याचा कायदेशीर पद्धतीने स्वीकार केला पाहिजे.

२) कायदेशीर संबंध निर्माण करण्याची इच्छा असावी

ठरावातील पक्षांच उद्दिष्ट अस नसेल तर करार बनू शकत नाही. उदा. सामाजिक किंवा व्यक्तिगत संबंधातून निर्माण केलेले ठराव ज्याच उद्दिष्ट कायदेशीर संबंध निर्माण करण्याच नसत.

उदाहरणे:-

1) नरेंद्र राजीवजींना जेवणाच आमंत्रण देतो. राजीव ते आमंत्रण स्वीकारतो. परंतू प्रत्यक्षात नरेंद्र मेजवानीची तजवीज करु शकत नाही, राजीव नरेंद्राला त्यासाठी कोर्टात खेचू शकत नाही. कारण जेवणाच आमंत्रण ही एक व्यक्तिगत संबंधीची बाब आहे.

2) मित्राकडील चहाच आमंत्रण हे करार ठरु शकत नाही.

3) राम आपल्या मुलाला खर्चासाठी दर महिन्यांला रु. १०० देण्याच वचन देतो. हे पैसे जर नंतर त्यांनी दिले नाहीत तर मुलगा वडिला विरुद्ध कोर्टात जाऊ शकत नाही.

निवाडा - बालफोर वि. बालफोर (१९१९) वरील केस मध्ये नवरा परदेशात असताना बायकोला दर महिन्याला खर्चासाठी रु ३० देण्याच वचन देतो. परंतु तो तशी रक्कम प्रत्यक्षात पाठवू शकत नाही. बायकोनी त्या पैशाच्या वसूलीसाठी नवर्या विरुद्ध दावा दाखल केला. कोर्टाने निवाडा दिला की इथे कायदेशीर संबंध निर्माण करण्याच उद्दिष्ट नसल्यामुळे बायकोला पैसे वसूल करण्याचा अधिकार नाही.

३) कायदेशीर प्रतिफल

पोल्लक यांच्या मते प्रतिफल म्हणजे ज्यासाठी दुसऱ्यानी ठरावाला आपली संमती दिली. प्रतिफल म्हण़जे देऊ केलेली रक्कम दिलेल्या वचनाच्या बदल्यात देऊ केलल प्रतिफल कोणताही मोबदला न घेता एखाद काम करण्यासाठी दिलेल आश्वासन करार ठरु शकत नाही.

उदा. राम रहीमला काहीही न घेता १ लाख रुपये देण्याच वचन देतो. हा वैध करार ठरु शकत नाही.

अ ब ला रु ३०० रु घेऊन पेन देण्याच कबूल करतो. अ ला मिळणारे रु. ३०० हे प्रतिफल तर ब ला त्या बदलात मिळणार पेन हे प्रतिफल.

प्रतिफल हे

- रोख रकमेत असेल किंवा वस्तूच्या स्वरुपात असेल.
- एखादी गोष्ट करण्याच किंवा न करण्याच वचन असेल
- भूतकाळासाठी असेल व वर्तमान काळासाठी असेल किंवा भविष्य काळासाठी असेल.

4) पक्षांची पात्रता

ठराव करणारी व्यक्ती कायद्याने सक्षम असणे आवश्यक आहे. त्यापैकी एक जर कोणीही सक्षम नसेल तर करार बनू शकत नाही.

पुढील व्यक्ती करार करण्यास अपात्र समजण्यात येतात

1) अज्ञान व्यक्ती (ठराविक वयाखालील व्यक्ती)

ब) मानसिक संतुलन बिघडलेली व्यक्ती

क) कायद्याने अपात्र ठरविण्यात आलेली व्यक्ती

5) मुक्त संमती

संमती म्हणजे दोन व्यक्तीच एखाद्या गोष्टीवर झालेल एकमत. करार म्हणजे एका व्यक्तीने मांडलेल्या प्रस्तावाला दुसऱ्या व्यक्तीने संमती देणे होय. ही संमती मुक्त मनाने दिलेली असावी. त्या वर कोणीही दडपण आणलेल नसाव किवा सक्ती केलेली नसावी. कलम १४ प्रमाणे मुक्त संमती म्हणजे

अ) त्या व्यक्तीवर कोणीही दडपण आणलेच नाही

ब) धाक दाखविलेली नाही

क) फसवणूक केलेली नाही

ड) चुकीची समजूत करुन दिलेली नाही

इ) चुकीने संमती दिलेली नाही.

थोडक्यात संबंधित व्यक्तीने करार मुक्त मनाने केलेला असावा.

6) **कायदेशीर उद्दिष्ट**

करार करण्याचा उद्देश वैध असला पाहिजे. उद्देशाचा प्रतिफलाशी संबंध नाही. हे म्हणजे करार करण्यामागील उद्दिष्ट. उदा. जर एखाद्याने जुगार अड्डा सुरु करण्यासाठी घर भाडयाने घेतले तर कराराच उद्दिष्ट जुगार अड्डा सुरु करणे होय.

उदा. अ नी ब ला क्यु ची हत्या करण्यासाठी रु. २ लाख देऊ केले. खून करणे हा कायद्याने गुन्हा आहे. म्हणून हा करार अवैध व बेकायदेशीर आहे.

पुढील परिस्थितीत उद्दिष्ट बेकायदेशीर समजले जाते:

अ) त्यावर कायद्याने बंदी आहे.

ब) या गोष्टीला परवानगी दिल्यास कुठल्यातरी दुसऱ्या कायद्याचा भंग होतो.

क) उद्देशा कोणाला फसविणे हा आहे.

ड) दुसऱ्याला शारीरिक इजा करणे किंवा त्याची संपत्ती लुबाडण्याच उदिष्ट आहे. हा कोर्टाच्या मते ही गोष्ट अनैतिक आहे किंवा समाजाच्या प्रचलित संकल्पनेच्या विरोधात आहे.

7) **कायदेशीर कार्यपद्धती किंवा औपचारिकता.**

एरवी तोंडी केलेला करार हा वैध करार आहे. परंतु काही कायद्याखाली विशिष्ट प्रकारचे करार लेखीच असणे आवश्यक आहे. उदा. आपल्या देशात अचल मालमत्तेची विक्री किंवा बक्षिस पत्र हे लेखीच असणे आवश्यक आहे. तसेच चेक, हुंडी वगैरे चलनक्षम दस्तएवज लेखीच असणे आवश्यक आहे. कंपनीची घटना पत्रक व नियमावली लेखीच असणे सक्तीचे आहे. या शिवाय नोंदणी विषयक कायद्याच्या कलम १७ खाली काही विशिष्ट करारांची नोंदणी ही सक्तीची आहे.

8) **अर्थ स्पष्ट करणे.**

करारातील भाषा स्पष्ट व असंदिग्ध असावी.

कलम २९ प्रमाणे ज्या करारातील भाषा स्पष्ट नसते किंवा स्पष्ट करणे किंवा त्याचा अर्थ लावणे अशक्य असते असे करार हे व्यर्थ करार समजले जातात. करारातील मजकूर संबंधित पक्ष तयार करतात. करारातील अटी स्पष्ट व असंधिग्ध असणे आवश्यक आहे. करारातील शब्द संदिग्ध अर्थाचे असतील तर करार व्यर्थ ठरतो. उदा - अ ब ला त्याची

खोली आधुनिक पद्धतीने सजविण्यासाठी रु. ३ लाख देण्याच कबूल करतो. हा करार व्यर्थ आहे. कारण आधुनिक पद्धत हा शब्द संदिग्ध आहे. त्याचा अर्थ स्पष्ट नाही.

9) **कराराची पूर्तता शक्य असावी.**

कराराची पूर्तता कायदेशीररित्या प्रत्यक्षात पूर्ण करणे शक्य नसेल तर तो करार व्यर्थ ठरतो. उदा. अ जादू करुन ब ला पैशाचा पाऊस पाडून दाखविण्याचा वचन देतो. अशा करारांची अंमलबजावणी होऊ शकत नाही.

10) **कायद्याने असे करार व्यर्थ किंवा बेकायदेशीर जाहीर केलेले नाहीत.**

करारातील इतर सर्व अटी जरी पूर्ण होत असल्या तरीही देशातील कायद्याने जर असे करार बेकायदेशीर म्हणून जाहीर केलेले असले तरी करार व्यर्थ ठरतात. उदा. दारुबंदी. कलम २४ ते ३० मध्ये अशा काही करारांची यादी आहे. उदा. व्यापार स्वातंत्र्याविरुद्ध, लग्न करण्याविरुद्ध तसेच कोर्टात दाद मागण्याच्या अधिकारा विरुद्ध केलेले करार ही काही ठळक उदाहरणे होय.

करार वैध ठरण्यासाठी तर नमूद केलेल्या १० ही अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे. त्यातील एक जरी अट पूर्ण झाली नाही तरीही करार अवैध ठरतो.

१. ५ प्रश्न

1) ठराव म्हणजे काय?
2) ठराव आणि करार यातील फरक स्पष्ट करा.
3) व्यर्थ व व्यर्थनीय करार यातील फरक सांगा.
4) वैध कराराच्या अटी विशद करा.
5) पुढील शब्द स्पष्ट करा.

   अ) व्यावसायिक कायदे

   ब) कायदा

   क) ठराव

   ड) करार

   इ) व्यर्थनीय ठराव

   फ) व्यर्थ ठराव

   ग) बेकायदेशीर ठराव

   ह) कोर्टाच्या मदतीने अंमलबजावणी करता न येणारे करार.

❖❖❖❖

२

कराराचे प्रकार
करारांची विविध गटात विभागणी

घटक रचना :

२.० उद्दिष्टये

२.१ वैधता किंवा कायद्याने अंमलबजावणी करता येणे या निकषावर करारांची विभागणी

२.२ करार करण्याच्या पद्धतीवरुन करारांची विभागणी

२.३ करार पूर्तीच्या पद्धतीनुसार विभागणी

२.४ ठराव व करार यातील फरक

२.५ व्यर्थ व व्यर्थनीय करार यातील फरक

२.६ इ करार. (E. contract)

२.७ संभाव्य करार

२.८ प्रश्न

२.० उद्दिष्टये

या पाठाचा अभ्यास केल्यानंतर विद्यार्थ्यांना पुढील गोष्टीची माहिती मिळेल

- करारांची विविध निकषावरील विभागणी
- ई. कराराचा अर्थ
- संभाव्य कराराचा अर्थ

२.१ करारांची विभागणी

निकष वैधते प्रमाणे किंवा त्यांच्या अंमलबजावणीच्या पद्धती प्रमाणे.

वरील निकषांवरुन करारांची विभागणी पुढील गटात केली जाते.

१) वैध (Valid) करार :

वैध करार म्हणजे सर्व आवश्यक गोष्टी असलेले करार, ज्यांची कायद्याने अंमलबजावणी करणे शक्य आहे.

२) व्यर्थनीय करार :

कोणत्याही करारात दोन पक्ष असतात. ज्या करारांची अंमलबजावणी दोहांपैकी फक्त एकाला करण्याचा अधिकार प्राप्त होतो. परंतु दुसरा पक्ष त्याची अंमलबजावणी करु शकत नाही अशा करारांना व्यर्थनीय करार म्हणतात. ज्या कराराला एक पक्षानी मुक्त संमती दिलेली नाही असे करार व्यर्थनीय करार ठरतात. करार वैध ठरण्यासाठी आवश्यक असणारी एक प्रमुख गोष्ट म्हणजे संबंधित व्यक्ती किंवा पक्षांची मुक्त संमती अशा कराराला नसते. व्यर्थनीय करारासाठी एका पक्षांची संमती धाक दाखवून, फसवणूक करुन किंवा दिशाभूल करुन मिळविलेली असते. अशा प्रकारे ज्यांनी मुक्त (Free) संमती दिलेली नाही तो पक्ष करार व्यर्थ ठरवू शकतो. अशी व्यक्ती कराराची पुर्तता करण्यास नकार देऊ शकते. त्यामुळे ज्या व्यक्तीची कराराला मुक्त संमती नाही ती व्यक्ती जो पर्यंत करार पूर्तीसांठी नकार देत नाही, तो पर्यंत असा करार वैध कराराच समजला जातो. त्यांनी जर करार पूर्तीला वेळेत नकार दिला तर दुसऱ्या पक्षाचीही करार पूर्ततेच्या जबाबदारीतून सुटका होते.

३) अवैध करार:

ज्या कराराची कायद्याने अंमलबजावणी करता येत नाही तो करार व्यर्थ किंवा अवैध ठरतो. असे करार कोणतेही अधिकार किंवा जबाबदारीची निर्मिती करीत नाहीत. अशा करारामुळे कोणालाही कोणत्याही प्रकारचे अधिकार प्राप्त होत नाही. काहीवेळा करार करतेवेळी ते वैध असतात. परंतु नंतर परिस्थितीत काही बदल झाल्यामुळे ते अवैध ठरतात. अवैध करार हा करारच नसतो. असे करार कोर्टाच्या मदतीनेही अमलात आणता येत नाहीत.

४) कायद्याच्या मदतीने अंमलबजावणी करता न येणारे (Unenforceable) करार :

जे करार इतर सर्व आवश्यक गोष्टींची पूर्तता करतात परंतु त्यात काही तांत्रिक दोष असल्यामुळे त्यांच्या अंमलबजावणीसाठी कोर्टात जाता येत नाही. इथे करार कायद्यातील काही तरतूदींची पूर्तता करीत नाहीत. अशा उणीवा जर नंतर दूर केल्या तर त्यांची कायदेशीर अंमलबजावणी होऊ शकते.

२.२ करार करण्याच्या पद्धतीवरुन करारांचे प्रकार

२.२.१ करार करण्याच्या पद्धतीवरुन करारांची विभागणी पुढील गटात केली जाते.

१) स्पष्ट करार :

जेव्हा कराराच्या अटी लिखित असतात किंवा स्पष्ट बोलून तोंडी ठरविल्या जातात तेव्हा त्यांना स्पष्ट करार म्हटले जाते. उदा. अ ब ला विचारतो (तोंडी किंवा लेखी) माझा सोनी दूर चित्रवाणी संच रु. ३०,००० ला घेतोस का? इथे करार स्पष्ट आहे.

२) गृहीत करार :

कराराच्या अटी ह्या संबंधित व्यक्तींच्या वागणूकीवरुन ठरतात. परंतु जेव्हा कराराचा प्रस्ताव किंवा स्वीकृती गृहीत धरण्यात येतो. तेव्हा गृहीत कराराची निर्मिती होते. उदा. अ बसमध्ये चढतो. इथे ही गोष्ट गृहीत धरली जाते की अ बसच तिकीट खरेदी करणार आहे.

३) करार सद्दश संबंध (Quasi Contract) :

एका अर्थी हे करार नसतातच परंतु इथे करार गृहीत धरला जातो कारण कोणता ही करार होण्यासाठी प्रस्ताव व स्विकृतीची आवश्यकता असते. इथे दोनही गोष्टी नसतात. परंतु काही संबंध हे करार सद्दश असतात. तसे करार नसतात परंतु कायद्याने इथे करार गृहीत धरला जातो म्हणून यांना करार सद्दश संबंध असे संबोधण्यास येते. उदा. अ ब ला काही जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करतो ब हा करार करण्यास सक्षम नसतो म्हणजेच वयाने लहान वगैरे अशा वेळी अ ला त्यानी ब ला पुरविलेल्या वस्तूंची किंमत ब च्या मालमत्तेतून मिळू शकते.

एखादी व्यक्ती स्वेच्छेने दुसऱ्यासाठी काही करतो. परंतु ती गोष्ट त्याला मोफत करायची नसते. इथे कायदा करार गृहीत धरतो. दुसऱ्याला कारणाशिवाय वस्तू मिळालेली असते. म्हणून इथे कोर्ट हस्तक्षेप करुन स्वेच्छेने वस्तू पुरविणार्याला त्याची किंमत मिळवून देते.

अशा प्रकारे असे करार प्रत्यक्षात केलेले नसतात. कोर्ट वस्तूंची न्याय किंमत त्या माणसाला मिळावी म्हणून त्यात हस्तक्षेप करते. परंतु काहीवेळा योग्य पुराव्याअभावी व्यक्तीला नुकसान सोसावा लागतो.

करार सद्दश संबंधांचे प्रकार:

अ) सक्षम नसलेल्या व्यक्तीला आवश्यक वस्तूंचा पुरवठा करणे.

अज्ञान किंवा वेडया माणसाला जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे. इथे अज्ञान किंवा मानसिक संतुलन बिघडलेली व्यक्ती व्यक्तीश: पैसे देण्यास बांधलेली नसते फक्त त्याच्या नावांने मालमत्ता असेल तर त्यातून असे पैसे दिले जातात. अशा माणसाकडे जर काहीही मालमत्ता नसेल तर पैसे वस्तूचे केले जाऊच शकत नाहीत.

फुकट करण्याच उद्दिष्ट नसलेल्या व्यक्तीकडून मिळालेल्या वस्तूची किमंत अदा करणे.

इथे वस्तू देणारी व्यक्ती फुकट वाटणारी नसते. त्यामुळे अशा व्यक्तीनी काही देऊ केले आणि तुम्ही ते स्वीकारलेत तर त्याची किंमत त्याला अदा करणे तुमच कर्तव्य आहे. कारण तुम्ही त्या वस्तूचा उपभोग घेतलेला असतो. उदा. तुमच्या शेजाऱ्यांनी पिझ्झा मागविला आणि तो देणाऱ्यानी तो चुकून तुम्हाला दिला. तुम्ही जर तो खल्लात तर त्याचे पैसे तुम्ही दिले पाहिजेत.

ब) हरविलेली वस्तू सापडल्यास :

दुसऱ्याची हरविलेली एखादी गोष्ट जर तुम्हाला सापडली तर त्या वस्तूच्या मालकाला शोधून त्याची वस्तू त्याला होती त्या परिस्थितीत पोहचविणे तुमचे कर्तव्य आहे. खरा मालक सापडेपर्यंत त्या वस्तूची योग्य ती काळजी घेणे ही तुमची जबाबदारी आहे. कायद्याने तुम्ही निक्षेप दाता (Bailee) समजले जात.

मालकाचा शोध घेण्यासाठी तुम्हाला काही पैसे खर्च करावे लागले तर ते पैसे मात्र तुम्ही मालकाकडून वसूल करुन घेऊ शकता.

क) आपल हित साधण्यासाठी दुसऱ्याची दिलेली देणी :

अशा प्रकारे तुम्ही दुसऱ्याची देणी दिली तर ती रक्कम त्याच्या कडून वसूल करुन घेऊ शकता. उदा. तुम्ही भाडयाच्या घरात राहता आणि मालकाने जर पाणी पट्टी वेळेवर भरली नाही तर नगरपालिका पाण्याचा पुरवठा बंद करु शकते ज्याचा तुम्हाला त्रास सहन करावा लागेल. तो वाचविण्यासाठी जर तुम्ही मालकाच्या वतीने पाणी पट्टी भरलीत तर त्याच्याकडून मागून घेऊ शकता किंवा भाडयातून वळते करुन घेऊ शकता.

ड) चुकून दिलेले पैसे किंवा पुरविलेला माल :

तुम्ही जर एखाद्याला चुकून पैसे दिले किंवा काही माल पुरविलात तर त्याची किंमत त्याच्या कडून मागू शकता. उदा. अ व ब मिळून सी ला रु. १०० द्यायचे आहेत. अ हे पैसे सी ला देतो परंतु ब ला याची माहिती नसल्यामुळे तोही परत सी ला पैसे देतो. अशा वेळी सी नी एकशंभर रुपये परत करणे आवश्यक आहे.

२.२.२ करार व करार सद्दश संबंध यातील फरक :

	करार सद्दश संबंध		**करार**
१	हा हेतू पुरस्सर केलेला नसतो. कायद्या इथे करार आहे असे गृहीत धरतो.	१)	संबंधित पक्ष एकत्र येऊन स्वेछेने करार करतात.
२	वैध कराराच्या सर्व अटी पूर्ण केलेल्या नसतात.	२)	इथे सर्व अटींची पूर्तता झालेली असते.
३	इथे कायदा करार गृहीत धरतो	३)	इथे संबंधित पक्ष स्वेच्छेने अधिकार व जबाबदार्यांची निर्मिती करतात.

२.३ करार पुर्ततेच्या निकषावरुन करारांची विभागणी

करार पूर्ततेच्या निकषावरुन करारांची विभागणी पुढील प्रमाणे करता येईल.

१) पूर्ण केलेला करार.(Executed Contract) :

जेव्हा दोनही पक्षांनी करारात ठरलेल्या गोष्टींची पूर्तता केलेली असते तेव्हा त्याला पूर्ण केलेला करार म्हणतात. दोहोंपैकी एका पक्षाने जरी आपले काम पूर्ण केलेले असेल तेव्हा दुसऱ्यानी त्याच्या भागाची पूर्तता करावयाची असते तेव्हाही त्याला पूर्ण केलेला (Executed) करार म्हणतात. उदा. अ आपली कार ब ला रु. २ लाखाला विकतो. अ नी ब ला कार दिली आहे व ब नी अ ला रु. २ लाख दिलेले आहेत तर याला पूर्ण केलेला करार म्हणतात.

२) पूर्ण करावयाचा (Executory) करार :

इथे दोनही पक्षांनी आपआपली जबाबदारी पूर्ण केलेली नसते. दोघानीही करारातील अटींची पूर्तता करावयाची असते पहिल्या प्रकारच्या करारात दोन ही पक्षांनी आपआपली जबाबदारीची पूर्तता केलेली असते तर इथे दोघांनीही अटींची पूर्तता केलेली नाही म्हणून करार अवैध किंवा व्यर्थ ठरत नाही. उदा. अ नी ब ला आपली कार रु एक लाखाला विकावयाचे ठरले आणि अजून अ नी ब ला कार दिलेली नाही व ब नी अ ला पैसे दिलेले नाहीत. तर असा करार पूर्ण करावयाचा करार बनतो.

३) निम्मी पूर्तता केलेला व निम्मा पूर्ण करावयाचा करार :

इथे एका पक्षांने करारातील अटींची पूर्तता केलेली असते व दुसऱ्यानी अजून करावयाची असते. उदा. अ नी ब ला आपल्या वाहनाची विक्री केलेली आहे. अ नी ब ला वाहनाचा ताबा दिलेला आहे परंतु ब नी अजून त्याची किंमत अदा केलेली नाही. इथे अ च्या दृष्टीकोनातून कराराची पूर्तता झालेली आहे आणि ब च्या दृष्टीकोनातून पूर्तता व्हावयाची आहे. कारण वाहनाची किंमत अजून अदा करावयाची आहे. याला निम्मा पूर्ण करावयाचा करार म्हणतात.

४) एकतर्फी पूर्तता करावयाचे करार :

इथे एका पक्षाने कराराची आधीच पूर्तता केलेली असते फक्त दुसऱ्यानी आपला भाग पूर्ण करावयाचा असतो.

५) दोहोंनी पूर्ण करावयाचे करार :

इथे दोनही पक्षांनी आपआपली जबाबदारी पूर्ण करावयाची असते. इथे कराराची पूर्तता दोघांनीही अजून करावयाची आहे. उदा. अ आपली कार ब ला रु. २ लाखाला देण्याच वचन देतो. हा दुहेरी करार आहे व दोहोंनी तो पूर्ण करावयाचा आहे.

२.४ ठराव (AGREEMENT) व करार (CONTRAT) यातील फरक

फरक	ठराव	करार
व्याख्या	दोन किंवा अधिक व्यक्तीनी केलेला ठराव ज्याची कायद्यानी अंमलबजावणी होऊ शकत नाही.	दोन पक्षानी एकत्र येऊन संमती दिलेली असते व त्याची अंमलबजावणी कायदेशीर रीत्या करता येते.
वैधता कशावर ठरते.	दोहों पक्षांची संमती असते	दोहों किंवा अधिक संबंधितानी संमती दिलेली असते.
लेखी असणे जरुरीच आहे का?	नाही	सर्वसाधारणपणे नाही फक्त काही जमीन विक्री वगैरे संबंधीचे करार लेखी असणे आवश्यक आहे.
प्रतिफल (consideration)	प्रतिफलाची आवश्यकता नाही	प्रतिफल आवश्यक आहे.
कायदेशीर परिणाम	कायदेशीर परिणाम शून्य.	कायद्यानी करारातील अटी पाळणे सक्तीचे पालन न झाल्यास त्यासाठी कोर्टात जाता येते.
स्वरुप	सर्व ठराव करार होऊ शकत नाहीत	सर्व करार हे मुळात ठरावच असतात.

२.५ व्यर्थ व व्यर्थनीय करारातील फरक

मुद्दे	व्यर्थ करार	व्यर्थनीय करार
व्याख्या	जेव्हा एखादा कराराची अंमलबजावणी अशक्य ठरते तेव्हा करार व्यर्थ ठरतो.	अशा कराराची अंमलबजावणी करारातील एक पक्ष करु शकते परंतु दुसरे पक्ष नाही.
स्थिती	यामुळे कोणतेही कर्तव्य किंवा जबाबदार्यांची निर्मिती होत नाही. याचा परिणाम शून्य आहे.	सर्व अधिकार व जबाबदार्यांची निर्मिती होते जो पर्यंत एक पक्ष तो व्यर्थ ठरवीत नाही.

स्वरुप	असे करार बनतात तेव्हा वैध असतात परंतु नंतरच्या काही घटनामुळे ते व्यर्थ ठरतात.	असे करार मुळातूनच व्यर्थनीय असतात किंवा नंतर व्यर्थनीय होतात.
अधिकार	कोणत्याही अधिकारांची निर्मिती होत नाही.	एक पक्ष करार व्यर्थ ठरवून त्या बद्दल दुसऱ्या पक्षाकडून नुकसान भरपाई मागू शकतो.

२.६ ई करार (E-contract)

२.६.१ ई कराराचा अर्थ :

इलेक्ट्रानिक्सच्या मदतीने झालेला करार म्हणजे इ करार. अशा करारासाठी वेगळया स्वतंत्र कायद्याची आवश्यकता आहे. परंतु देशातील विविध न्यायालयानी मात्र सध्या अस्तित्वात असलेल्या करारासंबंधीच्या कायद्याचा वापर अशा करारासाठी आतापर्यंत करीत आलेले आहेत. साध्या कराराच्याच तंत्राचा वापर अशा करारासाठी केला गेलेला आहे. ई कराराविषयीच्या तंटयांची सोडवणूक पूर्वीच्याच कायद्याने केली जात आहे.

२.६.२ ई करारांची निर्मिती :

ऑन लाईन व्यवहार तीन प्रकारे पुरी केली जातात.

- इंटरनेटच्या मदतीने व्यापारी व ग्राहक करार करतात. (याला बिझिनेस टु कन्झ्युमर बी टु सी म्हणतात.)
- व्यापारी दुसऱ्या व्यापारा सोबत इंटरनेट व्दारा केलेले करार (बी टु बी)
- ग्राहक व ग्राहक यांच्यातील करार (सी टु सी)

२.६.३ ऑनलाईन किंवा संगणकाव्दारे मांडलेल प्रस्ताव :

इंटरनेटव्दारे व्यवसाय करणारे व्यापारी

- ही गोष्ट अत्यंत महत्वाची आहे कारण असे करार करताना ग्राहकाला आपल्या बँक अकाउंट संबंधी बरीच माहिति विक्रेत्याला द्यावी लागते व त्याचा गैर वापर होण्याची शक्यता असते.

आपल्या व्यवहारासंबंधीच्या सर्व अटी इंटरनेटव्दारे ग्राहकाला कळवितात म्हणजेच नंतर तक्रारीला जागा राहत नाही या सर्व अटी स्पष्ट शब्दात कळविणे आवश्यक आहे. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की प्रस्ताव मांडणार्याच्या हाती सर्व सत्ता असते. विक्रेत्यांनी आपल्या सर्व अटी विचार पूर्वक तयार केल्या पाहिजेत.

या अटीमध्ये किमान पुढील विषयावरील अटी स्पष्ट असणे आवश्यक आहे.

- माल खराब निघाल्यास किंवा विक्रेत्यांनी कराराचा भंग केल्यास खरेदीदार त्या विरुद्ध कशाप्रकारे व कोणाकडे दाद मागू शकतो?
- व्यवहारावर असलेली इतर बंधने कोणती?
- ग्राहकांनी प्रस्तावाची स्वीकृती कशाप्रकारे करणे आवश्यक आहे?
- वस्तूची किंमत व त्यावरील कर ग्राहकांनी कशी अदा करावी?
- माल परत घेण्यासंबधीचे व पैसे परत करण्या संबंधीचे नियम कोणते?
- वस्तूच्या वापरा संबंधी कोण कोणत्या गोष्टी बद्दल विक्रेता जबाबदार नाही?
- खरेदीदारासंबंधी विक्रेत्याला मिळालेल्या माहितीचा नंतर कसा वापर विक्रेता करणार आहे?
- विक्रेत्याच्या वेबसाईटवर या सर्व अटी स्पष्टपणे मांडलेल्या असाव्यात ज्यांचा सखोल अभ्यास खरेदीदार सवडीने करु शकेल व नंतरच व्यवहार पूर्ण करेल.
- प्रस्तावांत त्याची स्वीकृती ग्राहकांनी कशा पद्धतीने करावी उदा. मला मान्य आहे वगैरे याच्या कार्य पद्धतीचा तपशील असावा.

२.६.४ ई सही (Electronic Signature) :

इलेक्ट्रॉनिक कागद पत्रांवर सही एका विशिष्ट पद्धतीनेच करावी लागते. त्याची खास नोदणी ही करुन घ्यावी लागते. अशी सही अत्यंत महत्त्वाच्या कागदपत्रासाठीच

उदा. आयकर विविरण पत्रक वगैरे साठी वापरली जाते. इतर सर्व साधारण पत्रांना अशा सहीचा वापर केला जात नाही. कारण तसे करणे आवश्यक नाहीं. इथे सही इलेक्ट्रानिक तंत्राच्या सहय्यानेच केली जाते.

२.७ संभाव्य घटनेवर आधारित करार (CONTINGENT CONTRACTS) घटनावलंबी करार

२.७.१ अर्थ :

करारा संबंधीच्या कायद्यातील कलम ३९ मध्ये अशा करारांची व्याख्या दिली गेली आहे. एखादी संभाव्य घटना घडली तर कराराची पूर्तता होते. थोडक्यात असे करार म्हणजे अट असलेले करार किंवा घटनेवर आधरित करार पूर्ण असेल (Absolute) किंवा अटीच्या पूर्ततेवर अवलंबून असेल. पूर्ण करार किंवा विना अट करार म्हणजे आश्वासन देणारा पक्ष कोणत्याही परिस्थितीत किंवा विना अट एखादी गोष्ट करण्याच आश्वासन देतो. परंतु संभाव्य करार किंवा घटनावलंबी करारामध्ये आश्वासक एखादी गोष्ट घडली किंवा नाहीं घडली तरच एखादी गोष्ट करण्याच आश्वासन देतो.

करारात ठराविक अट असेल तर त्याला घटनावलंबी करार म्हणतात. इथे अपेक्षेप्रमाणे एखादी गोष्ट घडली किंवा नाही घडली तरच संबंधित पक्षांना आपण कबूल केलेली. जबाबदारीची पुर्तता करावी लागते. नाहीतर नाही. अपेक्षित घटना जर घडली नाही तर मग करार व्यर्थ ठरतो व कराराची पूर्तता करण्याची आवश्यकता राहत नाही. थोडक्यात इथे संबंधित पक्षांची जबाबदारीची पुर्तता ठराविक परिस्थितीतच पूर्ण केली जाते. उदा. ठरलेल्या बोटीतून काही माल आलाच तर तो विभाला विकण्याचा करार भावना करते. इथे करारात अट आहे म्हणून हा करार घटनावलंबी करार ठरतो. सर्व प्रकारचे नुकसान भरपाईचे करार किंवा विम्याचे करार हे अशा प्रकारचे करार होय. कलम ३१ प्रमाणे ठराविक घटना घडली किंवा नाही घडली तरच पुर्तता करणे आवश्यक असलेले करार म्हणजे घटनावलंबी करार होय.

२.७.२ घटनावलंबी करारात आवश्यक असलेल्या गोष्टी :

- करार वैध असावा.
- कराराची पूर्तत ठराविक अटीवर करण्याचे ठरलेले असावे.
- घटना भविष्यात घडणारी असावी व घडण्याची खात्री नसावी.
- घटना कराराशी संबंधित असावी.

उदा. अमीर सलमानला सोफा कम बेड विकतो व सलमान वस्तू मिळाल्यावर पैसे देण्याच कबूल करतो. असा करार हा घटनावलंबी करार समजला जात नाही यांत कोणतीही अनिश्चितता अशी नाही, हा नेहमीचा करार आहे.

२.७.३ घटनावलंबी कराराच्या अंमलबजावणी संबंधीचे नियम :

- एखादी घटना ठरलेल्या मुदतीत घडली तरच कराराची पूर्तता करावयाची ठरले असेल तर ती घटना त्या कालावधीत घडली तरच करार पूर्ण करणे बंधनकारक ठरते (कलम ३५).

  एखादी घटना ठरलेल्या मुदतीत न घडल्यास करार पूर्ण करावयाचे ठरले असल्यास मुदतीत घटना घडली नाही किंवा घडणे अशक्य झाले तर त्याची अंमलबजावणी करता येते कारण आता ती घटना घडणे शक्य नाही (कलम ३५)

- अशक्य गोष्टीवर अवलंबलेले करार हे अवैध ठरतात. त्यांची अंमलबजावणी कायद्याप्रमाणे करताच येत नाही. अशी घटना कधीही घडू शकत नाही. घटना अशक्य आहे या गोष्टीची जाणीव पक्षांना करार करताना असो किंवा नसो परिस्थितीत काहीही फरक पडत नाही.

२.७.४ घटनावलंबी कराराचे (Contingent Contract) प्रकार :

१) ठराविक घटना घडण्यावर अवलंबित असलेले करार :

काही वेळा करार हे ठराविक गोष्ट भविष्यात घडली तरच पूर्ण करावयाचे असतात अशा वेळी ठरलेल्या वेळेत ती घटना घडली की कराराची पूर्तता करणे बधंनकारक ठरते. अशी घटना जर घडली नाही तर करार व्यर्थ ठरतो. उदा. अ आपली बोट सुरक्षितपणे आली तर त्यातला काही माल ब ला विकण्याच कबूल करतो. बोट आली तर करार वैध ठरतो व बोट समुद्रात बुडाली तर करार व्यर्थ ठरतो.

२) संभाव्य घटना न घडण्यावर पूर्ण करावयाचा करार :

काहीवेळा ठराविक घटना घडली नाही तरच करार पूर्ण करावयाचे ठरते. अशावेळी ती घटना घडली नाही तर तो करार वैध ठरतो. उदा. ठराविक बोट जर आली नाही तर अ ब ला काही माल विकण्याचा करार करतो. इथे जर बोट आली तर करार व्यर्थ ठरतो आणि जर बोट समुद्रात बुडाली तर करार वैध ठरते.

३) संभाव्य घटना ठरलेल्या मुदतीत घडली तर करार पूर्ण करणे :

काहीवेळा पक्ष असे ठरवितात की ठरलेल्या मुदतीत जर एखादी घटना घडली तर कराराची पूर्तता करावयाची. वेळेत जर ती घटना घडली तर करार वैध ठरतो आणि मुदत संपेपर्यंत जर घटना घडलीच नाही तर करार अवैध ठरतो. उदा. अ ब ला काही माल विकल्याच कबूल करतो जर १० दिवसाच्या आत एखादी बोट सुरक्षितपणे बंदरात आली. बोट जर ८ किंवा ९ दिवसात आली तर करार वैध ठरतो आणि १२ व्या दिवशी किंवा १३ व्या दिवशी आली तर करार अवैध किंवा व्यर्थ ठरतो.

४) ठरलेल्या मुदतीत घटना घडली नाही तर कराराची पूर्तता करावयाची :

ठरलेल्या मुदतीत ती घटना घडली तर करार अवैध किंवा व्यर्थ ठरतो व घडली नाही तर मात्र वैध ठरतो. उदा. अ ब ला काही माल विकण्याच कबूल करतो जर एखादी बोट १० दिवसात आली नाही तर इथे जर बोट ८ व्या किंवा ९ व्या दिवशी बोट आली तर करार व्यर्थ ठरतो व १० व्या किंवा १३ व्या दिवशी आली तर करार वैध ठरतो.

५) अशक्य गोष्टीवर अवलंबून असलेले करार :

काही वेळा घटनावलंबी करार मुळातच अवैध असतात. उदा. अ ,ब ला त्यांनी क शी विवाह केल्यास १ लाख रुपये देण्याच कबूल करतो. परंतु समजा ५ वर्षापूर्वीच क च निधन झालेल आहे तर ब नी क शी विवाह करणे शक्यच नसल्यामुळे करार अवैध ठरतो.

२.८ प्रश्न

1) कराराचे प्रकार सांगा.

2) ठराव व करार यातील फरक स्पष्ट करा.

3) व्यर्थ करार व व्यर्थनीय करार म्हणजे काय?

4) ई करार म्हणजे काय?

5) घटनावलंबी करार म्हणजे काय? त्याचे विविध प्रकार विशद करा.

6) संक्षिप्त टीपा लिहा:-

अ) घटनावलंबी करारांची अंमलबजावणी संबधीचे नियम

ब) घटनावलंबी करारातील आवश्यक बाबी

7) पुढील शब्दाची व्याख्या द्या.

अ) ई करार. ब) ई सही क) घटनावलंबी करार

ड) एकतर्फी पूर्ण करार. इ) पूर्तता व्हावयाचे करार.

❖❖❖❖

३

प्रस्ताव (कलम २ अ) व स्वीकृती (कलम २ ब)

घटक रचना :

३.० उद्दिष्टये

३.१ विषय परिचय

३.२ प्रस्तावाचा अर्थ

३.३ वैध प्रस्तावाचा आवश्यक असणाऱ्या गोष्टी

३.४ प्रस्तावाचे प्रकार किंवा विभागणी

३.५ प्रस्तावाची स्वीकृती

३.६ प्रश्न

३.० उद्दिष्टये

या पाठाच्या अभ्यासानंतर पुढील गोष्टी स्पष्ट होतील.

- प्रस्तावाचा अर्थ व त्यासाठी आवश्यक गोष्टी
- वैध प्रस्तावाला आवश्यक असणाऱ्या गोष्टी
- विविध प्रकारच्या प्रस्तावांचा परिचय.

३.१ विषय परिचय

कराराची सुरुवात प्रस्तावाने होते. जेव्हा एखादा प्रस्ताव योग्य पद्धतीने मांडला जातो व दुसऱ्याकडून त्याची स्वीकृती केली जाते तेव्हा करार अस्तित्वात येतो. करार वैध ठरण्यासाठी इतरही काही गोष्टी किंवा अटींची पूर्तता आवश्यक आहे ही गोष्ट विसरून चालणार नाही.

३.२ प्रस्तावाचा अर्थ

३.२.१ करार कायद्यातील कलम २ (अ) मध्ये प्रस्तावाची व्याख्या देण्यात आलेली आहे. जेव्हा दुसऱ्या व्यक्तीची संमती मिळावण्याच्या उद्दिष्टाने व्यक्ती दुसऱ्या जवळ एखादे कृत्य करण्याची किंवा न करण्याची आपली इच्छा प्रकट करते तेव्हा अशा व्यक्तीने प्रस्ताव सादर केला असे म्हटले जाते.

३.२.२ वरील व्याख्येचे विश्लेषण केल्यास आपल्याला त्यात पुढील घटक आहेत ही गोष्ट लक्षात येईल.

अ) एखादी व्यक्ती एखादी गोष्ट करण्याची किंवा न करण्याची इच्छा प्रकट करते

ब) एक व्यक्ती इथे दुसऱ्या व्यक्तीकडे आपली इच्छा प्रकट करते.

क) इच्छा प्रकट करण्यामागच उद्दिष्ट म्हणजे त्या प्रस्तावाला दुसऱ्या व्यक्तीने संमती द्यावी ही असते.

ड) प्रस्ताव मांडणाऱ्या व्यक्तीला प्रस्तावक म्हंटल जात तर ज्याच्याकडे तो प्रस्ताव मांडलेला आहे त्याला प्रस्तावाचा स्वीकार करणारा (offers) म्हंटले जाते.

इ) कराराची सुरुवात ही केव्हाही प्रस्तावानेच होते. प्रस्तावाव्दारे एक व्यक्ती एखादी गोष्ट करण्याची आपली इच्छा दुसऱ्याकडे प्रकट करते. त्या प्रस्तावामागचे उद्दिष्ट म्हणजे त्या दुसऱ्या व्यक्तीनी त्याला संमती द्यावी हीच असते.

संमती लेखी किंवा तोंडी कळविता येते किंवा कृती करुनही कळविता येते.

प्रस्ताव मांडणाऱ्या व्यक्तीला प्रस्तावक किंवा वचन दाता (Promisor) म्हणतात तर ज्याच्या समोर प्रस्ताव मांडला जातो त्याला स्वीकृतीदार म्हणतात. इंग्रजीत यानाच Promisor or offerer and offeree or promisee or Acceptor संबोधले जाते.

उदा. राम शामला विचारतो हा सोफा सेट तू रु. २ लाखाला घेशील का? इथे राम शामपुढे प्रस्ताव मांडतो कारण तो सोफा त्याचा विकण्याची आपली इच्छा त्याच्याकडे प्रकट करतो. त्यासाठी शाम कडून तो संमतीची अपेक्षा करतो.

३.२.३ प्रस्ताव मांडण्याच्या विविध पद्धती:- प्रस्ताव पुढील कोणत्याही पद्धतीने मांडला येतो.

अ) तोंडी किंवा लेखी स्वरुपात.

लेखी प्रस्ताव पत्राने तारेने किंवा टेलेक्सद्वारे किंवा जाहिरातीद्वारे मांडता येते. तसेच तोंडी प्रस्ताव प्रत्यक्ष किंवा टेलिफोन वरही मांडता येतो.

उदाहरणे:

- अ आपल घर ब ला ठराविक किंमतीला विकण्याची तयारी दर्शवितो. हा प्रस्ताव शब्दात मांडलेला आहे. म्हणून याला प्रकट (Express) प्रस्ताव म्हणतात.

अ ब ला फोन करुन सांगतो की आपण आपल घर ठराविक किंमतीला विकायला तयार आहोत. हा कृतीने केलेला प्रकट प्रस्ताव होय.

ब. कृतीद्वारे किंवा गृहीत प्रस्ताव. प्रस्ताव स्पष्ट शब्दात मांडता येतो. तसाच हातानी बोटानी विशिष्ट हालचाली करुनही मांडता येतो.

परंतु काहीही न बोलणे म्हणजे संमती समजली जात नाही.काहीवेळा एखादी गोष्ट न करुनसुद्धा प्रस्ताव मांडता येतो. त्याच्या त्या कृतीचा अर्थ त्याची संमती अशी समजली जाऊ शकते. प्रस्ताव कृतीने मांडला जातोच त्याला गृहीत प्रस्ताव म्हणतात. उदा:- बेस्ट ठराविक मार्गावर बस सेवा सुरु करते म्हणजेच ठरलेल्या तिकिटाच्या पैशात प्रवासी नेण्याची गृहीत प्रस्ताव मांडते.

- अ मुंबई वरुन अलिबागला आपल्या बोटीतून प्रवाशांना नेतो आणि बोट सध्या मुंबईच्या धक्कयावर उभी केलेली आहे. हा एक कृतीने मांडलेला प्रस्ताव आहे. त्यांनी प्रवाशांना हाकामारुन बोलाविण्याची गरज नाही. त्याची बोट गेट वे ला उभी करणे म्हणजेच प्रस्ताव मांडणे हा एक गृहीत प्रस्ताव आहे.

३.२.४ प्रस्ताव कोणाचा?

अ. ठरलेल्या व्यक्तीला केलेला प्रस्ताव किंवा विशिष्ठ व्यक्तीला केलेला प्रस्ताव उदां झहीर मिहिरला आपला घोडा रु. ८०, रुपयांना विकायच आहे. अस सांगतो. हा प्रस्ताव विशिष्ट व्यक्तीला दिलेला प्रस्ताव आहे. म्हणजे मिहिरचा तो घोडा त्यांनी रामलाही त्याच किंमतीचा दिला पाहिजे अस नाही.

क्ष हा य कडून त्याची कार १ लाख रुपयाचा घेण्याचा प्रस्ताव देतो. हा प्रस्ताव विशिष्ट व्यक्तीला देतो. हा प्रस्ताव विशिष्ट व्यक्तीला दिलेला आहे. तो प्रस्ताव य लाच स्वीकारता येईल दुसऱ्या कोणाला नाही.

ब) ठरलेल्या व्यक्तींच्या समुहाला केलेला प्रस्ताव. उदा. शाळा नोटीस बोर्डावर नोटीस लावते की एका शिक्षकाचा हरविलेले फोन कोणी शोधून दिल्यास त्याला रु. ५०० च बक्षीस दिले जाईल. हा प्रस्ताव ठराविक समुहासाठी म्हणजे त्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठीच आहे.

क) संबंध जगाच केलेला प्रस्ताव

असा प्रस्ताव विशिष्ट व्यक्तीला केलेला नसतो तर सार्या जगासाठी खुला असतो. असा प्रस्ताव त्यातील अटी पूर्ण करुन कोणीही स्वीकारू शकतो. इथे प्रस्तावाची माहिती असलेली कोणीही व्यक्ती पुढे येते आणि त्यातील अटी पूर्ण करुन त्याचा स्वीकार करु शकते. उदा. अ वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर करतो की हरविलेल्या आपल्या मुलाला शोधून आणणर्याला आपण पाच हजार रुपयांच बक्षीस देऊ. क नी ही जाहिरात पाहून त्याला तो मुलगा सापडल्यावर अ ला तार करुन कळविले अ नी क ला बक्षीसाची रक्कम दिली पाहिजे असा निवाडा कोर्टाने केला हरभजनलाल विरुद्ध हरचरण लाल अशीच आणखीन एक केस या संदर्भात प्रसिद्ध आहे. ती म्हणजे कारलैच विरुद्ध काबौलिक स्मोकबॉल कंपनी. केसचा तपशील. काबौलिक स्मोकबॉल कंपनीने विविध वर्तमान पत्रातून जाहीर केले की त्यांच्या या गोळ्या व्यवस्थितपणे घेतल्याने नंतर जर

कोणाला फ्लू झाला तर १०० पौंड भरपाई कंपनी देईल. त्यासाठी कंपनीनी लंडनबँकेत १००० पौंड ठेवलेले आहेत.

कारलैल या बाईने त्या गोळया घेतल्या आणि नंतर तिला पोलू झाला कोर्टाने निर्णय दिला की तिने प्रस्तवाचा स्वीकार केलेला असून तिला १०० पौंड नुकसान भरपाई मिळाली पाहिजे.

३.३ वैध प्रस्तावासाठी आवश्यक गोष्टी

प्रस्ताव वैध ठरण्यासाठी पुढील अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

1) प्रस्ताव प्रकट किंवा गृहीत असू शकेल. प्रस्ताव शब्दात मांडल्यास प्रस्तावाला प्रकट प्रस्ताव म्हणतात. आणि तो जर संबंधित व्यक्तीच्या कृतीतून प्रकट होत असेल तर त्याला गृहीत किंवा पृच्छ़न्न प्रस्ताव म्हणतात.

2) **प्रस्तावातील कलम किंवा अटी स्पष्ट असाव्यात**

प्रस्तावातील अटी जर स्पष्ट नसतील तर तो वैध प्रस्ताव ठरत नाही. अस नेहमीच म्हटले जाते की वैध प्रस्तावाशिवाय वैध करार बनतच नाही आणि हे म्हणणे योग्यच आहे. म्हणून प्रस्तावातील अटी स्पष्ट व नि: संधिग्ध असाव्यात. प्रस्तावातील शब्दांचा अर्थ वेग वेगळा निघण्यासारखा नसावा. पक्षांची भूमिका स्पष्ट असावी.

3) **प्रस्ताव व प्रसतावासाठी आमंत्रण या दोन गोष्टी भिन्न आहेत.**

प्रस्ताव वेगळा व प्रसतावासाठीच निमंत्रण वेगळ. प्रस्तावासाठीच्या निमंत्रणात एक पक्ष दुसऱ्याकडून प्रस्तावाची फक्त अपेक्षा करते. दुकानात वस्तूवर किमंत लिहिलेली असते. ती म्हणजे प्रस्तावासाठी आमंत्रणाच उत्तम उदाहरण समजले जाते. तसेच लिलावाने वस्तूची विक्री करण्याची जाहिरात दर पत्रक या सर्व गोष्टी म्हणजे प्रस्तावासाठीची आमंत्रणे होय.

उदा. नोकरीसाठीची जाहिरात किंवा कामासाठी.

4) **प्रस्ताव ठराविक व्यक्तीसाठी असू शकेल किंवा साऱ्या जगासाठी खुला असू शकेल (Specific or General)**

जेव्हा खुला प्रस्ताव मांडला जातो तेव्हा त्याला जगासाठी केलेला प्रस्ताव म्हणतात. त्याचा कोणीही स्वीकार करु शकतो. ठराविक व्यक्तींना केलेला प्रस्ताव फक्त तीच व्यक्ती स्वीकार करु शकते. उदा. अ ब ला आपली कार रु. ५ लाखाला देऊ करतो. हा ठराविक व्यक्तीलाच केलेला प्रस्ताव आहे. याचा स्वीकार फक्त ब च करु शकतो तीच कार क ला अ त्याच किंमतीला देईल असे नाही.

अ आपल्या मुलाला शोधून देणाऱ्याला पाच हजाराच बक्षीस जाहीर करतो. हा खुला प्रस्ताव आहे. त्याचा स्वीकार कोणीही करु शकतो.

प्रस्ताव (कलम २ अ) व स्वीकृती (कलम २ ब)

५) प्रस्ताव दुसऱ्याला सादर केला पाहिजे.

दुसऱ्याला प्रस्ताव कळविणे आवश्यक आहे. नाहींतर त्याला कायद्यात वैधता नाही. प्रस्तावाची माहिती नसताना त्याचा स्वीकार होऊ शकत नाही. तो माहीत असूनच त्याचा स्वीकार केला तरच स्वीकृती वैध ठरते. समजा अ ला ब ची खाली पडलेली वस्तू सापडली आणि त्यानी ती त्याला परत केली. अशावेळी जर अ नी वस्तू परत करणाऱ्याला काही बक्षीस देण्याच जाहीर केल व ती वस्तू परत करताना ब ला या बक्षीसाची माहिती नव्हती तर तो अ कडे बक्षीसाची मागणी करु शकत नाही. कारण वस्तू परत करताना त्याला अ नी जाहीर केलेल्या बक्षीसाची माहिती नव्हती. प्रस्तावाची माहिती पूर्णपणे असल्याशिवाय त्याची वैध स्वीकृती होऊ शकत नाही. म्हणून प्रस्तावकांनी प्रस्तावाची योग्य पद्धतीने माहिती दुसऱ्या पक्षाला दिली पाहिजे. प्रस्तावाची माहिती नसताना दिलेली स्वीकृती कायदेशीर स्वीकृती ठरत नाही.

या विषयावरील निवाडा :- लालमन शुक्ला वि. घौरी दत्त (१९१३) तपशील : लालमन शुक्ला हे गौरी दत्त यांच्याकडे कामाला होते. गौरी दत्त यांचा पुतण्या जेव्हा हरवला तेव्हा त्यांनी त्याला शोधायला लालमन शुक्ला या नोकराला पाठविले. नंतर पुतण्याला शोधून आणणार्यासाठीच रु ५०१ च बक्षीस जाहीर केल. शुक्ला यांना पुतण्या सापडला त्या वेळी त्यांना बक्षीसाची माहिती नव्हती.

कोर्टाने निवाडा दिला की शुक्ला यांना बक्षीस मागण्याचा अधिकार नाही कारण प्रस्तावाच्या माहिती शिवाय त्याची स्वीकृती वैध ठरत नाही.

म्हणून प्रस्तावाच्या माहिती शिवाय त्याची स्वीकृती होऊ शकत नाही.

६) एखादी गोष्ट न करणे म्हणजे प्रस्तावाचा स्वीकृती अस जाहीर करता येणार नाही. उदा. अ नी ब ला पत्र पाठवून कळवल की मी माझी कार तु ला १ लाखाला विकत आहे. तू जर लगेच नकार कळविले नाहींस तर हा प्रस्ताव तुला मान्य आहे अस मी समजेन. अस म्हणून चालणार नाही.

1) फक्त किंमत सांगणे म्हणजे प्रस्ताव मांडणे नव्हे किंवा विक्रीसाठीची तयारी दाखविणे नव्हे.

   निवाडा : हार्वे वि. फॅसे.

जमाईका मधल्या काही मालमत्तेच्या संबंधात वाटाघाटी चालू होत्या. ७ ऑक्टोबर १८९१ ला फॅसीने हार्वेला तार पाठविली की तू तुझी मालमत्ता मला विकशील का? त्याची कमीत कमी किंमत कळव. फॅसीने उत्तर दिले रु ९०० . हार्वेनी कळविले की किंमत मला मान्य आहे. मालमत्तेची कागद पत्रे पाठव म्हणजे आम्हाला त्याचा ताबा

लगेच मिळू शकेल. कोर्टाने निवाडा दिला की कराराची पूर्तता झालेली नाही. हार्वेनी फक्त किंमत कळवलेली आहे. विक्रीची तयारी दर्शविलेली नाही.

३.४ प्रस्तावाचे विविध प्रकार

१. स्पष्ट प्रस्ताव

तोंडी किंवा लेखी स्पष्ट शब्दात मांडलेला प्रस्ताव. उदा. विरेननी किरणला विचारल माझा संगणक तू १० हजाराला घ्यायला तयार आहेस का?

२) पृच्छन्न किंवा गृहीत प्रस्ताव

इथे प्रस्तावाचा अनुमान संबंधितांच्या कृतीतून काढला जातो. उदा. ए. टी. एम मधून पैसे काढणे म्हणजे कार्डधारक व बँक यांच्यातील गृहीत करार होय.

३) खुला प्रस्ताव

आम जनतांसाठी मांडलेला प्रस्ताव म्हणजे खुला प्रस्ताव होय. हा प्रस्ताव एका विशिष्ट व्यक्तीसाठी मांडलेला नसतो. याचा स्वीकार कोणीही करु शकतो. उदा. वर्तमानपत्रातील जाहिरात 'माझ पाकीट हरविलेल आहे. आणून देणाऱ्याला मी रु. ५,०००/- चे बक्षीस देईन."

४) ठराविक व्यक्तीला केलेला प्रस्ताव (Specific offer)

इथे प्रस्ताव हा ठराविक १ किंवा अनेक व्यक्तींच्या समोर मांडला जातो. उदा. अ आपले घर ब ला चार लाख रुपयांना विकण्याचा प्रस्ताव देतो. इथे प्रस्ताव हा फक्त ब पुढेच मांडलेला आहे. त्यामुळे याची स्वीकृती फक्त ब च करु शकतो. (बौलटन वि. जोन्स (१८५७)

५) एकमेकाविरुद्धचे प्रस्ताव (Cross offer)

माहीत नसताना दोन व्यक्ती एकमेकाला एकच प्रस्ताव देतात. उदा. अ ब पुढे प्रस्ताव मांडतो की तो आपली कार रु. २ लाखाला विकायला तयार आहे. या प्रस्तावाची माहिती नसल्यामुळेच ब ही अ ला प्रस्ताव देतो की मी तुझी कार रु २ लाखाला घ्यायला तयार आहे. दोन प्रस्ताव एकमेकाविरुद्ध मांडले जातात.

६) सतत खुला प्रस्ताव किंवा स्थाई प्रस्ताव (Standing offer)

दीर्घ काळासाठी उपलब्ध असलेला प्रस्ताव म्हणजे सततचा प्रस्ताव किंवा टेंडर. उदा. अ कंपनीला एखाद्या मालाचा पुरवठा वर्षभर आवश्यक असतो. कंपनी तशी जाहिरात वर्तमान पत्रातून देते. ब टेंडर भरतो आणि तो पास होतो. आता प्रस्ताव हा वर्षभर खुला राहतो. ठरलेल्या दरानेच माल वर्षभर पुराविण्याची ब वर जबाबदारी येते.

७) प्रति प्रस्ताव.

एखाद्याला केलेला प्रस्ताव मान्य नसेल तर तो दुसरा आपला प्रस्ताव मांडू शकतो त्याला प्रति प्रस्ताव (Counter offer) म्हणतात. उदा. अ आपली कार ब ला रु. ८० हजाराला विकण्याचा प्रस्ताव मांडतो. पण ब ला ही किंमत मान्य नाही तर तो प्रति प्रस्ताव अ ला मांडू शकतो की मी रु. ५० हजार देईन. याला प्रती प्रस्ताव म्हणतात. आता अ हा प्रस्ताव स्वीकारायच की नाही हे ठरवू शकतो. अ नी स्वीकारले तर करार पूर्ण होतो.

३.५ प्रस्तावाची स्वीकृती

वैध प्रस्तावाची स्वीकृती म्हणजेच कराराची पूर्तता. कलम २ (ब) प्रमाणे ज्याला प्रस्ताव दिलेला आहे. त्यांनी जर त्याला आपली संमती दाखविली किंवा त्याला स्वीकृती दिली तर करार पुर्ण होतो. प्रस्तावाची स्वीकृती म्हणजेच करार होय. ही स्वीकृती वैध असली पाहिजे. वैध स्वीकृतीसाठी पुढील नियमांच पालन आवश्यक आहे.

१) ज्याला प्रस्ताव दिलेला आहे त्यानीच त्याचा स्वीकार केला पाहिजे. इतर कोणी नाही. उदा. अ नी ब कडे प्रस्ताव मांडला तर तो बनीच स्वीकारला पाहिजे.क त्याचा स्वीकार करु शकत नाही, तस करायच झाल्यास त्याला परत अ ची संमती आवश्यक आहे.

२) स्वीकारणारी व्यक्ती स्पष्ट असावी. सबंध जगाला जर प्रस्ताव दिला असेल तर तो प्रस्ताव कोणी स्वीकारलय हे स्पष्ट झाल पाहिजे. त्यानी आपली स्वीकृती शब्दात किंवा कृतीने प्रस्ताव कर्त्याला कळविले पाहिजे. अशा प्रस्तावाला सर्वसाधारण प्रस्ताव किंवा खुला प्रस्ताव असे संभोदले जाते. अशा प्रस्तावाना जेव्हा कोणी स्वीकारतो तेव्हा तो प्रस्ताव संपुष्टात येतो. उदा. अ नी वर्तमान पत्रातून जाहिरात दिली की आपल्या हरविलेल्या मुलीचा शोध घेणार्याला रु. २५ हजाराचे बक्षीस दिले जाईल. ब त्या मुलीबद्दल अ ला माहिती देतो. ब ला बक्षीस मिळाली पाहिजे. तसेच एखाद्या समूहासाठी जर प्रस्ताव असेल तर त्या समुहातील कोणीही व्यक्ती तिचा स्वीकार करु शकते परंतू त्या समूहात समावेश होत नसलेली व्यक्ती तो प्रस्ताव स्वीकारु शकत नाही.

1) **स्वीकृती ही विना अट असावी.**

स्वीकृती ही विनाअट असावी. अटी घालून दिलेली स्वीकृती कायदेशीर स्वीकृती ठरत नाही. प्रस्ताव स्वीकारताना एखादी छोटी अट जरी घातली तरी हाती स्वीकृती अवैध ठरते. अटी घालून दिलेली स्वीकृती म्हणजे स्वीकृती नसून उलट नवीन प्रस्ताव समजला जातो. उदा. अ एखादी वस्तू शंभर रुपयांना देण्याचा प्रस्ताव मांडतो. जर ब म्हणाला की मी फक्त रु. ९० देईन तर ही स्वीकृती नसून ब नी मांडलेला नवीन प्रस्ताव आहे.

राम शिवाला विचारतात की, माझा कुत्रा र १०० रुपयांना विकत घेशील का? शिवा म्हणतो घेईन पण त्या साठी तू माझ मांजर ९० रुपयांना विकत घेतले पाहिजे.

वरील उदारणात कराराची पूर्तता होत नाही कारण स्वीकृती ही अटी घालून दिलेली आहे. ती केव्हाही विना अट असणे आवश्यक आहे.

2) **स्वीकृतीची माहिती प्रस्तावकाला दिली गेली पाहिजे.**

फक्त मनात दिलेली स्वीकृती ही स्वीकृती ठरत नाही. परंतु खुल्या प्रस्तावासाठी स्वीकृती कळविण्याची अट नाही. असे प्रस्ताव त्यावर कारवाई करुन स्वीकारता येतात. उदा. मारिया पीटरला सांगतो की तो सिवेनशी लग्न करु इच्छितो.परंतु तो स्टीवेनला या बद्दल काहीही सांगत नाही. तर कराराची पूर्तता होत नाही. स्टीवेन या लग्नाला तयार असली तरीही.

निवाडा: रेल्वे कंपनीला कोळसा पुरविण्याचा प्रस्ताव मिळाला. त्यावर रेल्वेच्या अधिकाऱ्यानी शेरा मारला की प्रस्ताव मान्य आणि प्रस्तावाचा कागद टेबलवरील ट्रे मध्ये ठेवला आणि नंतर त्याबद्दल विसरुन गेला. कोर्टाने निवाडा दिला की कराराची पूर्तता झालेली नाही कारण प्रस्तावाच्या स्वीकृतीची माहिती प्रस्तावकाला दिली गेलेली नाही, परंतु कराराला कोर्टाने नंतर मान्यता दिली कारण ती रेल्वे कंपनी प्रस्तावकाकडून नेहमीच कोळसा खरेदी करीत असे.

५) फक्त मनात दिलेली स्वीकृती कायद्यात स्वीकृती ठरत नाही. न दिलेल उत्तर हे कधीही संमती समजली जात नाही. फक्त मनातून ठरविले आणि संमती प्रत्यक्षात योग्य पद्धतीने प्रस्तावाकाला कळविले नाही तर ती संमती ठरत नाही. संमती स्पष्ट शब्दातून किंवा कृतीतून प्रस्तावकाला कळविले पाहिजे. फक्त मनात केलेला निश्चय संमती ठरत नाही प्रस्तावक अशी अट घालू शकत नाही की तू नकार न कळविल्यास मी तुझी संमती आहे असे गृहीत धरीन." उदा. राम शामला सांगतो की तो कृष्णाच घर विकत घेणार आहे. परंतु राम प्रत्यक्षात कृष्णाला काहीही कळवीत नाही. तर करार पूर्ण होत नाही.

निवाडा: फेल्ट हाऊस वि. बिंद चे १८६२. पुतण्यानी काकाशी त्याचा घोडा विकत घेण्याबद्दल चर्चा केली. त्यांनी काकाना प्रस्ताव दिला की तुम्ही एक आठवडयात जर काहीही कळविले नाही तर मी घोडा माझा झाला अस समजेन, पुढे चुकून घोडा लिलावात विकला गेला. लिलाव करणाऱ्याला असे कळविण्यात आले होते की तो घोडा विकू नको. ही गोष्ट त्याच्या लक्षात राहिली नाही आणि त्यांनी घोडा विकून टाकला. काकानी लिलाववाल्याविरुद्ध खटला भरला. कोर्टापुढे महत्वाचा विषय होता तो म्हणजे मुळात काकानी पुतण्याला घोडा विकला होता का? कोर्टाने विवाडा दिला की घोडयाची पुतण्याला विक्री झालेली नव्हती. त्यांच्यातला करारपूर्ण झालेला नव्हता. काही न बोलणे म्हणजे संमती असे गृहीत धरता येणार नाही.

६) स्वीकृती योग्य शब्दात योग्य पद्धतीने कळविलेली पाहिजे.

प्रस्तावाला संमती ठराविक मुदतीत कळवायची अट असेल तर त्या कालावधीतच स्वीकृती कळविली गेली पाहिजे. स्वीकृती शब्दात मांडता येते किंवा कृतीनेही प्रकट करता येते. पोस्टाने कळविता येते तसेच तार करुन किंवा ई मेलनेही कळविता येते. स्वीकृती कशा पद्धतीने कळवावी हे जर प्रस्तावात दिलेल असेल तर ती त्याच पद्धतीने

कळविली पाहिजे. इतर पद्धतीने कळविल्यास प्रस्तावक त्याच पद्धतीने स्वीकृती कळविण्याचा आग्रह धरु शकतो. परंतु तो जर बराच वेळ गप्पच राहिला तर त्याला स्वीकृती मान्य आहे. असे गृहीत धरले जाते. प्रस्तावकांनी मालाचा ताबा ठरलेल्या जागी देण्याची अट घातलेली असल्यास मालाचा ताबा तिथेच दिला पाहिजे. दुसरीकडे देतो म्हटल तर तो माल स्वीकारण्यास नकार देऊ शकतो.

योग्य पद्धत म्हणजे त्या त्या व्यवसायात वापरात असलेली नेहमीची पद्धत. प्रस्तावक आपला प्रस्तावाला कशी स्वीकृती द्यायची या बद्दल अट घालू शकतो. प्रस्तावक स्वीकृतीच्या पद्धतीबद्दल अटी घालू शकतो. नकार कसा द्यायचा या बद्दल त्याला अटी घालण्याचा अधिकार नाहीत.

७) स्वीकृती योग्य वेळेत कळविली पाहिजे केव्हाही नव्हे

एम ने काही कंपनीचे भाग विकत घेण्याचा प्रस्ताव ९ जूनला मांडला. दुसऱ्या पक्षानी त्याची स्वीकृती २४ नोव्हेंबरला कळविली. एम ने भाग विकत घेण्यास नकार दिला. कारण खूप उशीर झाला होता. योग्य वेळेत जर स्वीकृती कळविली नाही तर प्रस्तावक त्याचा नकार देऊ शकतो.

३.६ प्रश्न

1) प्रस्ताव म्हणजे काय? वैध प्रस्तावासाठी आवश्यक असणार्या गोष्टी सांगा.

2) प्रस्तावाचे विविध प्रकार कोणते?

3) प्रस्तावातील महत्वाच्या गोष्टी विशद करा.

4) प्रस्तावाची स्वीकृती म्हणजे काय?

5) स्वीकृतीतील महत्त्वाच्या घटकांची चर्चा करा.

6) पुढील शब्दांची व्याख्या द्या.

   अ) प्रस्ताव

   ब) वैध प्रस्ताव

   क) एकमेकाविरुद्धचे प्रस्ताव (Cross Offer)

   ड) ठराविक व्यक्तीला दिलेला प्रस्ताव

   इ) गृहीत प्रस्ताव.

❖❖❖❖

४

प्रस्ताव व स्वीकृती कळविणे

घटक रचना :

४.० उद्दिष्टये

४.१ विषय परिचय

४.२ प्रस्ताव कळविण्याची प्रकिया पूर्ण होणे.

४.३ स्वीकृती कळविणे

४.४ प्रस्ताव मागे घेणे (कलम - ५)

४.५ प्रश्न

४.० उद्दिष्टये

या पाठाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्याना पुढील गोष्टींची माहिती मिळेल

- प्रस्ताव कळविण्याची प्रकिया केव्हा पूर्ण होते?
- प्रस्ताव व स्वीकृती कळविणे.
- प्रस्ताव मागे घेण्याबद्दल चर्चा

४.१ विषय परिचय

दुसऱ्या पक्षाला प्रस्ताव कळविणे आवश्यक आहे. तरच ती व्यक्ती त्याचा विचार करुन त्याची स्वीकृती करावयाची किंवा नाही या बद्दल निर्णय घेऊ शकते आणि स्वीकारायचे ठरले तर पुढे कराराची पूर्तता करणे शक्य होते.

प्रस्ताव ज्याच्यासाठी आहे त्याला त्याची माहिती दिली गेली पाहिजे. तरच प्रस्तावाला अर्थ प्राप्त होतो. प्रस्ताव जर पोस्टामार्फत पाठविला तर ते पत्र त्या माणसाला मिळेपर्यंत प्रस्तावाला अर्थ प्राप्त होत नाही. म्हणजेच जेव्हा त्याला त्याची माहिती मिळते. जेव्हा पत्र पोस्टात टाकल तेव्हा नव्हे.

४.२ प्रस्ताव कळविण्याच्या प्रक्रियेची पूर्तता

प्रस्ताव कळविण्याच्या प्रक्रियेची पूर्तता तेव्हाच होते जेव्हा त्या दुसऱ्या व्यक्तीला प्रस्ताव प्राप्त होतो. पोस्टाने जर पत्राद्वारे प्रस्ताव पाठविला तर ज्या वेळी त्याला पत्र पोहचते तेव्हाच प्रस्ताव कळविण्याच्या प्रक्रियेची पूर्तता होते. उदा. चेन्नईतला शंकरानंद मधुराई मधील रामला पत्रानी कळवितो की तो आपली कार १ लाख रुपयांना विकायला तयार

आहे. १ जानेवारीला हे पत्र पोस्टात पडत आणि ते पत्र रामला ७ जानेवारीला मिळते. इथे प्रस्ताव कळविण्याची प्रक्रिया ७ जानेवारीला पूर्ण होते.

इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की प्रस्ताव प्रत्यक्ष पोहचण्यापूर्वी जर त्याला स्वीकृती दिली तर ती स्वीकृती वैध ठरत नाही. उदा. लालमन वि गौरी दत्त दत्तनी आपला नोकर हरविलेल्या पुतण्याचा शोध घेण्यासाठी पाठविले. नोकर शोधायला गेल्यानंतर यांनी पुतण्याचा शोधून आणणार्यासाठी बक्षीस जाहीर केली. नोकराला पुतण्याचा शोध लागला आणि त्यानी मालकाकडे बक्षीसाची मागणी केली. कोर्टाने निवाडा दिला की नोकराला बक्षीस देणे बंधनकारक नाही कारण नोकरानी जेव्हा पुतण्याचा शोध लावला तेव्हा त्याला बक्षीसाची माहिती नव्हती. थोडक्यात प्रस्तावाची माहिती नसताना केलेली त्याची स्वीकृती वैध ठरत नाही.

प्रस्ताव म्हणजे एखादी गोष्ट काही अटीखाली करण्याची इच्छा प्रकट करणे होय. त्याचा स्वीकार झाला तरच कराराची पूर्तता होते.

४.३ स्वीकृतीची माहिती देणे

पुढील उदाहरणावरून आपण प्रस्ताव व स्वीकृती पूर्ण कशी व कधी होते याचा अभ्यास करु या.

आग्रामधील राम दिल्लीतील रहीमला पत्राने कळवितो की तो त्याची कार १ लाख रुपयांना विकायला तयार आहे. हे पत्र १ जानेवारीला पोस्टात पडले आणि रहीमला ७ जानेवारी रोजी मिळाले. रहीम या प्रस्तावाच्या स्वीकृतीच पत्र १० जानेवारीला पोस्टात टाकतो. ते पत्र रामला १५ जानेवारीला मिळत. आता पुढील प्रश्नांना उत्तरे द्या.

अ) प्रस्ताव कळविण्याची प्रक्रिया केव्हा पूर्ण झाली? उत्तर :७ जानेवारीला

ब) रामाच्या दृष्टीकोनातून स्वीकृतीची प्रक्रिया कधीपूर्ण झाली? १० जानेवारीला

क) रहीमच्या दृष्टीने स्वीकृती पोहचविण्याची प्रक्रिया कधी पूर्ण झाली? १५ जानेवारीला.

ड) जर ८ जानेवारीचा राम तारेने रहीमला कळवितो की त्यांनी प्रस्ताव रद्द केले आहे किंवा मागे घेतलेला आहे. ही तार जर रहीमला १० तारखेच्या आधी मिळाली तर प्रस्ताव मागे घेतल्याची कृती वैध ठरते काय? होय.

इ) १४ जानेवारीला जर रहीम तार करुन कळवितो की त्यांनी स्वीकृती मागे घेतलेली आहे. आणि ही तार रामला पत्राआधी मिळते. तर स्वीकृतीची माघार वैध ठरते काय? होय.

प्रस्तावकाच्या दृष्टीकोनातून-

स्वीकृती कळविण्याची प्रक्रिया प्रस्तावकाच्या बाजूने केव्हा पुर्ण होते? जेव्हा स्वीकार कर्ता पत्र पोस्टात टाकतो तेव्हा त्या तारखेला कराराची पूर्तता होते. पत्र प्रस्तावकाला

मिळालेल असो किंवा नसो. परंतु प्रस्तावकाची ही जबाबदारी निर्माण होते फक्त जेव्हा योग्य पत्र लिहून पुरेस पोस्टेज लावून पत्र पोस्टात टाकल जात. पत्र पोस्टाच्या पेटीत टाकल्या नंतरच प्रसतावकावर त्याची जबाबदारी येते.

स्वीकृती देणाऱ्याच्या दृष्टिकोनातून -

जेव्हा स्वीकृतीची प्रस्तावकाला मिळते तेव्हा ती स्वीकृती दाराच्या दृष्टीकोनातून स्वीकृतीची प्रक्रिया पूर्ण होते. उदा. अ चा प्रस्ताव ब पोस्टाने पत्र पाठवून स्वीकारतो. जेव्हा पत्र पोस्टाच्या पेटीत टाकल जात तेव्हा प्रस्तावाची स्वीकृती अ च्या बाजूने पूर्ण होते व जेव्हा ते पत्र ब ला मिळते तेव्हा ती प्रक्रिया ब च्या बाजूने पूर्ण होते.

जर स्वीकृती टेलिफोन टेलेक्स किंवा फॅक्सद्वारे कळविली जाते तेव्हा जेव्हा त्याची माहिती प्रस्तावकाला मिळते तेव्हा ती प्रक्रिया पूर्ण होते. प्रस्तावकाला स्वीकृती प्राप्त झाली किंवा कोणत्या ही पद्धतीने मिळाली की कराराची पूर्तता होते.

४.४ प्रस्ताव मागे घेणे (कलम ५)

४.४.१ अर्थ :

प्रस्ताव मागे घेणे म्हणजेच करारातू माघार घेणे किंवा आपले विचार बदलणे.

प्रस्ताव केव्हा परत घेता येतो?

प्रस्तावकाला स्वीकृती प्राप्त होण्याआधी किंवा स्वीकृती कळविण्याची प्रक्रिया त्याच्या दृष्टीने पूर्ण होण्यापर्यंत आपला प्रस्ताव परत घेता येतो. नंतर नाही. कारण प्रस्तावाला दुसऱ्या पक्षानी संमती दिली म्हणजे कराराची पूर्तता होते. तसेच दिलेली स्वीकृती स्वीकृतीदराच्या दृष्टीकोनातून पूर्ण व्हायच्याआधी केव्हाही परत घेता येते. त्यानंतर नाही. उदा. यमीन नी यासरला पत्रद्वारे पाठविलेला प्रस्ताव जर यासरनी पत्रद्वारेच स्वीकारला तर यासरने स्वीकृतीच पत्र पोस्टात टाकण्याआधी यमीन आपला प्रस्ताव मागे घेऊ शकतो किंवा रद्द करु शकतो. पत्र पोस्टात पडल्या नंतर त्याला प्रस्ताव परत घेता येणार नाही. उदा. अ ब ला आपल घर विकण्याचा प्रस्ताव पोस्टाने पाठवितो आणि ब या प्रस्तावाला पोस्टानेच स्वीकृती कळवितो. ब त्याची स्वीकृतीच पत्र पोस्टात टाकेपर्यंत अ आपला प्रस्ताव परत घेऊ शकतो नंतर नाही. ब आपण दिलेली स्वीकृती अ ला मिळवण्याआधी केव्हाही तारेने किंवा फोनवर स्वीकृतीमागे घेऊ शकतो. अ ला पत्र मिळाल्या नंतर नाही.

४.४.२ प्रस्ताव मागे घेण्याच्या विविध पद्धती

१. माघार घेतल्याची सूचना देऊन :

प्रस्तावकाच्या बाजूने स्वीकृतीची प्रक्रिया पूर्ण होण्याआधी केव्हाही सूचना देऊन, प्रस्ताव मागे घेता येतो. पत्राने पाठविलेल्या प्रस्ताव तोंडी कळवूनही परत घेता येतो.

प्रस्ताव स्पष्ट शब्दातच परत घेण्याची आवश्यकता नाही परंतु प्रस्ताव परंतु घेतल्याची माहिती दुसऱ्या पक्षाला दिली गेली पाहिजे.

२) उशीर करुन :

प्रस्तावकानी ठराविक मुदत दिली असेल तर त्या मुदतीत स्वीकृती न देणे म्हणजेच प्रस्ताव नाकारणे. मुदत जर दिली नसेल तरीसुद्धा खूप उशीर करणे म्हणजे सुध्दा नाकारणेच होय. किती दिवसांचा उशीर चालेल हे इतर परिस्थितीवर अवलंबून असते. उदा सोन्याच्या व्यापारात रोज दरात चढउतार होत असल्यामुळे थोडासा उशीर ही अक्षम्य ठरतो.

३) प्रस्तावात जर काही पूर्व अट असेल तर ती अट पूर्ण न करणे म्हणजे प्रस्ताव नाकारणेच होय :

प्रस्तावकानी जर काही पूर्व अट प्रस्तावात घातलेली असेल तर त्या अटीची पूर्तता न करणे म्हणजे प्रस्ताव नाकारणेच ठरते. कारण प्रस्तावातच ती अट असते. उदा. अ ब ला काही माल विकण्याचा प्रस्ताव देतो परंतु त्यात ब नी ठरलेली काही रक्कम एखाद्या तारखे आधी दिली पाहिजे ती जर दिली नाही तर प्रस्ताव आपोआप रद्द होता.

४) प्रस्तावक मरण पावल्यास किंवा त्याला मध्यंतराच्या काळात वेड लागल्यास.

अशावेळी त्याच्या मरणाची किंवा तो वेडा झाल्याची गोष्ट स्वीकृती दाराला कळलेली असली पाहिजे.

५) प्रति प्रस्ताव मांडून (Counter offer)

जेव्हा दुसरा पक्ष प्रस्ताव नाकारतो किंवा आपला असा वेगळा प्रस्ताव मांडतो तेव्हा पहिला प्रस्ताव आपोआप रद्द ठरतो. किंवा स्वीकृतीदारांनी जर एखादी अट घालून स्वीकृती दिली तर तो प्रति प्रस्तावच ठरतो.

६) प्रस्तावकानी जर स्वीकृती कशी द्यावी या बद्दल काही पद्धत नेमून दिली असेल तर त्या पद्धतीने स्वीकृती न देणे म्हणजे प्रस्ताव नाकारणेच ठरते.

७) प्रस्ताव बेकायदेशीर ठरुन

प्रस्ताव मांडल्यानंतर त्याची स्वीकृती मिळण्याआधी जर सरकारने नवीन कायदा पास करुन प्रस्ताव बेकायदेशीर ठरविला तरीही प्रस्ताव आपोआप रद्द होतो. उदा. अ नी ब ला जो दुसऱ्या राज्यात राहतो १० पोती गहू विकण्याचा प्रस्ताव दिला परंतु त्यांनी स्वीकृती कळविण्या आधी राज्य सरकारानी राज्याबाहेर गहू विकण्यावर बंदी घातली तर प्रस्ताव बेकायदेशीर ठरुन रद्द होतो.

४.४.३ स्वीकृती रद्द करणे :

स्वीकृतीदाराच्या दृष्टीने स्वीकृतीची प्रक्रिया पूर्ण होण्याआधी केव्हाही त्याला ती परत घेता येते. त्यानंतर मात्र नाही. उदा. शहीद बिलालला आपल दुकान विकायच असल्याच पोस्टाने कळवितो आणि ते दुकान आपण विकत घेत असल्याच बिलाल शहिदला पोस्टानेच कळवितो. शहीद आपला प्रस्ताव बिलाल त्याच स्वीकृतीच पत्र पोस्ट करण्याआधी केव्हाही परत घेऊ शकतो. त्यानंतर नाही.

बिलाल आपण दिलेली स्वीकृतीच पत्र शहीदला मिळण्याआधी केव्हाही फोन किंवा तार करुन परत घेऊ शकतो. त्यानंतर नाही.

४.४.४ प्रस्ताव व स्वीकृती माघार घेण्याची वेळ

प्रस्तावक आपला प्रस्ताव दुसऱ्या पक्षानी स्वीकारे पर्यंत परत घेऊ शकतो. त्यानंतर नाही. उदा. अ आपल घर विकायच असल्याचा प्रस्ताव ब ला पत्रद्वारे कळवितो. अ पत्र १ जुलैला पाठवितो आणि ब ४ जुलैला प्रस्तावाच्या स्वीकृतीच पत्र पोस्टात टाकतो. अ ला ते पत्र ६ जुलैला पोहचते.

- अ आपला प्रस्ताव ४ जुलै पर्यंत परत घेऊ शकतो.
- अ ला ते पत्र मिळेपर्यंत म्हणजे ६ जुलैपर्यंत ब आपली स्वीकृती रद्द करु शकतो.

४.४.५ परत घेतल्याची माहिती देणे

प्रस्ताव परत घेण्याचे पत्र पाठविल्या नंतर तो परत घेण्याचा विचार त्याला परत बदलता येत नाही. परंतु घेतलेली माघार दुसऱ्या पक्षाला प्राप्त झाल्यानंतरच त्याच्यावर बंधनकारक ठरत. स्वीकृतीच पत्रत्यांनी पाठविण्याआधीच त्याला प्रस्ताव रद्द केल्याच पत्र मिळाले तरच प्रस्ताव रद्द होतो.

४.५ प्रश्न

1) प्रस्तावाची माहिती देणे म्हणजे काय? संबंधित निवाडा देऊन कल्पना स्पष्ट करा.

2) प्रस्तावाची माहिती देणे का आवश्यक आहे?

3) संक्षिप्त टीपा लिहा.

   अ) स्वीकृती रद्द करणे.

   ब) प्रस्ताव परत घेण्याच्या विविध पद्धती.

❖❖❖❖

५

करार करण्यास पात्रता - सक्षम व्यक्ती
(कलम १० ते १२)

घटक रचना :

५.० उद्दिष्टये

५.१ विषय परिचय

५.२ अज्ञान व्यक्तीची व्याख्या आणी त्याच्या बरोबर केलेल्या कराराचे परिणाम

५.३ वेडया व्यक्तीशी किंवा मानसिक संतुलन बिघडलेल्या व्यक्तीशी केलेला करार

५.४ करार करण्यास पात्रता - करार करण्यास अपात्र ठरविण्यात आलेली व्यक्ती

५.५ प्रश्न

५.० उद्दिष्टये

या पाठाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्यांना पुढील गोष्टींची माहिती मिळेल.

- अज्ञान व्यक्तीचा अर्थ व त्याच्याशी केलेल्या कराराचे परिणाम.
- करार सक्षम व्यक्ती. करार करण्यासाठीची पात्र नसलेल्या मानसिक संतुलन बिघडलेल्या व्यक्तीशी केलेले करार व अशा करारांचे परिणाम.
- करार करण्यास पात्रता या विषयाची महिती करुन घेणे.

५.१ विषय परिचय

करार वैध ठरवण्यासाठी ज्या व्यक्तीमध्ये करार होतो ती व्यक्ती करार करण्यास पात्र किंवा सक्षम असणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे प्रत्येक व्यक्ती करार करण्यास पात्र समजली जाते. परंतु काही व्यक्ती मात्र करार करण्यास अपात्र समजले जातात. कारण त्यांच वय आवश्यकतेपेक्षा कमी असते किंवा त्यांना करारातील अटी समजून घेणे शक्य नसते. त्यामुळे ती व्यक्ती दुसऱ्या बरोबर व़ैध करार करु शकत नाही.

कायद्यातील कलम ११ मध्ये करार करण्यास कोणती व्यक्ती सक्षम आहे. या बद्दलच्या तरतुदी आहेत.'प्रत्येक व्यक्ती जी त्याला लागू असणाऱ्या कायद्याखाली सज्ञान वयाची असते व जी वेडा नाही व करार करण्यास अपात्र ठरविण्यात आलेली नाही ती करार करु शकते.

म्हणून कलम १० प्रमाणे सक्षम व्यक्तीमधील सर्व ठराव हे करार ठरतात. कलम १० प्रमाणे करार करणारी व्यक्ती सक्षम असणे मात्र आवश्यक आहे.

कलम ११ प्रमाणे पुढील प्रत्येक व्यक्ती करार करण्यास पात्र आहे.

- त्याला लागू असलेल्या कायद्या प्रमाणे सज्ञान वयाची (१८ किंवा २१ वर्षे) आहे.
- ज्याला समज आहे म्हणजेच ज्याच मानसिक संतुलन बिघडलेल नाही.
- जिला कोणत्याही कायद्याखाली करार करण्यास अपात्र घोषित केलल नाही.

म्हणून पुढील व्यक्ती करार करण्यास अपात्र ठरविण्यात आलेल्या आहेत:-

1) अज्ञान व्यक्ती - वयाने लहान.

2) वेडी व्यक्ती

1) कोणत्याही कायद्याने त्या व्यक्तीला करार करण्यास अपात्र जाहीर केलेल्या आहेत.

पुढील प्रत्येक व्यक्ती करार करण्यास अपात्र समजली जाते

अ) वयाने लहान व्यक्ती

ब) मानसिक संतुलन बिघडलेली व्यक्ती

क) कोणत्याही कायद्याखाली करार करण्यास अपात्र घोषित करण्यात आलेली व्यक्ती

वरील व्यक्ती करार करण्यास अपात्र असले तरीही काहीवेळा ती व्यक्ती काही करार करतात. जसे पैसे उसने घेणे किंवा कर्ज घेणे, त्यांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे किंवा अशा व्यक्तीच्या हिताच्या काही गोष्टी इतरानी करणे अशा करारांची चर्चा पुढे करण्यात आलेली आहे.

५.२ अज्ञान व्यक्तीची व्याख्या व त्या सोबत केलेल्या करारांचे परिणाम

५.२.१ अज्ञान व्यक्तीचा अर्थ :

ज्या व्यक्तीनी सज्ञानतेच वय पूर्ण केलेल नाही ती व्यक्ती अज्ञान व्यक्ती समजण्यात येते. सज्ञान कोणाला म्हणाव या बद्दलच्या तरतूदी सज्ञान संबंधीच्या १८७५ च्या कायद्यातील कलम ३ मध्ये आहेत. त्याप्रमाणे सर्व साधारणपणे १८ वर्षाच वय पूर्ण झालेली व्यक्ती सज्ञान समजली जाते. परंतु ज्या व्यक्तीच्या मालमत्तेच्या सुरक्षेसाठी कोर्टाने पालक नेमलेला आहे. अशा व्यक्तीनी मात्र वयाची २१ वर्षे पूर्ण करणे आवश्यक आहे.

५.२.२ अज्ञान व्यक्तीने केलेल्या कराराचे परिणाम :-

अज्ञान व्यक्ती बरोबर केलेला करार हा मुळातच व्यर्थ असतो. त्याचे काहीही परिणाम होत नाही.

१) अज्ञान व्यक्तीने किंवा अज्ञान व्यक्तीशी केलेला करार हा व्यर्थ करार ठरतो.

कलम १० प्रमाणे करार करणारी व्यक्ती करार करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. कलम ११ मध्ये स्पष्टपणे नमूद केलेल आहे की अज्ञान व्यक्ती करार करण्यास अपात्र आहे. १९०३ पर्यंत असे करार व्यर्थ की व्यर्थनीय करार आहेत याबद्दल विविध कोर्टाच्या मतात मत भिन्नता होती. परंतु १९०३ मध्ये प्रीव्ही कौन्सिलने स्पष्ट केले की अज्ञान व्यक्तीशी केलेला करार हा मुळातच व्यर्थ असतो. अज्ञान व्यक्ती ही करार करुच शकत नाही.

या विषयावरील महत्वावा निवाडा म्हणजे मोहरीबीबी वि. धर्मादास घोष (१९०३). अ या अज्ञान व्यक्तीने ब कडून रु २०,००० उसने घेतले. आणि कर्ज घेताना काही मालमत्ता तारण ठेवली. पुढे २ महिन्यानी ती व्यक्ती सज्ञान झाली आणि आपण अज्ञान असताना केलेला तारण करार रद्द करण्याची कोर्टाला विनंती केली. कोर्टाने निर्णय दिला की तो तारण व्यवहार रद्द होतो आणि अज्ञान व्यक्तीने केलेला करार मुळातच व्यर्थ असल्यामुळे अज्ञान व्यक्तीने केलेला करार मुळातच व्यर्थ असल्यामुळे अज्ञान व्यक्तीने घेतलेले उसने पैसे ही त्यांनी परत करण्याची आवश्यकता नाही.

२) अशा करारांना पूर्वलक्षी संमतीही (Ratificatication) देता येत नाही.

अज्ञान व्यक्तीशी केलेला करार हा मुळातच व्यर्थ ठरतो. त्यामुळे त्याला ती व्यक्ती सज्ञान झाल्यानंतर पूर्वीच्या कराराला पूर्वलक्षी संमती देऊ शकत नाही. करार करताना सक्षम नसलेली व्यक्ती नंतर सक्षम झाल्यावर त्याला पूर्वलक्षी संमती देऊ शकत नाही.

परंतु जर सज्ञान झाल्यावर नवीन प्रतिफल घेऊन नवा करार केला तर तो मात्र वैध करार ठरतो.

३) अज्ञान व्यक्तीला मात्र कराराचा फायदा मिळू शकतो किंवा तो लाभार्थी बनू शकतो.

म्हणजे एखाद्या कराराने जर त्याला काही लाभ मिळणार असेल तर तो लाभ तो मागून घेऊ शकतो. ती व्यक्ती लाभार्थी बनायला कायद्याने बंदी नाही. त्यामुळे अज्ञान व्यक्ती काही मालमत्ता खरेदी करु शकते व त्याची योग्य किंमत अदाकरुन त्याचा ताबा मिळविण्यासाठी कोर्टात जावू शकते.तसेच एखाद्या अज्ञान व्यक्तीच्या नावे जर कोणी वचन चिठ्ठी (Promissory Note) दिली असेल तर त्यातील पैसे ती व्यक्ती मागून घेऊ शकते.

४) खोटी माहिती देण्यावर बंधने नाहीत

समजा एखाद्या अज्ञान व्यक्तीने आपण सज्ञानी आहोत असे भासवून जरी करार केला तरीही ती व्यक्ती त्या कराराने बाधली जात नाही. त्याच्या फसवणूकीच्या अधिकारावर कायदेशीर बंदी नाही. त्याच्याशी करार करणाऱ्यानी आपली फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी.

५) मुलकी गुन्हे माफ नाही.

करार संबंधाव्यतिरिक्त इतर प्रकारच्या मुलकी गुन्हयांना (Tort-Civil-wrong) अज्ञान व्यक्तीला कायद्याने सूट दिलेली नाही. एका अज्ञान व्यक्तीने घोड मागून घेतला आणि तो मित्राला वापरायला दिला. मित्राने त्या घोडयावर उडी मारली आणि घोडा मेला. अज्ञान व्यक्तीने करार भंग केला म्हणून त्याला त्यासाठी जबाबदार धरता येणार नाही अशाप्रकारे तुम्ही करारभंगाला मुलकी गुन्हयाचे स्वरुप देऊ शकत नाही.

६) नादार घोषीत करता येत नाही.

अज्ञान व्यक्ती करार करु शकत नसल्यामुळे त्याची जी काही देणी असतील ती त्याच्या नावाने असलेल्या मालमत्तेतून भागविता येतात, त्या देणीसाठी ती व्यक्ती व्यक्तिश: जबाबदार राहत नाही म्हणून त्या व्यक्तीला नादार जाहीर करता येत नाही.

७) भागीदारी

अज्ञान व्यक्ती करार करु शकत नसल्यामुळे भागीदारीत भागीदार बनू शकत नाही. परंतु कलम ३० प्रमाणे अज्ञान व्यक्तीला भागीदारीचे फक्त फायदे मिळू शकतात.

८) अज्ञान व्यक्ती प्रतिनिधी (Agent) बनू शकते.

अज्ञान व्यक्ती प्रतिनिधी म्हणून काम करु शकते. परंतु ती त्याच्या कृतीसाठी नियोक्ताला जबाबदार राहत नाही. अज्ञान व्यक्ती चलनक्षम दस्ताऐवज बनवू शकते किंवा त्याचे हस्तांतर करु शकते, परंतू त्यासाठी ती स्वत: जबाबदार राहत नाही.

५.३ वेडया व्यक्तीशी केलेले करार

या आधी कलम ११ मध्ये सांगितल्या प्रमाणे करार करणाऱ्या प्रत्येक व्यक्ती मानसिकदृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे वेडया व्यक्तीशी करार करता येत नाही.

५.३.१ मानसिक सक्षमतेची व्याख्या कायद्याने कलम १२ मध्ये दिलेली आहे. मानसिक क्षमता म्हणजेच करार करताना व्यक्तीला करारातील अटी समजून घेण्याची क्षमता असली पाहिजे, त्याचे आपल्यावर काय परिणाम होतील हे समजण्याची त्याच्याकडे क्षमता असली पाहिजे.

- म्हणून करार करणारी व्यक्ती ही अशी पाहिजे की ज्याला त्यातील अटी समजल्या पाहिजेत
- आपण काय करतोय ते योग्य आहे हे त्या व्यक्तीला पटले पाहिजे. त्याबद्दलचा निर्णय घेण्याची क्षमता त्याच्या जवळ पाहिजे.

व्यक्तीच्या वेडाचेही काही प्रकार असतात.

1) काही व्यक्ती नेहमी वेडे असतात परंतु ते काहीवेळा शहण्यासारखे वागतात. अशा व्यक्ती आपल्या शहाणपणाच्या काळात वैध करार करु शकतात. त्यामुळे वेडयांच्या रुग्णालयातील एखादी व्यक्ती शहाणा असण्याच्या काळात करार जरुर करु शकते.

2) काही व्यक्ती नेहमी शहण्यासारखी वागतात परंतु त्यांना काही वेळा वेडाचे झटके येतात अशी व्यक्ती त्या काळात करार करू शकत नाही. तसेच एखाद्या व्यक्तीच्या अंगात खूप ताप आहे आणि त्यामुळे भ्रिमष्ठ झालेली आहे आणि तिला करारातील अटी समजून घेण अशावेळी शक्य नाही तेव्हा तसेच जी व्यक्ती दारूच्या नशेत आहे व त्याला आपल्या हिताचे निर्णय घेण्याच भान नाही अशा काळात ती व्यक्ती करार करु शकत नाही.

इॅलस्बरीच्या पुस्तकात त्यांनी स्पष्ट केलेले आहे की वेडया माणसाशी वैध करार करता येणार नाही.

५.३.२ मानसिक संतुलन काही कारणामुळे बिघडू शकते.

काही माणस जन्मत: वेडी असतात.त्यांना आपल्या हिताची जाणीवच नसते अशी माणस केव्हाही योग्य निर्णय घेऊ शकत नाहीत त्यांच्या मेंदूची वाढ योग्य पद्धतीने झालेली नसते.

काही व्यक्ती काही विशिष्ट घटनामुळे नंतरच्या आयुष्यात मनाचा तोल गमवतात हा मेंदूचा आजार आहे. अती मानसिक तणाव अशा गोष्टीना कारणीभूत होऊ शकतो. अशी व्यक्ती काही वेळा शहाणपणाने वागू शकतात.

दारुडे :- दारुच्या अतिसेवनामुळे मेंदूवर परिणाम होऊ शकतो. नशेतील व्यक्ती करारातील अटी समजून घेऊ शकत नाही. अशा वेळी त्या व्यक्तीशी केलेला करार व्यर्थ ठरतो. परंतु काही व्यक्तींच्या मेंदूवर दारुचा फारसा परिणाम होत नाही. दारुच्या नशेतही त्यांची निर्णय क्षमता अबाधित असते. अशा व्यक्ती नशेत असतानाही वैध करार करु शकतात. कारण करारातील अटी त्यांना समजलेल्या असतात. फक्त दारु प्यालेले आहेत म्हणून ते करार करण्यास अपात्र ठरत नाहीत.

संमोहन शास्त्राच्या आधारेही एखाद्या व्यक्तीच्या मेंदूवर परिणाम केला जाऊ शकतो.

५.३.३ मानसिक दृष्टया सक्षम नसलेल्या व्यक्तीशी केलेले करार.

अज्ञान व्यक्तीशी केलेल्या कराराप्रमाणेच अशा व्यक्तीशीही केलेले करार पूर्णपणे व्यर्थ ठरतात. त्यांचा परिणाम शून्य असतो.

परंतु अशा व्यक्तीला जर जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा केला तर त्याचे पैसे त्याच्या नांवे असलेल्या मालमत्तेतून केव्हाही वसूल करता येतात. (कलम ६८)

५.४ करार करण्यास अपात्र जाहीर केलेली व्यक्ती

काही विशिष्ट कायद्याखाली काही व्यक्तीना काही काळासाठी करार करण्यास अपात्र घोषित करण्यात येते.

उदा.

१) शत्रू राष्ट्रातील व्यक्ती

भारतात असलेली परदेशी नागरिक शांततेच्या काळात आपल्या देशातील नागरिका बरोबर विशिष्ट नियमांचे पालन करुन करार करु शकतात. परंतु ज्या देशाने भारताविरुद्ध युद्ध जाहीर केलेल आहे, त्या युद्धाच्या काळात त्या देशाच्या नागरिकांना आपल्य देशातील व्यक्तीशी करार करता येणार नाही. थोडक्यात शत्रु राष्ट्राच्या नागरिकांमध्ये वैध करार होऊ शकत नाही.

२) परदेशी राजे व प्रतिनिधी (आयुक्त ambassadors)

परदेशातील राजे, राज्य प्रमुख किंवा आयुक्त यांच्याशि करार जपून करावा कारण अशा लोकांच्या विरुध्द आपल्या देशात सहजपणे कोर्टात केस घालता येत नाही. त्यासाठी विशिष्ट कार्य पद्धतीचा अवलंब करावा लागतो. त्यासाठी केंद्र सरकारची वगैरे परवानगी घ्यावी लागते. आंतराष्ट्रीय कायद्याने अशा व्यक्तीना खास सवलती बहाल केलेल्या आहेत सर्वसाधारणपणे अशा व्यक्तींशी करार कराता येत नाही.

५.५ प्रश्न

1) व्यक्तीच्या करारपात्रतेविषयी थोडक्यात चर्चा करा.

2) संक्षिप्त टीप तयार करा - वेडया माणसाशी करार करणे.

❖❖❖❖

६

प्रतिफल
(CONSIDERATION)
कलम २ (२५)

घटक रचना :

६.० उद्दिष्टये

६.१ विषय परिचय

६.२ प्रतिफलाचा अर्थ आणि व्याख्या

६.३ प्रतिफल नाही तर करार नाही

६.४ प्रतिफलाचे प्रकार

६.५ कराराशी संबंध नसलेली व्यक्ती आणि प्रतिफलाशी संबंध नसलेली व्यक्ती.

६.६ प्रश्न

६.० उद्दिष्टये

या पाठाच्या अभ्यासानंतर पुढील गोष्टी स्पष्ट होतील.

- प्रतिफलाचा अर्थ व व्याख्या
- प्रतिफलाला आवश्यक गोष्टी
- प्रतिफला शिवाय वैध ठरणारे करार.
- प्रतिफलाचे विविध प्रकार.
- कराराशी संबंध नसलेली व प्रतिफलाशी संबंध नसलेल्या व्यक्तीचा अर्थ

६.१ विषय परिचय

कोणत्याही कराराचा पाया म्हणजे प्रतिफल. प्रतिफलासाठी केलेल्या कराराचीच अंमलबजावणी कायद्याने होऊ शकते. जेव्हा एखादी व्यक्ती काही करण्याचे वचन देते तेव्हा तेव्हा त्याला त्या बदलात दुसरी काही गोष्ट प्राप्त होणे अपेक्षित आहे. हे जे दिलेल्या वचनाच्या बदल्यात मिळणार आहे त्यालाच प्रतिफल म्हणतात. प्रतिफल हा कराराचा आत्मा आहे.

दिलेल वचन कायद्याने बंधनकारक ठरावयाचे असल्यास त्यास प्रतिफल असणे आवश्यक आहे. प्रतिफला शिवाय वचनाची पूर्तता कायद्याप्रमाणे होऊ शकत नाही.

प्रतिफला शिवाय दिलेल वचन व्यर्थ ठरते. त्याचा परिणाम शून्य. उदा. अ नी जर ब ला काहीही न करता रु. १,००० देण्याच वचन दिले तर त्यातून ब ला कोणतेही अधिकार प्राप्त होत नाहीत.

कोणताही करार संबधितावर बंधनकारक ठरण्यासाठी त्यात वैध प्रतिफलाची तरतूद असणे आवश्यक आहे. प्रतिफला शिवाय वचनाची पूर्तता कायद्याप्रमाणे होऊ शकत नाही. प्रतिफला शिवाय दिलेल वचन व्यर्थ ठरते. त्याचा परिणाम शून्य उदा. अ नी जर ब ला काहीही न करता रु. १,०००/- देण्याचे वचन दिल तर त्यातून ब ला कोणतेही अधिकार प्राप्त होत नाहीत.

कोणताही करार संबंधितावर बंधनाकारक ठरवण्यासाठी त्यात वैध प्रतिफलाची तरतूद असणे आवश्यक आहे. प्रतिफल म्हणजे दोनही पक्षानी जे काही करण्याचे वचन दिले असेल त्याची किंमत म्हणता येईल. प्रतिफलाशिवाय वैध करार बनूच शकत नाही. उदा. समजा अनिलनी भानूशी फुकटात त्याची कार घेण्याचा करार केला. इथे वैध करारच नाही. कारण प्रतिफल शून्य आहे.

अंजूने मंजूशी तिची कार रु. ८०,०००/- ला विकत घेण्याचा करार केला तर मोटार कार हे अंजूला मिळालेल प्रतिफल तर रु. ८०,०००/- किंमत ही मंजूला करारातून मिळालेल प्रतिफल. त्यामुळे हा करार वैध करार ठरतो प्रतिफलासाठीचा Consideration हा शब्द लॅटिन Quid Pro Quo शब्दासाठी आहे ज्याचा अर्थ काही तरी फळ असा होतो. किंवा दिलेल्या वचनाची ती किंमत असते.

६.२ प्रतिफलाचा अर्थ व व्याख्या

६.२.१ अर्थ व व्याख्या

करार संबधीच्या कायद्यातील कलम २ (ड) मध्ये प्रतिफलाची व्याख्या देण्यात आलेली आहे.

जेव्हा प्रस्तावकाच्या इच्छेनुसार प्रस्तावत्याने किंवा दुसऱ्या व्यक्तीने एखाचे कृत्य केले आहे किंवा केले नाही करीत आहे किंवा करीत नाही किंवा करण्याचे किंवा न करण्याचे वचन दिले आहे किंवा करण्याचे किंवा न करण्याचे वचन दिले आहे तेव्हा अशा केलेल्या किंवा न केलेल्या कृत्याला किंवा त्याबद्दलच्या वचनास प्रतिकल असे म्हणतात

कलम २३ मध्ये तरतूद आहे की प्रतिफला शिवायचा ठराव व्यर्थ आहे.

प्रतिफलाची व्याख्या अनेकांनी वेगवेळया शब्दात केलेली आहे. पोल्लोक यांच्या मते प्रतिफल म्हणजे दिलेल्या वचनाची किंमत होय.

व्याख्येवरुन प्रतिफलाचा अर्थ पुढील प्रमाणे सांगता येईल:-

1) प्रतिफलातील कृत्य हे प्रस्तावकाच्या इच्छेवरुन केलेले असावे. कोणत्याही तिर्हाईत व्यक्तीच्या इच्छेवरुन केलेले कृत्य प्रतिफल ठरत नाही.

2) प्रस्तावत्याने किंवा त्याच्यावतीने दुसऱ्या एखादया व्यक्तीने कृत्य केले पाहिजे.

3) प्रतिफलाचे कृत्य भूतकाळात वर्तमानकाळात किंवा भविष्य काळात करता येते. प्रतिफल हे एखादे कृत्य करण्यासाठी असते किंवा न करण्यासाठी सुद्धा असू शकते.

4) प्रतिफलाच्या कृतीला व्यवहारात काही किंमत असली पाहिजे. ती फक्त काल्पनिक कृती असून चालणार नाही.

5) प्रतिफल तुल्यबळ असले पाहिजे असे नाही. परंतु त्याला काही किंमत जरुर असली पाहिजे.

6) प्रतिफल हे कायदेशीर असावे.

उदा. अ ब ला रु. १ हजाराला आपला घोडा विकण्यास तयार होतो. इथे अ ला घोडयाच्या बदलात मिळणारे रु.१ हजार हे प्रतिफल तर पैशाच्या बदल्यात मिळणारा घोडा हा ब चा प्रतिफल होय.

६.२.२ प्रतिफल वैध ठरण्यासाठी पुढील गोष्टींची आवश्यकता आहे :

कोणत्ताही करार प्रतिफला शिवाय पूर्ण होऊ शकत नाही. प्रतिफल हे करार करणाऱ्या दोहोंनाही मिळाला पाहिजे. म्हणजेच दोघानाही काहीना काही मिळाले पाहिजे. तरच करार वैध ठरु शकतो. आणि कायदेशीर संबंध प्रस्थापित होतात. प्रतिफल रोख रकमेत असेल, वस्तूच्या रुपात असेल, एखाद कृत्य करणे किंवा न करणेही असू शकेल.

१) वचनदाताच्या इच्छेवरुन प्रतिफलाची निर्मिती झालेली असली पाहिजे. ते त्याच्याच हिताचे असले पाहिजे असे नाही. ते कोणतिर्हाईत व्यक्तीच्याही हितांचे असू शकेल उदा. प्रा. विनायक स्वेच्छेने जाऊन एखाद्या महाविद्यालयात अर्थशास्त्राचे तास घेतो. तो महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सांगण्यावरून काही करीत नाही. तर त्याला महिना आखेर पगार मागता येणार नाही.

२) प्रतिफल भूत,वर्तमान किंवा भविष्यकालीन असू शकेल.

प्रतिफल तीन प्रकारच असू शकत - भूत, वर्तमान व भविष्यकालीन. करार करताना दिलेल प्रतिफल वर्तमानकालीन करार केल्यानंतर भविष्यकाळात द्यावयाच प्रतिफल हे भविष्यकालीन प्रतिफल समजल जात. भारतीय कायद्याप्रमाणे तीन ही प्रकारचे प्रतिफल वैध समजल जात. परंतु इंग्लंडमधील कायद्यात मात्र भूतकाळातील प्रतिफल वैध समजल जात नाही.

३) प्रतिफल हे त्याच किंमतीच असल पाहिजे अस नाही. म्हणजेच पुरेस असण आवश्यक नाही ते कमीही असू शकेल. याचा अर्थ एखादा गरजवंत रु. १०,००० चा मोबाईल रु. ५००० विकू शकेल. हा करार वैधच ठरतो. फक्त त्याला दोघाची मुक्त संमती पाहिजे. उदा. अ महिना १ रु. भाडयाने आपले घर ब ला देतो. कोर्टाने निवाडा दिला की हा करार वैध आहे. कारण प्रतिफल हे त्याच किंमतीच असण्याची कायद्यात अट नाही.

४) प्रतिफल कायदेशीर असल पाहिजे.

प्रतिफल हे कायदेशीर नसेल तर कराराच बेकायदेशीर ठरतो आणि व्यर्थ समजला जातो. उदा. क ड शी करार करतो की जर त्यांनी ब चा खून केला तर तो त्याला रु. १०,०००/- देईल. हा करार बेकायदेशीर आहे.

५) प्रतिफल हे काल्पनिक असू नये.

प्रतिफलाला व्यवहारात काही किंमत असावी. तो जर पूर्ण करता येण्याजोग नसला तरतो काल्पनिक ठरतो. प्रतिफल अदा करणे शक्य असावे. अशक्य गोष्टीला कायद्यात किंमत नाही. कृती प्रत्यक्षात करता न येणारी असू शकेल किंवा कायद्याने करणे अशक्य असेल. उदा. अ ब ला जादूने हवेतून सोन काढून देण्याच वचन देतो व त्यासाठी त्याच्याकडे रु. ५ हजार मागतो. हा करार पूर्ण करणे अशक्य असल्यामुळे व्यर्थ ठरतो.

६.३. प्रतिफल नाही तर करार नाही या नियामाला कायद्यानी काही अपवाद दिलेले आहेत

सर्वसाधारणपणे कोणताही करार वैध ठरण्यासाठी त्या मध्ये प्रतिफलाचा समावेश आवश्यक आहे. त्या शिवाय केलेला करार हा अवैध ठरतो. परंतु कलम २५ मध्ये या नियमाला काही अपवाद दिलेले आहेत. त्या कराराना मात्र प्रतिफलाची आवश्यकता नाही. ते अपवादात्मक करार पुढील प्रमाणे:-

१) नैसर्गिक प्रेमापोटी केलेले करार.

जवळच्या नातेवाईकामधील नैसर्गिक प्रेमापोटी केलेले करार जर लेखी असतील व त्यांची नोंदणी सरकार दरबारी केलेली असेल तर असे करार प्रतिफलाशिवाय सुद्धा वैध ठरतात ड कलम २५ (२)]

प्रतिफला शिवायचे असे करार वैध ठरण्यासाठी

अ) ते लेखी असावेत.

ब) त्याची सरकारी अधिकार्याकडे नोंदणी झालेली असावी.

क) नैसर्गिक प्रेमापोटीच ती केलेली असावीत.

ड) ते करार जवळच्या नात्यातील व्यक्तीमध्येच केलेले असावेत.

वरील सर्व अटी पूर्ण झाल्यासच करार वैध ठरतात.

२) भूतकाळात केलेल्या सेवेपोटी ड कलम २५ (२) :

भूतकाळात वचनदाताची कोणत्याही प्रकारे केलेल्या सेवेसाठी (अंशत: किंवा पूर्णत) वचनदात्याला काही देण्यासाठी केलेला करार. त्या व्यक्तीने स्वेच्छेने काही केलेले असावे. ती गोष्ट करणे त्याच्यावर बंधनकारक नसावे. थोडक्यात इथे पुढील अटी पूर्ण करणे आवश्यक आहे.

अ) कृती स्वेच्छेने केलेली असावी.

ब)ती कृती वचन दात्यासाठी असावी किंवा ती करणे वचन दात्याला बंधनकारक असावे.

क) त्या कृतीच्या वेळी वचनदाता अस्तित्वात असावा

ड) वचन दाता आता त्याची भरपाई करण्यास पुढे आला असावा.

३)कालबाह्य कर्ज देणे कलम २५ (३) :

कालबाह्य कर्ज परत करण्यासाठी केलेला करारही वैध ठरतो. परंतू करार लेखी असावा आणि त्यावर वचनदात्याने सही केलेली असावी (स्वत: किंवा त्याच्या वतीने दुसऱ्यांनी) हे वचन संपूर्ण कर्ज परत करण्यासाठी असेल किंवा अंशत: परत करण्यासाठीही असू शकेल. कालबाह्य कर्ज परत करण्यासाठी दिलेली तोंडी वचन कायदेशीर ठरत नाही.

४) धर्मादाय कारणासाठी दिलेल वचन :

धर्मादाय संस्थांना देणगी देण्याचे फक्त वचन दिले तर तो करार कायदेशीर करार ठरत नाही. त्यावर कोर्टात जाता येत नाही. कारण त्या कराराच्या पाठीशी प्रतिफल नाही.

परंतु जर एखादी व्यक्तीनी ठराविक रक्कम देणगी म्हणून देण्याच कबूल केल व त्या आश्वासनाच्या आधारावर एखादी धर्मादाय संस्था तेवढयाच रकमेची खरेदी करण्याचा दुसऱ्या व्यक्तीशी करार केला तर हे अश्वासन करार ठरत आणि त्या साठी कोर्टात जाता येत. उदा. अनुरागने एखाद्या शाळेला ८ हजार रुपयांची देणगी देण्याच मान्य केले आणि या आश्वासनाच्या आधारावर शाळेने रु. ८ हजाराच्या पाणी शुद्ध करणाऱ्या यंत्राची खरेदी केली तर मात्र अनुरागच वचन करार ठरत. आता अनुरागला देणगी देण्यास नकार देता येत नाही.

अशावेळी अनुरागला रु. ८ हजाराची देणगी शाळेला द्यावीच लागेल कारण शाळेने त्याच्या आश्वासनावर विसंबून यत्रांची खरेदी केलेली आहे. हा करार प्रतिफलाशिवायही वैध ठरतो.

६.४ प्रतिफलाचे प्रकार

प्रतिफलाचे पुढील प्रमाणे तीन प्रकार आहेत.

१) भूतकाळातील प्रतिफल.

२) वर्तमान काळातील प्रतिफल.

३) भविष्य काळातील प्रतिफल.

१) भूतकाळातील प्रतिफल :

जेव्हा वचनदाताच्या इच्छेवर करार करण्यासाठी काही प्रतिफल दिले असेल तर त्याला भूतकाळतील प्रतिफल म्हणतात. उदा. ब च्या सांगण्यावरुन अ ब च्या मुलाला जानेवारी महिन्यात गणीत शिकवितो. फेब्रुवारी मध्ये ब अ ला त्या पोटी रु. २०० देण्याचे वचन देतो. अ ची शिकवणी ही भूतकाळातील प्रतिफल होय.

२) वर्तमान काळातील प्रतिफल :

वचन देतानाच दिले जाणार प्रतिफल म्हणजे वर्तमान काळातील प्रतिफल होय. उदा. अ ब ला एक पुस्तक रु. २०० का विकतो आणि ब त्याचे पैसे पुढच्या महिन्यात देण्याचे वचन देतो. हे वर्तमान काळातल प्रतिफल आहे. कारण वचन देतानाच पुस्तक दिलेले आहे.

३) भविष्य कालीन प्रतिफल :

जेव्हा दोनही पक्ष प्रतिफल भविष्याकाळात देण्याच मान्य करतात तेव्हा तो प्रतिफल भविष्यकालीन प्रतिफल ठरतो. दोघांनी एकमेकाला दिलेल वचन हे प्रतिफल ठरते. उदा. अ ब ला पुढल्या महिन्यात रु. २ हजारांना सोफासेट देण्याचे मान्य करतो व ब सोफा सेट मिळाल्यानंतर १५ दिवसांनी त्याचे पैसे देण्याच वचन देतो. इथे दोघांनी दिलेल प्रतिफल हे भविष्यकालीन प्रतिफल आहे.

६.५ कराराशी संबंध नसणे

याचा अर्थ करारात सहभागी न झालेली व्यक्ती याला तिराहित असही संबोधतात. त्याला कराराच्या पूर्ततेसाठी सर्वसाधारणपणे कोर्टात जाता येत नाही.

कायदा सांगतो की जो करारातील पक्ष नाही त्याला करार पूर्ततेसाठी कोर्टात जाता येणार नाही.

डनलप टायर कंपनी वि. सेल्प्रिÀज आणी कं (१९१५)

अ नी ब ला मोठया प्रमाणावर टायरांची विक्री केली,आणि करारात एक अट होती की ब नी अ नी घेतलेल्या किंमती पेक्षा कमी किंमतीला ती टायर विकू नये. तशीच अट घालून विकली. परंतु क नी कमी किमतीला ब नी क ला टायर विकली. अ नी क विरुद्ध खटला घातला. कोर्टाने अ ला ब आणि क यांच्या करारात ढवळाढवळ करण्याचा अधिकार नाही, असा निर्णय दिला.

६.५.२ प्रतिफलाशी संबध नसणे

भारतीय करार कायद्याप्रमाणे प्रतिफल हे ज्याला वचन दिले त्याच्याकडून (Promisee) किंवा इतर कोणाकडूनही मिळू शकते. म्हणजेच प्रतिफलाशी संबंध नसलेली व्यक्तीही

कराराच्या पूर्ततेसाठी कोर्टात जाऊ शकते. परंतु इंग्लंड मधील कायद्याप्रमाणे अस करता येत नाही.

भारतात मात्र प्रतिफलाशी संबंध नसलेली व्यक्ती करार पूर्ततेसाठी कोर्टात जाऊ शकते. असा निर्णय चिन्नय्या वि रामय्या या खटल्यात कोर्टाने दिलेला आहे.

केसचा तपशील

लक्ष्मीरानी नावाच्या वयस्क बाईंनी आपली मालमत्ता रामय्या नांवाच्या मुलीला दिली व देताना अशी अट घातली की त्या मुलीने चिन्नय्या नांवाच्या नातेवाईकाला त्या मालमत्तेच्या उत्पन्नातून दरवर्षी ठराविक रक्कम द्यावी. परंतु नंतर रामय्यानी रक्कम देण्यास नकार दिला आणि कारण सांगितले की या करारात चिन्नय्याचा काही संबंध नाही. कोर्टाने चिन्नय्याच्या बाजूने निर्णय दिला. कारण चिन्नय्याच्या बहिणीने प्रतिफल दिलेल आहे.

६.६ प्रश्न

१) प्रतिफल म्हणजे काय? त्यातील आवश्यक गोष्टी कोणत्या?

२) प्रतिफल नाही म्हणजे करार नाही. या विधानावर चर्चा करा.

३) संक्षिप्त टीपा लिहा.

अ) प्रतिफलाचे प्रकार

ब) कराराशी संबंध नसलेली व्यक्ती

❖❖❖❖

७

मुक्त संमती आणि व्यर्थनीय करार
(कलम १३ ते १९)

घटक रचना :

७.० उद्दिष्टये

७.१ संमती

७.२ धाकदपटशा (Coercion) (कलम-१५)

७.३ अनुचित प्रभाव (Undue Influence) (कलम -१५)

७.४ कपट (Fraud) (कलम -१७)

७.५ असत्य विधान किंवा दिशाभूल (Mis representation) (कलम -१८)

७.६ चूक (Mistake) (कलम -२०)

७.७ प्रश्न

७.० उद्दिष्टये

या पाठाच्या अभ्यासानंतर तुम्हाला पुढील गोष्टींची माहिती होईल.

- संमतीचा अर्थ.
- धाकदपटशचा अर्थ व त्याचे परिणाम.
- अनुचित प्रभाव या संज्ञेचा अर्थ व त्याचे परिणाम.
- कपट या संज्ञांचा अर्थ व परिणाम.
- असत्य विधान किंवा दिशाभूल या संज्ञेचा अर्थ व परिणाम.
- चूक या विधानाचा अर्थ व परिणाम.

७.१ संमती

कलम १३ मध्ये याची व्याख्या दिलेली आहे. 'जेव्हा दोन व्यक्ती एकाच विषयासंबंधी एकाच विचाराने सहमत होतात तेव्हा त्यांनी संमती दिली असे म्हटले जाते. किंवा त्या दोहोंमध्ये सहमती झाली असे म्हटले जाते.

संमती म्हणजे एखादी गोष्ट घडावी या विषयी एकमत होणे ठराव किंवा करार तेव्हाच तयार होतो जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती एखाद्या गोष्टीला आपली संमती देतात. ही संमती मुक्त असली पाहिजे.

कलम १४ मध्ये मुक्त संमतीची व्याख्या आहे.

जेव्हा व्यक्तीवर कोणत्याही प्रकारचे दडपण नसताना संमती दिली जाते तेव्हा ती संमती ही मुक्त संमती समजली जाते. बलप्रयोग, धाकदपटशा, अनुचित प्रभाव, कपट, असत्य किंवा दिशाभूल करणार विधान आणि चूक या पैकी कोणत्याही मार्गाचा अवलंब न करता देण्यात आलेली संमती म्हणजे मुक्त संमती होय. वरील कोणतीही गोष्ट असताना दिलेली संमती ही मुक्त संमती समजली जात नाही आणि मुक्त संमती शिवाय कोणताही वैध करार बनू शकत नाही.

वरील कोणत्याही गोष्टी असताना जर संमती दिली गेली तर ती संमती मुक्त संमती समजली जात नाही.

मुक्त संमती ही कोणत्याही करारातील अत्यंत आवश्यक गोष्ट समजली जाते. मुक्त संमती म्हणजे दोन व्यक्ती कुठल्याही प्रकारच्या दडपणाशिवाय एखाद्या गोष्टीला संमती देतात. दोन ही पक्षाना करारातील अटी व उद्दिष्ट मान्य असतात. करारातील शब्दांचा दोघांच्याही मनात तोच अर्थ असतो. दोहोमध्ये कोणत्या ही प्रकारचा गैर समज नसावा. एखाद्या गोष्टीवर दोहोंचे एकमत होणं म्हणजेच सहमती होय.

७.२ धाकदपटशा (कलम १५)

७.२.१ अर्थ

धाकदपटशा म्हणजे भारतीय दंड संहितेने प्रतिबंध केलेला एखादा गुन्हा करण्याची भीती दाखवून किंवा एखाद्याला बेकायदेशीररीत्या बंधनात ठेवून किंवा ठेवण्याची धमकी देऊन किंवा त्याची मालमत्ता ताब्यात घेऊन किंवा तिला नासधूस करण्याची भीती दाखवून एखाद्याची कराराला संमती घेणे. उदा. अ ब ला धमकावतो की माझ्याशी लग्न कर नाही तर तुला गोळी घालून ठार करेन आणि भीतीने ब अशी विवाह करते. धाक दाखवून संमती घेतलेली असल्यामुळे हा विवाह बेकायदेशीर ठरतो.

थोडक्यात सांगायचे तर धाक दाखवून दुसऱ्याची संमती मिळवणे किंवा एखाद्याला संमती देण्यास भाग पाडणे. म्हणजेच धाक दाखवून संमती मिळवणे किंवा दुसऱ्याला करार करण्यास भाग पाडणे, अशी धाक जिथे दाखवली तिथे भारतीय दंड विधान अमलात असो किंवा नसो त्यात काही फरक पडत नाही, काही गंभीर गुन्हा किंवा इजा करण्याची भीती दाखवून घेतलेली संमती ही धाकेखाली घेतलेली व अवैध संमती समजली जाते, ही मुक्त संमती नव्हे.

७.२.२ करारावरील परिणाम :

ज्याची संमती धाक दाखवून घेतलेली असते त्याला तो करार व्यर्थ ठरविण्याची मुबा आहे. म्हणजेच करार हा व्यर्थनीय (Voidable) ठरतो. परंतु त्याची जर काही तक्रार नसेल तर कराराची नियमित किंवा यथाविधी अंमलबजावणी होऊ शकते.

संबंधित पक्षानी जर करार व्यर्थ ठरविण्याचे ठरविल्यास दुसऱ्या पक्षाकडून त्याला काही फायदा मिळाला असेल तर तो त्यांनी परत केला पाहिजे.

वरील विवेचन थोडक्यात आकृतीमध्ये पुढील पद्धतीने मांडता येते.

एखादी कृती करणे किंवा करण्याची भिती दाखवणे.	या कृतीला भारतीय दंड विधानाने बंदी घातलेली असावी.

धाक दाखविण्यासाठी आवश्यक बाबी

करार करणाऱ्या किंवा तिर्हाईतानी ती कृती केलेली असावी	दुसऱ्या पक्षाने करारास संमती द्यावी म्हणून अशी कृती केलेली असावी

७.३अनुचित प्रभाव (कलम १६)

७.३.१ अर्थ

इथे एखाद्या पक्षावर अनुचित प्रभाव पाडलेला असतो ज्यामुळे ती व्यक्ती स्वतंत्र्यपणे आपल्या हिताचा निर्णय घेऊ शकत नाही.

(कलम १६ (२) प्रमाणे एखादी विशिष्ठ व्यक्ती दुसऱ्यावर अनुचित प्रभाव पाडण्याच्या स्थितीत आहे अस गृहीत धरल जात. उदा. अध्यात्मिक गुरु आपल्या शिष्यावर प्रभाव पाडून मोक्ष मिळण्यासाठी त्याची मालमत्ता दान करण्यास सांगतो.

७.३.२ अनुचित प्रभाव म्हणजे काय?

एक पक्ष दुसऱ्या पक्षावर प्रभाव पाडून त्याच्या मनाविरुद्ध त्याला निर्णय घेण्यास लावतो. अशा प्रभावामुळे तो दुसरा पक्ष आपल्या हिताचा नसलेला निर्णय घेतो. या मध्ये मानसिक, नैतिक किंवा इतर सर्व प्रकारच्या प्रभावाचा समावेश होतो ज्यामुळे तो पक्ष स्वत:च्या विचाराने स्वत:च्या हिताचा निर्णय घेऊ शकत नाही.

पालक व पाल्य, नवरा बायको, वकील व अशील, डॉक्टर व रुग्ण अशा सर्वांचा अनुचित प्रभाव पाडू शकणाऱ्या व्यक्तींमध्ये समावेश होतो. अशा व्यक्तींमध्ये समावेश असलेल्या व्यक्तीशी जर काही करार झाले असतील तर त्यात अनुचित प्रभावाचा वापर झालेला आहे असे सर्वसाधारणपणे गृहीत धरले जाते. अनुचित प्रभावाचा वापर केलेला नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी जी व्यक्ती प्रभाव पाडण्याच्या स्थितीत आहे त्यावर असते.

पुढील प्रसंगी एक पक्ष दुसऱ्यावर प्रभाव पाडण्याच्या स्थितीत आहे अस गृहीत धरल जात.

- आयकर अधिकारी व आयकरादाता
- पालक व पाल्य
- वकील व अशील
- आध्यात्मिक गुरु व त्याचा शिष्य
- सद्दढ माणूस आणि वयस्क, खूप आजारी, अशक्त, अपंग व्यक्ती.

७.३.३ अनुचित प्रभावाचे परिणाम

एखाद्याची कराराला संमती अनुचित प्रभावाच्या वापराने घेतली असेल तर तो पक्ष करार व्यर्थनीय (Voidable) ठरवू शकतो. तो पक्ष केव्हाही करार रद्द करु शकतो. परंतु त्या कराराच्या अनुषंगाने त्याला जर काही फायदा झालेला असेल तर तो मात्र त्यानी संबधिताला परत केला पाहिजे.

उदाहरणे.

१) अ च्या मुलाने वचन चिठ्ठीवर ब ची खोटी सही केलेली आहे. ब अ च्या मुलावर खटला भरण्याची भिती दाखवून त्याच्याशी दुसरा एखादा करार केलेला आहे. न्यायालय असा करार रद्द करु शकते.

२) अ नावाचा सावकार ब नावाच्या शेतकर्याला रु. १०० च कर्ज देऊन त्याच्यावर प्रभाव आणून त्याच्याकडून दोनशे रुपहे कर्ज महिना ६% व्याजाने घेतल्याच लिहून घेतो. न्यायालय हे कागद रद्द करुन ब ला फक्त रु. १०० परत करायला सांगू शकते.

धाक आणि अनुचित प्रभाव दोन्ही मध्ये एक पक्ष दडपणाखाली संमती देत असले तरीही दोहोमध्ये तसा बराच फरक आहे. तो फरक पुढील तक्त्यावरुन स्पष्ट होईल.

धाक व अनुचित प्रभाव यातील फरक,

मुद्दा	धाकधपटशा	अनुचित प्रभाव
१) अर्थ	इथे एक पक्ष दुसऱ्याला धाक दाखवून त्याची संमती मिळवते	इथे एक पक्ष आपल्या स्थानाचा दुरुपयोग करुन दुसऱ्या व्यक्तीला त्याच्या हिताचा नसलेला निर्णय घेण्यास भाग पाडते. आणि करारासाठी त्याची संमती मिळवते.
२) स्वरुप	गुन्हा करण्याची धमकी देऊन संमती मिळवली जाते.	मनावर दडपण आणून संमती मिळवली जाते.
३) माध्यम	सक्तीने संमती मिळवली जाते	नैतिक दबावाखाली हिताच समजून चुकीचा निर्णय घेतला जातो.
४) जबाबदारी	भारतीय दंड विधानाखाली हा शिक्षेस पात्र गुन्हा आहे.	इथे कोणत्याही प्रकारची फौजदारी जबाबदारी नाही फक्त अनैतिकता आहे.

७.४ फसवणूक (Fraud) (कलम १७)

७.४.१ अर्थ

जाणूनबुजून एखाद्या व्यक्तीला फसविण्याच्या उद्दिष्टाने किंवा त्याला करारबद्ध करण्यासाठी खोटी माहिती पुरविणे किंवा खरी माहिती लपवून ठेवणे म्हणजे कपट किंवा फसवणूक होय.

यामध्ये महत्त्वाची माहिती लपवून ठेवली जाते किंवा चुकीच्या पद्धतीने मांडली जाते. त्यामागे दुसऱ्या पक्षाला फसविण्याचे उद्दिष्ट असते. अशा प्रकारे फसवून करारावर त्याची संमती घेतली जाते. खरी माहिती माहित असून इथे हेतु पुरस्पर चुकीची माहिती पुरविली जाते. ज्या आधारे दुसरा पक्ष चुकीचा निर्णय घेऊ शकेल. किंवा त्याला चुकीचा निर्णय घेण्यासा भाग पाडले जाते. अशी फसवणूक करारातील एक पक्ष करतो किंवा त्याच्यावतीने दुसरा कोणीतरी करतो.

उदा.

1) शहा खान कडून एखाद्या जमीनीची खरेदी करतो जी जमीन खानने आधीच राहूलला विकलेली आहे. खाननी इथे शाहची फसवणूक केलेली आहे कारण जमीन आपण आधीच दुसऱ्याला विकलेली आहे ही गोष्ट त्याच्यापासून लपवून ठेवलेली आहे.

2) अमूर जॉलीला आपली गाय गाबण आहे अस खोटच सांगून गाय विकतो. अमूरच्या सांगण्यावर विश्वास ठेवून जॉली ती गाय रु. ४५,००० ला विकत घेते. ही फसवणूक आहे.

3) टीना मीनाकडून दहा हजार रु. उसने घेते व एक महिन्यानी परत करण्याचा खोट वचन देते. तिला पैसे परत करायचेच नाही आहेत. ही सुद्धा एक फसवणूकच आहे.

फसवणूक म्हणजे दुसऱ्याला फसविण्याच्या उद्दिष्टाने केलेली सर्व प्रकारच्या कृती. इथे मुद्दामहून, माहित असून खोटी माहिती दिली जाते. आणि दुसऱ्या पक्षाला करार करण्यास प्रवृत्त करण्यात येते. काही वेळा एखादी गोष्ट सत्य आहे किंवा नाही याची शहानिशा न करता दडपून सत्य आहे असे छ़ाती ठोकपणे सांगितले जाते.

कलम १७ प्रमाणे फसवणूक या सदरात पुढील सर्व गोष्टींचा समावेश होतो.

७.४.२ फसवणूकीतले घटक

१) चुकीची माहिती दिली जाते.

इथे बेदरकारपणे चुकीची माहिती दिली जाते. त्याची सत्यता पडताळून पाहिली जात नाही. परंतु माहिती देणाऱ्याचा त्याच्या सत्येतेवर खरोखरच विश्वास असेल तर मात्र ही गोष्ट फसवणूक ठरत नाही.

२) महत्त्वाची माहिती जाणूनबुजून लपविली जातो.

एखाद्याने आवश्यक ती माहिती मुद्याम लपवून ठेवली तर ती फसवणूक ठरते. परंतु अशी माहिती देणे त्याच्यावर बंधनकारक नसेल तर मात्र ती फसवणूक ठरत नाही.

३) वचनपूर्ती करण्याच्या उद्दिष्टा शिवाय दिलेल वचन.

समजा एखाद्याने काही वस्तू मागविल्या व त्यांची किंमत अदा न करण्याच आधीच ठरविले होत तर ती फसवणूकच ठरते. इथे वचन पूर्तीच उद्दिष्टच नसत.

४) कायद्याने खास फसवणूकीच्या गोष्टी म्हणून जाहीर केलेल्या आहेत.

उदा. नादार व्यक्ती बरोबर गुप्तपणे करार करणे ही गोष्ट नादारी कायद्याखालील फसवणूकच आहे.

५) नुकसान

दुसऱ्या पक्षाच या फसवणूकीमुळे काही नुकसान झालेल असले पाहिजे जर नुकसान काहीही झालेल नसेल तर हा गुन्हा ठरत नाही.

महत्त्वाची माहिती जाणून बुजून लपवलेली असली पाहिजे	खोटी माहिती दिली असली पाहिजे.

फसवणूकीतील आवश्यक घटक.

फसवणूक प्रत्यक्षात झालेली असली पाहिजे	काही नुकसान झालेले असले पाहिजे

७.४.३ फक्त गप्प राहण फसवणूक ठरते का?

फक्त गप्प राहणे ही फसवणूक ठरत नाही. स्पष्ट बोलणे त्या व्यक्तीच कर्तव्य असल पाहिजे किंवा कोणत्याही कायद्याखाली त्यांनी काही ठराविक माहिती देणं सक्तीचे असले पाहिजे. नाहीतर करार करणाऱ्या व्यक्तीनी आपल्याला माहीत असलेल्या सर्व गोष्टी दुसऱ्याला सांगितल्याच पाहिजे असे त्याच्यावर बंधन नाही. परंतु पुढील दोन प्रकारच्या करारात मात्र गप्प राहणे म्हणजे फसवणूक ठरते.

१) जिथे बोलण त्याचे कर्तव्य आहे.

२) किंवा जिथे गप्प राहणे हीच फसवणूक ठरते.

एका पक्षाने दुसऱ्याला आपल्याकडील सर्व बारीकसारिक माहिती पुरविली पाहिजे असे नाही. व्यापारात ग्राहकाने स्वत:ची काळजी घेणे अपेक्षित आहे. बोलण दुसऱ्यावर बधंनकारक नाही. आणि शांत राहण म्हणजे फसवणूक ठरत नाही, तसेच ज्या गोष्टी दोघांनाही माहीत आहेत त्या परत सांगण्याची आवश्यकता नाही. उदा. अ नी ब ला

काही पक्षी विकले. पक्षी आजारी होते. विकताना अस ठरल होत की आहे तसे विकायचे. इथे फसवणूक झालेली नाही. (वर्ड वि. हॉब्स) (१८७८)

कलम १७ मध्ये असा स्पष्ट उल्लेख आहे की पक्षावर बोलणे बंधनकारक नसेल तर नुसत गप्प राहणे म्हणजे फसवणूक ठरत नाही. काही ठिकाणी मात्र बोलण बंधनकारक असत किंवा गप्प राहणे म्हणजेच फसवणूक ठरते.

१) फक्त गप्प राहणे म्हणजे फसवणूक नव्हे.

आपण विकत असलेल्या वस्तूमधील दोष प्रत्येकांनी जाहीर केलेच पाहिजे असे नाही.

उदा. अ आपला एक आजारी घोडा ब ला विकतो. अ ला माहीत आहे की तो आजारी आहे. अ ब ला घोडयाबद्दल काहीही सांगत नाही. ही फसवणूक नव्हे.

२) काहीवेळा मात्र गप्प राहण म्हणजे फसवणूक ठरु शकते

कारण इथे मौन राहणे ही फसवणूक ठरते. उदा. समजा ब अ ला म्हणाला की तू घोडयाबद्दल काहीही बोलला नाहीस तर मी समजेन की घोडयाची प्रकृती ठणठणीत आहे. अ काहीही बोलत नाही. इथे अ च मौन म्हणजे फसवणूक ठरते.

७.४.४ बोलणे आवश्यक आहे किंवा कर्तव्य आहे.

विशिष्ट प्रकारच्या करारात कायदा सांगतो की तुम्ही सर्व माहिती देणे तुमच्यावर बंधनकारक आहे. इथे माहिती न पुरविल्यामुळे करार व्यर्थ अथवा व्यर्थनीय ठरतो. उदा. सर्वोत्तम विश्वासाचे करार. इथे सर्व माहिती एकाच पक्षाकडे असते आणि तो जाहीर करणे हे त्याच कर्तव्य असते. दुसऱ्या पक्षाची कराराला संमती त्यावरच अवलंबून असते. इथे एका पक्षाने माहिती दिलीच पाहिजे.

पुढील करार या प्रकारात मोडतात:

१) विम्याचे करार

विम्याचे करारात विमा पॉलिसी घेणाऱ्यांनी ज्याचा विमा उतरवायचा आहे. त्याची संपूर्ण माहिती जाहीर केलाr पाहिजे. कारण विमा उतरविण्यात काय धोका आहे याची पूर्ण माहिती समजल्याशिवाय विमा कंपनी विमा उतरविण्यास तयार होत नाही. माहिती जर पूर्णपणे दिली नाही तर नंतर करार रद्द ठरु शकतो. माहिती हेतु पुरस्सपरच लपवलेली असली पाहिजे असे नाही. चुकून जरी सांगायचे राहिले तरीही करार रद्द ठरु शकतो.

२) अचल मालमत्ते संबंधीचे करार.

अचल मालमत्ता हस्तांतर कायद्यातील कलम ५५ (१) (अ) १८८२ प्रमाणे विक्रेत्याच्या मालकी हक्कात काही दोष असतील व त्याची माहिती विक्रेत्याला असून खरेदी दाराला नसेल तर ही फसवणूक ठरते. परंतु जर थोडे प्रयत्न करुन खरेदीदार ही माहिती जर सहज मिळवू शकत असेल तर मात्र फसवणूक ठरत नाही. इथे खरेदीदाराला त्याची

निष्काळजीपणा भोवते. उदा. अ एक सोफा ब ला विकतो व अ ला माहीत आहे की त्याला चर गेलेली आहे. तो ही गोष्ट ब ला सांगत नाही. ही फसवणूक आहे. ब नंतर करार रद्द करु शकतो जेव्हा त्याला तो दोष समजतो.

३) कंपनीचे भाग विकणे किंवा भागवाटप करणे

कंपनी कायद्याप्रमाणे संचालक मंडळाने कंपनीच्या माहिती पत्रकात कंपनीची संपूर्ण माहिती देणे आवश्यक आहे. कारण ते वाचूनच आमजनता कंपनीत आपले पैसे गुंतवण्यासंबंधीचा निर्णय घेत असते. संचालकांनी काही माहिती दडवून ठेवली असल्यास भागधारक नंतर शेअर परत करु शकतात म्हणजेच करार रद्द करु शकतात.

४) लग्नाचा करार.

लग्न करताना दोघांनीही आपआपली संपूर्ण खरी माहिती एकमेकाला देणे आवश्यक आहे. नाहीतर केव्हाही एक पक्ष ठरलेल लग्न रद्द करु शकतो.

७.४.५ फसवणूकीचे परिणाम

करारातील एका पक्षाची संमती फसवणूक करुन मिळवलेली असेल तर फसवणूक झालेला पक्ष केव्हाही करार रद्द करु शकता - म्हणजेच करार व्यर्थनीय ठरतो.

फसवणूक झालेल्या पक्षापुढे दोन पर्याय आहेत

- तो पक्ष करार रद्द करु शकतो.
- किंवा करार करताना दिलेली माहिती सत्य असती तर कराराने त्याचा काय फायदा झाला असता तशी परिस्थिती निर्माण करण्यास दुसऱ्या पक्षाला भाग पाडू शकतो.

उदा. अ ब ला आपली मालमत्ता विकताना खोट सांगतो की मालमत्तेवर कोणताही बोजा नाही. म्हणजेच त्याच्या तारणावर कर्ज घेतलेले नाही अशावेळी ब एकतर करार रद्द करु शकतो किंवा अ ला प्रथम त्यावरील कर्ज परत करुन मग मालमत्ता विकायला सांगू शकतो. म्हणजेच मालमत्ता कर्जमुक्त करुन देण्यास सांगू शकतो.

करार रद्द करतानाच तो पक्ष आपल्याला झालेल्या नुकसानी पोटी भरपाई मागू शकतो, परंतु फसवणूक झालेल्या व्यक्तीला जर थोडयाशा परिश्रमाने सत्य शोधून काढणे सहज शक्य असेल तर मात्र फसवणूकीच्या सबबीखाली करार रद्द करता येत नाही.

फसवणूक झालेल्या व्यक्तीपुढे पुढील पर्याय आहेत.

१) करार रद्द करणे.

२) नुकसान भरपाई ही मागणे

३) कराराची पूर्तता करुन नुकसान भरपाई मागणे.

७.५ असत्य विधान (MISREPRESENTATION) (दिशाभूल)

७.५.१ अर्थ

याचा अर्थ करार करताना एखाद असत्य विधान करण म्हणजेच खोटी माहिती देऊन दुसऱ्या पक्षाची करारासाठी संमती मिळवणे. इथे माहिती खोटी आहे ही गोष्ट त्या पक्षाला माहितही नसते. त्याची अशी समजूत असते की आपण सांगतो ते सत्य आहे. उदा. अ ला आपला घोडा ब ला विकायचा आहे तो त्याला सांगतो की 'माझा घोडा उत्तम स्थितीत आहे. अ ला मनापासून वाटत असत की आपला घोडा निर्दोष आहे.परंतु त्याला माहीत नाहीं की घोडा काल आजारी होता. पुढे ब तो घोडा विकत घेतो. अ नी खोटी माहिती दिलेली आहे.

थोडक्यात इथे खोटी माहिती दिलेली असते परंतु ती जाणूनबुजून फसवणूक करण्याच्या उद्दिष्टाने दिलेली नसते.

या विषयावरील महत्त्वाचा निवाडा म्हणजे डेरी वि. पीक (Derry V Peak) १८८९.

त्या केसमध्ये माहिती पत्रकामध्ये अशी माहिती असते की कंपनीला वाफेवर किंवा यंत्राच्या सहाय्याने ट्रॅम चालविण्याची परवानगी खास कायद्याने मिळालेली आहे. परंतु वाफेवर चालविण्यासाठी व्यापारी मंडळाची परवानगी घेण्याची अट असते. त्या मंडळाने परवानगी नाकारली आणि कंपनीला आपला गाशा गुंडाळावा लागला. एका भागधारकाने संचालकाविरुद्ध खटला भरला की त्यांनी आपली फसवणूक केलेली आहे. कोर्टाने निवाडा दिला की इथे फसवणूक झालेली नाही कारण संचालकांची अशी प्रामाणिक समजूत होती की कायद्याने आपल्याला परवानगी दिलेली आहे.

७.५.२ असत्य विधानासाठी आवश्यक गोष्टी :

- एखादी गोष्ट ठासून सांगितलेली असते
- नंतर ते विधान खोटे ठरते.
- हे विधान दुसऱ्या पक्षाने करारास संमती द्यावी म्हणून केलेली असते.
- त्या पक्षानी त्या विधानानुसार कारवाई केलेली असते.
- ते विधान संबंधित पक्षाने केलेले असते किंवा त्याच्यावतीने दुसऱ्यानी केलेली असते.

७.५.३ फसवणूक व असत्य विधान यातील फरक.

फसवणूक	असत्य विधान (दिशाभूल)
१) जाणूनबुजून दुसऱ्याला फसविण्यासाठी असत्य विधान करण्यात येते.	असत्य विधान करणाऱ्या व्यक्तीला ते असत्य आहे हे खरोखरच माहीत नसते.
२) दुसऱ्याला फसविण्याच उद्दिष्ट असते	फसविण्याच उद्दिष्ट नसते
३) करार व्यर्थनीय ठरतो.	ज्याची दिशाभूल झालेली आहे तो पक्ष करार रद्द करु शकतो.
४) विशिष्ट प्रकारच्या फसवणूकीसाठी भारतीय दंड विधानाप्रमाणे शिक्षा होऊ शकते.	हा गुन्हा ठरत नाही.

७.६ चूक (Mistake) (कलम -२०)

७.६.१ अर्थ

चूक म्हणजे एखाद्या गोष्टीच्या सत्यतेबद्दल चुकीचा विश्वास. करारातील दोनही पक्षाच्या मनात असलेल्या चुकीच्या विश्वासावर आधारित करार रद्द करता येत नाही. इथे दोघांच्या ही मनात चुकीची समजूत असते ज्याच्या आधारावर करार करण्यात येतो.

७.६.२ चूक दोन प्रकारची असू शकते.

१) कायद्यातील तरतूदीबद्दल गैरसमज

२) तपशीलाबद्दल (facts) चूक

१) कायद्यातील तरतूदी बद्दलची चूक

याचा अर्थ कायद्यात चूक अस नसून कायद्यातील तरतूदींचा अर्थ लावण्यात झालेली चूक. करारातील पक्षाकडून अशी चूक होऊ शकते, इथे करातील पक्षाला कायदा योग्य पद्धतीने समजलेला नसतो. तरतूदीबद्दल पक्षाची गैर समजूत झालेली असते. नेमका कायदा तुम्हाला माहीत नसतो.

२) तपशीलाबद्दल चूक.

एखाद्या गोष्टीबद्दल पक्षाच्या मनात गैर समजूत झालेली असते. उदा. तुम्ही ३५ वर्षे वयाचे आहात तर माझी समजूत असते की तुमचे वय ३४ वर्षे आहे. मी तुमच्या वयाबद्दल चूक केलेली असते.

तपशीलाबद्दल झालेली चूक ही योग्य सबब ठरु शकते. ही चूक परत दोन प्रकारची असते. एकतर्फी किंवा दुतर्फी म्हणजे एकाला वस्तू स्थितीची योग्य जाणीव नसते किंवा दोंघानाही अशी जाणीव नसते. ही चूक दोन प्रकारची असते.

अ. दुहेरी चूक

कलम २० प्रमाणे करारातील एखाद्या तपशीलाबद्दल दोघांच्याही मनात चुकीची समज असेल तर करार हा व्यर्थ ठरतो. उदा. अ ब ची कार रु. ९०,०००/- ला घेण्यास तयार होतो. कराराच्या आदल्या दिवशी ती कार अपघातात नष्ट झालेली असते. ही गोष्ट करार करताना दोघांनाही माहीत नसते. त्यामुळे त्यांनी करार केलेला असतो. ही तपशीला बद्दलची दुहेरी चूक असून करार आपोआप रद्द ठरतो. कारण ज्या कारची विक्री झालेली आहे. ती कार त्या वेळी अस्तित्वातच नाही.

ब. एकतर्फी चूक

तपशीलाबद्दल एकाच व्यक्तीच्या मनात चुकीची समजूत असेल तर मात्र करार रद्द ठरत नाही. करार वैध ठरतो.

उदा. अमिता एका दुकानातून लोणच खरेदी करते. दुकानदारानी आधी लोणच्याचा नमूना दाखविलेला असतो. अमिताला वाटत की लोणचं मुरलेल (जून) आहे. प्रत्यक्षात लोणचं नवीन असत. इथे अमिताला करार रद्द करता येणार नाही कारण फक्त तिच्या मनात गैरसमज आहे. दुकान दाराच्या मनात नाही.

त्यामुळे असे म्हणता येईल की दुहेरी चूक असेल तर करार रद्द होतो एकेरी चुकीमुळे नाही.

करातातील एकाच पक्षाच्या मनात तपशीलाबद्दल संभ्रम असेल तर त्या पक्षाला करार रद्द करण्याचा अधिकार नाही, एकेरी चूक करार रद्द ठरवू शकत नाही. परंतु एका पक्षाची झालेली गैरसमजाची कल्पना जर दुसऱ्या पक्षाला असून मुद्दामहून गप्प राहिल्यास मात्र करार रद्द होऊ शकतो.

एकतर्फी चूक ही पुढील प्रकारची असू शकते:-

व्यवहारच्या स्वरूपाबद्दल

करार करणार्यांपैकी एका व्यक्तीच्या मनात व्यवहाराच्या स्वरुपाबद्दल जर गैरसमज असेल तर तो करार व्यर्थ ठरतो. त्याला कारण तो पक्ष आंधळा असेल किंवा अशिक्षित असेल किंवा कागद पत्रांच्या स्वरुपाबद्दल त्याची जाणूनबुजून दिशाभूल केलेली असेल.

७.६.३ खोटया किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीचा करारावरील परिणाम.

देशातील कोणत्याही प्रचलित कायद्यासंबंधी जर पक्षाला माहिती नसेल तर त्या कारणावरुन करार रद्द करता येणार नाही किंवा रद्द होत नाही, परंतु असा गैरसमज जर परदेशी कायद्याबद्दल असेल तर मात्र गोष्ट वेगळी. उदा. अ व ब मध्ये करार होतो आणि

दोघांची समजूत असते की एखादा कर्ज भारतातील प्रचलित कायद्याखाली मुदत बाह्य झालेला आहे. हा करार रद्द किंवा व्यर्थनीय ठरु शकत नाही.

कारण प्रत्येक नागरिकाला आपल्या देशातील प्रचलित कायद्याच ज्ञान असण अपेक्षित आहे. कायदा माहीत नाही ही कधी ही सबब होऊ शकत नाही, या सबबीखाली करार कोणालाही रद्द करता येणार नाही.

कराराच्या स्वरुपाबद्दल दोघांच्याही मनात जर गैर समज किंवा गोंधळ असेल तर मात्र करार रद्द ठरु शकतो.

उदा.

अ ब सोबत त्याचा एखादा घोडा विकत घेण्याचा करार करतो. कराराच्या वेळी दोघानाही माहीत नसते की तो घोडा आधीच मरण पावलेला आहे. करार आपोआप रद्द ठरतो.

ब च्या मरणानंतर अ ला काही मालमत्ता मिळणार असते. ती मालमत्ता तो क ला विकतो. परंतु विक्रीचा करार झाला त्या वेळी ब जीवंत असतो व ही गोष्ट अ व क दोघानाही माहीत नसते. हा करार रद्द ठरतो.

कलम २० खाली पुढील परिस्थितीत करार रद्द ठरतात.

- करार करणाऱ्या दोनही पक्षाच्या मनात विषयाबद्दल गैर समज असावा.
- व ती गोष्ट कराराच्या दृष्टीने महत्त्वाची असावी.

७.६.४ एकतर्फी व दुतर्फी गैर समजामधील फरक.

एकतर्फी गैरसमज	दुतर्फी गैरसमज
१) एकच पक्षाच्या मनात गैरसमज असतो.	करारातील दोनही पक्षाच्या मनांत गैर समज असतो.
२) करार व्यर्थ किंवा व्यर्थनीय ठरत नाही.	करार व्यर्थ ठरतो.
३) कलम २२ मधील तरतूदी लागू होतात.	कलम २० मधील तरतूदी लागू होतात.

७.७ प्रश्न

1) संमतीची व्याख्या द्या. संमती केव्हा मुक्त संमती समजली जाते?
2) अनुचित प्रभाव म्हणजे काय? त्याचे परिणाम विशद करा.
3) धाकदपटशा म्हणजे काय? अनुचित प्रभाव व धाकदपटशा यामधील फरक स्पष्ट करा.

4) फसवणूक म्हणजे काय ? त्यासाठी आवश्यक गोष्टी कोणत्या?

5) चुकीचे परिणाम सांगा.

6) व्याख्या द्या.

अ) संमती

ब) एकतर्फी गैरसमज

क) फसवणूक

ड) दिशाभूल

इ) अनुचित प्रभाव

फ) धाकदपटशा

❖❖❖❖

८

कायदेशीर उद्दिष्टये व व्यर्थ ठराव किंवा करार

(कलम २३ ते ३०)

घटक रचना :

८.० उद्दिष्टये

८.१ व्यर्थ ठराव म्हणजे काय?

८.२ पैजेचा ठराव व संभाव्य घटनेवर आधारित करार किंवा घटनावलंबी करार यातील फरक

८.३ प्रश्न

८.० उद्दिष्टये

या पाठाच्या अभ्यासानंतर पुढील विषयाची तुम्हाला माहिती मिळेल.

- व्यर्थ ठराव किंवा करार यांचा अर्थ
- कायदेशीर व बेकायदेशीर उद्दिष्टये
- पैजेचा करार - त्यांचा अर्थ व त्यासाठी आवश्यक गोष्टी.
- पैजेचे करार व घटनावलंबी (Contingent) करार यांच्यातील फरक

८.१ व्यर्थ ठराव किंवा करार म्हणजे काय?

८.१.१ अर्थ

कलम २ (ग) प्रमाणे जो करार कायद्याने अंमलात आणता येत नाही तो व्यर्थ ठराव किंवा करार होय. त्यामुळे अशा करारामुळे कोणालाही, कोणत्या ही प्रकारचे अधिकार प्राप्त होत नाहीत. असे करार मुळातूनच व्यर्थ असतात.

कोणत्याही करारासाठी अत्यावश्यक गोष्ट म्हणजे त्याच उद्दिष्ट व प्रतिफल कायदेशीर असावे. ज्याच उद्दिष्ट किंवा प्रतिफल बेकायदेशीर आहे असे करार व्यर्थ ठरविण्यात आलेले आहेत. कराराचे उद्दिष्ट किंवा प्रतिफल केव्हा बेकायदेशीर समजण्यात येतात याबद्दलच्या तरतूदी कलम २३ मध्ये देण्यात आलेल्या आहेत.

८.१.२ कायदेशीर प्रतिफल व उद्दिष्टे

कलम २३ मध्ये कोणती उद्दिष्टे किंवा प्रतिफल बेकायदेशीर समजण्यात येतात याबद्दल तरतूदी आहेत.

प्रतिफल किंवा उद्दिष्ट पुढील परिस्थितीत बेकायदेशीर ठरविण्यात आलेली आहेत.

- कायद्याने त्यांना प्रतिबंध आहे.
- त्यामुळे एखाद्या कायद्यातील तरतूदींचा भंग होतो.
- फसवणूक करण्याच किंवा एखाद्याला शारीरिक इजा करण्याच किंवा एखाद्याच्या मालमत्तेच नुकसान करण्याच उद्दिष्ट आहे.
- कोर्टाच्या मते ते अनैतिक आहे किंवा लोकभावनेला धक्का देणार आहे.

उदा. चोरी केलेल्या मालाच्या विक्रीचा करार, कायद्याने बंदी घातलेल्या औषधाच्या खरेदींचा करार. कोणालातरी शारीरिक इजा करण्यासाठीचा करार इत्यादी. कोणत्याही कराराचे उद्दिष्ट व प्रतिफल या दोन ही गोष्टी कायदेशीर असाव्यात नाहीतर करार अवैध ठरतो.

एखादा नादार व्यक्ती आपली मालमत्ता आपल्या नातेवाईकाला देतो. इथे प्रतिफल जरी कायदेशीर असल तरीही करार व्यर्थ ठरतो कारण नादार व्यक्ती आपली मालमत्ता विकू शकत नाही. असे करणे नादारी संबंधीच्या कायद्याखाली गुन्हा आहे. म्हणून प्रतिफल व उद्दिष्ट दोनही कायदेशीर असतील तरच करार वैध ठरतो.

८.१.३ कोणते प्रतिफल उद्दिष्ट कायदेशीर आहे. व कोणते बेकायदेशीर आहे?

उदाहरणे:-

1) अ आपल घर ब ला रु. १२,०००/- चा विकण्यास तयार होतो. इथे घरासाठी रु १२,०००/- देणे म्हणजे ब नी अ ला दिलेल प्रतिफल व अ नी ब ला घर देणे हे ब ला दिलेल प्रतिफल आहे. ही दोनही प्रतिफल कायदेशीर आहेत त्यामुळे करार हा वैध ठरतो.

2) अ ब च्या मुलाचा सांभाळ करण्याची जबाबदारी स्वीकारतो आणि त्या बदल्यात ब त्याला दर महिन्याला रु. १,०००/- देण्याचे कबूल करतो. इथे दोघांनी एकमेकाला दिलेल वचन म्हणजे प्रतिफल होय. ही प्रतिफले कायदेशीर आहेत.

3) अ, ब व क एकत्र येऊन ठरवितात की एखाद्या गावावर दरोडा घालून मिळालेले पैसे सम प्रमाणात वाटून घ्यायचे. इथे करार रद्द ठरतो कारण त्याच उद्दिष्ट हे बेकायदेशीर आहे.

4) अ ब ला सरकारी खात्यात नोकरी मिळवून देण्याच आश्वासन देतो आणि त्या बदल्यात ब त्याला रु ३,००० देण्याच कबूल करतो, प्रतिफल बेकायदेशीर असल्यामुळे करार रद्द ठरतो.

5) अ ब ला आपली मुलगी अनैतिक कारणासाठी वापरण्यास देतो. हा करार अवैध आहे कारण तो अनैतिक आहे.

प्रत्येक करार ज्याच उद्दिष्ट किंवा प्रतिफल बेकायदेशीर आहे तो करार अवैध ठरतो.

पुढील प्रकारचे करार कायद्याने अवैध म्हणून घोषित केलेले आहेत:

१) कोणत्याही कायद्याने बंदी घातलेली आहे.

कोणत्याही कायद्याच्या विरोधात केलेला करार हा अवैध ठरतो. विरोधात बंदी घातलेली कृती करणे हा गुन्हा आहे आणि कायद्यात त्यासाठी दंडाची व/ किंवा शिक्षेची तरतूद करण्यात आलेली असते. उदा. कोणत्याही सरकारी अधिकार्याला लाच देऊन काम करुन घेणं हा गुन्हा घोषित करण्यात आलेला आहे. असे करार अंमलात आणता येत नाही.

२) लग्न करण्यास बंदी घालणारा करार (कलम २६)

अल्पवयीन व्यक्ती वगळून इतर कोणाच्याही लग्नाला बंदी घालणारा करार हा बेकायदेशीर व व्यर्थ ठरतो.

परंतु इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की ठराविक व्यक्तीशीच लग्न करण्याचा करार हा कायदेशीर करार आहे. हा लग्नाचा प्रतिबंध करणारा करार ठरत नाही. म्हणून वैध करार ठरतो.

उदा :

1) अ ब शी करार करतो की तो क शी लग्न करणार नाही. करारासाठी कायदेशीर प्रतिफल आहे. तरीही करार रद्द ठरतो.

2) अ ब शी करार करतो की तो क शीच लग्न करेल. दुसऱ्या कोणाशी करणार नाही. हा करार वैध ठरतो.

३) व्यापार विरोधी करार (कलम २७)

कोणालाही कायदेशीर व्यापार उद्योग व्यवसाय करण्यास प्रतिबंध घालणारा करार हा अवैध करार ठरतो.

४) कोर्टाची मदत न घेण्यासंबंधीचा करार

कराराच्या पूर्ततेसाठी कोर्टाची मदत घेण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. त्यामुळे करार पूर्ततेसाठी कोर्टाची मदत घेता येणार नाही अशा आशयाचा करार केल्यास तो करार अवैध ठरतो.

१९९६ साली करार संबंधीच्या कायद्यातील कलम २८ मध्ये बदल करण्यात आलेले आहेत. कायद्यातील या दुरुस्तीमुळे आणखीन काही प्रकारचे करार अवैध ठरविण्यात आलेले आहेत. उदा. नोकराने मालकाशी करार केला की त्याला बेकायदेशीरपणे नोकरीवरुन काढून टाकले तरीही तो मालकाविरुद्ध कोर्टात जाणार नाही. हा कायद्याची मदत घेण्याविरुद्ध केलेला करार असल्यामुळे बेकायदेशीर ठरतो.

थोडक्यात कायद्याची मदत घेण्याविरोधात केलेला करार अव़ैध ठरतो. (कलम २८).

५) अस्पष्ट करार: करारातील अटी जर स्पष्ट नसतील तर करार अवैध ठरतो (कलम २९)

उदा: अ ब बरोबर १०० टन तेल विक्रीला करार करतो. पण करारात कोणत्या प्रकारच तेल याचा स्पष्ट उल्लेख नाही. अस्पष्ट ते साठी हा करार रद्द ठरतो.

६) सामाजिक धोरणाच्या विरोधातील करार

काही विशिष्ट प्रकारचे करार हे समाजाला हानी पोहचविणारी असतात किंवा प्रचलित समाज धोरणाच्या विरोधातील असतात. असे करार अवैध ठरविण्यात आलेले आहेत. पुढील प्रकारचे करार समाजिक धोरणाच्या विरोधातील करार घोषित करण्यात आलेले आहेत.

- व्यापार स्वातंत्र्य विरोधातील करार.
- लग्नाला प्रतिबंध करणारे करार.
- व्यक्ती स्वांतत्र्या विरोधातील करार.
- पालकांच्या पाल्यावरील हक्का विरोधातील करार.
- गुन्हयासंबंधी तडजोड करणारे करार.
- सरकारी नोकरी किंवा सन्मान विकणारे करार.
- शत्रूराष्ट्रातील परदेशी नागरिकाशी केलेले करार.
- लाच देण्या घेण्या संबंधीचे करार.
- गुन्हा करण्या संबंधीचे करार.
- सावकारांना फसविण्या संबधीचे करार.
- सरकारला फसविण्यासाठी केलेले करार
- खटल्यातून मिळालेली भरपाई वाटून घेण्याचा करार.

अ) व्यापारास प्रतिबंध घालणारा करार

व्यापार, उद्योग, व्यवसाय या गोष्टीना प्रतिबंध घालण्यास करार हा अवैध ठरतो. कारण कुठल्याही नागरिकाला व्यापार, उद्योग किंवा व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य आहे. त्यावर कोणीही बंधने आणू शकत नाही.

निवाडा: माधव वि. राजकुमार.

अ व ब मध्ये करार झाला की ब नी आपला व्यवसाय बंद करावा व त्यासाठी अ नी त्याला काही पैसे द्यावेत. ठरल्या प्रमाणे ब आपला धंदा बंद करतो परंतु अ ब ला ठरलेली रक्कम देत नाही. ब अ च्या विरोधात कोर्टात खटला घालतो कोर्टाने निवाडा दिला की हा व्यापार विरोधातील करार असल्यामुळे अवैध आहे.

ब) लग्नविरोधातील करार.

कोणाच्या लग्नात आडकाठी आणणारे करार अवैध ठरतात. कोणालाही दुसऱ्याच्या लग्न करण्याच्या अधिकारात हस्तक्षेप करता येणार नाही.

निवाडा: लो वि. पिअरलेस. अ व ब मध्ये करार झाला की अ नी ब शीच लग्न करावे व ब नी अ शीच लग्न करावे इतर कोणाशी नाही जो कोणी हा करार मोडेल त्यांनी दुसऱ्या पक्षाला दोन लाख रुपये द्यावेत. कोर्टाने निवाडा दिला की या करारामुळे लग्न स्वातंत्र्यावर गदा येत असल्यामुळे करार रद्द ठरतो.

क) पालकांच्या अधिकारात हस्तक्षेप करणारा करार.

पालकांना आपल्या पाल्यावर काही अधिकार कायद्याने बहाल केलेले आहेत. त्यांना दुसऱ्याशी करार करुन या अधिकारात कपात करण्याचा किंवा अधिकार सोडून देण्याची मुभा नाही. कारण असे करार मुलांच्या हिताआड येणारे ठरतात.

ड) व्यक्ति स्वातंत्र्यावर बंधने आणणारे करार.

व्यक्ती स्वातंत्र्याला बाधा आणणारे करार हे सार्वजनिक धोरणाविरुद्धचे करार समजले जातात. उदा. गुलाम म्हणून काम करण्याचा करार. असे करार या सदरात मोडतात.

निवाडा: रामशास्त्री वि अंबेला. अ व ब मध्ये करार झाला की घेतलेल कर्ज पूर्ण पणे फिट पर्यंत कर्जदाराने सावकारच्या घरा गुलाम म्हणून राबावे कोर्टाने हा करार रद्द ठरविला.

इ) सरकारी पदे किंवा सन्मानाची विक्री

सरकार काही पदे किंवा सन्मान गुणाच्याआधारे जाहीर करते. असे सन्मान वशिल्याने मिळवून देण्यासाठी केलेले करार हे जनतेच्या धोरणाच्या विरुद्ध केलेले करार ठरतात. अशी सन्माने मिळालेली व्यक्ती पैसे घेऊन ती सन्माने दुसऱ्याला देऊ शकत नाही. उदा. एस् वि मुख्यस्वामी या खटल्यात अ सरकारतील आपली नोकरी किंवा जागा काही पैसे

घेऊन ब ला देण्याच कबूल करतो. हा करार सार्वजनिक विचारांच्या किंवा हिताच्या विरोधातील करार आहे. म्हणून कोर्टाने करार रद्द ठरविला.

फ) शत्रूराष्ट्रातील परदेशी व्यक्ती बरोबरचा करार.

जो पर्यंत दोन देशातील संबंध मैत्रीचे आहेत तो पर्यंत परदेशी व्यक्तीशी केलेले करार वैध आहेत. परंतु जेव्हा त्या दोन देशामध्ये युद्ध सुरु होतो तेव्हा असे करार सार्वजनिक धोरणाच्या विरोधातील करार ठरतो व करार रद्द होतो.

ग) लाच घेण्या - देण्याविषयाचे करार.

जिथे गुन्हेगारीवर आधारित करार आहे तिथे तो करार सार्वजनिक धोरणाच्या विरोधातील करार ठरतो. उदा. अ व ब मध्ये करार होतो की ब नी अ ला रु. १५००० द्यायचे व त्या बदल्यात ब च्या मुलाला वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवून द्यायचे. करार सार्वजनिक धोरणाच्या विरोधातील असल्यामुळे अवैध ठरतो.

ह) गुन्हा करण्यासाठी केलेला करार.

दोन व्यक्तीमध्ये कोणाचातरी खून करण्याचा करार होतो. तेव्हा तो करार सार्वजनिक धोरणाच्या विरोधातील असल्यामुळे रद्द ठरतो.

आय) सावकारांना फसविण्याचा करार.

कर्जदार जर एकत्र येऊन कर्ज देणाऱ्यालाच फसविण्याचा करार केला तर तो करार सार्वजनिक धोरणाच्या विरोधातला व अवैध ठरतो.

ज) सरकारला फसविण्याचा करार.

कर चुकाविण्यासारखे सरकारला फसविण्याचे करार केल्यास ते सार्वजनिक धोरणाच्या विरोधातील व अवैध करार ठरतात.

क) एखाद्या खटल्याचा मदत करुन त्या बदल्यात खटल्यातून मिळणार्या भरपाईत हिस्सा मागणारा करार अवैध ठरतो. असे करार म्हण़जे कोर्टाच्या खटल्यावर केलेला जुगार असतो म्हणून सार्वजनिक धोरणाच्या विरोधातला व अवैध करार ठरतो.

७) पैजेचे करार (कलम ३०)

इथे एखाद्या विशिष्ट गोष्टीवर दोन व्यक्तीची मते एकामेकाविरुद्ध असतात. भविष्यात घडणारी एखादी घटना आधार समजली जाते. ती घटना कशी घडेल हे आज नक्की सांगता येत नाही.

उदा. अ व ब मध्ये करार होतो मी आज पाऊस पडला तर ब अ ला रु. १०० देईल.

क व ड नाणेफेक करतात व काटा आला तर क डला व छापा आला तर ड कला रु. ५०/- देईल हा पैजेचा करार असून अवैध आहे.

पैजेच्या करारात पुढील गोष्टी असणे आवश्यक आहे.

1) दोनही पक्षाला जिंकणे शक्य असते.

2) जिंकणे किंवा हरणे ही गोष्ट एखाद्या घटनेवर आधारित असते.

3) घटना कशी घडेल हे आज दोघानाही ठामपणे सांगता येत नाही.

4) दाहोपैकी कोणीही जिंकू शकतो परंतु कोणीही हरु शकत नाही अशी परिस्थिती असेल तर करार पैजेचा ठरत नाही.

पैजेचा करार योगायोगावर अवलंबून असतो. घटना कशीही घडू शकते. ती कशी घडेल याबद्दल आज निश्चितपणे सांगता येत नाही. ती घटना भविष्यात घडणारी असते व कशीही घडू शकते. ती अनिश्चित असते. ती कशी घडेल ही गोष्ट आज संबधित पक्षांना सांगता येत नाही, म्हणून क्रिकेटच्या मॅच वर पैजा लावल्या जातात. मॅच पुढल्या महिन्यात खेळली जाणार असते. किंवा एखाद्या उमेदवाराच्या निवडणूक जिंकण्या किंवा हरण्यावर पैजा लावल्या जातात. निवडणूकीचा परिणाम दोनही पक्षाला आज माहीत नसतो.

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे करार करणाऱ्या पक्षाची त्या घटनेत कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष सहभाग नसतो किंवा हितसंबंध गुंतलेला नसतो फक्त त्यावर त्यांना पैज लावायची असते किंवा जुगार खेळायचा असतो व त्यातून कष्टाविना पैसे कमवायचे असतात.

पैजेच्या कराराला आवश्यक असणाऱ्या गोष्टी.

कोणताही करार पैजेचा करार ठरण्यासाठी पुढील गोष्टी त्यात असणे आवश्यक आहे:

- पैसे किंवा इतर मौल्यवान वस्तू देण्याची तरतूद असावी
- एका पक्षाला फायदा व्हावा आणि दुसऱ्या पक्षाला नुकसान. म्हणजेच एकाचा तोटा हा दुसऱ्याचा फायदा असावा
- दिलेल वचन हे एखाद्या घटनेच्या घडण्यावर किंवा न घडण्यावर अवलंबून असावे
- घटना अनिश्चित असावी. त्या घटनेवर दोन ही पक्षाचा ताबा नसावा. घटना कशी घडेल हे जर एक पक्षाचा माहीत असेल किंवा घटना त्याच्या आखत्यारीतील असेल तर असे करार पैजेचा करार ठरत नाही.
- दोनही पक्षांना जिंकण्याची किंवा हरण्याची बरोबरीने संधी असावी. जर नसेल तर करार पैजेचा करार ठरत नाही तसेच एक पक्ष जर फक्त हरणारच असेल किंवा जिंकणार किंवा हरणार नसेलच तरीही
- त्या घटनेत कोणत्याही पक्षाचे हित संबंध गुंतलेले नसावेत पैज जिंकण्या हरण्या पुरताच त्यात त्यांचा संबंध असावा.

- जुगार खेळण्याच्या उद्दिष्टानच वचन दिलेले असावे. घटनेत दोनही पक्षांचे इतर कोणतेही हितसंबध गुंतलेले नसावेत.

कलम ३० प्रमाणे पैजेचे करार हे अवैध ठरविण्यात आलेले आहेत. तसेच पैजेची रक्कम वसूल करण्यासाठी किंवा ठेवलेली ठेव परत मागण्यासाठीही कोर्टात खटला भरता येणार नाही.

परंतु कायद्याने काही विशिष्ट प्रकारच्या पैजेच्या कराराना खास परवानगी दिलेली आहे. जसे घोडयाची शर्यत. याला कायद्याने अनुमती दिलेली आहे. तसेच पुढील प्रकारच्या पैजेच्या कराराना ही परवानगी आहे.

अ) लॉटरी

ब) बुद्धिमत्तेवर आधारित खेळ, कोडी सोडविणे

क) विम्याचे करार

अ) लॉटरी

लॉटरी हा नशीबाचा खेळ असतो त्यामुळे तो एकप्रकारचा जुगारच आहे भारतीय दंड विधानातील कलम २९ (४अ) खाली लॉटरीचा धंदा चालविणे हा गुन्हाच ठरतो. त्यासाठी कायद्यात शिक्षेची तरतूद आहे. फक्त राज्य सरकारने खास परवानगी दिली असेल तरच लॉटरीचा धंदा चालविणे कायदेशीर ठरतो.

ब) बुद्धिमत्तेचे खेळ / साहित्यिक कोडी

जिंकण जिथ नशीबावर अवलंबून ती लॉटरी आणि केलेला करार हा पैजेचा करार. परंतु बक्षीस जर कौशल्य वापरुन एखादी कोडी सोडविण्यार्याला असेल तर तो जुगार ठरत नाही. इथे करार हा वैध करार ठरतो. म्हणून अक्षर कोडी, चित्र कोडी, साहित्यावर आधारित कोडी खेळाच्या शर्यती यांना कायद्याने परवानगी दिलेली आहे. इथे जिकंण व हरण तुमच्या बुद्धिमत्तेवर अवलंबून असत नशीबावर नाही. इथे बक्षिस गुणवत्तेसाठी दिले जाते.

1) **विम्याचे करार**

विम्याच्या करारात सुद्धा नशीबाचा भाग असतो. एखादी गोष्ट घडली तरच विमा कंपनी पैसे देते. परंतु कायद्याने अशा कराराना खास परवानगी दिलेली आहे. पैजेचा करार व विम्याचा करार यामध्ये तसा फरक आहे. तो फरक पुढीलप्रमाणे सांगता येईल.

1) विम्याचा करार हा स्वत:च्या हितसंरक्षणासाठी केला जातो. पैजेचा करारात हित संरक्षणाचा उद्देश नसतो. त्यातील पक्षांना फक्त फुकटात पैसे कमवायचे असतात.

2) विम्याच्या कराराच्या मागे शास्त्रीय अभ्यास असतो. योग्य पद्धतीने हिशेब करुनच करार केला जातो. जुगारात कोणत्याही प्रकारचा विचार किंवा हिशेब केला जात नाही.

3) विम्याचे करार जनतेच्या हिताचे आहेत. पैजेचे करार समाज हिताचे नाहीत.

८.२ पैजेचे करार व घटनावलंबी करार (CONTINGENT CONTRACT) यातील फरक

मुद्दे	पैजेचे करार	घटनावलंबी करार
एकमेकाला दिलेली वचने	यामध्ये दोहोंनी एकमेकाला वचन दिलेलेअसते.	इथे तस काही नसते.
स्वरुप	हा करार संभाव्य घटनेवरच अवलंबून असतो.	इथे पैजेच स्वरुप नसते.
वैध किंवा अवैध	अवैध	वैध
हितसंबंध	पक्षांचे काही हित संबंध गुंतलेले नसतात.	पक्षांचे हितसंबंध गुंतलेले असतात.
नशीबाचा खेळ	हा केवळ नशीबाचा खेळ असतो.	इथे नशीब किंवा देवाचा फारसा संबंध नसतो.

८.३ प्रश्न

1) करारासंबंधीच्या कायद्याने अवैध घोषित केलेल्या करारांची यादी द्या.

2) पैजेचा करार म्हणजे काय? त्याला आवश्यक असणाऱ्या गोष्टीची चर्चा करा.

3) व्यापारावर बंधन घालणारा करार केव्हा वैध ठरतो?

4) टीपा लिहा.

अ) सार्वजनिक धोरणा विरोधातील करार

ब) पैजेचे करार व घटनावलंबी करार यातील फरक स्पष्ट करा.

❖ ❖ ❖ ❖

९

खास करार किंवा विशिष्ट प्रकारचे करार
नुकसान भरपाईचे करार व हमीचे करार

घटक रचना :

९.० उद्दिष्टे

९.१ नुकसान भरपाईचे करार

९.२ हमीचे करार

९.३ हमीचे प्रकार

९.४ सततची हमी रद्द करणे

९.५ हमीदाराच्या जबाबदारीचे स्वरुप

९.६ नुकसान भरपाईचे करार व हमीचे करार यातील फरक

९.७ प्रश्न

९.० उद्दिष्टे

या पाठाच्या अभ्यासानंतर पुढील गोष्टी स्पष्ट होतील.

- नुकसान भरपाईच्या कराराच अर्थ व प्रकार
- नुकसान भरपाईच्या करारातील आवश्यक गोष्टी
- नुकसान भरपाईचे अधिकार
- हमीच्या कराराचे स्वरुप व वैशिष्ट्ये

९.१ नुकसान भरपाईचे करार

९.१.१ व्याख्या व अर्थ :

व्याख्या : एक पक्ष दुसऱ्या पक्षाच्या संभाव्य नुकसानाची भरपाईची हमी देतो. ते नुकसान वचन देणाऱ्याकडून किंवा त्याच्या वतीने दुसऱ्याच्या कृतीमुळे झालेला असतो किंवा होण्याची शक्यता असते. थोडक्यात दुसऱ्याचा होणार असलेले नुकसान भरुन देण्याची हमी दिली जाते.

इतर शब्दात सांगायचे झाल्यास संभाव्य नुकसाना पासून संरक्षण देणारा करार.

दुसऱ्याला होणारे नुकसान भरुन देण्याची हमी देणारा हमीदार व भरपाई मिळणारा असे एकूण दोन पक्ष अशा करारात असतात.

नुकसान भरपाईचे वचन देणाऱ्याला नुकसान भरपाई देणारा (Indemnifier) व ज्या व्यक्तीला नुकसान भरपाई द्यायची त्याला नुकसान भरपाई धारक (Indemnity holder) म्हणतात.

नुकसान भरपाईची व्याख्या पुढीलप्रमाणे करता येईल.

अ ला झालेल्या नुकसान ब भरुन देणार आहे. ब त्या नुकसानीला स्वत: जबाबदार असलेच असे नाही. म्हणजेच त्यानी केलेल्या चुकीमुळेच अ च नुकसान झालेल असेल असे नाही. नुकसान भरपाई रोख रक्कमेत केली जाऊ शकते तसेच एखाद्या यंत्राची दुरुस्ती करुन देऊन किंवा बदलून देऊन ही करता येते. नुकसान भरपाईच्या करारात एरवीच्या करारासंबंधीच्या इतर सर्व बाबी असणे आवश्यकच आहे. उदा. प्रतिफल, सज्ञान व्यक्ती वगैरे.

९.१.२ हमीचा करार :

उदा. अ व ब हे दोन मित्र दुकानात जातात. दुकानदाराला अ सांगतो की ब ला हव्या त्या वस्तू तुमच्या कडून खरेदी करु दे त्याचे पैसे तो तुम्हाला देईल याची मी हमी देतो. हा हमीचा करार आहे.

९.१.३ हमीच्या कराराचे प्रकार :

असे करार दोन प्रकारचे असतात. हमी देणार्या व्यक्ती वरुन करारांची अशी विभागणी केली जाते.

१) हमीदार स्पष्ट असतात.

२) हमीदार गृहीत धरलेले असतात.

1) **हमीदार स्पष्ट असतात :**

इथे हमीदार उघडपणे स्पष्ट शब्दात हमी देतात की दुसऱ्याच जर नुकसान झाल तर तो आपण भरुन देऊ. उदा. अ, ब ला आश्वासन देतो की ब च्या वस्तूना कच्च्या कृतीमुळे जर काही नुकसान झाले तर तो तोटा आपण भरुन देऊ.

2) **गृहीत हमीदार :**

करारातील पक्षांचा विचार केल्यास एक व्यक्तीने हमी स्वीकारलेली आहे असे सहजपणे गृहीत धरता येते. उदा. अभिजित अब्दुलच्या दुकानातून एक स्कूटर एक दिवस वापरण्यासाठी घेतो. स्कूटरला अपघात होऊन स्कूटरचे नुकसान होते. इथे अभिजितला

अब्दुलला झालेल नुकसान भरुन देणे भाग आहे जरी तस काही त्यांनी स्कूटर भाड्यांनी घेताना स्पष्टपणे सांगितलेले नसले तरीही.

९.१.४ नुकसान भरपाईच्या करारातील आवश्यक घटक :

नुकसान भरपाईचा करार वैध ठरण्यासाठी त्यात पुढील गोष्टींचा समावेश आवश्यक आहे.

1) नुकसान अपेक्षित :

नुकसान भरपाईचा करार हा संभाव्य नुकसान भरुन देण्यासाठी असतो.

2) **वैध करारात आवश्यक असणाऱ्या इतर गोष्टी :**

नुकसान भरपाईचा करार हा सर्वसाधारण कराराचाच एक नमूना असल्यामुळे इतर करारात आवश्यक असणाऱ्या गोष्टी इथेही आवश्यक असतात. उदा.मुक्त संमती, सक्षम पक्ष, प्रतिफल वगैरे.

3) **दुसऱ्याला नुकसान होण्यापासून वाचविणे :**

दुसऱ्या पक्षाला होणाऱ्या संभाव्य नुकसानापासून वाचविण्याचे उद्दिष्ट असले पाहिजे.

४) हे संरक्षण फक्त प्रत्यक्षात झालेल्या नुकसानाच्या भरपाईसाठीच असावी. तोटा वचनदात्याच्या कृतीमुळे किंवा इतर कोणाच्या कृतीमुळे झालेला असू शकेल. करारात ज्या घटनेचा उल्लेख असतो फक्त त्या घटनेमुळेच झालेल्या नुकसानाची भरपाई करण्यात येते. करारातील घटना प्रत्यक्षात घडली पाहिजे.

५) व्याख्या सर्वसमावेशक नाही. व्याख्येत स्पष्ट करण्यात आलेल आहे की एखाद्या व्यक्तीच्या कृतीमुळे होणाऱ्या तोट्याचीच भरपाई केली जाते. नुकसान काही वेळा इतर गोष्टीमुळे ही होऊ शकतो. ज्यावर कोणत्याही व्यक्तीचा ताबा नसतो. उदा. त्सुनामी, भूकंप वगैरे.

९.१.५ भरपाई देणाऱ्या विरुद्ध खटला झाला तर त्याचे अधिकार (कलम १२५) :

1) होणाऱ्या नुकसानाची भरपाई वसूल करण्याचे अधिकार. त्यानी द्यावी लागणारी सर्व नुकसानाची भरपाई झाली पाहिजे.

2) त्यासाठी होणारा खर्च वसूल करणे.

   नुकसान भरपाई मिळविण्यासाठी त्याला जर काही पैसे खर्च करावे लागले तर तेही पैसे वसूल करता येतात.

3) तडजोड घडवून आणल्यास त्यासाठी घ्यावयाची रक्कम. तीही वसूल करता येते.

नुकसान भरपाईचा करार हा एक प्रकारचा करारच आहे. त्यामुळे इतर प्रकारच्या करारात ज्या गोष्टी आवश्यक असतात त्या सर्व गोष्टी या करारातही आवश्यक असतात. जसे सक्षम पक्ष, मुक्त संमती, कायदेशीर उद्दिष्ट इत्यादी. त्यामुळे जर कराराच उद्दिष्ट बेकायदेशीर असेल तर करार अवैध ठरतो. उदा. बकुल मुकुलला सांगतो की तू रामाला

बदडून काढ. त्यासाठी जर कोर्टाने तुला दंड केला तर तो दंड मी भरीन. या कराराच उद्दिष्ट बेकायदेशीर असल्यामुळे करार अवैध ठरतो.

९.२ हमीचे करार (CONTRACTS OF GUARANTEE)

९.२.१ अर्थ व व्याख्या :

एखाद्याने दिलेल वचन पाळले नाही किंवा कर्ज फेडल नाही तर त्याची पूर्तता करण्याची हमी अशा कराराद्वारे देण्यात येते. अशा करारात तीन पक्ष असतात.

- धनको ज्याला हमी देण्यात येते.
- जामीनदार म्हणजेच जो हमी देतो.
- प्रमुख देणेकरी (Principal Debtor) ज्यानी कराराची पूर्तता केली नाही तर त्याची पूर्तता करण्याची हमी देण्यात येते.



करार संबंधीच्या कायद्यातील कलम १२६ प्रमाणे हमीचा करार म्हणजे दुसरी व्यक्ती दिलेल वचन पूर्ण करेल किंवा घेतलेले कर्ज वेळेत फेडेल यासाठी दिलेली हमी.

ब्रिकनिट्स वि. डामेल (१७०४) च्या इंग्लिश केसमध्ये अशा कराराची व्याख्या स्पष्ट शब्दात देण्यात आलेली आहे. 'हमीचा करार म्हणजे दुसरी व्यक्ती कराराची पूर्तता करेल किंवा घेतलेल्या कर्जाची परतफेड करेल म्हणून दिलेली हमी.“ कोणाला कर्ज मिळावे, उधारीवर माल मिळावा किंवा नोकरी मिळावी यासाठी हमीचा करार केला जातो. उदा. अ, ब ला रु. ५००० चे कर्ज देतो व क, अ ला हमी देतो की ब नी जर वेळेवर पैसे परत केले नाहीत तर ते पैसे मी देईन. हा हमीचा करार होय. यामध्ये –

- अ हा सावकार
- क हा हमीदार व
- ब हा कर्ज घेणारा (Principal Debtor) इथे एकूण ३ करार असतात, सावकार व कर्जदार यांच्यातला पहिला करार.

- सावकार व हमी देणारा यांच्यातला दुसरा करार.
- हमी देणारा व कर्ज घेणारा यांच्यातला तिसरा करार.

कर्ज घेणारा हमीदाराला विनंती करतो की त्यांनी कर्जाला जामीन राहावे व त्याला पैसे द्यावे लागले तर ते पैसे त्याला आपण नंतर देऊ. अशा प्रकारे हमीच्या करारात तीन पक्ष व एकूण तीन करारांचा समावेश असतो.

अर्थात प्राथमिक जबाबदारी ही कर्ज घेणाऱ्याची असते. हमीदाराची जबाबदारी दुय्यम असते व कर्जदाराने कर्ज न फेडल्यासच ही जबाबदारी निर्माण होते. (बंडक वि. विक्रम कॉटन मिल्स (१९७०).

हमी देणाऱ्याला कराराची संपूर्ण माहिती पुरविणे आवश्यक आहे. त्याला न सांगता जर नंतर करारातील अटीत काही फेरफार करण्यात आले तर हमीदाराची जबाबदारी लगेच आपोआप संपुष्टात येते.

९.२.२ हमीच्या कराराची वैशिष्ट्ये किंवा अशा करारातील आवश्यक गोष्टी :

हमीच्या करारात आवश्यक असणाऱ्या गोष्टी पुढील प्रमाणे सांगता येतील :

1) **करारात तीन पक्ष असतात :**

हमीच्या करारात तीन पक्ष असतात - सावकार, कर्जदार व हमी देणारा. इथे संबंधीत पक्षामध्ये तीन स्वतंत्र करार झालेले असतात व करारांना तिघांच्याही संमतीची आवश्यकता आहे. हे तीन करार पुढीलप्रमाणे झालेले असतात.

अ) सावकार व कर्जदार

ब) सावकार व हमी देणारा

क) कर्जदार व हमी देणारा

२) जबाबदारी :

अशा करारात प्राथमिक जबाबदारी ही कर्ज घेणाऱ्याची असते आणि हमी देणाऱ्याची जबाबदारी ही दुय्यम असते. कर्जदारांनी कर्जाची परतफेड वेळेवर केली नाही तरच हमीदारावर जबाबदारी येते.

९.२.३ वैध करारासाठी आवश्यक गोष्टी :

अशा कराराच्या वैधतेसाठी इतर सर्व साधारण करारातीलच गोष्टी असणे आवश्यक आहे. जसे मुक्त संमती, प्रतिफल, कायदेशीर उद्दिष्ट, पक्ष सक्षम असणे वगैरे. या सर्व गोष्टी अशा करारातही आवश्यक आहेत. परंतु प्रतिफलाच्या बाबतीत सावकार व हमीदार यांच्यात थेट प्रतिफलाची आवश्यकता नाही. कर्जदाराचे प्रतिफल हे पुरेसे आहे.

९.२.४ करार लेखी असणे :

हमीचा करार इंग्लंड व नेपाळ मध्ये लेखी असणे आवश्यक आहे. परंतु भारतीय कायद्याखाली अशी अट नाही. करार लेखी किंवा तोंडीही असू शकतो. दोनही प्रकार वैध समजले जातात.

९.२.५ हमीच्या कराराची वैशिष्ट्ये :

हमीचा करार हा इतर सर्व साधारण करारा प्रमाणेच एक प्रकारचा करार आहे. त्यामुळे इतर सर्व साधारण करारातील सर्व गोष्टी इथेही असणे आवश्यक आहे हे ओघानेच आले, परंतु त्याशिवाय अशा करारात पुढील गोष्टीही असणे आवश्यक आहेत.

1) हमीदाराची जबाबदारी मूळ कर्जदारांनी आपली जबाबदारी वेळेत व योग्य पद्धतीने पार पाडली नाही तरच निर्माण होते. त्यानी कर्जफेड केली नाही तर हमीदारावर ती फेडण्याची जबाबदारी येते. अशी अट जर नसेल तर करार हमीचा करार न ठरता तो नुकसान भरपाईचा करार ठरतो.

उदा.

1) अ, ब ला क ला काही वस्तू उधारीवर विकायला सांगतो आणि क नी जर वस्तूचे पैसे दिले नाही तर आपण ते देण्याच मान्य करतो. हा हमीचा करार आहे. कारण क नी पैसे दिले नाही तरच अ वर पैसे देण्याची जबाबदारी येते. नाहीतर नाहीं.

2) अ एका दुकानदाराला क ला काही वस्तू उधारीवर विकायला सांगतो, आणि क वेळेवर पैसे फेडेल याची मी काळजी घेतो अस आश्वासन देतो. हा हमीचा करार नव्हे कारण क नी नाही दिली तरच अ वर जबाबदारी येत नाही. हा नुकसान भरपाईचा करार आहे.

2) कर्जदार करार करण्यास सक्षम असण्याची आवश्यकता नाही.

सावकार आणि हमीदार हे दोघेही करार करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. परंतु कर्ज घेणारा करार करण्यास सक्षम असलाच पाहिजे अस नाही, कारण इथे कर्जदार कर्ज परत करण्यास जबाबदार नसून हमीदार जबाबदार आहे. (काशिबा वि.श्रीपत)

3) हमीदाराने जबाबदारी स्पष्ट शब्दात घेतलेली असावी.

करार हमीचा करार ठरण्यासाठी जामीनदारांने स्पष्ट शब्दात कर्ज फेड करण्याची जबाबदारी घेतलेली असावी. उदा. अ, ब बरोबर टायटन वॉच कंपनीत जातो व मालकाला म्हणतो, 'ब ला हे घड्याळ घेऊ द्या. त्यांनी जर पैसे नाही दिले तर मी देईन." हा हमीचा करार होय.

९.३ हमीचे प्रकार

हमीचे प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येतील.

1) **विशिष्ट हमी :**

विशिष्ट हमी म्हणजे एका ठराविक करारासाठी खास करुन दिलेली हमी. इथे जामीन राहिलेल्याची जबाबदारी फक्त त्या विशिष्ट करार किंवा व्यवहारासाठी मर्यादित असते. त्या व्यक्तीच्याक इतर करारांशी काहीही संबंध नसतो. उदा. ब, क ला ५ पोती गहू विकतो व त्याचे पैसे क एक महिन्यात देईल अशी हमी अ, ब ला देतो. नंतर ब, क ला फक्त ४ पोती गहू विकतो. आणि क त्याचे पैसे वेळेवर देत नाही. इथे अ नी विशिष्ट व्यवहारासाठी हमी दिलेली असते. त्यामुळे या व्यवहारासाठी तो हमीदार राहत नाही. ४ पोत्यांचे पैसे दिले नाही. या व्यवहाराशी त्याचा काहीही संबंध नाही.

2) **सततची हमी (Continuing guarantee) :**

अशी हमी अनेक व्यवहारांना मिळून दिलेली असते. अशा हमीच्या वेळी हमी देणारा आपल्या जबाबदारीवर मर्यादा घालून घेऊ शकतो.त्या रकमे पर्यंतच तो जबाबदार राहतो. हमी देताना त्याची कालावधी व रक्कम ठराविण्यात येते. उदा. (१) ब क ला आपल्या जमीनीचे भाडे गोळा करण्यासाठी वसूली कारकून म्हणून नेमतो आणि अ, क नी गोळा केलेल्या रकमा रु ५,०००/- पर्यंत वेळेवर ब ला आणून देईल याची हमी घेतो. ही सततची हमी होय.

3) **पूर्व लक्षी हमी :**

पूर्व लक्षी हमी ही सध्या अस्तित्वात असलेल्या कर्जासाठी पूर्व लक्षाने देण्यात येते.

4) **भविष्यकालीन हमी :**

भविष्यकाळात निर्माण होणाऱ्या कर्जासाठी इथे हमी देण्यात येते.

९.४ सततची हमी रद्द करणे

सततची हमी पुढील पद्धतीने संपुष्टात आणता येते.

1) सूचना देऊन (कलम १३०) योग्य प्रकारे आगाऊ सूचना देऊन भविष्यकाळातील व्यवहारांसाठी अशी हमी रद्द करता येते.

2) **हमीदार मरण पावल्यास (कलम १३१) :**

हमीदार जर मरण पावला तर भविष्यातील व्यवहारासाठी तो किंवा त्याचे वारस जबाबदार राहत नाहीत. हमीदाराच्या मरणाबद्दल खास सूचना देण्याची आवश्यकता नाही, हमीदाराच्या मरणानंतरच्या व्यवहारांना हमीचे संरक्षण राहत नाही, कर्ज देणाऱ्याला हमीदाराच्या मृत्यूची माहिती नसली तरी काही फरक पडत नाही.

९.५ हमीदाराच्या जबाबदारीचे स्वरुप

कर्जदाराकडून जी रक्कम सावकार व्याज वगैरे सकट वसूल करु शकतो तेवढीच रक्कम सावकार हमीदारकडून वसूल करु शकतो. उदा. अ ब ला हमी देतो की ब नी क वर काढलेल्या हुंडीचे पैसे क वेळेवर देईल. क ने हुंडीचा अनादर केला तर अ ला हुंडीचे पैसे अधिक त्यावर ठरलेल्या दराने व्याज ब ला देणे भाग आहे.

९.६ नुकसान भरपाईचा करार व हमीचा करार यातील फरक

मुद्दे	नुकसान भरपाईचा करार	हमीचा करार
अर्थ	एक व्यक्ती दुसऱ्याला होणाऱ्या नुकसानाची भरपाई करुन देण्याच वचन देते.	इथे दुसरी व्यक्ती करार पूर्ण करेल याची हमी देण्यात येते.
पक्षांची संख्या	करारात दोनच पक्ष असतात	अशा करारात तीन पक्ष असतात
जबाबदारी	मुख्य जबाबदारी नुकसान भरपाई करणाऱ्यावर असते	हमीदाराची जबाबदारी दुय्यम स्वरुपाची असते.
करारांची संख्या	एकच करार असतो. नुकसान होऊ शकणारी व्यक्ती व ते भरुन देण्याच कबूल करणारी व्यक्ती यांच्यामध्ये एकच करार असतो.	तीन करार असतात हमीदार व कर्जदार सावकार व कर्जदार व सावकार व हमीदार.
कराराची पूर्तता	करारपूर्ती संभाव्य नुकसानावर अवलंबून असते.	इथे आधीच कर्ज दिलेल असत ते वेळेवर परत केले जाईल याची हमी असते.

९.७ प्रश्न

1) नुकसान भरपाईच्या कराराची वैशिष्टये विषद करा.
2) हमीच्या करारची व्याख्या द्या व आवश्यक गोष्टींची चर्चा करा.
3) हमीदाराचे कर्जदाराविरुद्ध असलेले अधिकार स्पष्ट करा.
4) विविध प्रकारच्या हमींचे वर्णन करा.

5) नुकसान भरपाईचा करार व हमीचा करार यातील फरक स्पष्ट करा.

6) संक्षिप्त टीपा लिहा:-

अ) नुकसान भरपाईचे प्रकार

ब) नुकसान भरपाई करणाऱ्याचे अधिकार

क) नुकसान भरुन देणाऱ्याचे अधिकार आणि कर्तव्ये

७) व्याख्या द्या.

अ) हमीचा करार. ब) नुकसान भरपाईचा करार.

क) अवैध हमी. ड) विशिष्ट हमी.

❖❖❖❖

१०

निक्षेपाचे करार

घटक रचना

१०.० उद्दिष्टये

१०.१ निक्षेपाचा अर्थ व व्याख्या

१०.२ निक्षेप गृहीताचे अधिकार व कर्तव्य

१०.३ निक्षेपदाताची कर्तव्ये.

१०.४ निक्षेप रद्द करणे.

१०.५ हरविलेली वस्तू सापडलेल्याचे अधिकार व कर्तव्ये

१०.६ ताबे अधिकार (Lien)

१०.७ प्रश्न

१०.० उद्दिष्टये

या पाठाच्या अभ्यासानंतर तुम्हाला पुढील गोष्टींची माहिती होईल

- निक्षेपाचा अर्थ
- निक्षेपाची वैशिष्टये
- विविध प्रकारचे निक्षेप
- निक्षेपगृहीताचे अधिकार व कर्तव्ये
- निक्षेप दाताची कर्तव्ये
- हरवलेली वस्तू सापडणाऱ्याचे अधिकार

१०.१ निक्षेपाची व्याख्या व अर्थ

१०.१.१ निक्षेपाची व्याख्या :

हा शब्द फ्रेंच भाषेतून आलेला आहे. बेलर (Bailor) म्हणजे कराराने वस्तू दुसऱ्याला देणे. कोणतीही वस्तू विशिष्ट कारणासाठी दुसऱ्याला ठराविक वेळेसाठी देणे म्हणज़े निक्षेप. उद्दिष्ट पूर्तीनंतर त्यानी ती वस्तू परत करावयाची असते किंवा मालकाच्या सूचनेप्रमाणे त्याची विक्री किंवा विलेवाट लावावयाची असते.

जी व्यक्ती वस्तू ठेवायला देते त्या व्यक्तीला (Bailor) निक्षेपदाता म्हणतात. तर ज्याला वस्तू देण्यात येते त्याला निक्षेप गृहीतदार (Bailee) म्हणतात व एकूण या व्यवहाराला निक्षेप (Baliment) म्हणतात.

व्याख्या : निक्षेप म्हणजे एक व्यक्ती आपल्या वस्तू काही विशिष्ट कारणासाठी दुसऱ्याकडे सोपविते व ते कार्य पूर्ण झाल्यावर वस्तू परत घेण्याचा करार करते. किंवा मालकाच्या आदेशाप्रमाणे त्या वस्तूची विल्हेवाट लावण्यास सांगण्यात येते. वस्तू निक्षेपासाठी देणारा निक्षेपदाता (Bailor) व ज्याच्याकडे वस्तू सोपविलेली आहे तो निक्षेप गृहीतदार (Bailee) म्हणून संबोधला जातो.

उदा:-

१) अ आपली मोटार ब ला काही वेळ वापरण्यासाठी देतो.

२) अ आपल्या शिंप्याकडे कोट शिवण्यासाठी काही कापड देतो.

३) अ आपला टी.व्ही. दुरुस्तीसाठी ब कडे देतो.

निक्षेपाच्या करारात एक व्यक्ती आपली वस्तू दुसऱ्याकडे काही विशिष्ट कारणासाठी सोपवितो. ते कारण संपल्यावर दुसऱ्यानी वस्तू पाहिल्याला परत करावी किंवा त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्याची नंतर विल्हेवाट लावावी म्हणजे विकावी वगैरे (कलम १४)

उदा:-

- अ ब ला वाचण्यासाठी आपल पुस्तक देतो.
- अ ब कडे आपल घडयाळ दुरुस्तीला देतो.
- अ ब कडून कर्ज घेतो व तारण म्हणून आपल्या हातातली सोन्याची अंगठी त्याला देतो.
- अ आपल्या शिंप्याला कोट शिवण्यासाठी कापड देतो. कोट शिवून झाल्यावर शिंपी तो कोट अ ला देतो.

वरील सर्व उदाहरणात अ हा निक्षेपदाता व ब हा निक्षेपगृहीता आहे.

१०.१.२ निक्षेपाची वैशिष्टये किंवा आवश्यक असणाऱ्या गोष्टी:-

1) वस्तू सोपविणे. एका व्यक्तीने आपली वस्तू दुसऱ्याकडे सोपविणे आवश्यक आहे.

2) वस्तू सोपविण्यामागे काही विशिष्ट उद्दिष्ट असते. उदा. दुरुस्तीसाठी, सुरक्षित राहण्यासाठी वापरासाठी वगैरे.

3) परत:- ज्या कारणासाठी वस्तू दिलेली असते ते कारण पूर्ण झाल्यानंतर वस्तू मूळ मालकाला परत करण्याचे किंवा मालकाच्या इच्छेप्रमाणे त्याची विल्हेवाट लावण्याचे ठरलेल असते.

4) निक्षेपाचा करार उघड किंवा स्पष्ट असतो किंवा काहीवेळा गृहीतही धरला जातो. (हरविलेली वस्तू दुसऱ्याला सापडली तर निक्षेपाचा करार कायद्या प्रमाणे गृहीत धरला जातो.)

5) मालकी - निक्षेपाच्या कालावधीत वस्तूची मालकी निक्षेपदाताकडेच असते म्हणजेच निक्षेपामुळे मालकीत बद्दल घडून येत नाही.

6) निक्षेप हा फक्त चल मालमत्तेचाच असतो. यात पैशाचा किंवा रोख रकमेचा मात्र समावेश होत नाही, त्यामुळे कोणाकडे पैसे ठेवायला देण म्हणजे निक्षेप नव्हे.

आपण बँकेत आपल्या खात्यात पैसे ठेवतो त्याला निक्षेप म्हणत नाहीत. खातेदार व बँक यांचे संबंध एक सावकार आणि कर्जदार असे असतात.

7) **ताबा (Possession)**

वस्तू आधीच ताब्यात असलेली व्यक्ती ही निक्षेप गृहीता (Bailee) बनू शकते. त्यासाठी नंतर संबधितामध्ये निक्षेपाचा करार होऊ शकतो. करार उघड असेल किंवा गृहीत धरलेला असेल. उदा. अ एक कार विक्रेता आहे. त्याच्या ताब्यात अनेक कार आहेत. त्यातील एक कार ब विकत घेतो परंतु कार अ कडेच काही दिवसासाठी ठेवतो. विक्रीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अ हा कारचा निक्षेप गृहीता बनतो पूर्वी तो त्या कारचा मालक असतो.

१०.१.३ निक्षेपाचे विविध प्रकार :

१) पैसे देण्याच्या आधारे -

अ) फुकट किंवा विना मोबदला निक्षेप

इथे निक्षेपदाता किंवा निक्षेप गृहीता यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा पैशाचा व्यवहार (देणं घेण) होत नाही.

उदा.

- अ आपल्या ब नावाच्या मित्राला आपल्या गावी जाण्यासाठी आपली कार देतो (प्रति फल काही नाही)
- अ आपली स्कूटर ब ला भाडं वैगरे न घेता दोन दिवस वापरण्यासाठी देतो.

ब) पैसे देऊन निक्षेप :

इथे निक्षेप गृहीताला काही पैसे द्यावे लागतात. उदा. अ आपली टॅक्सी ब ला दोन दिवस वापरण्यासाठी दिवसाला रु ५००/- भाडयावर देतो. हा निक्षेप सशुल्क निक्षेप आहे.

२) निक्षेपाचा फायदा :

1) निक्षेप दाता आपल्या फायद्यासाठी निक्षेपाचा करार करतो. इथे वस्तू दुसऱ्याकडे ठेवली जाते व त्याच उद्दिष्ट फक्त निक्षेपदात्याची सोय व्हावी ही असते. उदा. गावाला जाताना मौल्यवान वस्तू सुरक्षिततेसाठी शेजाऱ्याकडे ठेवली जाते.

2) निक्षेप गृहीताच्या फायद्यासाठी निक्षेप. इथे निक्षेपाचा फायदा फक्त निक्षेप गृहीताला होतो. उदा. मित्राला स्कूटर वापरण्यासाठी देणे.

3) दोहोच्या फायद्यासाठी निक्षेप.

4) इथे दोनही पक्षाला काही फायदे मिळणार असतात. उदा. टी. व्ही. किंवा घड्याळ दुरुस्तीला देणे.

३) उद्दिष्टावरुन

अ) सुरक्षिततेसाठीचा निक्षेप.

उद्दिष्टावरुन सुरक्षिततेसाठीचा निक्षेप म्हणजे वस्तू सुरक्षित राहावी म्हणून दुसऱ्याकडे ठेवली जाणे होय. उदा. दागिने बँकेच्या लॉकरमध्ये ठेवणे.

ब) भाडयाने देणे.

वेळेनुसार विशिष्ट रकमेची आकारणी करून वस्तू वापरास देणे म्हणजे भाडयाने देणे होय. उदा.कार किंवा स्कूटर भाडयाने देणे.

१०.२ निक्षेपगृहीत्याचे (Bailee) अधिकार व कर्तव्ये.

१०.२.१ अधिकर :

निक्षेप गृहीत्याचे अधिकार पुढील प्रमाणे सांगता येतील:-

1) **संयुक्त मालकीच्या वस्तूचा निक्षेप.**

निक्षेपित वस्तूचे अनेक मालक असतील तर आधी ठरल्याप्रमाणे किंवा त्यापैकी कोणा एकाला परत केली तरी चालते. (कलम १६५)

2) **निक्षेपदाता मालक नसणे :**

निक्षेपदाता जर वस्तूचा खरा मालक नसेल तर निक्षेप गृहीताने त्याला ती परत केली म्हणजे त्याची जबाबदारी संपली. मूळ मालकाला शोधून ती वस्तू त्यालाच पुन: परत करण्याची आवश्यकता नाही. (कलम १६६)

3) **निक्षेप गृहीताचा ताबा अधिकार :**

ताबा अधिकार (Lien) म्हणजे एखाद्याकडून कर्जाची रक्कम परत मिळेपर्यंत त्याची वस्तू ठेवून घेण्याचा अधिकार. कायद्याने असा अधिकार काही विशिष्ट परिस्थितीत बहाल केलेला आहे.

ताबा अधिकारांचे परत दोन प्रकार आहेत. विशिष्ट वस्तूवरील ताबा (Particular Lien) व सर्व वस्तूवरील ताबा (General Lien) अधिकार

पहिल्या प्रकारात ज्या वस्तूचा प्रत्यक्ष संबंध आहे. फक्त तीच वस्तू अडवून ठेवण्याचा अधिकार आहे. तर दुसऱ्या प्रकारात कर्जदाराच्या मालकीची कोणतीही वस्तू अडवून ठेवण्याचा अधिकार असतो. उदा. अ ब कडे पॉलिश करण्यासाठी एखादा हिर्याचा खडा देतो ब ते काम पूर्ण करतो. त्याचे पैसे मिळेपर्यंत ब अ चा हिरा आपल्या ताब्यात ठेऊ शकतो.

१०.२.२ निक्षेप गृहीताची कर्तव्ये :

१. वस्तूची योग्य ती काळजी घेणे :

आपल्याकडे ठेवलेल्या वस्तूची निक्षेप गृहीतानी योग्य ती काळजी घेतली पाहिजे. किती काळजी घ्यावी याला कायद्याच उत्तर ती वस्तू तुमच्या मालकीची असतीतर तुम्ही त्याची किती काळजी घेतली असती तेव्हा ही इथे व्यक्तीकडून सर्व साधारण हुशारी अपेक्षित आहे. तो त्या विषयातला तज्ञ वगैरे असला पाहिजे अशी अपेक्षा नाही, स्वताच्या वस्तू एवढी काळजी घेतल्यानंतर ही जर त्या वस्तूची नासधूस झाली किंवा चोरी वगैरे झाली तर निक्षेप गृहीता त्याला जबाबदार धरला जाणार नाही. निक्षेप पैसे घेऊन असो किंवा फुकट असो वस्तूची काळजी मात्र तेव्हढीच घेतली पाहिजे. तसेच वस्तूचा नाश नैसर्गिक आपत्तीमुळे झाल्यास निक्षेप गृहीता त्याला जबाबदार राहणार नाही. उदा: अ आपली दागिने सुरक्षित राहण्यासाठी ब कडे ठेवतो. अ ते दागिने आपल्या इतर दागिन्या बरोबर लॉकरमध्ये ठेवतो. अशा परिस्थितीत जर घरावर दरोडा पडून दागिन्याची चोरी झाली तर ब ला जबाबदार धरल जात नाही.

2. नोकरांच्या निष्काळजीपणाला निक्षेप गृहीता जबाबदार :

त्याच्या नोकरांच्या निष्काळजीपणामुळे जर काही नुकसान झाले तर मात्र निक्षेप गृहीता त्यासाठी जबाबदार धरला जातो. परंतु जर नोकराने आपल्या कामाच्या कक्षेबाहेर जाऊन काही कृती केली तर मात्र निक्षेपगृहीता जबाबदार राहत नाही. त्यासाठी तो नोकराला जबाबदार धरला जातो. (सॅडरसन वि कोलिन्स)

3. परवानगी नसलेल्या कारणासाठी वस्तूचा वापर :

निक्षेप गृहीताने जर परवानगी न घेता वस्तूचा विशिष्ट कारणासाठी वापर केला तर वस्तूच्या नासधूसीला तो जबाबदार राहतो. अस करताना त्यात त्यांनी आवश्यक काळजी घेतलेली असली तरीही. म्हणजेच अपघाताने वगैरे नुकसान झाले तरीही (कलम १५४). उदा. अ, ब ला घोडेसवारी करण्यासाठी आपला घोडा देतो. ब आपल्या नात्यातला क ला घोडा सवारी करण्यासाठी देतो. क घोडा काळजीपूर्वक वापरतो तरीही घोडयाला अपघात होतो. घोडयाला झालेल्या जखमेच्या उपचाराचा खर्च अ ला ब नी दिला पाहिजे.

4. निक्षेप गृहीता निक्षेपदात्याच्या मालात आपला माल मिसळतो :

अशा परिस्थितीत कायद्याने पुढील उपाय सुचविलेले आहेत.

1) जर निक्षेप गृहीताने निक्षेपदाताच्या संमतीने मालाची भेसळ केलेली असेल तर एकूण मिश्रणात त्यांच्या त्यांच्या मालकीच्या प्रमाणात त्यांचा वाटा राहील (कलम १५५)

2) निक्षेप गृहीताने निक्षेपदाताच्या परवानगी शिवाय जर मालाचे मिश्रण केलेले असेल तर आणि त्या मिश्रणातून प्रत्येकाचा वाटा वेगळा करणे शक्य असेल तर त्यांची मालकी पूर्वीप्रमाणेच राहील. मात्र मिश्रणातून प्रत्येकाचा वाटा वेगळा करण्यासाठी येणारा खर्च निक्षेप गृहीतानीकेला पाहिजे तसेच अशा मिश्रणाने काही मालाच्या किंमतीत घट झालेली असेल तर झालेला नुकसान त्यांनीच भरुन दिला पाहिजे. (कलम १५६) उदा. हमीद आपल्या नावाचा शिका असलेल्या काही कापसाच्या गाठी सलामीकडे ठेवतो, त्यातील १०० गाठीत सलीम हमीदच्या परवानगी शिवाय आपल्या गाठीत मिसळतो ज्यावर दुसरा शिक्का असतो. हमीदला त्याच्या गाठी परत मिळायला पाहिजेत आणि त्याच्या गाठी वेगळया काढण्यास होणारा खर्च किंवा काही नुकसान झाले असल्यास त्याची किंमत सलीमनी दिली पाहिजे.

निक्षेपदाताच्या परवानगी शिवाय त्याचा माल इतर मालाबरोबर मिसळला असेल व त्याचा माल वेगळा करण आता शक्य नसेल तर निक्षेप गृहीतानी निक्षेपदाताचा होणारा सर्व नुकसान भरुन दिला पाहिजे. (कलम १५७) उदा. ड उत्तम प्रतीच रु ४५ च पीठ ब ला देतो आणि ड च्या परवानगी शिवाय ब ते पीठ आपल्या कडच्या निकृष्ट पीठात मिसळतो. ज्याची किंमत फक्त रु. २५ असते . ब नी ड़ चा होणारा नुकसान भरुन दिला पाहिजे.

5. वस्तू परत करणे आवश्यक:

निक्षेपदात्याचा माल ठरलेले काम झाल्यानंतर निक्षेप गृहीतानी त्याला होत त्या चांगल्या स्थितीत आधी ठरल्याप्रमाणे परत केला पाहिजे. हे त्याच कर्तव्य आहे. त्यानी आपला माल परत मागण्याची वाट पाहायची गरज नाही. यासाठी जर करार करताना काही कालावधी ठरलेली असेल तर त्या कालावधीतच माल परत केला पाहिजे (कलम १६०)

निक्षेप गृहीताच्या चुकीने जर वस्तू वेळेवर परत केली गेली नाही आणि त्या वस्तूंना काही नुकसान पोहचले तर त्याला निक्षेप गृहीता जबाबदर राहील. (कलम १६१) उदा. ग नी ब च्या काही वस्तूच वाहतूक करण्याच कबूल केल. मालवाहतूक करणाऱ्या व@नच्या चालकाने वॅन रस्त्यावर उभी करुन ठेऊन जेवायला गेला त्या वेळेत वस्तूंची चोरी झाली. ब नी ग वर नुकसान भरपाई साठी दावा लावला. चालकाच्या निष्काळजीपणामुळे झालेला तोटा ग ने भरुन दिला पाहिजे असा निवाडा कोर्टाने दिला.

6. निक्षेपित वस्तूत झालेली वाढ :

निक्षेपाच्या काळात जर त्या वस्तूत काही वाढ झाली तर त्याच्या सकट वस्तू निक्षेपदात्याला परत केली पाहिजे. उदा. क आपली गाय काही काळासाठी ब क डे

ठेवतो. त्या काळात गायीला वासरु होते. ब नी गाय व वासरु दोन ही क ला परत केली पाहिजे.

१०.३ निक्षेपदाताची कर्तव्ये

निक्षेपदात्याची कर्तव्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील :

1) **निक्षेपाच्या वस्तूत जर काही दोष असतील तर ती उघड करणे :**

वस्तू दुसऱ्याकडे ठेवताना त्याच्यात जर काही दोष असतील व त्यामुळे निक्षेप गृहीताला ती वस्तू वापरताना काही त्रास किंवा नुकसान होण्याची शक्यता असेल तर वस्तू ठेवताना त्याला त्यांची माहिती निक्षेपदातानी दिली पाहिजे, त्यांनी जर हे दोष सांगितले नाहीत आणि निक्षेप गृहीताचे त्यामुळे काही नुकसान झाले तर निक्षेपदातानी तो भरुन दिला पाहिजे.

उदा.

1) अ आपला घोडा ब ला देतो. घोडा मारकुटा असतो. ही गोष्ट अ ब ला सांगत नाही, ब घोडयावरुन पडून त्याला दुखापात होतो. घोडा पळून जातो. ब च्या नुकसानीला अ जबाबदार धरला जातो.
2) अ ब ची कार भाडयाने घेतो. कारचे ब्रेक व्यवस्थित नसतात. ही गोष्ट ब सांगत नाही कारला अपघात होतो तर होणारा नुकसान ब नी भरुन दिला पाहिजे.
3) फुकट दिलेल्या निक्षेपात वस्तूवर काही खर्च करावा लागला तर तो वस्तू वापरणाऱ्यानी भरुन दिला पाहिजे.
4) निक्षेपदाताला निक्षेपाचे अधिकार नसतील तर त्यामुळे निक्षेप गृहीताला होणारा तोटा निक्षेपदाताने भरुन दिला पाहिजे (कलम १६४) उदा. अ ब ची गाडी त्याच्या परवानगी शिवाय क ला वापरायला देतो. ब क वर खटला घालून त्याच्याकडून नुकसान भरपाई मागून घेतो. क ते पैसे अ कडून वसूल करु शकतो.

१०.४ निक्षेप रद्द करणे

पुढील परिस्थितीत निक्षेप रद्द होतो किंवा निक्षेपाचा करार संपुष्टात येतो.

1) **मुदत संपल्यावर :**

   निक्षेप जर ठराविक काळासाठी असेल तर ती मुदत संपल्यावर निक्षेप आपोआप संपुष्टात येतो.

2) **निक्षेपित वस्तूचा नाश :**

   निक्षेपित वस्तूचा काही कारणाने नाश झाल्यास निक्षेपाचा करार संपुष्टात येतो.

3) **उद्दिष्ट पूर्ती :**

ठराविक उद्दिष्टासाठी निक्षेप केलेला असेल तर ते उद्दिष्ट पूर्ण झाल्यावर करार संपुष्टात येतो.

4) **करार भंग :**

निक्षेप गृहीतानी जर करारातील अटींचा भंग केल्यास निक्षेप रद्द होतो.

5) **फुकट दिलेली वस्तू (कलम १५९) :**

फुकट जर वस्तू दिलेली असेल तर तो करार केव्हाही रद्द करता येतो. परंतु ठरलेल्या वेळेपूर्वी करार रद्द केल्यामुळे जर निक्षेप गृहीताचे काही नुकसान झाले तर तो निक्षेपदाताने भरुन दिला पाहिजे.

6) **मृत्यू. (कलम १६२) :**

फुकट केलेला निक्षेप निक्षेपदाता किंवा गृहीता या पैकी कोणच्याही मृत्यूमुळे संपुष्टात येतो.

१०.५ हरविलेली वस्तू सापडलेल्याचे अधिकार आणि कर्तव्ये

१०.५.१ अर्थ :

इथे दुसऱ्याची मालकीची हरविलेली वस्तू कोणाला तरी सापडलेली असते. अशा प्रकारे वस्तू सापडणाऱ्याला कायद्याने काही अधिकार दिलेले आहेत व त्यावर काही जबाबदाऱ्याही टाकलेल्या आहेत

१०.५.२ अधिकार :

ज्या कोणाला दुसऱ्याची हरविलेली एखादी वस्तू सापडलेली असते त्यांनी जर त्याचा ताबा घेतला तर कायद्याने तो निक्षेपगृहिता समजला जातो. (कलम १३२) कलम १६८ व १६९ मध्ये त्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत.

1) धारणधिकार:- तो खरा मालक सापडेपर्यंत ती वस्तू आपल्या ताब्यात ठेऊ शकतो.

2) नुकसानभरपाई व ताबा

3) वस्तूच्या राखणासाठी व मालकाला शोधण्यासाठी त्याला जो पैसा खर्च करावा लागेल त्याची भरपाई झाली पाहिजे. हे पैसे त्याला मिळेपर्यंत तो ती वस्तू अडवून ठेऊ (थ्गह) शकतो. ते पैसे मिळाल्या शिवाय वस्तू परत करणार नाही अस सांगण्याचा त्याला अधिकार आहे.

4) वस्तू शोधून देणाऱ्याला मालकांनी जर काही बक्षीस जाहीर केलेले असेल तर ते बक्षीस त्याला मिळाले पाहिजे.

४) विक्री :- वस्तू सहज विकणारी असेल व मालक याचा झालेला खर्च वैगरे देण्यास नकार देत असेल तर पुढील अटी पाळून ती वस्तू विकून टाकण्याचा त्याला अधिकार आहे.

अ) वस्तू नाशवंत आहे व उशीर केल्यास त्याच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होऊ शकतो.

ब) त्यानी त्या वस्तूवर केलेल्या खर्चाची रक्कम वस्तूच्या २/३ किंमतीपेक्षा अधिक आहे.

१०.५.३ कर्तव्ये :

वस्तू सापडणारा निक्षेप गृहीता ठरतो त्यामुळे त्याला पुढील जबाबदार्या पार पाडाव्या लागतात:-

- वस्तूच्या खर्या मालकाला शोधण्याचा प्रामाणिक प्रयत्न त्यांनी कसोशीने केला पाहिजे
- वस्तू ताब्यात असेपर्यंत त्याची योग्य ती काळजी घेतली पाहिजे. (कलम १५१) समजा गाय सापडली आहे तर त्याला वेळोवेळी पुरेसा चारा घातला पाहिजे.
- सापडलेली वस्तू त्यांनी आपल्या इतरवस्तू मध्ये मिसळू नये. व्यवस्थितपणे वेगळ ठेवाव (कलम १५५-१५७)
- खऱ्या मालकाला वस्तू लगेच परत केल्या पाहिजेत. (कलम १६१)
- वस्तूत काही वाढ झालेली असेल तर तीही मालकाला दिली पाहिजे. (कलम १६३)
- त्यानी तो माल आपल्यासाठी वापरु नये.

१०.६ ताबे हक्का संबधीचा (LIEN) कायदा

१०.६.१ अर्थ :

ताबा हक्क म्हणजे दुसऱ्याची वस्तू अडवून ठेवण्याचा अधिकार. इथे एकाची वस्तू दुसऱ्याच्या ताब्यात असते. आपली काही मागणी पूर्ण होईपर्यंत वस्तूचा ताबा सोडायला ताबेदार तयार नसतो. थोडक्यात दुसऱ्याची वस्तू अडवून ठेवण्याचा अधिकार. आपली काही येणी परत मिळेपर्यंत किंवा इतर काही मागणी पूर्ण होईपर्यंत वस्तूचा ताबा मालकाला दिला जात नाही. हा हक्क निर्माण होण्यासाठी दुसऱ्याची वस्तू तुमच्या ताब्यात असणे आवश्यक आहे.

म्हणजेच ताबा हक्क म्हणजे दुसऱ्याची वस्तू अडवून ठेवण्याचा अधिकार. इथे वस्तूची मालकी एकाची असते परंतु वस्तू दुसऱ्याच्या ताब्यात असते. ज्याच्या ताब्यात वस्तू आहे. त्याची काही मागणी पूर्ण होईपर्यंत तो वस्तूचा ताबा सोडायला नकार देतो.

१०.६.२ ताबे हक्काचे प्रकार :

ताबे हक्काचे दोन प्रकार आहेत

अ) विशिष्ट वस्तूवरील ताबा (Particular Lien)

ब) कोणत्याही वस्तूवरील ताबा (General Lien)

अ) विशिष्ट वस्तूवरील ताबा हक्क :

ज्या वस्तूच्या संबधात पैसे येणे असतात ती वस्तू अडवून ठेवण्याचा अधिकार होय. हा अधिकार म्हणजे विशिष्ट वस्तूवरील ताबा अधिकार होय. हा अधिकार त्या संबंधित वस्तूंच्या ताब्या बद्दल मर्यादित असतो. त्या वस्तूसंबंधी काही पैसे वगैरे मिळायचे असतात.

कलम १७० प्रमाणे एकाच्या वस्तू दुसऱ्याकडे निक्षेप म्हणून ठेवलेल्या असतील व निक्षेप गृहीत्यानी त्यावर काही श्रम केले असतील किंवा पैसे खर्च केले असतील तर त्या श्रमांचा प्रतिफल किंवा खर्च केलेले पैसे मिळेपर्यंत वस्तूचा ताबा न देण्याचा त्या व्यक्तीला अधिकार आहे.

निक्षेप गृहीत प्रमाणेच विकलेल्या वस्तूचे पैसे न मिळालेला (अदत्र विक्रेता) (Unpaid Seller) हरविलेली वस्तू सापडलेला, कर्जापोटी वस्तू गहाण म्हणून ठेऊन घेतलेला प्रातिनिधा (Agent) इत्यादी लोकांनाही अशा प्रकारचा ताबा अधिकार कायद्याने बहाल केलेला आहे.

ब) कोणत्याही वस्तूवरील ताबा (कर्ज पूर्ण परत करेपर्यंत वस्तू अडवून ठेवणे) (कलम १७१):

हा एक खास हक्क आहे. कायद्याने हा हक्क ठराविक लोकांनाच बहाल केलेला आहे. म्हणजे (१) बँक (२) फॅक्टर (विशिष्ट प्रकारचे एंजट किंवा प्रतिनिधी) (३) बंदरावरील प्रतिनिधी (Wharfingers) ४) उच्च न्यायालयातील वकील (५) विमा प्रतिनिधी तसेच (६) इतर कोणी ज्यांच्याशी या संदर्भात खास करार करण्यात आलेला आहे. फक्त याच लोकांना अशा प्रकारचा अधिकार आहे. इथे संबंधित व्यक्तीची कुठलीही आपल्याकडील वस्तू आपल कर्ज वसूल होईपर्यंत अडवून ठेवता येते. येणे असलेली रक्कम मात्र कायदेशीर येणी असावी.

दुसऱ्या व्यक्तीकडून येणे असलेल्या सर्व गोष्टी प्राप्त होईपर्यंत आपल्या ताब्यात असलेल्या त्या व्यक्तीच्या सर्व गोष्टी अडवून ठेवता येतात. येणे रक्कम त्या वस्तूबद्दलच असावी अशी इथे अट नाही. परंतु जर वस्तू त्याच्याकडे विशिष्ट कारणासाठी ठेवलेल्या असतील

उदा. सुरक्षिततेसाठी तर मात्र त्या वस्तू अडवून ठेवता येत नाही. उदा. अ नी काही दागिने बँकेत एका विशिष्ट कर्जाच्या वेळी तारण म्हणून ठेवले. ते कर्ज परत केल्यानंतर त्यांनी दागिने परत मागितले परंतु बँकेला अ कडून आणखीन ही काही रकमा देय होत्या म्हणून बँकेनी दागिने परत करायला नकार दिला अने बँकेविरुद्ध कोर्टात केस घातली. कोर्टाने बँकेच्या बाजूने निर्णय दिला. कारण बँकेला कर्जदाराच्या कोणत्याही वस्तू अडवून ठेवण्याचा खास अधिकार कायद्याने दिलेला आहे.

सॉलिसिटरला ही असाच खास अधिकार आहे. आपली सर्व फी मिळेपर्यत आपल्या ताब्यात असलेल्या अशीलाच्या सर्व खटल्याचे कागद पत्र तो परत करण्यास नकार देऊ शकतो. (सॉलिसिटर म्हणजे एक विशिष्ट प्रकारचे वकील जे फक्त उच्च न्यायालयातच काम करतात)

१०.७ प्रश्न

1) निक्षेप म्हणजे काय ? वैध निक्षेपासाठी आवश्यक गोष्टी कोणत्या?

2) विविध प्रकारच्या निक्षेपांचे वर्णन करा.

3) टीपा लिहा:-

   1) निक्षेपदाता व निक्षेप गृहीता यांचे अधिकार व कर्तव्ये .

   2) हरविलेली वस्तू सापडलेल्याचे अधिकार व कर्तव्ये.

   3) ताबा हक्क.

4) व्याख्या द्या.

   1) ताबा

   2) निक्षेप

   3) फुकटचा निक्षेप

   4) विशिष्ट वस्तूवरील ताबा अधिकार

   5) कोणत्याही वस्तूवरील ताबा अधिकार

❖❖❖❖

११

तारणा संबंधीचा करार
(CONTRACT OF PLEDGE)
(कलम १७२ ते १७९)

घटक रचना :

११.० उद्दिष्टे

११.१ अर्थ व वैध तारणाची खास वैशिष्टये

११.२ मालक नसलेल्यानी वस्तू तारण म्हणून ठेवणे (कलम १७८ व १७९)

११.३ तारण ठेवणारा व तारण ठेऊन घेणारा

११.४ निक्षेप व तारण यातील फरक

११.५ प्रश्न

११.० उद्दिष्टे

या पाठाच्या अभ्यासानंतर पुढील गोष्टींची तुम्हाला माहिती होईल.

- वैध तारणाचा अर्थ व आवश्यक गोष्टी.
- मालक नसलेल्यानी वस्तू तारण म्हणून ठेवणे.
- तारण ठेवणारा व ठेऊन घेणारा यांचे अधिकार व त्यांची कर्तव्ये.
- निक्षेप व तारण यामधील फरक.

११.१ वैध तारणाचा अर्थ व त्यासाठी आवश्यक गोष्टी

११.१.१ अर्थ :

तारण म्हणजे कर्जदार सावकाराकडे आपली वस्तू कर्जाच्या बदल्यात ठेवायला देतो व कर्ज परत करण्याची हमी देतो. कर्जाच्या सुरक्षिततेसाठी तारणाचा वापर केला जातो.

थोडक्यात तारण म्हण़जे कर्जाच्या सुरक्षिततेसाठी केलेला निक्षेप. इथे निक्षेपदात्याला तारण ठेवणार (Pawnor) निक्षेप. गृहीताला तारण स्वीकारणारा (Pawnee) असे म्हणतात. (कलम १७२)

११.१.२ वैध तारणासाठी आवश्यक गोष्टी :

१) तारण हे चल मालमत्तेचच असते.

मौल्यवान दागिने किंवा महत्त्वाचे कागदपत्र तारण म्हणून ठेवण्यात येतात. जमीनजुमला घरदार वगैरेही तारण म्हणून ठेवतात परंतु त्यासाठी मालमत्ता हस्तांतर (Transfer of Property Act) कायदा नावाचा स्वतंत्र कायदा आहे.

२) ताबा देणे :

तारण व्यवहारात वस्तूचा ताबा दुसऱ्याकडे देणे अत्यंत आवश्यक आहे. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की फक्त ताबाच दिला जातो. वस्तूची मालकी ताबा देणार्याकडेच राहते. ताबा जर दिला नाही तर तारण वैध ठरत नाही.

३) ताबा हा प्रत्यक्ष असेल किंवा सांकेतिक :

प्रत्यक्ष ताबा म्हणजे वस्तू उचलून नेऊन सावकराकडे देणे. परंतु सांकेतिक ताबा म्हणजे वस्तू प्रत्यक्षात दिली जात नाही. परंतु त्याच्या वरील ताबा अधिकार दुसऱ्याकडे सोपविला जातो. उदा. गुदामाची चावी देणे. चाव्या दुसऱ्याकडे देणे म्हणजे सांकेतिक ताबा देणे होय.

४) ताबा देण्यामागे उद्देश हा कर्ज वेळेत परत करण्याची हमी असते . वेळेत कर्ज परत करण्यासारखेच सांगितलेल विशिष्ट काम योग्य पद्धतीने वेळेत पूर्ण करणे हादेखील उद्देश या मागे असू शकतो.

५) दिलेली वस्तू नंतर परत केली पाहिजे :

ही सुद्धा एक आवश्यक गोष्ट आहे. सावकराकडे वस्तू कर्जासाठी तारण म्हणून दिलेली असते. कर्ज वेळेत परत केल्यावर सावकारांनी वस्तूचा ताबा परत मालकाला दिला पाहिजे.

११.२ मालक नसलेल्याकडून तारण (कलम १७८ व १७९)

तारण ठेवणारा हा त्या वस्तूचा मालक असला पाहिजे. तारणाचे अधिकार हे मालकालाच आहेत. परंतु या नियमाला कायद्याने काही अपवाद दिलेले आहेत. त्यामुळे विशिष्ट प्रकारचे लोक मालक नसताना सुद्धा वस्तू तारण म्हणून ठेवू शकतात.

1) **व्यापारी प्रतिनिधी (Mercantile Agents) :**

मालविक्रीच्या कायद्याप्रमाणे व्यापारी प्रतिनिधी (Mercantile Agents) म्हणजे दैनंदिन व्यापारात ज्याच्याकडे वस्तूंचा ताबा असतो. व्यापारातील दैनंदिन व्यवहारात त्यांना वस्तू विकण्याचा किंवा गहाण ठेवण्याचा अधिकार असतो. हा अधिकार व्यापारी रुढीमुळे प्राप्त झालेला असतो.

त्यामुळे ज्या व्यापारी प्रतिनिधीकडे मालकाच्या संमतीने वस्तूचा व त्यांच्या मालकी हक्क सांगणाऱ्या कागदपत्रांचा ताबा असतो, ते दैनदिन व्यहाराचा भाग म्हणून वस्तूचे मालक नसतानाही ती वस्तू सावकराकडे तारण म्हणून ठेऊन त्यावर कर्ज घेऊ शकतात.

२) व्यर्थनीय करारात ताब्यात असलेली वस्तू गहाण ठेवणे :

व्यर्थनीय कराराच्या वेळी जर ज्या पक्षाला करार व्यर्थ ठरविण्याचा अधिकार आहे त्यांनी तो व्यर्थ ठरविलेला नसेल म्हणजेच आपल्याला असलेल्या अधिकाराचा वापर केलेला नसेल तर ज्या व्यक्तीच्या ताब्यात वस्तू आहे ती व्यक्ती वैधपणे वस्तू तारण म्हणून ठेऊ शकते. ज्या सावकराकडे वस्तू तारण म्हणून ठेवण्यात आली त्याला जर काही माहीत नसेल तर त्याला वस्तूचा वैध ताबा मिळतो. म्हणजेच तारण व्यवहार वैध ठरतो. तारण ठेवणार्याकडे वस्तूची निवैध मालकी नाही आहे याची माहिती सावकाराला असता कामा नये. (कलम १७८ अ) उदा. अ नी फसवून ब ला वस्तू विकण्यास भाग पाडले. अ नी ती वस्तू क कडे गहाण ठेवली. क ला यातील कोणत्याही गोष्टीची माहिती नाही तर तारण व्यवहार वैध ठरतो.

३) मर्यादित मालकी असलेल्याकडून तारण (कलम १७९) :

वस्तूमध्ये एखाद्याला मर्यादित मालकी असेल व त्यांनी ती गहाण ठेवली तर त्याची त्या वस्तूतील मालकी जेवढी असेल तेव्हढयाच प्रमाणात तारण वैध ठरतो. अशावेळी तारण ठेऊन घेणाऱ्याला या मर्यादित मालकीची माहिती असो किंवा नसो. व्यवहारात काही फरक पडत नाही.

उदा. अ ला रस्त्यावर ब चा ट्रान्झिस्टर सापडतो. प्रामाणिक प्रयत्न करुनही अ ला वस्तूच्या मालकाचा पत्ता मिळत नाही. अ ला त्या वस्तूच्या दुरुस्तीवर रु. २०/- खर्च केले आणि नंतर ती वस्तू गहाण ठेवून रु. १००/- चे कर्ज क कडून घेतला. ब ला क ला रु. २०/- दिल्यानंतरच आपली वस्तू परत मिळेल.

११.३ तारण ठेवणारा व ठेऊन घेणारा यांचे अधिकार आणि कर्तव्ये

११.३.१ तारण ठेवणाऱ्याचे (Pawner) अधिकार व कर्तव्ये :

वस्तूची विक्री होण्याआधी किंवा विक्री होईपर्यंत ती परत मिळण्याचा अधिकार (कलम १७७) :

वस्तू गहाण ठेवताना ठराविक मुदतीच्या आत कर्ज परत करण्याचे ठरलेले असेल व त्या मुदतीत जर कर्ज फेडता आले नाही तर ती वस्तू दुसऱ्याला विकून सावकार आपल्या कर्जाची वसूली करु शकतो. परंतु अशावेळी सावकरानी प्रत्यक्षात वस्तूची विक्री करेपर्यंत कर्जदार केव्हाही कर्जाची व्याजा सकट फेड करुन वस्तूचा ताबा परत घेऊ शकतो. परंतु कर्ज परत फेडण्यात झालेल्या उशीराच्या काळात जर सावकाराला त्यावर

काही खर्च करावा लागला असेल तर तोही कर्जदारानी भरुन दिला पाहिजे. कारण त्यांनी उशीर केल्यामुळे हा जादा खर्च झालेला असतो.

११.३.२ तारण ठेऊन घेणार्याचे (Pawnee) अधिकार व कर्तव्ये:-

१) वस्तू तारण म्हणून ठेवून घेण्याचा अधिकार. (कलम १७३ व १७४) :

कलम १७३ प्रमाणे तारण ठेऊन घेणारा कर्जाची परत फेड होईपर्यंत किंवा दिलेल एखादे आश्वासन पूर्ण करे पर्यंत तर वस्तू ठेऊन घेऊ शकतोच. त्या शिवाय रकमेवरील व्याज व वस्तूच्या राखणीवर झालेला खर्च ही पूर्णपणे मिळेपर्यंत वस्तू ठेऊन घेऊ शकतो.

२) काही विशेष खर्च करावा लागला (Extra-orinary) तर तो परत मिळवण्याचा हक्क :

वस्तूच्या राखणीवर जर सावकाराला काही विशेष खर्च करावा लागला तर तो सुद्धा कर्जदाराकडे मागता येतो. उदा. गायीच्या तारणावर कर्ज दिलेल आहे व गाय आजारी पडली व विशेष औषधोपचार करावा लागला तर तोही खर्च सावकार वसूल करु शकतो.

३)विक्रीला अधिकार :

कर्जाची रक्कम सव्याज परत मिळेपर्यंत वस्तू तारण म्हणून आपल्याकडे ठेऊन घेता येईल. किंवा मुदत संपल्यावर कर्जदारानी पैसे दिले नाही तर त्याला माहिती देऊन पुरेशी मुदत देऊन तो ती वस्तू विकून आपल्या कर्जाची परत फेड करुन घेऊ शकतो.

४) विशिष्ट वस्तू ताबा अधिकार :

सावकाराला विशिष्ट वस्तूच्याच ताबा घेण्याचा अधिकार आहे. कर्जदारानी वेळेत पैसे परत केले नाहीत तर तारण म्हणून ठेवलेलीच वस्तू अडवून ठेवता येते. कर्जदाराच्या इतर काही वस्तू जरी त्याच्या ताब्यात असल्या तरी त्या अडवून ठेवता येत नाही.

५) वेळेत कर्ज परत न केल्यास सावकाराचे अधिकार :

कर्जदांरानी जर ठरलेल्या मुदतीत सव्याज कर्ज परत केले नाही तर सावकाराला पुढील अधिकार प्राप्त होतात:-

- येणे रकमेसाठी कर्जदारावर खटला दाखल करुन पैसे मिळेपर्यंत त्याची वस्तू अडवून ठेवता येते.
- या शिवाय कर्जदाराला पुरेशा मुदतीची सूचना देऊन तारण ठेवलेल्या वस्तूची विक्री करुन कर्ज फेड करुन घेता येते.

६) सावकरानी वस्तूचा वापर करु नये :

गहाण ठेवलेल्या वस्तूची वापरामुळे जर झीज वगैरे होत असेल तर सावकरानी ती वस्तू आपल्या कामासाठी वापरु नये.

११.४ निक्षेप व तारण यातील फरक

निक्षेप	तारण
निक्षेप अनेक प्रकारचा असू शकतो जसे पैसे घेऊन किंवा फुकट सुद्धा	तारण हे खास कारणासाठीच असते. घेतलेले कर्ज किंवा दिलेल वचन वेळेत पूर्ण करण्याची हमी म्हणून तारणाचा वापर केला जातो.
निक्षेप गृहीताला वस्तूची विक्री करता येत नाही.	कर्ज वेळेत परत न केल्यास सावकाराला वस्तूच्या विक्रीचा अधिकार प्राप्त होतो.
निक्षेप गृहीता वस्तूचा वापर करु शकतो.	सावकार वस्तू फक्त ताब्यात ठेऊन घेतो. त्याचा वापर करु शकत नाही.
इथे वस्तूचा प्रत्यक्ष ताबा देण्यात येतो.	इथे तारण म्हणून मालकीचे कागदपत्र ही ठेवता येतात.

११.५ प्रश्न

1) तारणाच्या करारात तारण ठेवणारा व तारण ठेऊन घेणारा (Pawnor and Pawnee) यांचे अधिकार व कर्तव्ये विशद करा.

2) मालक नसलेली व्यक्ती केव्हा वस्तू तारण म्हणून ठेऊ शकते?

3) निक्षेप व तारण यातील फरक स्पष्ट करा.

4) संक्षिप्त टीपा लिहा:-

1) निक्षेपदाता व निक्षेप गृहीता यांचे अधिकार आणि कर्तव्ये.

2) वस्तू सापडलेल्याचे अधिकार व कर्तव्ये - ताबा अधिकार

5) व्याख्या द्या:-

   1) तारण ठेऊन घेणारा - सावकार

   2) तारण ठेवणारा - कर्जदार

   3) तारण

❖❖❖❖

१२

प्रतिनिधित्वाचा कायदा
(LAW OF AGENCY)

घटक रचना :

१२.० उद्दिष्टे

१२.१ अर्थ व प्रतिनिधी संबंधीच्या कायद्यातील आवश्यक गोष्टी.

१२.२ प्रतिनिधी नियुक्ती करण्याच्या पद्धती

१२.३ प्रतिनिधींचे विविध प्रकार.

१२.४ प्रतिनिधीची कर्तव्ये व अधिकार

१२.५ प्रतिनिधीची नियुक्ती रद्द करणे.

१२.६ नियुक्ती रद्द न करता येणारे प्रतिनिधित्व

१२.७ प्रश्न

१२.० उद्दिष्टे

या पाठाच्या अभ्यासानंतर तुम्हाला पुढील विषयांची माहिती मिळेल

- प्रतिनिधी नियुक्तीच्या विविध पद्धती
- प्रतिनिधींचे विविध प्रकार
- प्रतिनिधीचे अधिकार व कर्तव्ये
- पूर्वसंमती (Ratification) साठी आवश्यक गोष्टी
- रद्द न करता येणाऱ्या प्रतिनिधीची नियुक्ती

१२.१ प्रतिनिधी या शब्दाचा अर्थ व प्रतिनिधी संबंधातील कायद्यातील आवश्यक गोष्टी

१२.१.१ व्याख्या व अर्थ :

करार संबंधीच्या कायद्याच्या कलम १८२ मध्ये प्रतिनिधी व्याख्या आहे, 'दुसऱ्याच्या वतीने काम करण्यासाठी किंवा एखाद्या व्यवहारात दुसऱ्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी

नेमलेली व्यक्ती म्हणजे प्रतिनिधी होय. प्रतिनिधीची नियुक्ती करणाऱ्याला नियोक्ता (Principal) म्हणतात.

जेव्हा एक माणूस आपल्यावतीने काही काम करण्यासाठी दुसऱ्याची नियुक्ती करतो त्याला प्रतिनिधीचा करार म्हणतात. अशा प्रकारे नेमणूक करणाऱ्याला नियोक्ता (Principal) म्हणतात तर ज्याची नेमणूक केली जाते त्याला प्रतिनिधी म्हणतात. (कलम १८२) प्रतिनिधीला नियोक्ताच्या वतीने दुसऱ्याशी करार करायचे असते. प्रतिनिधीनी ठरलेलं काम केल्यास त्याच्या कृतीला नियोक्ता हा जबाबदार राहतो.

१२.१.२ वैध प्रतिनिधीसाठी आवश्यक बाबी :

प्रतिनिधीची व्याख्या या आधी आलेली आहे. त्या प्रमाणे प्रतिनिधीनी पुढील अटी पूर्ण करणे आवश्यक आहे. त्या अटी म्हणजे :-

१) नियोक्ता व प्रतिनिधी यांच्यात करार झाला पाहिजे :

असा करार एक अत्यावश्यक गोष्ट आहे. म्हणजेच प्रतिनिधित्वाची निर्मिती कराराने केली जाते. हा करार नियोक्ता व प्रतिनिधी यांच्यात होतो. हा करार उघड (Express) असतो किंवा काहीवेळा गृहीतही धरला जातो.

२) प्रतिनिधीनी प्रतिनिधी म्हणून काम केल पाहिजे :

प्रतिनिधी हा नियोक्ताच काम करतो. ही गोष्ट त्यांनी बाहेरच्या व्यक्तीशी करार करताना स्पष्ट केली पाहिजे. इथे एक व्यक्ती दुसऱ्याच्या वतीने काम करते. आणि त्यातून निर्माण होणारी जबाबदारी ही नियोक्त्याची असते. म्हणजेच इथे काम दुसऱ्याच्यावतीने करण्यात येते.

३) नियोक्ता करार करण्यास सक्षम असला पाहिजे :

नियोक्ता हा करार करण्यास पात्र असला पाहिजे - म्हणजेच समज असणारा, सज्ञान (योग्य वयाचा) वगैरे असावा.

४) प्रतिनिधी करार करण्यास पात्र असण्याची आवश्यकता नाही.

म्हणजेच कोणीही व्यक्ती प्रतिनिधी म्हणून काम करु शकते. ती व्यक्ती करार करण्यास सक्षम असण्याची आवश्यकता नाही. (कलम १८४) अज्ञान व्यक्तीची सुद्धा प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करता येते. अशा प्रतिनिधीनी केलेल्या करारांना नियोक्ता जबाबदार राहतो. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की करार करण्याची क्षमता नसलेल्या प्रतिनिधीनी केलेल्या कराराना तो प्रतिनिधी नियोक्त्याला जबाबदार राहत नाही. म्हणजेच नियोक्ता अशा प्रतिनिधीला जबाबदार धरु शकत नाही. त्यामुळे करारामुळे नियोक्त्याचे काही नुकसान झाले तर तो नुकसान प्रतिनिधी कडून वसूल करु शकत नाही, प्रतिनिधीच्या चुकीमुळे नुकसान झालेलं असलं तरीही. कारण प्रतिनिधी करार करण्यास सक्षम नाही.

५) अशा करारांना प्रतिफलाची आवश्यकता नाही :

वैध प्रतिनिधीच्या नेमणूकीच्या कराराला प्रतिफलाची आवश्यकता नाही (कलम १८५) प्रतिफला शिवाय केलेल्या प्रतिनिधिची नियुक्तीही वैध नियुक्ती ठरते. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात प्रतिनिधीला त्यांनी केलेल्या कामासाठी सर्वसाधारणपणे कमीशनच्या रुपात मोबदला देण्याची पद्धत आहे.

१२.२ प्रतिनिधित्व निर्माण करण्याच्या विविध पद्धती

सर्वसाधारणपणे व्यवहारात बहुतांश करार संबंधित व्यक्ती स्वत:च करतात. परंतु जेव्हा आपल्यावतीने करार करण्यासाठी दुसऱ्याची नेमणूक करण्यात येते तिथे त्याला प्रतिनिधी (Agent) म्हणतात. प्रतिनिधीची नेमणूक करणारा करार हा एक कराराचा खास प्रकार आहे. कलम १८२ मध्ये प्रतिनिधीची नियोक्ताची व्याख्या देण्यात आलेली आहे. ती पुढील प्रमाणे:-

1) प्रतिनिधी: प्रतिनिधी म्हणजे दुसऱ्याच्यावतीने करार करण्यासाठी नेमलेली व्यक्ती किंवा एखाद्या गोष्टीत दुसऱ्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी नेमलेली व्यक्ती.

2) ज्या व्यक्तीच्या वतीने प्रतिनिधी काम करतो त्याला नियोक्ता म्हणतात.

3) प्रतिनिधीची केलेली नियुक्ती म्ह़णजे प्रतिनिधी करार.

प्रतिनिधीची नेमणूक :

प्रतिनिधीची नेमणूक पुढील पद्धतीने केली जाते.

१) खास करार करुन (कलम १८६ व १८७) :

इथे लेखी करार करुन प्रतिनिधीची नेमणूक करण्यात येते. असा करार तोंडी ही करता येतो. परंतु नेहमीची पद्धत म्हणजे लेखी मुखत्यार पत्र करुन प्रतिनिधीची नेमणूक केली जाते. नियोक्त्याच्या वतीने एखाद खास काम करण्यासाठी मुखत्यार पत्राद्वारे (Letter of Authority of Power of Attorney) प्रतिनिधीची नेमणूक केली जाते. काही वेळा नियोक्त्याच्यावतीने नेहमी काम करण्यासाठी सुद्धा प्रतिनिधीची नेमणूक करतात. उदा. एखादी विधवा आपल्या सर्व आर्थिक व्यवहार संभाळण्यासाठी विश्वासातील एखाद्या नातेवाईकाला प्रतिनिधी म्हणून नेमते. इथे प्रतिनिधी नियोक्ताची सर्व प्रकारची कामे त्या व्यक्तीच्या वतीने करतो.

२) गृहीत कराराद्वारे प्रतिनिधीची नेमणूक (कलम १८७) :

बऱ्याचवेळा एकूण परिस्थितीवरून प्रतिनिधीची नेमणूक गृहीत धरण्यात येते. संबंधित पक्षांच्या वागणूकीवरुन असे गृहीत केले जाते. उदा. कलकत्याच्या अ च दिल्लीमध्ये दुकान आहे. दुकानाचा मॅनेजर ब क कडून नेहमी त्या दुकानासाठी माल खरेदी करतो.

घेतलेल्या मालाचे पैसे अ चुकते करतो. इथे ब हा अ चा प्रतिनिधी समजला जातो. गृहीत कराराची इतर उदाहरणे म्हणजे -

- भागीदार
- नोकर
- बायको , मुलगा वगैरे

हे लोक प्रतिनिधी समजले जातात. बायको ही नेहमी नवर्याची प्रतिनिधी समजली जाते किंवा गृहीत धरली जाते. नवरा आणि बायको जेव्हा एकत्र राहतात तेव्हा बायको नवऱ्याच्या समाजातील पतीचा वापर करुन दुकानातून दैनंदिन गरजेच्या वस्तूंची खरेदी करु शकते. परंतु पुढील परिस्थितीत मात्र बायकोला असे अधिकार राहत नाहीत.

1) नवऱ्यांनी बायकोला कर्ज काढू नको किंवा उधारीवर माल आणू नको म्हणून निक्षून सांगितले आहे.

2) उधारीवर खरेदी केलेल्या वस्तू दैनंदिन गरजेच्या नाहीत.

3) खरेदीसाठी नवऱ्यांनी पुरेसे पैसे दिलेले आहेत

4) दुकानदाराला नवऱ्याने आपल्या बायकोला उधारीवर माल देऊ नको म्हणून स्पष्टपणे बजावले आहे.

ब) जेव्हा बायको तिची काहीही चूक नसताना नवऱ्यापासून वेगळी राहते व नवरा तिच्या दैनंदिन गरजा भागविण्यासाठी पैसे देत नाही तेव्हा ती जीवनावश्यक वस्तूंची नवऱ्याच्या वतीने खरेदी करु शकते.

गृहीत प्रतिनिधित्वाचे स्वरुप पुढील प्रमाणे असू शकते.

१) नकाराधिकार नाही (Agency by estoppel) :

एखादी व्यक्ती आपण दुसऱ्याच्या वतीने काम करीत आहोत असा भास निर्माण करते तर नंतर त्या व्यक्तीला आपल प्रतिनिधित्व नाकारता येणार नाही. थोडक्यात एखाद्याने आपण प्रतिनिधी आहोत अस खोट सांगून व्यवहार केला तर नंतर त्याला त्याची जबाबदारी नाकारता येणार नाही.

२) Holding Out. इथे एखादी व्यक्ती प्रतिनिधी म्हणून नियोक्त्याच्या समोर वागते व नियोक्ता ही गोष्ट स्पष्टपणे नाकारीत नाही तर नंतर त्याला प्रतिनिधीच्या कार्याची जबाबदारी नाकारता येणार नाही. उदा. समजा एक व्यापारी नेहमी आपल्या नोकराला एखाद्या दुकानातून उधारीवर खरेदी करण्यासाठी पाठवितो व नंतर त्याचे पैसे देतो. परंतु एकदा त्यांनी नोकराकडे पैसे देऊन रोख खरेदी करायला सांगितले प्ारंतु नोकरांनी नेहमी प्रमाणे माल उधारीवर आणले तर व्यापारला ते पैसे देण्यास नकार देता येणार नाही.

३) गरजेमुळे निर्माण झालेल प्रतिनिधित्व (Agency by necessity):

काही विशिष्ट परिस्थितीत कायदा प्रतिनिधित्व गृहीत धरते. उदा. एखाद्याने बायकोला टाकलं असेल तर तिने आपल्या दैनंदिन गरजेपोटी आणलेल्या वस्तूंची किंमत तिच्या नवऱ्यानी अदा केलीच पाहिजे. त्याला आपली जबाबदारी नाकारता येणार नाही. काही वेळा नियोक्त्याची वेळेत परवानगी घेणे शक्य नसते. तशा वेळी प्रतिनिधीनी केलेल्या कृतीला नियोक्ता जबाबदार असतो. समजा प्रवासात कार बिघडली तर चालक तिची आवश्यक दुरुस्ती मालकाला न विचारताही करुन घेऊ शकतो. काहीवेळा प्रतिनिधीला मालकाचे नुकसान टाळण्यासाठी आपल्या अधिकाराबाहेर काही कृती करावी लागते. इथे प्रतिनिधित्व गृहीत धरले जाते.

४) पश्चात परवानगीचे प्रतिनिधित्व (Agency of ratification)

इथे घटना घडल्यानंतर मालक त्याची जबाबदारी स्वीकारतो. याला ratification असे म्हणतात. इथे आधी परवानगी न घेता काही कृती तातडीने करावी लागते व परवानगी नंतर घेतली जाते.

सर्वसाधारणपणे प्रतिनिधीनी जर दिलेल्या अधिकारापलिकडे काही कृती केली तर त्याला नियोक्ता जबाबदार राहत नाही. पण काही वेळा नियोक्ता आपणहून त्या कृतीची जबाबदारी स्वीकारतो. कलम १९६ मध्ये अशा प्रतिनिधी संबंधीच्या तरतूदी आहेत. एखाद्याने न सांगता दुसऱ्यानी त्याच्यावतीने काही कृती केली तर नंतर या कृतीला दुसरी व्यक्ती संमती देऊ शकते व न सांगता त्यांनी केलेल्या कृतीची जबाबदारी स्वीकारु शकते किंवा त्याच्या परवानगी शिवायच कृती झालेली असल्यामुळे त्याची जबाबदारी नाकारु ही शकते. त्यांनी जर जबाबदारी स्वीकारायचे ठरविले (Ratification) तर त्यांनी आधीच परवानगी दिली होती असे समजले जाते किंवा आधी परवानगी दिली असती तर जी काही परिस्थिती निर्माण झाली असती तशीच झालेली आहे असे समजले जाते.

१२.३ प्रतिनिधीचे प्रकार

प्रतिनिधींची विभागणी विविध प्रकारे करता येतो.

1) **खास (Special) प्रतिनिधी:- एखाद्या खास कामासाठी नेमलेला प्रतिनिधी किंवा खास प्रतिनिधी :**

इथे प्रतिनिधीची नेमणूक एखाद्या विशिष्ठ कामासाठी करण्यात आलेली असते. अशी नेमणूक अल्प मुदतीसाठी व एखाद्याच कामासाठी मर्यादित असते. ते काम झाले की प्रतिनिधीत्वाची नेमणूक संपुष्टात येते. उदा अ ब ला आपल्या मुंबईतल्या एखाद्या फ्लॅट च्या विक्रीसाठी प्रतिनिधी म्हणून नेमलं तर तो फ्लॅट विकून झाले की प्रतिनिधित्वाचा करार संपुष्टात येतो.

२) सर्व कामासाठी प्रतिनिधी :

इथे प्रतिनिधिला सर्व प्रकारचे अधिकार बहाल करण्यात आलेले असतात. नियोक्त्याला स्वत: न करता येणाऱ्या सर्व कामासाठी प्रतिनिधिला अधिकार बहाल केले जातात. नियोक्त्याच्या गैरहजेरीत त्याच्यावतीने प्रतिनिधी सर्व प्रकारची कामे करु शकतो. समजा एखाद्याला दीर्घ मुदतीसाठी परदेशात राहायला जायच आहे. तो जाताना आपली सर्व कामे त्याच्यावतीने करण्याचे अधिकार स्वत:च्या मुलाला मुलीला किंवा शेजाऱ्याला देऊन जाऊ शकतो.

३) सर्व साधारण (General) प्रतिनिधी :

इथे व्यवसायातील सर्व प्रकारची कामे प्रतिनिधी नियोक्त्याच्या वतीने करु शकतो. ही सर्व कामे नियोक्त्याच्या हितासाठी त्याच्यावतीने केली जातात.

४)सह प्रतिनिधी:-

इथे दोन किंवा अधिक प्रतिनिधी नियोक्त्याच्या वतीने एकत्रितपणे काम करतात.त्यांची जबाबदारी ही संयुक्त जबाबदारी असते इथे नियोक्त्याची कामे सर्वांना मिळून करता येतात किंवा तस ठरले असेल तर त्यातील कोणी ही एक किंवा अनेकजण स्वतंत्रपणे काम करु शकतात.

५) उप प्रतिनिधी (Sub-Agent) :

इथे उप प्रतिनिधी प्रमुख प्रतिनिधीच्या हाताखाली काम करतो. थोडक्यात तो प्रतिनिधीचा प्रतिनिधी असतो. उप प्रतिनिधीच्या कृतीसाठी नियोक्ता प्रतिनिधीला जबाबदार धरु शकतो.

६) फॅक्टर :

हा व्यवसायातला एक खास प्रकारचा प्रतिनिधी आहे. मालमत्ता त्याच्या ताब्यात असते व तो मालकाच्या वतीने त्याची विक्री करु शकतो. विक्रीच्या अटी तो ठरवितो. जर अशा प्रतिनिधिनी त्याला दिलेल्या अधिकाराबाहेर काही कृती केली परंतु व्यवहारातील प्रथेप्रमाणे त्याला अस करण्याचे अधिकार असतील तर त्याला नियोक्ता जबाबदार राहतो.

७) कमिशन प्रतिनिधी :

मालाच्या खरेदी किंवा विक्रीसाठी असा प्रतिनिधी नेमला जातो. तो मालासाठी ग्राहक शोधतो किंवा ग्राहकासाठी विक्रेता शोधतो. प्रत्यक्ष विक्री पूर्ण झाल्यावर तो दोघाकडून कमीशन घेऊ शकतो. कमीशन विक्रीच्या किंमतीवरुन ठरते.

८) अडत्या (Broken) :

हा एक खास प्रकारचा प्रतिनिधी आहे जो खरेदीदार व विक्रेता यांच्या मध्ये मध्यस्थ म्हणून काम करतो. तो दोघांना एकत्र आणण्याचे काम करतो.त्यालाही कामासाठी कमीशन मिळते. दोघांना एकत्र आणल्यावर त्याचे काम संपते. प्रत्यक्ष माल कधीही त्याच्या ताब्यात नसतो त्यामुळे त्याला ताबा अधिकार (Lien) नसतो.

९) लिलाववाला :

लिलाव म्हणजे आम जनसमुदायात केलेली विक्री. सर्वात जास्त किंमत देण्यास पुढे येणार्याला वस्तू विकली जाते. लिलावाला हा एका प्रकारचा प्रतिनिधी आहे ज्याची नेमणूक विक्रेता करतो. त्याला कमीशनच्या स्वरुपात मोबदला दिला जातो.

१०) बुडीत कर्जाची हमी देणारा प्रतिनिधी (Del Credere Agent) :

नियोक्त्याच्या वतीने मालाची विक्री करण्यासाठी अशा प्रतिनिधीची नेमणूक केली जाते. तो माल उधारीवर विकतो आणि उधारी वसूलीची जबाबदारी स्वीकारतो. त्यासाठी त्याला काही जादा कमीशन देण्यात येते. थोडक्यात हा एक व्यापारी अभिकर्ता आहे जो कर्जवसूलीचीही हमी देतो.

१२.४ प्रतिनिधीची कर्तव्ये व अधिकार

१२.४.१ प्रतिनिधीची कर्तव्ये:-

१) तो आपल्यावरील जबाबदारी दुसऱ्यावर टाकू शकत नाही. (कलम १९०) :

प्रतिनिधी सर्व साधारणपणे त्याच्यावर टाकलेली जबाबदारी दुसऱ्यावर सोपवू शकत नाही. परंतु काही व्यवसायात अशी सोपविण्याची पूर्वापर प्रथा आहे. तिथे हा नियम लागू होत नाही. या शिवाय काहीवेळा कामच असं असते की जिथे दुसऱ्याची मदत घ्यावीव लागते.

२) आदेश पाळण्याची सक्ती (नियोक्त्याच्या आदेशांचे पालन करणे हे त्याचे कर्तव्य आहे.(कलम २११) :

नियोक्त्याचे स्पष्ट शब्दात दिलेल्या आदेशांचे प्रतिनिधीने पालन केलेच पाहिजे. असे न केल्यामुळे नियोक्त्याचे जर काही नुकसान झाले तर ते त्यांनी भरुन दिले पाहिजे. काम करताना त्यानी आपल्या बुद्धीचा योग्य वापर केला पाहिजे व कामात योग्य काळजी घेतली पाहिजे. पण यापेक्षा त्यांनी नियोक्त्यानी दिलेल्या आदेशांचे पालन प्रथम केले पाहिजे. नियोक्त्याच्या आदेशाचे पालन न केल्यामुळे नियोक्त्याचे काही नुकसान झाल्यास त्यासाठी प्रतिनिधीला जबाबदार धरलं जाते.

इथे कायद्याच्या पालनासाठी दोन गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. प्रथमत: नियोक्त्याने शक्यतो आपले आदेश लेखी स्वरुपात द्यावेत. कारण तोंडी दिलेले आदेश बऱ्याच वेळा संदिग्ध असतात व विसरले जातात. काही तज्ञांची प्रतिनिधीला मदत देऊ केली असेल तर त्याची संपूर्ण माहिती त्यांनी नियोक्त्याला दिली पाहिजे. अशा वेळी प्रतिनिधीनी अधिक काळजी घेण्याची गरज राहत नाही. कारण कामाची प्राथमिक जबाबदारी ही तज्ञ व्यक्तीवर असते.

३) हिशेब देण्याच कर्तव्य :

नियोक्त्यानी दिलेल पैसे व व्यवहारात मिळालेले पैसे, केलेला प्रत्यक्ष खर्च इत्यादींचा काटेकोरपणे नोंद ठेऊन नियोक्त्याला देणे प्रतिनिधीचे कर्तव्य आहे. त्यांनी मध्ये काही छुपा नफा करुन घेता कामा नये. त्याला मिळालेल्या एकूण पैशातून त्याचा झालेला खर्च व ठरलेला मोबदला मात्र तो केव्हाही कापून घेऊ शकतो.

४) काळजी घेणे व शहाणपणाचा वापर करणे :

प्रत्येक व्यवहार आवश्यक शहाणपणाचा वापर करुन योग्य ती काळजी घेऊन पूर्ण करणे आवश्यक आहे. व्यवसायिकांच्या बाबतीत ही जबाबदारी अधिक महत्त्वाची ठरते. व्यवसायिक सल्ला गारांना भरपूर पैसे मोजून त्यांची सेवा घेतलेली असते. त्यामुळे त्यांनी लक्षपूर्वक काम हाताळणे अपेक्षित असते. त्यांच्या ज्ञानाचा नियोक्त्याला फायदा मिळाला पाहिजे.

५) प्रामाणिकपणा व चोरुन नफा न कमविणे :

प्रतिनिधिनी नियोक्त्याची सेवा प्रामाणिकपणे केली पाहिजे व कोणत्याही प्रकारे चोरुन नफा कमविता कामा नये. त्यांनी असे काही नफा कमविल्याचे आढळले तर नियोक्ता ते पैसे मागून घेऊ शकतो.

प्रतिनिधीनी दुसऱ्या व्यक्तीकडून लाच किंवा कमीशन स्वीकारू नये. आणि व्यवहारात असे कमीशन वगैरे मिळाले असेल तर ते पैसे नियोक्त्यालाच द्यावेत.

६) काम प्रामाणिकपणे करणे :

प्रतिनिधीने आपलं काम प्रामाणिकपणे केले पाहिजे. त्याच्या कामात जर अप्रामाणिकपणा दिसून आला तर त्याला त्याचा मोबदला नाकारला जाऊ शकतो.

७) नियोक्त्याशी संपर्क :

प्रतिनिधीनी नियोक्त्याशी सतत संपर्कात राहून त्याला मिळालेली सर्व माहिती नियोक्त्याला दिली पाहिजे वेळोवेळी त्याच्याकडून मार्गदर्शन घेतले पाहिजे. त्यांनी कोणतीही माहिती नियोक्त्या पासून लपवून ठेवता कामा नये.

८) स्वतंत्र खातं :

प्रतिनिधीनी नियोक्त्याच्या पैशाचा स्वतंत्र हिशेब ठेवला पाहिजे. त्याचे पैसे आपल्या पैशात मिसळता कामा नये. प्रतिनिधीनी नियोक्त्याचा हिशेब त्याला स्वतंत्रपणे वेळेवर सादर करावा.

१२.४.२ प्रतिनिधीचे अधिकार:

प्रतिनिधीचे अधिकार पुढीलप्रमाणे सांगता येतील:-

१) कामाचा मोबदला मिळण्याचा अधिकार (कलम २१९-२२०) :

कामाचा मोबदला मिळण हा प्रतिनिधीचा मूलभूत हक्क आहे. त्यांनी आपल काम बिनचूक पूर्ण केल्यावर त्याला हा अधिकार प्राप्त होतो. त्याच्या कामाबद्दल काहीही तक्रार असता कामा नये. त्याच काम जर समाधानकारक नसेल तर त्याला कामाचा मोबदला पूर्णत: किंवा अंशत: नाकारला जाऊ शकतो (कलम २२०).

२) नुकसान भरपाईचा अधिकार (कलम २२५) :

नियोक्त्याच्या निष्काळजीपणामुळे प्रतिनिधीचे जर काही नुकसान झाले तर त्यासाठी त्याला नुकसान भरपाई मिळण्याचा हक्क आहे.

३) केलेल्या खर्चाची भरपाई (कलम २१७) :

नियोक्त्याच्या नावाने मिळणाऱ्या पैशातून प्रतिनिधीला आपण केलेला खर्च किंवा दिलेली अगाऊ रक्कम कापून घेण्याचा अधिकार आहे. नियोक्त्याच्या सांगण्यावरुन पैसे खर्च केलेले असतील किंवा व्यवसयाच्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे पैसे खर्च केलेले असतील. प्रतिनिधीने धंद्याच्या फायद्यासाठी काही पैसे खर्च केलेले असतील तर तेही त्याला मिळाले पाहिजेत. त्याला मिळालेल्या एकूण पैशातून अशाप्रकारे त्याला येणे असलेली रक्कम वजा करुन बाकीचे पैसे नियोक्त्याला देण्यात येतात.

४) ताबा अधिकार (Right of Lien) कलम २२१ :

नियोक्त्याचा काही माल प्रतिनिधीकडे असेल तर प्रतिनिधी त्याला त्याची देय रक्कम प्राप्त होईपर्यंत माल ठेऊन घेऊ शकतो.

५) कायदेशीर कृतीमुळे झालेल्या नुकसानाची भरपाई (कलम २२२) :

प्रतिनिधीनी आपल्या कामाचा भाग म्हणून केलेल्या कायदेशीर गोष्टीतून जर त्याचं काही नुकसान झालं तर ते नुकसान नियोक्त्यानी भरुन दिले पाहिजे. उदा. सलीम हा पाटना मधला एक दलाल आहे अहमद या तिथल्या व्यापाऱ्याच्या वतीने चमनभाईशी अहमद साठी १० तेलाच्या डब्याच्या खरेदीचे तीन करार करतो. नंतर अहमद ते तेल स्वीकारण्यास नकार देतो. चमनभाई सलीम वर खटला भरतो. सलीम अहमदला ही गोष्ट कळवितो. परंतु सलीम सर्व करार रद्द करतो. सलीम कोर्टात आपली बाजू मांडतो परंतु

त्याला केसमध्ये यश प्राप्त होत नाही. त्याला नुकसान भरपाई द्यावी लागते व कोर्ट केसवर पैसे खर्च करावे लागतात. सलीमचा झालेला हा सर्व खर्च अहमदनी भरुन दिला पाहिजे.

६) विशिष्ट वस्तूवरील ताबा अधिकार (Particular Lien) :

प्रतिनिधीच्या आपल्या नियोक्त्याच्या आपल्या ताब्यातील सर्व चल व अचल मालमत्ता आपल्या कामाचा मोबदला व झालेला इतर खर्च व नुकसान नियोक्त्याकडून प्राप्त होईपर्यंत अडवून ठेवण्याचा अधिकार आहे. मूळ करारातया संबंधी काही वेगळी तरतूद मात्र नसावी.

१२.५ प्रतिनिधित्व संपुष्टात आणणे (TERMINATION OF AGENCY)

प्रतिनिधित्व पुढील दोन गोष्टीमुळे संपुष्टात आणता येते.

१) संबंधित पक्षाच्या कृतीमुळे

२) कायद्यातील तरतुदी प्रमाणे

अ) पक्षाच्या कृतीमुळे

१) करार करुन.

इतर कराराप्रमाणेच प्रतिनिधीच्या नियुक्तीचा करारही दोनही पक्षाच्या संमतीने संपुष्टात आणता येतो.

२) नियोक्ता करार रद्द करतो :

नियोक्त्याने कराराद्वारे प्रतिनिधीला काही खास अधिकार बहाल केलेले असतात. त्याच्या मनात आले तर नंतर केव्हाही हा करार रद्द करु शकतो म्हणजेच दिलेले अधिकार परत घेऊ शकतो त्या तारखेपासून करार रद्द होतो. करार रद्द करण्याची कृती उघड असते किंवा काहीवेळा कृतीवरुन गृहीत धरली जाते.

- प्रतिनिधित्व सततच किंवा दीर्घ मुदतीच असेल तर तो पुढील काळासाठी रद्द करता येतो. प्रतिनिधीने त्या आधी केलेल्या कृती रद्द करता येत नाहीत किंवा प्रतिनिधित्वाचा करार पुर्वलक्षी रद्द करता येत नाही. करार रद्द करताना प्रतिनिधीला पुरेशा अवधीची पूर्वसूचना दिली पाहिजे. अशीच सूचना इतर संबंधित लोकांनाही देण आवश्यक आहे.

- प्रतिनिधीची नेमणूक जर ठराविक मुदतीसाठी करण्यात आलेली असेल तरीसुद्धा ती मुदत पूर्ण होण्या आधीचे करार रद्द करता येतो. परंतु अशावेळी पूर्व सूचना देऊन करार रद्द केलेला असला तरीही त्या पोटी प्रतिनिधीला नियोक्त्यानी नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे.

३) प्रतिनिधीनी करार रद्द करणे :

इथे प्रतिनिधीला या पुढे प्रतिनिधी म्हणून काम करण पसंत नसत. म्हणून तो पुढाकार घेऊन करार रद्द करु शकतो. प्रतिनिधीनीही अशा वेळी नियोक्त्याला पूर्व सूचना देणे आवश्यक आहे. अशी जर सूचना दिली नाही तर त्यामुळे नियोक्त्याचे जर काही नुकसान झाले तर ते प्रतिनिधीनी भरुन दिले पाहिजे. तसेच जर प्रतिनिधीचा करार ठराविक मुदतीसाठी असेल व मुदत संपण्यापूर्वी प्रतिनिधीला तो रद्द करावयाचा असेल तर योग्य पूर्व सूचना नियोक्त्याचा देणे आवश्यक आहे. नाही तर सूचने अभावी होणाऱ्या नुकसानीला तो जबाबदार धरला जातो.

ब) कायद्यातील तरतुदीप्रमाणे :

पुढील परिस्थितीत प्रतिनिधित्वाचा करार कायद्यातील तरतूदी प्रमाणे आपणहून संपुष्टात येतो.

१) प्रतिनिधित्वाचे काम पूर्ण झाल्यास :

ज्या विशिष्ट कार्यासाठी प्रतिनिधीची नेमणूख करण्यात आलेली असते ते कार्य जर पूर्ण झाल तर प्रतिनिधित्वाला करार आपोआप रद्द होतो. उदा. कोर्टात एखादी केस लढविण्यासाठी वकीलाची नेमणूक केलेली असेल तर केसचा निकाल लागल्यावर करार आपोआप संपुष्टात येतो.

2) **मुदत संपल्यावर:-**

जर प्रतिनिधीची नेमणूक ठराविक मुदतीसाठी करण्यात आलेली असेल तर ती मुदत संपल्यावर ठरलेलं काम संपलेलं नसलं तरीही करार संपुष्टात येतो.

३) नियोक्ता किंवा प्रतिनिधीचा मृत्यू :

नियोक्ता किंवा प्रतिनिधी मरण पावल्यास करार आपोआप संपुष्टात येतो. नियोक्त्याचा मृत्यू झाला तर प्रतिनिधीनी नियोक्त्याच्या हित संरक्षणासाठी आवश्यक ती सर्व काळजी घेतली पाहिजे.

४) नियोक्ता किंवा प्रतिनिधी वेडा झाल्यास :

जर नियोक्त्याला किंवा प्रतिनिधीला वेड लागले तर करार आपोआप संपुष्टात येतो. परंतु इथेही नियोक्त्याला वेड लागल्यास, त्याच्या हित रक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी प्रतिनिधीने पूर्ण केल्या पाहिजेत.

५) नियोक्ता नादार बनल्यास :

जेव्हा नियोक्ता नादार घोषित केला जातो. तेव्हा करार संपुष्टात येतो. परंतु जर प्रतिनिधी नादार झाल्यास करार रद्द करायचे किंवा नाही ही गोष्ट नियोक्त्याच्या मर्जीवर अवलंबून असते.

६) संबंधित वस्तू नाश पावल्यास :

प्रतिनिधीची नियुक्ती एखाद्या मालमत्तेच्या संदर्भात असेल व कोणत्याही कारणाने ती मालमत्ता नाश पावल्यास प्रतिनिधित्व आपोआप संपुष्टात येते. उदा. एखादे घर विकण्यासाठी प्रतिनिधीची नेमणूक करण्यात आलेली असेल तर जर ते घर आगीत जळाल तर करार संपुष्टात येतो.

७) कंपनी विसर्जित झाल्यास :

हे म्हणजे नियोक्ता किंवा प्रतिनिधीच्या मृत्यूसारखे आहे. कारण कायद्याच्या दृष्टीने कंपनी ही कृत्रिम व्यक्ती समजली जाते. त्यामुळे कंपनी जर विसर्जित झाली तर प्रतिनिधीत्वही संपुष्टात येते.

८) करारातील एखादा पक्ष शत्रू राष्ट्राचा नागरिक ठरणे :

जर नियोक्ता किंवा प्रतिनिधी दुसऱ्या राष्ट्राचा नागरिक असेल व दोन राष्ट्रामध्ये युद्ध सुरु झाले तर करार संपुष्टात येतो. कारण शत्रू राष्ट्रातील नागरिकाबरोबर करार करणे बेकायदेशीर ठरते.

१२.६ रद्द न करता येणारे प्रतिनिधित्व (IRREVOCABLE AGENCY)

पुढील परिस्थितीत प्रतिनिधीचा करार रद्द करता येत नाही.

1) **प्रतिनिधीचे हितसंबंध ज्यात गुंतलेले आहेत (Agency Coupled with interest) :**

प्रतिनिधित्वाच्या मालमत्तेत जर प्रतिनिधीचे हितसंबंध गुंतलेले असतील तर असा करार रद्द करता येत नाही. कारण त्यामुळे प्रतिनिधीच नुकसान होऊ शकते. उदा. अ ब ला काही पैसे देणे लागतो. त्यानी जर त्याचे घर विकण्यासाठी ब ची प्रतिनिधी म्हणून नेमणूक केली व सांगितलं की घर विकून आलेल्या पैशातून तुझे वळते करुन बाकीचे पैसे मला दे. अ हा करार रद्द करु शकत नाही. एव्हढेच नव्हे तर अ मरण पावल्यास किंवा त्याला वेड लागल्यास सुद्धा करार रद्द ठरत नाही.परंतु इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की ब चे हितसंबंध प्रतिनिधित्वाच्या करारा आधीचे असावेत करार केल्यानंतर जर हित संबंध निर्माण झाले तर मात्र करार रद्द करता येतो.

असे हितसंबंध असलेले करार रद्द करताच येत नाहीत असे नाही. परंतु अशावेळी प्रतिनिधीला होणाऱ्या नुकसानाची भरपाई करुन दिली पाहिजे आणि नंतर करार रद्द करावा.

काम जर अर्ध पूर्ण झालेल असेल तर अशावेळी नियोक्ता प्रतिनिधीची नेमणूक रद्द करु शकत नाही. (कलम २०४)

2) प्रतिनिधीनी काही वैयक्तिक जबाबदारी स्वीकारली असेल तर :

प्रतिनिधीनी स्वत:च्या पतीवर मालाची उधारीवर खरेदी केली असेल किंवा पैसे वगैरे आधी दिले असतील तर करार रद्द करता येत नाही. उदा. अ नी ब कापसाच्या १०० गाठी खरेदी करण्यास सांगितले व ब कडे असलेल्या अ च्या पैशाचा त्यासाठी वापर करण्यास सांगितले. ब नी १०० कापसाच्या गाठी आपल्या नावाने खरेदी केली अशा परिस्थितीत अ ब ची नेमणूक रद्द करु शकणार नाही.

१२.७ प्रश्न

1) प्रतिनिधी नियुक्तीच्या करारातील आवश्यक गोष्टी विशद करा.

2) प्रतिनिधित्व निर्माण करणाऱ्या विविध पद्धतींची चर्चा करा.

3) प्रतिनिधीचे विविध प्रकार सांगा.

4) संक्षिप्त टीपा लिहा:-

   1) पश्चात संमतीने प्रतिनिधीची नेमणूक

   2) प्रतिनिधीची कर्तव्ये व अधिकार.

   3) प्रतिनिधित्व रद्द करणे.

5) व्याख्या द्या.

   1) प्रतिनिधित्व

   2) रद्द करता न येणारे प्रतिनिधित्व.

   3) प्रतिनिधी

   4) नियोक्ता

   5) पैसे वसूलीचे हमी देणारा प्रतिनिधी

   6) सर्वकष प्रतिनिधी

   7) फॅक्टर

   8) उप प्रतिनिधी

❖❖❖❖

१३

मालविक्रीचा कायदा १९३०

घटक रचना :

१३.० उद्दिष्टे

१३.१ विषय परिचय

१३.२ मूलभूत संकल्पना

१३.३ विक्रीसाठी आवश्यक गोष्टी

१३.४ विक्री व विक्रीचा ठराव.

१३.५ विक्री व भाडे खरेदीची विक्री यातील फरक.

१३.६ मालाचे प्रकार

१३.७ विक्री करार पूर्ण झालेल्या मालाचा नाश झाल्यास होणारे परिणाम

१३.८ प्रश्न

१३.० उद्दिष्टे

या पाठाच्या अभ्यासानंतर पुढील गोष्टींची तुम्हाला माहिती मिळेल.

- मालविक्रीच्या कायद्यातील मूलभूत संकल्पना
- विक्रीसाठी आवश्यक असणार्या गोष्टी.
- विक्री व विक्रीचा ठराव यातील फरक.
- विक्री व भाडेखरेदी पद्धतीने विक्री.

१३.१ विषय परिचय

माल विक्रीचा कायदा हा मालाच्या विक्री संबंधीचा कायदा आहे. माल म्हणजे सर्व प्रकारची चल मालमत्ता. या व्याख्येत चालू चलन व कोर्टात दावा लावणारा अधिकार यांचा मात्र समावेश होत नाही. आपल्या देशातील हा कायदा इंग्लंडच्या १८९३ च्या माल विक्री कायद्यावर आधारित आहे.

हा कायदा पास होण्यापूर्वी म्हणजे १९३० साला पर्यंत, माल विक्रीच्या करारांना सर्व साधारण कराराना लागू होणारा १८७२ चा कायदा लागू होता. परंतु त्यातील तरतूदी या साठी अपुऱ्या व असमाधानकारक होत्या. म्हणून १९३० साली हा स्वतंत्र कायदा पास करण्यात आला. या कायद्यात एकूण ६६ कलम असून १ जुलै १९३० रोजी हा कायदा अंमलात आला. हा कायदा जम्मू व काश्मीर राज्य वग़ळून भारतात इतर सर्वत्र लागू आहे.

१३.२ मूलभूत संकल्पना

१३.२.१ माल विक्रीची व्याख्या :

कायद्यातील कलम २ (१) मध्ये **माल विक्रीची** व्याख्या आहे. यानुसार ज्या करारात विक्रेता पैशाच्या बदल्यात मालाची मालकी खरेदीदाराकडे हस्तांतरित करतो किंवा करण्याचे वचन देतो. जेव्हा मालाची मालकी विक्रेत्याकडून खरेदी दाराकडे वर्ग होते तेव्हा विक्री झाली असे समजले जाते.

मालकीचे हस्तांतर जर भविष्यात होणार असेल व त्यासाठी आणखीन काही कृत्य करणे आवश्यक असेल तर त्याला विक्रीचा ठराव (Agreement to Sell) म्हणतात.

१३.२.२ महत्त्वाच्या संकल्पना :

१) खरेदीदार (कलम २(१)) :

खरेदीदार म्हणजे अशी व्यक्ती जी माल खरेदी करते किंवा खरेदी करण्यास संमती देते.

२) विक्रेता (कलम २ (१३)) :

विक्रेता म्हणजे अशी व्यक्ती जी माल विकते किंवा विकण्यास संमती देते. उदा. अ आपल्या दुकानातील एक साखरेच पोतं ब ला विकतो. इथे अ हा विक्रेता व ब हा खरेदीदार आहे.

३) माल :

कलम ड२(७)] मध्ये मालाची व्याख्या देण्यात आलेली आहे. माल म्हणजे कोणतीही चल संपत्ती. यांत फक्त चालू चलन व कोर्टात जाण्याचा अधिकार यांचा समावेश होत नाही. कंपनीचे भाग म्हणजे सुद्धा माल. या शिवाय या व्याख्येत शेतातील धान्य, गवत यांचाही समावेश होतो. तसेच जमीनीतील चिरे, खाण, माती इत्यादी जे जमीनीतून नंतर वेगळ करुन विकले जाणार असतात त्यांचाही समावेश होतो.

४) ताबा देणे (Delivery) कलम २(२) :

ताबा देणे म्हणजे स्वेच्छेने वस्तू दुसऱ्या व्यक्तीच्या ताब्यात देणे.

ताबा देण्याचे प्रकार.

1) **प्रत्यक्ष ताबा देणे**

इथे माल प्रत्यक्षात उचलून दुसऱ्याला किंवा त्याच्या प्रतिनिधीला दिला जातो. विक्रेत्याला मालाचे पैसे मिळूनही जर त्यांनी त्याचा ताबा दिला नाही तर खरेदीदार कोर्टात जाऊन दिलेल्या पैशावर योग्य व्याजाची मागणी करू शकतो. उदा. अ नी आपली कार ब ला विकली व त्याला कार दिली तर प्रत्यक्ष ताबा दिला अस म्हटलं जाते.

ब) सांकेतिक ताबा.

माल गोडाऊन मध्ये असताना गुदामाची चावी खरेदीदाराला देणे म्हणजे त्यातील मालाचा सांकेतिक ताबा देणे समजले जातो. उदा. कार विकल्यावर कारची चावी देणे म्हणजे त्याची सांकेतिक डेलिव्हरी होय.

क) गृहीत ताबा :

गृहीत ताबा म्हणजे वस्तूचा ताबा खरेदीदाराला आधीच दिलेला असतो. नंतर फक्त त्याच्या मालकी हक्कात बदल होतो. उदा. नारदनी नारायणाला आपली बस भाडयाने दिलेली असते. नंतर त्यालाच ती बस विकली जाते. अशा वेळी ताबा गृहीत धरला जातो. (Constructive Delivery)

५) किंमत :

किंमत म्हणजे करारातील मोबदला किंवा प्रतिफल (Consideration) होय. इथे मालाच्या बदल्यात पैसे दिले जातात. मालाच्या बदल्यात जर दुसरा माल दिला तर तो व्यवहार माल विक्रीचा समजला जात नाही. त्याला वस्तू विनिमय (Barter) म्हटले जात. उदा. अ ब ला एक पुस्तक रु. ३००/- ला विकतो. याला विक्रीचा व्यवहार म्हणतात.

2) **मालकी हक्कात बदल :**

विक्री व्यवहाराच्या पूर्ततेसाठी मालाच्या मालकी हक्कात बदल होणे आवश्यक आहे. विक्री नंतर खरेदीदार मालाचा मालक बनतो. विक्रीच्या वेळी मालाचा ताबा व मालकी हक्क दोन ही गोष्टी खरेदीदाराला दिल्या जातात. उदा. अ आपली कार ६ लाख रुपयांना ब ला विकतो. अशावेळी अ ब ला कार देतो व सोबत त्याची मालकीही बहाल करतो.

७) विक्री :

जेव्हा मालकी हक्क आणि मालाचा ताबा एकाचवेळी दिला जातो तेव्हा त्याला विक्री म्हणतात. अशाप्रकारे विक्रेता आणि खरेदीदार यांच्यातला व्यवहार पूर्ण होतो. उदा. अ आपल पेन ब ला विकतो आणि ब त्याची किंमत रोखीने अदा करतो. इथे विक्रीचा व्यवहार पूर्ण होतो.

८) विक्रीचा ठराव (Agreement to Sell) :

जेव्हा मालाचा मालकी हक्क काही कालावधी नंतर दिला जाणार असतो तेव्हा त्याला विक्रीचा ठराव म्हणतात. उदा. अ ब कडुन त्याची बस ३ लाख रुपयांना विकत घेतो परंतु बस चा ताबा पुढील वर्षी देण्यात येणार असतो. हा विक्रीचा ठराव होय.

जिथे मालाचा ताबा काही ठराविक काळानंतर किंवा एखादी अट पूर्ण केल्यानंतर दिला जाणार असतो तर तो व्यवहार हा विक्रीचा ठराव (Agreement to sell) ठरतो. [(कलम ४ (३)] हा व्यवहार भविष्यात पूर्ण होणारा असतो किंवा एखादी अट पूर्ण केल्यावर पूर्ण होणारा असतो. उदा:- १ जानेवारीला अ आपली स्कूटर ब ला रु. ३०,००० ला विकतो आणि स्कूटरचा ताबा १५ जानेवारीला देण्याचे व पैसे २० जानेवारीला देण्याचे ठरते.

ब) अ ब ची स्कूटर विकत घ्यायला तयार होतो परंतु अशी अट घालतो की त्याचा मेकॅनिक क नी स्कूटरची स्थिती समाधानकारक आहे असे मत व्यक्त केले पाहिजे. क जेव्हा तस मत व्यक्त करतो तेव्हाच विक्रीचा व्यवहार पूर्ण होतो.

१३.३ विक्री वैध ठरण्यासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी

कलम ४(१) प्रमाणे जेव्हा विक्रेता पैशाच्या बदल्यात मालाच्या मालकी हक्कात बदल करण्यास तयार होतो. तेव्हा त्याला विक्री म्हटली जाते.

वरील व्याख्येतून विक्रीसाठी पुढील गोष्टींची आवश्यकता स्पष्ट होते:-

१) दोन पक्ष

विक्रीच्या करारासाठी दोन स्वतंत्र पक्षांची आवश्यकता आहे ते म्हणजे विक्रेता व खरेदीदार. व्यक्ती स्वत:चा माल स्वत:च खरेदी करु शकत नाही त्यामुळे दुसरा पक्षही आवश्यक असतो.

२) पक्ष

अज्ञान व्यक्ती किंवा वेडा व्यक्ती हा विक्रेता किंवा खरेदीदार होऊ शकत नाही. कारण करार संबंधाच्या कायद्यातील कलम ११ प्रमाणे ही व्यक्ती करार करण्यास सक्षम नाही. परंतु अशा व्यक्तीच्या वतीने त्याचा पालक खरेदीदार होऊ शकतो.

३) मालकी हक्कातील बदल

इथे मालकी हक्क म्हणजे वस्तूची मालकी. मालकी हक्कातील बदल ही विक्री करारातील एक अत्यावश्यक घटक आहे. फक्त वस्तू दुसऱ्याला देण्याने विक्री होत नाही. मालाच्या मालकानी मालाची मालकी खरेदीदाराला दिली पाहिजे किंवा देण्यास कबूल झाला पाहिजे तरच विक्रीची प्रक्रिया पूर्ण होते.

४) माल

विक्री ही मालाचीच असली पाहिजे. कलम २ (७) प्रमाणे माल म्हणजे कोणतीही चल मालमत्ता यात फक्त व्यवहारातील चलन व कोर्टात जाण्याचा अधिकाराचा समावेश होत नाही. पैशाची जरी समावेश होत नसला तरीही जुन्या दुर्मिळ नाण्यांचा समावेश मात्र माल या संकल्पनेत होतो. या शिवाय माल मध्ये

- कंपनीचे भाग
- शेतातील उभे पीक
- जमीनीला चिकटलेल्या गोष्टी ज्या विक्रीच्या वेळी जमिनीतून बाहेर काढता येतात. त्यांचा समावेश होतो. उदा. खाणीतील माती, नावलौकिक, व्यापारी चिन्ह , कॉपीराईट, पेटेंट, पाणी, वीज, कोर्टाची डिक्री (आज्ञा) या सर्व गोष्टींचा माल या संज्ञेत समावेश होतो.

५) प्रतिफल

माल विक्रीच्या करारात प्रतिफल हे पैशाच्या स्वरुपात असले पाहिजे. मालाच्या बदलात दुसरी वस्तू दिली गेली तर हा व्यवहार वस्तू विनिमय (Barter) ठरतो. विक्री होत नाही. त्यामुळे अशा व्यवहाराना हा कायदा लागू होत नाही. अचल मालमत्तेसाठीही हा कायदा लागू होत नाही. त्यांना मालमत्ता हस्तांतर (Transfer of Property) कायदा लागू होतो.परंतु प्रतिफलाचा काही भाग रोख रकमेत व काही भाग मालाच्या स्वरुपात दिल्यास तो व्यवहार माल विक्रीचा व्यवहार ठरतो. उदा. जुनी कार व काही पैसे देऊन नवीन कारची खरेदी करणे.हा व्यवहार माल विक्रीचा व्यवहार समजला जातो.

६) विक्री

ज्या व्यवहारात मालाची मालकी विक्रेत्याकडून खरेदीदाराकडे लगेच वर्ग केली जाते त्याला विक्री म्हणतात (कलम ४ (३)) किंवा याला संपूर्ण विक्री म्हणतात. इथे वस्तूचां ताबा नंतर दिला गेला तरी चालतो. मालकी मात्र लगेच दिली पाहिजे. वस्तूची किंमत लगेच दिली गेली पाहिजे अस नाही. उदा. तुम्ही एका पुस्तकाच्या दुकानात जाऊन एखाद्या पुस्तकाची खरेदी केलीत व निरोप दिलात की उद्या माझा धाकटा भाऊ येऊन पुस्तक घेऊन जाईल व पुस्तकाचे पैसे मी पगार झाल्यावर पुढल्या महिन्याच्या एक तारखेला आणून देईन. तरी हा व्यवहार माल विक्रीचा व्यवहार ठरतो.

७) विक्रीचा विषय.

विक्रीचा विषय कोणतीही चल मालमत्ता असते.

१३.४ विक्री व विक्रीचा ठराव यातील फरक (SALE AND AGREEMENT TO SELL)

विषय	विक्री (Sale)	विक्रीचा ठराव (Agreement to Sell)
मालकी हक्काच हस्तांतर	मालकी हक्काच हस्तांतर लगेच होत.	मालकी हक्काचे हस्तांतर भविष्य काळात व्हावयाचे असते.
करार पूर्ण किंवा नाही	इथे विक्रीचा करार (प्रक्रिया) पूर्ण झालेला असतो	इथे काही करावयाचे शिल्लक असते. त्यामुळे करार नंतर पूर्ण होतो.
मालकी	खरेदीदाराला वस्तू वापरण्याचा संपूर्ण अधिकार प्राप्त होतो इथे मालमत्तेवर अधिकार प्राप्त होतो.	खरेदीदाराला असा अधिकार प्राप्त होत नाही. फक्त व्यक्तिगत अधिकार निर्माण होतो.
खरेदीदाराने करार भंग केल्यास विक्रेत्याला मिळणारे अधिकार.	विक्रेता खरेदीदाराकडून किंमत वसूल करु शकतो.	वस्तू जरी खरेदीदाराच्या ताब्यात असली तरी विक्रेता खरेदीदारावर फक्त नुकसान भरपाईसाठी दावा लावू शकतो.

१३.५ विक्री व भाडे खरेदी पद्धतीची विक्री यातील फरक

विक्री	भाडे खरेदी पद्धतीची विक्री
मालाची मालकी करार झाल्याबरोबर खरेदीदाराकडे वर्ग होते.	शेवटचा हप्ता दिल्या नंतरच खरेदीदाराला मालाची मालकी प्राप्त होते.
खरेदीदार हा वस्तूचा मालक बनतो.	भाडे खरेदीत वस्तू खरेदी करणाऱ्याची भूमिका शेवटचा हप्ता फिटेपर्यंत निक्षेप गृहीताची (Bailee) असते.
खरेदी दारानी वस्तूची किंमत दिली पाहिजे. तो करार रद्द करु शकत नाही.	भाडे खरेदी पद्धतीने खरेदी केलेली व्यक्ती केव्हाही ती वस्तू परत करुन करार रद्द करु शकते.

खरेदीदार वस्तूची पुनर्विकी करु शकतो व त्या खरेदीदार व्यक्तीला मालकी हक्क हस्तांतरित करु शकतो.	भाडे खरेदी पद्धतीने वस्तू घेतलेली व्यक्ती करार पूर्ण झाल्या शिवाय वस्तूची पुनर्विक्री करु शकत नाही किंवा खरेदी दाराला मालकी हक्क बहाल करु शकत नाही.
विक्रीवर विक्रीकर लावला जातो.	विक्री पूर्ण होईपर्यंत म्हणजेच शेवटचा हप्ता देण्यापर्यंत विक्रीकर लागू होत नाही.

१३.६ मालाचे प्रकार

१) अस्तित्वात असलेला माल किंवा वस्तू :

हा माल किंवा वस्तू करार करताना अस्तित्वात असतो. अस्तित्वात असलेल्या वस्तूचे परत वेगवेगळे प्रकार आहेत.

अ) निश्चित केलेल्या वस्तू

विक्रेत्याकडे असलेल्या अनेक वस्तू मधून नेमकी कुठली वस्तू विकायची हे विक्रेता ठरवितो किंवा खरेदीदार आपल्या आवडीची वस्तू निवडतो. विक्रीचा करार पूर्ण झाल्यानंतर वस्तूची निश्चिती केली जाते.

ब) निश्चिती व्हावयाच्या वस्तू (Unascertained goods) :

इथे विक्रेता फक्त मालाचे वर्णन करतो. वस्तूची निश्चिती नंतर केली जाते.

क) विशिष्ठ वस्तू (Specific goods) :

कलम २ (१४) प्रमाणे ज्या मालाची निश्चिती विक्रीचा करार करतानाच झालेली असते त्याला विशिष्ठ (Specific) वस्तू म्हणतात. उदा. कार, वॉच वगैरे.

२) भविष्यकालीन माल :

इथे करार करताना वस्तू प्रत्यक्षात अस्तित्वात नसते. नंतरच्या काळात त्याची निर्मिती करावयाची असते किंवा खरेदी करावयाची असते.उदा. शेतकरी शेतातल्या पिकाची विक्री करु शकतो.

३) घटनावलंबी

इथे एखादी अनिश्चित घटना घडली किंवा नाही घडली तरच वस्तू मिळवायची किंवा उत्पादन करावयाची असते. उदा. मुंबईच्या एका व्यापाऱ्याचा काही माल जर्मनीवरुन यायचा आहे. तो तो माल विकण्यासाठी करार करतो. इथे माल घटनावलंबी आहे कारण माल सुरुक्षितपणे मुंबई बदंरात आला तरच हा विक्रीचा व्यवहार पूर्ण होऊ शकतो. म्हणून घटनावलंबी म्हणजे एक प्रकारचे भविष्य काळातील मालच आहे.

१३.७ करार पूर्ण झाल्यावर मालाचा नाश झाला तर होणारा परिणाम

मालाचे अनेक प्रकार आहेत आणि त्यांचा ताबा कसा द्यावा या बद्दल अनेक पर्याय संबंधित पक्षांना उपलब्ध आहेत.

मालाचा नाश झाला तर त्याचे काय काय परिणाम होतील?

१) विक्री करार पूर्ण करण्यापूर्वी मालाचा नाश झाला तर:-

करारपूर्तीच्या आधी विशिष्ट मालाचा नाश झाला व याची माहिती विक्रेत्याला नव्हती तर करार रद्द होतो. इथे कराराची पूर्तता अशक्यच होते व अशक्य गोष्टीसाठी करार करता येत नाही. कराराचे मुख्य उद्दिष्टच संपुष्टात आलेले असते.

२) विक्रीच्या ठरावानंतर परंतु विक्रीची प्रक्रिया पूर्ण होण्याआधी मालाचा नाश झाला तर :-

विशिष्ट माला संबंधीचा करार असून विक्रीच्या ठरावात खरेदीदाराचा काही दोष नसताना मालाचा नाश झाला तर करार रद्द ठरतो. परंतु मालाची मालकी व जोखीम अजून खरेदीदाराला वर्ग झालेली नसला पाहिजे. इथेही करार पूर्ती अशक्य होते. उदा. एक घोडा वापरुन बघण्यासाठी ५ दिवसासाठी दिला गेला. परंतु खरेदीदाराचा काहीही दोष नसताना त्या ५ दिवसांतच घोडयाच आकस्मिक निधन झाल तर तोटा विक्रेत्यांनीच सोसला पाहिजे कारण करार रद्द झालेला आहे.

१३.८ प्रश्न

1) विक्री व विक्रीचा ठराव यातील फरक स्पष्ट करा.
2) विक्री करारातील महत्त्वाच्या घटकांची चर्चा करा.
3) टीपा लिहा.
    1) मालाचे प्रकार.
    2) माल नाश झाल्यास होणारे परिणाम.
4) पुढील गोष्टींची व्याख्या द्या.
    1) माल
    2) ताबा देणे
    3) सांकेतिक ताबा
    4) भविष्यकालीन वस्तू
    5) विक्रीचा ठराव
    6) भाडेखरेदी पद्धत
    7) गृहीत ताबा

❖❖❖❖

१४

प्रमुख व दुय्यम अटी
(CONDITION AND WARRANTIES)
(कलम ११-१७)

घटक रचना :

१४.० उद्दिष्टे

१४.१ विषय परिचय

१४.२ गृहीत प्रमुख अटी

१४.३ गृहीत दुय्यम अटी

१४.४ प्रमुख अट केव्हा दुय्यम अट बनू शकते.

१४.५ प्रमुख व दुय्यम अटीतील फरक

१४.६ ग्राहक राजा काळजी घे

१४.७ प्रश्न

१४.० उद्दिष्टे

या पाठाच्या अभ्यासानंतर तुम्हाला पुढील विषयाची माहिती होईल.

- प्रमुख व दुय्यम अटी यांची व्याख्या.
- गृहीत प्रमुख अटींची चर्चा.
- गृहीत दुय्यम अटींची चर्चा.
- प्रमुख अट केव्हा दुय्यम अट म्हणून गणली जाते.
- प्रमुख व दुय्यम अटींमधला फरक.

१४.१ विषय परिचय

प्रमुख अट ही कराराच्या गाभ्याशी निगडित असते. तिला कराराचा पाया म्हणता येईल. प्रमुख अटीचा भंग झाल्यास संबंधित पक्ष करार रद्द करु शकते व त्याचे काही नुकसान झालेला असेल त्यासाठी भरपाई मागू शकते.

दुय्यम अट ही कराराच्या प्रमुख उद्दिष्टाशी निगडित असते. परंतु त्याच स्थान दुय्यम असत.त्याच पालन झाल नाही तर करार रद्द करता येत नाही. परंतु संबंधित पक्षाला अटीच पालन न झाल्यामुळे झालेल्या नुकसानाची भरपाई मागण्याचा अधिकार आहे.

पुढील परिस्थितीत प्रमुख अटीचा भंग केवळ दुय्यम अटीचा भंग समजला जातो.

- जेव्हा खरेदीदार अटींच्या भंगतेकडे दुर्लक्ष करण्याचे ठरवितो.
- जेव्हा खरेदीदार प्रमुख अटीच्या भंगाला दुय्यम अटींचा भंग समजण्याच ठरवितो व करार रद्द करण्याचा आपला हक्क सोडून देतो.
- खरेदीदारांनी करारातील काही माल आधीच स्वीकारलेला आहे व तो भाग करारातील इतर भागापासून वेगळा करता येत नाही.
- करार हा ठराविक मालासाठी आहे व मालाची मालकी खरेदीदाराकडे वर्ग याआधीच झालेली आहे.

प्रमुख व दुय्यम अटी या प्रकट असतात किंवा काही ठिकाणी गृहीत धरली जातात. या अटींचा जेव्हा विक्रीच्या लेखी करारात समावेश झालेला असतो तेव्हा त्यांना प्रकट प्रमुख व दुय्यम अटी म्हणतात. या अटी जर करारात लिहिलेल्या नसतील तर त्यांना गृहीत प्रमुख व दुय्यम अटी म्हणतात. या अटी प्रचलित कायद्यान्वये किंवा व्यापारातील प्रथामुळे करारात गृहीत धरल्या जातात.

१४.२ गृहीत प्रमुख अटी (Implied Condition)

१) वस्तूच्या मालकीची अट [कलम १४ (अ)] :

विक्रीच्या करारात नेहमी गृहीत धरले जाते की विक्रेत्याला माल विकण्याचा अधिकार आहे किंवा विक्रीच्या ठरावामध्ये जेव्हा मालाची मालकी वर्ग केली जाते. तेव्हा विक्रेत्याला विकण्याचे अधिकार प्राप्त झालेले असतात.

रोलंड .वि. दिवाल.

अ नी ब कडून एक कार विकत घेतली व काही काळापर्यंत त्याचा वापर केला. नंतर असे लक्षात आले की ब नी ती कार चोरुन आणली होती. त्यामुळे अ ला ती कार कारच्या त्या खर्या मालकाला परत करावी लागली. कोर्टाने निवाडा दिला की अ ला त्यांनी ब ला कारची किंमत म्हणून दिलेले सर्व पैसे परत करावेत.

२) वर्णनावरुन मालाची विक्री

अशावेळी माल वर्णनावर हुकुम असावा अशी प्रमुख अट आहे. ही गृहीत अट आहे. त्यामुळे करारात त्याचा उल्लेख असणे आवश्यक नाही. उदा. एका यंत्राच्या विक्रीच्या करारात उल्लेख होता की यंत्र जवळ जवळ नवीन आहे. त्याचा फारसा वापर केलेला नाही. परंतु प्रत्यक्षात असे दिसून आले की यंत्र जुनं होत व दुरुस्त करुन विकलेल होत. खरेदीदार ते यंत्र स्वीकारण्यास नकार देऊ शकतो.

३) नमूना दाखवून विक्री

मालाची विक्री नमूना दाखवून झालेली असेल तर सर्व माल त्या नमून्या बरहुकुम असणे आवश्यक आहे. खरेदी दाराला माल दाखविलेल्या नमून्याप्रमाणे आहे हे तपासून पाहण्याची संधी दिली गेली पाहिजे. माल हा विक्री योग्य असावा. नमूना बघून मालाची विक्री योग्यता ठरविता आली पाहिजे.

४) वर्णन करुन व नमूना दाखवून विक्री :

अशावेळी माल वर्णना प्रमाणेतर असावाच त्या शिवाय दाखविलेल्या नमून्याप्रमाणेही असावा.

५) मालाची गुणवत्ता :

सर्व साधारण नियम म्हणजे 'ग्राहका सावध रहा," म्हणजे मालाची गुणवत्ता तपासून घेण्याची प्रमुख जबाबदारी ही ग्राहकाची आहे. यालाच Caveat Emptor किंवा Buyer Beware म्हणतात. विक्रेत्यानी मालातील दोष स्वत: हून सांगण्याची आवश्यकता नाही. ग्राहकानीच मालाची गुणवत्ता तपासून मग खरेदीचा निर्णय घ्यावा. परंतु पुढील विशिष्ट परिस्थितीत माल ठरलेल्या गुणवत्तेचा असणे आवश्यक आहे.

- खरेदीदार आपण माल कशासाठी विकत घेत आहोत हे आधी जाहीर करतो व त्या कारणासाठी उपयुक्त असा माल देण्यास विक्रेत्याला सांगतो. थोडक्यात खरेदीदार विक्रेत्यावर विश्वास ठेऊन मालाची खरेदी करतो.
- विक्रेता मालतील दोष सांगत नाही व वरवरच्या पाहणीत अशा दोषांची कल्पना खरेदी दाराला येत नाही. मालातील दोष सहजा सहजी समजत नाहीत.
- विक्रेता गुणवत्तेची खात्री देतो आणि खरेदीदार त्याच्यावर विश्वास ठेऊन मालाची खरेदी करतो.

निवाडा : अ नी ब कडून कार विकत घेतली व आपण ती टॅक्सी म्हणून वापरणार आहोत हे सांगितले. परंतु कार टॅक्सी म्हणून वापरण्यास अयोग्य होती. कोर्टाने निवाडा दिला की अ कार परत करु शकतो.

परंतु वस्तूची विक्री पेटेंट खाली किंवा व्यापारी नावाने विकली तर ती वस्तू ठराविक कामासाठी उपयोगी असली पाहिजे अशी अट घातला येणार नाही.

६) वस्तू विक्री योग्य असावी. (कलम १६) :

मालाची विक्री वर्णनावरुन झालेली असेल तर माल त्या वर्णना बरहुकुम असावा तसेच विक्री योग्य असावा.

ब्रंट वि ऑस्ट्रेलियन निटिंग मिल्स लि. ने अंडरवेअर विकले. ग्राहकाला काही दिवसानी चर्मरोग झाला. कोर्टाने ग्राहकाला नुकसान भरपाई देण्यास सांगितले.

अपवाद :- जर ग्राहकांनी माल तपासून खरेदी केला असेल तर तपासणीत स्पष्ट होणारे दोष नंतर आढळले तर करार रद्द करता येणार नाही.

७) खाद्य वस्तू :

खाद्य वस्तू खाणे योग्य असली पाहिजे म्हणजेच आरोग्याला घातक ठरेल अशी असू नये.

१४.३ गृहीत दुय्यम अटी

या आधी आपण पाहिल आहेच, की पुढील परिस्थितीत प्रमुख अटीचा भंग दुय्यम अटीचा भंग समजण्यात येतो.

1) खरेदीदार प्रमुख अटीचा भंग हा दुय्यम अटीचा भंग म्हणून मान्य करतो

2) खरेदीदाराने काही माल आधीच स्वीकारलेला असतो आणि आता सर्व माल स्वीकारण्यास नकार देणे त्याला शक्य नसते.

1) निर्धोकपणे मालाचा वापर करण्याची दुय्यम गृहीत अट याचा अर्थ त्यानी मालाचा वापर करताना त्यावर कोणालाही हक्क सांगता येत नाही.

प्रत्येक विक्रीच्या करारात असे गृहीत असते की मालाची खरेदी केल्यानंतर खरेदीदार त्याचा शांतपणे वापर करु शकतो. त्यात कोणीही अडथळे आणू शकत नाही. विक्रेत्याच्या मालकी हक्कातील दोषामुळे जर इतर कोणी व्यक्ती खरेदीदाराच्या अधिकारात व्यत्यय आणला असेल तर विक्रेत्यानी खरेदी दाराला नुकसान भरपाई दिली पाहिजे.

2) **मालाची मालकी निर्भेळ असावी कलम १४ (क) :**

खरेदीदाराने खरेदी केलेल्या मालावर कोणत्याही प्रकारचा बोजा नसावा. म्हणजेच विक्रेत्यानी त्या मालावर कोणाकडून कर्ज वगैरे घेतलेल नसाव. उदा. अ नी ब कडे आपला वॉच गहाण ठेऊन काही कर्ज घेतो व नंतर तो वॉच परत आणून क ला विकतो. ब कडे जाऊन वॉच वरील बोजाची माहिती देतो. आणि क ला तो कर्ज फेडाव लागतो. इथे दुय्यम अटीचा भंग होतो आणि अ ब कडून नुकसान भरपाई मागू शकतो.

३) मालाच्या धोकादायक दोषांची माहिती खरेदी दाराला देणे :

विकलेल्या मालाच्या वापरात जर काही संभाव्य धोका असेल तर विक्रेत्यानी त्याची कल्पना खरेदीदाराला दिली पाहिजे. उदा. क अ कडून एक जंतुनाशक पावडरचा डबा विकत घेतला. अ ला माहित आहे की डब्याचं झाकण जर काळजीपूर्वक उघडले नाही तर स्फोट होऊ शकतो. परंतु तो क ला ही गोष्ट सांगत नाही. क नेहमीच्या पद्धतीने डबा उघडते आणि त्यातील पूड स्फोट होऊन तिच्या डोळयात जाते व डोळयाला दुखापत

होते. अ नी क ला नुकसान भरपाई दिली पाहिजे. कारण त्यांनी क ला आधी सावध करणे आवश्यक होते.

१४.४ जेव्हा प्रमुख अटीचा भंग दुय्यम अटीचा भंग समजला जातो

कलम १३ मध्ये अशा विषयी तरतूदी आहेत. त्या पुढील प्रमाणे:-

1) विक्रीचा करार ठराविक अटीच्या पूर्ततेवर अवलंबून आहे. खरेदीदार अशा अटीच्या पूर्ततेकडे दुर्लक्ष करायच ठरवितो.किंवा या अटीचा भंग हा दुय्यम अटीचा भंग समजतो व करार रद्द न करण्याचा निर्णय घेतो.

2) करारातील अट ही महत्त्वाची आहे. की दुय्यम अटीची आहे या बद्दल करारात काहीही म्हटलेल असल तरीही ही गोष्ट प्रत्येक करारातील इतर परिस्थितीवर ठरत. त्याला नांव काय दिलंय हे महत्त्वाच नाही. त्यामुळे करारात दुय्यम अट म्हटलेली एखादी अट प्रत्येक्षात महत्त्वाची अट असू शकते. हे प्रत्यक्ष परिस्थितीवर ठरते.

१४.५ प्रमुख व दुय्यम अट यातील फरक

विषय	प्रमुख अट	दुय्यम अट
अट	या अटीची पूर्तता कराराच्या मूळ गाभ्याशी निगडित असते.	ही अट प्रमुख उद्दिष्टाशी फक्त निगडित असते.
अधिकार	संबंधित पक्ष करार रद्द करु शकते.	करार रद्द करता येत नाही. फक्त नुकसान भरपाई मागता येते.
हाताळण्याची मुभा	प्रमुख अटीचा भंग हा दुय्यम अटीचा भंग अस मानता येत.	दुय्यम अटीचा भंग हा प्रमुख अटीचा भंग मानता येत नाही.
कराराशी संबंध	कराराच्या मुळाशी निगडित असते.	कराराच्या मुळाशी थेट संबंध नसतो.

१४.६ ग्राहक राजा काळजी घे (CAVEAT EMPTOR OR BUYER BEWARE) किंवा जागृत राहा

१) अर्थ :

कायद्याचे सूत्र म्हणजे खरेदीदारांनी स्वत:च स्वत:ची काळजी घेतली पाहिजे. खरेदी करताना खरेदीदारानी स्वत:च वस्तू तपासून पहिली पाहिजे. त्यात काही दोष नाहीत

याची खात्री करुन, घेतलाr पाहिजे. थोडक्यात वस्तूमधील दोष शोधून काढण्याची जबाबदारी खरेदीदाराची आहे. वस्तू खरेदी करताना त्यात काही दोष नाही याची खरेदीदारांनीच खात्री करुन घेतली पाहिजे. विक्रेता वस्तू किंवा सेवामधील दोष स्वत:हून जाहीर करणार नाही. खरेदीदारानी आपल्या ज्ञानाचा वापर करुन वस्तूची तपासणी करुन खरेदी केली पाहिजे. आपल्याला पुरेसे ज्ञान नसेल तर त्या विषयातील बाहेरच्या तज्ज्ञांची आवश्यकता वाटल्यास मदत घेतली पाहिजे. म्हणून खरेदीदारांनी खरेदी करताना पुरेशी काळजी घेतली पाहिजे. वस्तूची तपासणी करुन ती आपल्याला उपयुक्त ठरणार आहे याची स्वत:च खात्री करुन ध्यावी. उदा. रामने एका दलालामार्फत १० गायी विकत घेतल्या. त्यातील दोन गायी दोषपूर्ण होत्या. राम ला ही गोष्ट माहीत नव्हती. कारण त्यांनी सगळया गायी काही तपासून बघितल्या नव्हत्या. परंतु पैसे मात्र सगळयाचे दिले होते. त्या दोषपूर्ण गायी घेतल्या नंतर फक्त तीनच दिवसात मेल्या. विकताना गायी सशक्त असावीत किंवा निरोगी असावीत अशी काही गृहीत अट नाही. त्यामुळे राम दलालाला किंवा विक्रेत्याला त्या नुकसानासाठी जबाबदार धरु शकणारे नाही. कारण खरेदी करताना सर्व गायी निरोगी आहेत याची खात्री करुन घेण्याची जबाबदारी रामची आहे. विक्रेता किंवा दलालाकडून गायीतले दोष समजतील अशी त्यानी अपेक्षा करु नये.

आणखीन एका केस मध्ये एका गृहस्थाने गणवेषासाठी कापड खरेदी केली. कापड चांगल होत परंतु गणवेश शिवायला उपयोगी नव्हत. विक्रेत्याला कापड गणवेशासाठी पाहिजे आहे ही गोष्ट माहीत नव्हती. त्यामुळे विक्रेत्याला या साठी जबाबदार धरता येणार नाही असा निर्णय कोर्टाने दिला.

१४.६.२ अपवाद: परंतु ग्राहक राजा सावध रहा या संकपल्पनेला काही अपवाद आहेत. ते पुढील प्रमाणे सांगता येतील:-

- विक्रेता ग्राहकाची दिशाभूल करतो आणि ग्राहक विक्रेत्याच्या सांगण्यावर विश्वास ठेवतो. इथे ही संकल्पना लागू होणार नाही, अशा परिस्थितीत खरेदीदार करार रद्द करु शकतो.

- विक्रेता जाणून बुजून खोटी माहिती देतो जी कायद्याच्या दृष्टीने फसवणूक ठरते किंवा विक्रेता हेतु पुर:स्सर वस्तूतील दोष लपवून ठेवतो ज्यामुळे त्यातले दोष खरेदीदाराला सहजासहजी समजणार नाहीत ग्राहकानीच काळजी घ्यावी ही संकल्पना इथे लागू पडत नाही. खरेदीदार करार रद्द करु शकतो आणि त्याच काही नुकसान झालेल असेल तर त्यासाठी भरपाई मागू शकतो.

- मालाची खरेदी वर्णना वरुन झाली आणि विशिष्ट प्रकारचा माल विकण्याचा त्या विक्रेताचा व्यवसाय आहे. अशा वेळी जर घेतलेला माल विक्री योग्य नसेल तर खरेदीदार करार रद्द करु शकतो. परंतु अशावेळी जर खरेदीदारानी तपासून माल खरेदी केली असेल तर मात्र करार रद्द करता येत नाही. डकलम १६ (२)]

- जिथे मालाची विक्री नमूना दाखवून झालेली आहे तिथे जर माल दाखविलेल्या नमून्याप्रमाणे नसेल तरीही ही संकल्पना लागू होत नाही. तसेच माल नमून्याबर हुकूम आहे हे तपासून घेण्याची संधी ग्राहकाला दिली गेली नसेल किंवा मालात काही छुपे दोष असतील तरीही करार रद्द करता येत नाही. (कलम १७)

मालाची खरेदी वर्णनावरुन व नमूना दाखवून झालेली असेल व माल दाखविलेल्या नमून्या प्रमाणे नसेल किंवा वर्णना प्रमाणे नसेल तरीही हे तत्व लागू पडत नाही. करार रद्द करता येतो. अशा वेळी माल वर्णनाप्रमाणे आणि दाखविलेल्या नमुन्याप्रमाणेही असणे आवश्यक आहे. (कलम १५)

१४.७ प्रश्न

1) प्रमुख अटीचा भंग केव्हा दुय्यम अटीचा भंग समजला जातो?

2) प्रमुख अट व दुय्यम अट यातील फरक स्पष्ट करा.

3) संक्षिप्त टीपा लिहा.

   1) गृहीत दुय्यम अटी

   2) ग्राहक राजा जागे राहा ही संकल्पना व त्याला असलेले अपवाद.

4) व्याख्या द्या.

   1) प्रमुख अट

   2) दुय्यम अट

❖❖❖❖

१५

विक्री करारात मालकी हक्काचे हस्तांतर
(TRANSFER OF PROPERTY)
(कलम १८ ते २६)

घटक रचना :

१५.० उद्दिष्टे

१५.१ विषय परिचय

१५.२ मालकी हक्काचे हस्तांतरण

१५.३ प्रश्न

१५.० उद्दिष्टे

या पाठाच्या अभ्यासानंतर तुम्हाला पुढील गोष्टी स्पष्ट होतील

- मालकी हक्काच्या हस्तांतराचा अर्थ
- मालकी हक्काच्या विभागणीची माहिती.

१५.१ विषय परिचय

मालकी हक्काच्या हंस्तातरातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे ते फक्त विशिष्ट वस्तूच्या बाबतीतच शक्य आहे. कलम १८ प्रमाणे विक्रेत्याकडून मालकी हक्क खरेदीदाराकडे तेव्हाच होऊ शकते. जेव्हा वस्तूची निश्चिती (Ascertain) होते.

१५.२ मालकी हक्काचे हस्तांतर

याची दोन विभागात विभागणी करता येते.

अ) निश्चित केलेल्या ठरलेल्या वस्तूची मालकी :

कलम १९ प्रमाणे निश्चित केलेल्या ठरलेल्या वस्तूंच्या विक्रीचा जेव्हा करार होतो तेव्हा मालकी हक्काचे हस्तांतर नेमकी केव्हा होईल हे ठरविण्याचे अधिकार संबंधित पक्षांना आहे.

या पक्षांच्या मनात मालकी हक्काच हस्तांतर केव्हा करायच आहे हे समजण्यासाठी करातातील अटींचा विचार करणे आवश्यक आहे. तसेच पक्षांची कृती व इतर परिस्थितीचा हा विचार करावा लागतो.

परंतु या बाबतीत संबंधित पक्षांनी स्पष्टपणे निर्णय घेतलेला नसेल तर त्याच्या मनातील इच्छा कशी समजून घ्यावी याबाबत कायद्याने काही नियम दिलेल आहेत. हे नियम कलम २० ते २४ मध्ये आहेत. ते पुढील प्रमाणे:-

१) जेव्हा वस्तू ताबा देणाच्या स्थितीत (Deliverable State) आहे :

कलम २० प्रमाणे ताबा देण्याच्या स्थितीतील ठरलेल्या विशिष्ट वस्तूचा विक्रीचा करार झाल्यास मालकी हक्क लगेच विक्रेत्याकडून खरेदीदाराकडे जातो. मालाचा ताबा किंवा किंमत अदा करण्याची प्रक्रिया मागून झाली तरी चालते त्याला महत्त्व नाही. उदा. अ ब कडून काही कापसाच्या गाठी खरेदी करतो. कापसाच्या गाठीबांधून गोडाऊन मध्ये ठेवलेल्या आहेत. मालाची किंमत ४ फेब्रुवारीला देण्याचे व मालाचा ताबा मे महिन्यात देण्याचे ठरते. हा करार २० जानेवारीला केला जातो. तर मालाची मालकी ब कडून अ कडे २० जानेवारीलाच वर्ग होते.

माल लगेच ताब्यात देण्याच्या स्थितीत असल्यामुळे मालकी हक्कातील बदल लगेच होतो. परतु संबंधित पक्ष अस ठरवू शकतात की मालाचा ताबा दिल्या शिवाय किंवा किंमत अदा केल्याशिवाय मालकी हक्कात बदल होणार नाही. अशावेळी ठरल्या प्रमाणेच मालकीच्या हक्कातील बद्दल होईल.

२) जेव्हा माल ताबा देण्याच्या स्थितीत नसतो:-

विक्रीसाठी मालाची निश्चिती झालेली आहे. परंतु त्याचा ताबा लगेच देता येणार नाही. कारण त्या आधी मालाचे वजन करणे, पॅकिंग करणे वगैरे झालेले नाही तर कलम २१ प्रमाणे माल ताब्यात देण्यालायक बनल्यावरच मालकी हक्काची अदला बदल होते. या साठी माल ताबा देण्यालायक झालेला आहे याची माहिती विक्रेत्यानी खरेदीदाराला देणे ही आवश्यक आहे. उदा. जगंलातील एखाद्या विशिष्ट झाडाची विक्री झाली. खरेदीदारांनी झाडाचा काही भाग घेतला आणि काही घेतला नाही, व्यवसायातील प्रथेप्रमाणे घेतलेला भाग व न घेतलेला भाग यांची विभागणी विक्रेत्याने करावयाची होती परंतु खरेदीदारानी ते काम स्वत:कडे घेतल. कोर्टाने निवाडा दिला की मालकी हक्कातील बदल झालेला नाही.

३) जेव्हा मालाची मोजणी वगैरे व्हावयाची आहे.

कलम २२ प्रमाणे विक्रीच्या मालाची निश्चिती झालेली आहे परंतु त्याची मोजणी किंवा वजन करणे वगैरे बाकी आहे, तर ती प्रक्रिया पूर्ण होऊन विक्रेत्यांनी खरेदीदाराला त्याची सूचना दिल्या शिवाय मालकी हक्कात बदल संभवत नाही

ब) मालाची निश्चिती झालेली नाही.

कलम १८ प्रमाणे मालाची निश्चिती. झाल्याशिवाय मालकी हक्काचे हस्तांतर होत नाही. विक्रीच्या नेमक्या वस्तू ठरविण्यासाठी काही खास गोष्टी करणे आवश्यक असते. कलम २३ प्रमाणे भविष्यात तयार होणाऱ्या मालाच्या (Future Goods) विक्रीच्या करारात

विक्री वर्णनाने व्हावयाची असेल तर त्या नेमक्या वर्णनाच्या वस्तू मिळवून विक्रीसाठी राखून ठेऊन त्याची माहिती खरेदीदाराला दिल्या शिवाय मालकी हक्कातील बदल संभवत नाही. ही माल स्वतंत्रपणे राखून ठेवण्याची प्रक्रिया विक्रेता खरेदीदाराच्या संमतीने करतो किंवा खरेदीदार विक्रेत्याच्या संमतीने करतो.

इथे ठराविक माल विक्रीसाठी वेगळा काढून ठेवण्याची प्रक्रिया महत्त्वाची आहे. अशा प्रकारे माल वेगळा करुन ठेवताना पुढील गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे:-

१) माल हा करारातील वर्णनाबर हुकुम असावा

उदा. चीनी मातीच्या कपबशांच्या विक्रीच्या कराराच्यावेळी मालाची बांधणी करताना त्यात आणखीन काही वेगळया वस्तू जर मिसळल्या तर चालणार नाही.

२) अशा प्रकारे वेगळया केलेल्या वस्तू ताबा देण्याच्या स्थितीत असाव्यात म्हणजेच वजन करुन, मोजून, व्यवस्थित पॅक करुन असाव्यात. कारण त्या जर नीट नसतील तर मालकीत बदल घडू शकत नाही.

३) माल विना अट विशिष्ट विक्री करारासाठी वेगळा केलेला असावा.

कलम २३(२) प्रमाणे माल ग्राहकाला पोहचविण्यासाठी वाहतूकदार किंवा इतर कोणाकडे ठरल्या प्रमाणे दिल्या पाहिजेत. असे केल्या बरोबर मालकी हक्कात बद्दल संभवतो म्हणजेच विक्रेत्यांच्या जागी खरेदीदार त्यांचा मालक बनतो. विक्रेत्याला जर अस करावयाच नसेल तर तो वाहतूकदाराला आधीच बजावून ठेवतो की माल ग्राहकाला प्रत्यक्ष पोहचविण्यापर्यंत मालाची मालकी आपलीच राहील.

४) अशावेळी माल वेगळा करताना विक्रेता किंवा खरेदीदार यांची संमती घेतली जाते. ही संमती माल वेगळा करण्यापूर्वी किंवा नंतर घेतली जाते.

क) विक्रेत्याच्या संमतीने

जर कराराच्या वेळी माल ग्राहकाच्याच ताब्यात असेल तर तो विक्रेत्याच्या संमतीने माल विक्रीसाठी वेगळा करुन ठेऊ शकतो आणि नंतर विक्रेत्याला त्याची माहिती देतो. त्यानंतर मालकी हक्कांचे हस्तांतर होते.

ड) खरेदीदाराच्या संमतीने विक्रेता माल वेगळा करतो.

उदा. अ ब कडून १००० लिटर पेट्रोल खरेदी करतो व त्या साठी १०० लिटरचे १० डबे आधीच पाठवितो ब नी त्या डब्यात पेट्रोल भरल्या बरोबर मालकीचे हस्तांतर होते. कारण त्या साठी खास डबे अ नी पाठविलेले असतात. माल वेगळ करण्यासाठीची संमती खरेदीदारांनी ठराविक डबे पाठवून आधीच दिलेली असते.

५) माल वेगळा करण्याच्या विविध पद्धती :

ठराविक करारासाठी माल वेगळा करुन ठेवण्यासाठी पुढील पद्धतीचा वापर केला जातो.

अ) मालाची योग्य आकारात बांधणी करुन.

ब) मालच्या मोठया साठयातून ठरलेल्या वजनाचा वा संख्येचा माल वेगळा करुन.

क) ठरल्याप्रमाणे माल वाहतूक कंपनीकडे सोपवून. इथे परत दोन पद्धती आहेत. माल आपल्याच नावाने पाठवता येतो (Self म्हणून) किंवा ग्राहकाच्या नावाने.

१) ठरलेली वस्तू करारासाठी राखून ठेवलेली आहे. व खरेदीदाराला देण्यासाठी वाहतूक कंपनीकडे किंवा इतर कोणाकडे सोपविलेली आहे परंतु खरेदीदारानी मालाचा ताबा घेण्यापूवीर् एखादी अट पूर्ण करणे आवश्यक आहे तर माल वाहतूक कंपनीकडे ग्राहकाला देण्यासाठी सोपविलेला असला तरीही जर ग्राहकांनी करारातील अट पूर्ण केल्याशिवाय त्याला मालाची मालकी प्राप्त होत नाही.

२) माल वाहतूक कपनीकडे सोपविताना जर विक्रेत्यानी मालाची पावती खरेदीदाराच्या नावाने न करता स्वत:च्या नावाने घेतलेली आहे. इथे असे गृहीत धरले जाते की आवश्यकता निर्माण झाल्यास मालाच्या पुनर्विक्रीचे हक्क विक्रेत्यानी स्वत: कडे राखून ठेवले आहेत.

पसंतीवर माल पाठवला असेल Sale or Return) मालकी हक्कातील हस्तांतर :

कलम २४ प्रमाणे माल जर पसंतीवर पाठविला असेल तर मालकी हक्कातील बदलासाठी पुढील नियम लागू होतात:-

अ) जेव्हा ग्राहक माल पसंत आहे असे विक्रेत्याला कळवितो किंवा प्रकट करणारी एखादी कृती करतो. उदा. अ ब ला पसंतीवर एक सोन्याचा दागिना विकतो. ब त्याच अटीवर तो दागिना क ला विकतो आणि क तो ड ला देतो. ड च्या ताब्यात असताना दागिना चोरीला जातो. आता ब अ ला दिगिना परत करु शकत नसल्यामुळे असे गृहीत धरले जाते की ब नी तो पसंत केलेला आहे. तसेच अशा विक्रीच्या वेळी जर खरेदीदारानी माल दुसऱ्याकडे गहाण टाकला तर त्यानी माल स्वीकारलेला आहे असे समजले जाते.

पुनर्विक्रीचा अधिकर राखून ठेवणे:-

कलम २५ प्रमाणे विक्रेत्याची वागणूक अशी असते की तो मालाच्या पुनविक्रीचे हक्क आपल्याकडे राखून ठेवतो. करारातील एखादी अट जर ग्राहकानी वेळेत पूर्ण केली नाही तर विक्रेता वस्तूची दुसऱ्याला विक्री करु शकतो. अशावेळी ग्राहकांनी वेळेत पूर्ण केली नाही तर विक्रेता वस्तूची दुसऱ्याला विक्री करू शकतो. अशावेळी ग्राहकानी अट पुर्ण केल्यावरच मालकी ग्राहकाला प्राप्त होते. उदा. अ ब ला १०० पोती तांदूळ विकतो व तो तांदूळ त्याला देण्यासाठी वाहतूक कंपनीकडे सोपविला अशावेळी मालकी हक्कात लगेच

बदल होतो आणी अ च्या एवजी ब तांदळाच्या पोतीचा मालक बनतो. परंतु समजा करारात अशी अट आहे की माल ताब्यात घेण्यापूर्वी ब नी मालाचे पैसे अ ला दिले पाहिजेत तर ब नी पैसे वेळेत दिले तरच ब मालक बनतो आणि नाही दिले तर अ वाहतूक कंपनीला मालाचा ताबा ब ला न देण्यास सांगून त्याची विक्री त्याच गावातील क ला करु शकतो.

मालकीत बदल :

मालविक्रीच्या कराराची पूर्तता एकूण तीन टप्प्यात पूर्ण होते (१) माल हक्कातील बद्दल (२) मालाच्या ताब्यातील बदल (मालाची डेलिव्हरी) आणि (३) मालाच्या नुकसानीच्या जोखमीतील बद्दल. माल विक्रीच्या कराराच प्रमुख उद्दिष्ट मालाची मालकी विक्रेत्या कडून खरेदीदाराकडे वर्ग होणे. मालकी हक्क व मालाचा ताबा या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. मालकी हक्क म्हणजे मालाची मालकी म्हणजेच त्याचा वापर कसा करावा हे ठरविण्याचा अधिकार आणि ताबा म्हणजे प्रत्यक्ष मालाच अस्तित्व.

१५.३ प्रश्न

1) मालकी हक्कातील बदलाचे परिणाम कोणते?

2) विविध प्रसंगी मालकी हक्काचे हस्तांतर कसे होते?

3) संक्षिप्त टीप तयार करा :- पसंतीवर विकलेल्या मालाच्या मालकी हक्कातील बदल कसा होतो?

❖❖❖❖

१६

अदत्त विक्रेता
(UNPAID SELLER)

घटक रचना :

१६.० उद्दिष्टे

१६.१ अर्थ व व्याख्या

१६.२ अदत्त विक्रेत्याचे अधिकार

१६.३ प्रश्न

१६.० उद्दिष्टे

या पाठाच्या अभ्यासानंतर तुम्हाला पुढील गोष्टी स्पष्ट होतील:-

- अदत्त विक्रेता या शब्दाचा अर्थ समजेल.
- तसेच त्याच्या अधिकाराची माहिती मिळेल.

१६.१ व्याख्या व अर्थ

१६.१.१ व्याख्या :

विक्रेता पुढील परिस्थितीत अदत्त विक्रेता (Unpaid Seller) ठरतो.

अ) जेव्हा खरेदीदारांनी घेतलेल्या मालाची पूर्ण किंमत अदा केलेली नाही.

ब) मालाची किंमत हुंडीच्या किंवा चेक च्या स्वरुपात प्राप्त झालेली आहे परंतु हुंडी किंवा चेकचा अनादर झालेला आहे. किंवा इतर कोणत्याही कारणाने त्याला त्याचे पैसे प्राप्त झालेले नाहीत.

१६.१.२अर्थ

कलम ४५ प्रमाणे विक्रेता म्हणजे विक्रेत्याच्या भूमिकेतील कोणीही व्यक्ती उदा त्याचा प्रतिनिधी ज्याच्या नांवे बोटीची हुंडी किंवा पावती बोट कंपनीने दिलेली आहे किंवा बोटीची हुंडी त्याच्या नांवे पृष्ठांकन करुन दिली गेलेली आहे ज्या मुळे माल त्याला मिळू शकतो. थोडक्यात अशी व्यक्ती ज्याला मालाची किंमत देय आहे.

विक्रेता पुढील परिस्थितीत अदत्त विक्रेता ठरतो.

- जेव्हा त्याला मालाची पूर्ण किंमत प्राप्त झालेली नाही किंवा
- मालाची किंमत चेक किंवा हुंडीच्या स्वरुपात प्राप्त झालेली आहे परंतु त्या दस्तऐवजाचा अनादर झालेला आहे.

१६.१.३ अदत्त विक्रेत्याची वैशिष्टये

अदत्त विक्रेत्याची वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील.

1) त्यांनी मालाची रोखीने विक्री केलेली आहे. परंतु त्याचे त्याला पैसे मिळालेले नाहीत.

2) त्याला पूर्ण किंमत मिळालेली नाही.

3) जिथे मालाची किंमत हुंडी किंवा चेकसारख्या चलनक्षम दस्तऐवजाच्या स्वरुपात प्राप्त झालेली आहे. परंतु दस्त ऐवजाचा अनादर झालेला आहे.

4) किंमत ज्यावेळी अदा केली जाते त्यावेळी विक्रेत्यानी ती स्वीकारण्यास नकार देऊ नये. जर खरेदीदारानी मालाची किंमत देण्याचा प्रयत्न केला परंतु विक्रेत्यांनी सबळ कारणाशिवाय ती स्वीकारण्यास नकार दिला तर तो अदत्त विक्रेता ठरत नाही.

१६.२ अदत्त विक्रेत्याचे अधिकार

अदत्त विक्रेत्याला दोन प्रकारचे अधिकार आहेत.

१) मालावरील हक्क

२) माल खरेदी करणाऱ्या व्यक्ती विरुद्धचे हक्क

या अधिकारांची आता आपण चर्चा करु या:-

अ) अदत्त विक्रेत्याची मालासंबंधीचे अधिकार

मालकी हक्कातील बद्दल झालेला असला तरीही अदत्त विक्रेत्याला माला संबंधी पुढील अधिकार कायद्याने बहाल केलेले आहेत.

१) ताबा (Lien) अधिकार

२) प्रवासातील माल अडविण्याचा अधिकार

३) पुनर्विक्रीचा अधिकार (कलम ४६(१))

१) ताबा अधिकार (कलम ४७)

ताबा (Lien) अधिकार म्हणजे ग्राहकाला माल देण्यास नकार देण्याचा अधिकार. जो पर्यंत विक्रेत्याला त्याच्या मालाचे पूर्ण पैसे मिळत नाहीत तो पर्यंत तो ग्राहकाला माल

देण्यास देण्यास नकार देऊ शकतो. म्हणजेच माल अडवून ठेऊ शकतो. पुढील परिस्थितीत या अधिकाराचा वापर करता येतो.

- मालाची विक्री उधारीवर झालेली नाही.
- मालाची विक्री उधारीवर झालेली आहे परंतु दिलेल्या उधारीची मुदत संपलेली आहे.
- उधारीची मुदत संपण्याआधीसुद्धा जर ग्राहक नादार झालेला आहे.

थोडक्यात विक्रेता पुढील दोन परिस्थितीत या अधिकाराचा वापर करु शकतो.

- माल अजून त्याच्या ताब्यात आहे.
- तो कायद्यातील व्याख्येप्रमाणे अदत्त विक्रेता आहे.

२) प्रवासातील माल अडविण्याचा (Stoppage in transit) अधिकार (कलम ५० ते ५२) :

माल अजून प्रवासात असताना वाहतूकदाराला सूचना देऊन इथे मालाचा ताबा परत मिळविला जातो व आपली रक्कम पूर्ण वसूल होईपर्यंत मालाची डेलिव्हरी देण्यास नकार देण्यात येतो.

इथे महत्त्वाची गोष्ट म्हणजे माल मध्यस्थाच्या ताब्यात असतो. विक्रेत्यानी ग्राहकाकडे माल पोहचविण्यासाठी तिचा ताबा वाहतूक कंपनी सारख्या मध्यस्थाकडे सोपविलेला असतो. आणि मध्यस्थानी अजून माल ग्राहकाला प्रत्यक्षात दिलेला नसतो.

प्रवासात माल केव्हा अ]ड़विता येते? फक्त पुढील परिस्थितीतच अदत्त विक्रेता या अधिकाराचा वापर करु शकतो:-

अ) विक्रेत्यानी मालाचा ताबा दुसऱ्याकडे सोपविलेला आहे.

ब) माल अजून प्रवासात आहे.

क) खरेदीदार नादार झालेला आहे.

३) पुनर्विक्रीचा अधिकार :

अदत्त विक्रेत्याला कायद्याने दिलेला हा एक महत्त्वाचा अधिकार आहे. आधीच्या दोन अधिकारात त्याला फक्त माल आपल्याकडेच ठेवता येतो. परंतु माल स्वत: जवळ ठेऊन घेतल्यानंतरही जर खरेदीदार मालाचे पैसे देत नसेल तर अदत्त विक्रेता त्या मालाची पुनर्विक्री करु शकतो. दीर्घ मुदतीसाठी माल फक्त ठेऊन घेऊन उपयोग नाही. काहीवेळा तर माल नाशवंतही असू शकतो. म्हणून कलम ५४ ने विक्रेत्याला पुनविक्रीचा हा महत्त्वाचा अधिकार बहाल केलेला आहे. पुढील परिस्थितीत या अधिकाराचा विक्रेता वापरकरु शकतो.

- माल नाशवंत आहे
- विक्रीच्या करारात अशी तरतूद आहे की खरेदीदाराने पैसे वेळेत दिले नाहीत तर विक्रेता तो माल दुसऱ्याला विकू शकतो.

१६.३ प्रश्न

१) अदत्त विक्रेता म्हणजे कोण?

२) अदत्त विक्रेत्याचे अधिकार व कर्तव्ये कोणती?

३) संक्षिप्त टीप तयार करा.

१) प्रवासातील माल अडविण्याचा अधिकार

❖❖❖❖

१७

चलनक्षम दस्तऐवजासंबंधीचा कायदा (१८८१)

घटक रचना :

१७.० उद्दिष्टे

१७.१ चलनक्षम दस्तऐवज

१७.२ वचन चिठ्ठी (कलम ४)

१७.३ हुंडी- (कलम ५)

१७.४ चेक - धनादेश (कलम ६)

१७.५ चेकचे रेखाकंन

१७.६ चेकचा अनादर (कलम १३७ - १३८)

१७.७ चलनक्षम दस्तऐवजाचा धारक

१७.८ यथाविधी धारक (Holder in due course)

१७.९ चलन क्षमता (कलम १४)

१७.१० पृष्ठांकन (कलम १५ -१६)

१७.११ अनादराची नोंदणी व नोंदणीचा दाखला ड(कलम ९९-१०४ (३)]

१७.१२ प्रश्न

१७.० उद्दिष्टे

या पाठाच्या अभ्यासानंतर तुम्हाला पुढील गोष्टी स्पष्ट होतील.

- चलनक्षम दस्तऐवजांचा अर्थ, व्याख्या व प्रकार.
- वचन चिठ्ठीचा अर्थ व आवश्यक गोष्टी.
- हुंडीचा अर्थ व त्याला आवश्यक गोष्टी.
- चेकसंबंधीचे विविध पक्ष.
- चेकच्या रेखांकनाचे विविध प्रकार.
- चेकच्या अनादराचा अर्थ.

- चलनक्षम दस्तऐवजाचा धारक व यथाविधी धारक. चलनक्षम दस्तऐवजाच्या हस्तांतराचा अर्थ व प्रकार.
- पृष्ठाकनाचा अर्थ व प्रकार.
- अनादराची नोंद व नोंदणीचा दाखला.
- हुंडीचे विविध प्रकार.

१७.१ चलनक्षम दस्तऐवज

१७.१.१ अर्थ :

चलनक्षम दस्तऐवज म्हणजे सहजपणे दुसऱ्याला देता येईल असा दस्तऐवज होय. कायद्यात त्याची नेमकी अशी व्याख्या नाही. चलनक्षम दस्तएवज म्हणजे वचन चिठ्ठी, हुंडी किंवा चेक (धनादेश) ज्याचे पैसे त्यात नमूद केलेल्या व्यक्तीला, तो सांगेल त्याला किंवा वाहकाला (कोणालाही) द्यावयाचे असतात [(कलम १३ (१)].

या कायद्याचे उद्दिष्ट म्हण़जे अशा प्रकारे पैशाच्या व्यवहार करणाऱ्या दस्तऐवजाच्या व्यवहाराना कायदेशीर अस्तित्व प्राप्त करुन देणे व त्यांचे नियमन करणे. विविध व्यक्तीमध्ये होणाऱ्या या कागद पत्रांच्या व्यवहाराला कायदेशीर शिस्त लावणे.

ब्रिटीशांच्या राजवटीत जेव्हा व्यवसायात सतत वाढ होत गेली तेव्हा सर्व व्यवहार रोख रकमेच्या स्वरुपात करणे अवघड झाले. व्यवहारात नाणे व नोटांची टंचाई भासायला लागली. त्यातून या अशा पत विषयक कागदपत्रांच्या वापराला सुरुवात झाली.

मुख्यत: या चलनक्षम दस्तऐवजांचा वापर दैनंदिन व्यापार व उद्योगात मोठया प्रमाणावर केला जातो.

१७.१.२ खास वैशिष्टये :

चलनक्षम दस्तऐवजांची खास वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील:-

१) लेखी व सहीचे :

सर्व चलनक्षम दस्तऐवजांची खास वैशिष्टये पुढील प्रमाणे सांगता येतील:-

१) लेखी व सहीचे

सर्व चलनक्षम दस्तऐवज म्हणजे वचन चिठ्ठी, हुंडी व चेक या लेखी स्वरुपातच असावेत व जो त्यांना तयार करतो त्याची त्यावर सही असणे अत्यावश्यक आहे. बँकाचे चेक ज्याचा डिमांड ड्राफ्ट म्हणतात त्यांच्याही समावेश चलनक्षम दस्तऐवजात होतो. कारण त्यांचा ही उपयोग याच कारणासाठी केला जातो.

२) पैसे

हे सर्व दस्तऐवज पैशातच असतात. यात भारतीय चलनाचा वापर केला जातो.

३) चलन क्षमता

यांना चलनक्षमता असते. म्हणजेच हे कागदपत्रे एक व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे सहज वर्ग केले जातात. वाहक दस्तऐवज असतील तर ती सहज एकापासून दुसऱ्याकडे वर्ग केले जातात. परंतु सांगेल त्याला असे त्यात शब्द असतील तर मात्र दुसऱ्याला देताना देणाऱ्यानी त्या माणसाचे नांव लिहून नंतर आपली सही करणे आवश्यक असते. तरच हस्तांतर वैध ठरते. ठराविक शब्दाचा वापर करुन दस्तएवजाची चलनक्षमता थांबविता येते. उदा. फक्त अ व्यक्तीलाच पैसे देणे

४) मालकी

ज्याला ठरलेली कायदेशीर प्रक्रिया करुन दस्तऐवज वर्ग केला जातो त्याला यथाविधी धारक (Holder in due course) म्हण़तात. दस्तऐवज वर्गकरणाऱ्याच्या मालकीत काही दोष जरी असले तरीही यथाविधी धारक त्या दस्तऐवजाचा मालक ठरतो.

५) सूचना

दस्तएवजाच्या हस्तांतराची माहिती जो दस्तऐवजाचे पैसे देणे लागतो त्याला देण्याची आवश्यकता नाही धारक स्वत:च्या नावाने त्याच्यावर खटला भरु शकतो.

६) गृहीते

अशा कागदपत्रांच्या संदर्भात काही गोष्टी गृहीत धरल्या जातात उदा. करारात प्रति फलाचा समावेश आहे. त्यामुळे वचन चिठ्ठीत 'या आधी मिळालेल्या पैशाच्या बदल्यात (For value received) वगैरे असे शब्द लिहीण्याची आवश्यकता नाही. कारण पैशांची देवाण घेवाण गृहीतच धरली जाते. व्यवहारात असे शब्द वापरण्याची पद्धत आहे ती फक्त उद्दिष्ट स्पष्ट व्हावा म्हणून.

७) लोकप्रियता

दस्तऐवजांचे हस्तांतर सुलभ असल्यामुळे व्यापारात यांचा वापर मोठया प्रमाणात केला जातो.

८) पुरावा

यात काही दोष असतील तरीही त्यांचा देणी सिद्ध करण्यासाठी पुरावा म्हणून वापर करता येतो.

१७.१.३ अशा दस्तऐवजासंबंधीची गृहीते. (कलम ११८-११९) :

दस्तऐवजांच्या बाबतीत अनेक गोष्टी गृहीत धरल्या जातात. त्या नसतील तर तसे सिद्ध करावे लागते. इतर प्रकारचे पुरावे देऊन तसे सिद्ध करणे शक्य असते. कलम ११८ व ११९ मध्ये त्या दिल्या गेल्या आहेत.

१) प्रतिफल :

प्रत्येक दस्तऐवज तयार करताना स्वीकारताना पृष्ठांकन किंवा वर्ग करताना त्यासाठी प्रतिफल दिले गेले आहे असे गृहीत धरले जाते. त्यामुळे धारकांनी प्रतिफल दिलेला आहे हे सिद्ध करण्याची आवश्यकता नाही; परंतु काही गुन्हा करुन तो मिळाविलेला असेल तर मात्र असे गृहीत धरले जात नाही.

२) तारीख :

पत्रका वर जी तारीख असेल त्याच दिवशी तो तयार केला गेला आहे असे गृहीत धरले जाते.

३) स्वीकृतीची वेळ :

असे गृहीत धरले जाते की प्रत्येक कागदपत्राची स्वीकृती योग्य वेळेत म्हणजेच त्याचे पैसे मिळण्याच्या (Maturity) तारखे आधी झालेली आहे.

४) हस्तांतराची वेळ :

हस्तांतर हे पैसे देय होण्यापूर्वीच झालेल आहे.

५) पृष्ठकांनाचा क्रम :

कागदपत्रावर ज्या क्रमाने नावे दिसतात त्याच क्रमाने पृष्टांकन केले जाते.

६) तिकीट लावणे (मुद्रांकन) :

हरविलेल्या कागदपत्रावर योग्य रकमेचे तिकीट लावून रद्द करण्यात आलेले होते.

७) प्रत्येक धारक हा यथाविधीधारक :

प्रत्येक धारक हा यथाविधी धारक मानला जातो.

८) दस्तऐवजाचा अनादर :

कोर्टात जर केस दाखल केली गेली तर नोंदणीच्या दाखल्याप्रमाणे अनादर झालेला आहे अस कोर्ट गृहीत धरत.

एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की वचनदाता जर असे म्हणत असेल की कोर्या कागदावर त्याची सही घेतली गेलेली होती तर ते तस नव्हत हे सिद्ध करण्याची

जबाबदारी वचन चिठ्ठीच्या मालकावर आहे. (श्री क्षेत्र मोहनरे उदय नारायण पंडा आणि इतर).

प्रतिफल आहे हे गृहीत अंतिम सत्य नाही. जर वचन चिठ्ठी योग्य पद्धतीने तयार केलेली होती हे जर सिद्ध झाले तर त्यात प्रतिफलाचा अभाव होता ही गोष्ट सिद्ध करण्याची जबाबदारी विरुद्ध पक्षावर आहे. (मरिमुटम राऊंडर वि. राधा कृष्पान व इतर.

१७.१.४ चलनक्षम दस्तऐवजाचे विविध प्रकार :

अशा कागदपत्रांची सर्व साधारणपणे सहा प्रकारात विभागणी केली जाते.

१) देशांतर्गत (Inland) दस्तऐवज (कलम १२)

देशांतर्गत कागद पत्राची कलम ११ मध्ये पुढील प्रमाणे व्याख्या देण्यात आलेली आहे.

'वचन चिठ्ठी, हुंडी किंवा चेक जर भारतात तयार गेलेली असेल व भारतातील व्यक्तीलाच त्याचे पैसे देय असतील तर त्याला देशांतर्गत दस्तऐवज म्हणतात"

कायद्याच्या कलमात पुढील कागदपत्रांना देशांतर्गत संभोधण्यात आले आहे.

- कागदपत्राची निर्मिती भारतात झालेली आहे व त्याचे पैसे भारतातच द्यावयाचे आहेत
- कागद पत्र भारतात तयार केलेला असून त्याचे पैसे भारतीय व्यक्तीलाच भारतात किंवा भारताबाहेर देय आहेत.

इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की कागद पत्राच हस्तांतर परदेशात एक किंवा अनेक वेळा झाले तरीही तो दस्तएवज देशांतर्गत दस्तऐवजच ठरतो. त्यामुळे भारतीय हुंडीच हस्तांतर जपान मध्ये जरी झाले तरीही हुंडीही भारतीय हुंडीच समजली जाते.

२) परदेशी दस्तऐवज (कलम १२) :

कलम १२ तील व्याख्ये प्रमाणे जो दस्तऐवज भारतीय किंवा देशांतर्गत नाही तो परदेशी दस्तऐवज समजला जातो.

३) वाहक (Bearer) दस्तऐवज (कलम १३) :

ज्या दस्तऐवजाचे पैसे जो धारक आहे अशा कोणालाही मिळू शकतात. त्याला धारक (Bearer) दस्तऐवज म्हणतात.

- दस्तऐवजाचे पैसे धारकाला द्यावयाचे असावेत किंवा
- दस्तऐवजावरील शेवटच पृष्टांकन हे कोर पृष्टांकन (ज्यावर कोणाचही नांव न लिहिता फक्त सही केलेली) आहे.

४) सांगितलेल्या व्यक्तीला पैसे मिळण्याचा दस्तऐवज- (कलम १३)

इथे दस्तऐवजाचे पैसे त्यावर नांव लिहिलेल्यालाच मिळतात, दस्तऐवज तयार करणारा त्याचे पैसे कोणाला मिळावेत हे ठरवितो आणि त्यावर त्याच नांव हे लिहितो कलम १३(१) मध्ये याची व्याख्या आहे.

वचन चिठ्ठी, हुंडी किंवा चेक ठराविक व्यक्तीच नाव घालून तयार केलल असेल व त्याच्या हस्तांतरावर बंदी घातलेली नसेल तर त्याला ठरलेल्या व्यक्तीलाच पैसे मिळण्याचा दस्तऐवज म्हणतात.

थोडक्यात सांगायच झाल तर

अ) दस्तएवजाचे पैसे त्यात नांव असेल त्यालाच मिळावयाचे असतात व

ब) त्यातील पैसे त्यात असलेल्या मिळावयाचे असून त्या कागदपत्राच्या हस्तांतरावर कोणतीही बंधने घातली गेलेली नसतात.

५) मागणी केल्याबरोबर पैसे मिळणारे दस्तऐवज (कलम १९-२१)

वचन चिठ्ठीत किंवा हुंडीत असे शब्द असतात की कागद पत्र दाखविल्या बरोबर सादर केल्यावर पैसे दिले जातील. पुढील प्रसंगी पैसे लगेच द्यावयाचे असतात.

अ) वचन चिठ्ठी किंवा हुंडीत मुदतीला उल्लेख नसतो. किंवा पैसे देण्याची तारीख नसते.

ब) कागद पत्र दाखविल्या बरोबर पैसे द्यावेत असे स्पष्ट उल्लेख असतो.

क) चेकच्या बाबतीत हा प्रश्न निर्माण होत नाही. कारण चेकचे पैसे नेहमीच लगेच द्यावयाचे असतात.

६) मुदतीचा दस्तऐवज

याचे पैसे भविष्य काळात द्यावयाचे असतात.

उदारणे:-

अ) दाखविलेल्यापासून ६० दिवसानी पैसे देण्याचे कबूल करणारी वचन चिठ्ठी किंवा हुंडी

ब) ठराविक तारखेला पैसे देण्याचा उल्लेख असलेली वचन चिठ्ठी किंवा हुंडी उदा २८ ऑगस्ट २०१५.

क) निश्चित घ]टना घडल्यावर पैसे देणे

उदा. विशिष्ट व्यक्तीच्या मरणांनतर पैसे देण्याचे वचन.

१७.२ वचन चिठ्ठी (कलम- ४)

१७.२.१ अर्थ

कायद्याने वचनचिठ्ठीची व्याख्या पुढील प्रमाणे केलेली आहे:-

वचन चिठ्ठी ही

- लेखी असते
- विनाअट हमी असते.
- त्यावर तयार करण्याची सही असते
- व ठरलेली म्हणजेच त्यात नमूद केलेली रक्कम पैशात देण्याचा उल्लेख असतो.
- पैसे त्या नमूद केलेल्या व्यक्तीला किंवा तो सांगेल त्याला किंवा वाहकाला घेणे.
- कागद पत्र तयार करणाऱ्याला वचनदाता म्हणतात.
- ज्याला पैसे मिळावयाचे आहेत त्याला पैसे मिळणारा (Payee) म्हणतात.

दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास वचनचिठ्ठी म्हणजे ऋणकोनी धनकोला ठराविक रक्कम त्याला किंवा तो सांगेल त्याला किंवा वाहकाला देण्याबद्दल स्वत:च्या सहीने दिलेले विना अट लेखी आश्वासन होय.

या मध्ये चलनी नोंटाचा समावेश होत नाही.

वचन चिठ्ठी ही लेखी आश्वासन असते. दिलेल आश्वासन विनाअट असते. त्यावर ऋणकोंची सही असते. ही पैसे देण्याबद्दलच असते. पैसे त्यात नमूद केलेल्याला किंवा तो सांगेल त्याचा किंवा वाहकाला किंवा धारकाला द्यावयाचे असतात.

उदा:-

1) अ पुढील तपशीलाच्या कागदावर सही करतो.
2) मी ब ला किंवा तो सांगेल त्याला रु. १,८००/- देण्याच वचन देतो.
3) मी ब ला आधीच्या व्यवहारातून रु. १,८००/- देणे लागतो.
4) क बरोबर माझ लग्न झाल्यावर ७ दिवसाच्या आत हे रु. १८०० देईन. असे वचन देतो.
5) मी क च्या मरणानंतर ब ला रु. १,८००/- देईन परंतु क नी तेव्हढे पैसे मरण्यासाठी मला दिले असतील तर.
6) मी ब ला रु. १,८००/- व माझा काळा घोडा पुढील १ जानेवारीला देईन.

7) श्री ब मी तुम्हाला रु. १,८००/- देणे आहेत.

8) मी ब ला रु. १,८००/- देण्याच वचन देतो परंतु त्यातून त्यांनी मला जर काही पैसे देणे लागत असेल तर ते पैसे मी कापून घेईन.

वरील पैकी क्रमांक १ व२ हे वचन चिठ्या आहेत तर इतर नाहीत.

वचन चिठ्ठीचा नमुना
मी श्री ----- यांचा मुलगा वचन देतो की श्री ----- यांचा मुलगा ----- याला किंवा तो सांगेल त्याला रु. ----- (अक्षरी -----) मात्र देईन. स्थळ सही तारीख

संयुक्त वचन चिठ्ठी
आम्ही श्री ----- यांचा पुत्र व श्री ------ यांचा पुत्र ----- श्री ----- यांच्या पुत्राला रुपये ----- (अक्षरी ----) देणे लागतो व ते पैसे त्यांनी मागणी करतातच देण्याचे वचन देतो. स्थळ (सही) तारीख (सही)

१७.२.२ वचन चिठ्ठीची खास वैशिष्टये

१) लेखी

वचन चिठ्ठी ही लेखी स्वरुपात असावी. लेखी म्हणजे छापील व टाईप केल असले तरीही चालेल. तोंडी दिलेल वचन ही वचन चिठ्ठी ठरत नाही. सर्वसाधारणपणे प्रतिफल, स्थळ व तयार केलेली तारीक या गोष्टी आवश्यक नाहीत.

२) पैसे देण्याचे वचन

- वचन चिठ्ठीत पैसे देण्याचे वचन असावे.
- फक्त पैसे देणे आहेत असा उल्लेख किंवा कबूली पुरेशी नाही.
- वचन हा शब्द असलाच पाहिजे असे नाही परंतू कागद पत्र तयार करणाऱ्यानी पैसे देण्याचे अश्वासन देणे (कोणत्याही इतर शब्दात) आवश्यक आहे.

उदा. 'मी सोहनलाल यांच्या कडून रु. ५,०००/- घेतलेले आहेत. ते मागतील त्या वेळी ते पैसे परत करीन."

३) विनाअट वचन

- पैसे देण्याच वचन विनाअट व निश्चित असावे.

- विनाअट म्हणजे एखादी घटना जी निश्चित घडणार आहे. परंतु केव्हा घडेल हे आज निश्चितपणे सांगता येत नाही.

उदा :- 'मी कशी लग्न केल्यानंतर ७ दिवसात ब ला रु ५००/- देईन " ही वचन चिठ्ठी ठरत नाही कारण यात लग्नाची अट आहे. परंतु पुढील शब्दातील वचन चिठ्ठी ठरते. मी क ला ब च्या मृत्युनंतर ७ दिवसाच्या आत रु. २५,०००/- देण्याचे वचन देतो. कारण इथे अट नाही. घटना घडणारच आहे फक्त ती केव्हा घडेल हे सांगता येत नाही. ब हा मरणारच आहे. फक्त केव्हा मरेल हे सांगता येत नाही.

४) तयार करणाऱ्याची सही

वचन चिठ्ठी तयार करणाऱ्याने त्यावर आपली सही केली पाहिजे. फक्त त्याच नांव लिहिलेल असेल तर ती वचन चिठ्ठी ठरत नाही.

५) पैसे ज्याला द्यायचे आहेत ती व्यक्ती ठरलेली असली पाहिजे.

वचन चिठ्ठीमध्ये पैसे ज्याला द्यावयाचे आहेत त्याचा स्पष्ट उल्लेख असावा म्हणजे त्यात त्याच नांव पत्ता वगैरे तपशील असावा. त्याच फक्त वर्णन असल तरीही पुरेसे आहे. फक्त त्यावरुन त्याची ओळख पटली पाहिजे.

६) देणी पैशाच्याच स्वरुपात असावी.

वचन हे फक्त पैसे देण्याबद्दलच असावे इतर कोणत्याही प्रकारच प्रतिफल नसाव.

उदा. मी ब ला रु.५०,००० आणि माझी कार देण्याच वचन देतो ही वचन चिठ्ठी ठरत नाही.

७) देय रक्कम निश्चित असावी.

पैसे किती द्यावयाचे आहेत त्याची निश्चित आकडा असावा. नाहीतर चिठ्ठी वैध ठरत नाही. उदा. अ ब ला रु. ८०० व त्याला देय असलेली इतर सर्व देणी देण्याच वचन देतो. ही वचन चिठ्ठी ठरत नाही. कारण एकूण देय रक्कम निश्चित नाही. परंतु पैसे व्याजा सकट देण्याचा उल्लेख वैध ठरतो. परंतु त्यात व्याजाच्या दराचा उल्लेख असला पाहिजे. उदा. अ ब ला रु. ५,०००/- व्याजा सकट देण्याच वचन देतो ही वचन चिठ्ठी ठरत नाही.

८) इतर आनुषंगिक गोष्टी :

वचन चिठ्ठीवर भारतीय मुद्रांकन कायद्यातील तरतुदीप्रमाणे योग्य रकमेच मुद्रांकन आवश्यक आहे. नाहीतर न्यायालय पुरावा म्हणून त्याचा स्वीकार करीत नाही. परंतु कागदपत्र बनविलेली तारीख, स्थळ इत्यादी गोष्टी आवश्यक नाही. किंवा आधी मिळालेल्या प्रतिफला साठी (for value Received) हे शब्द कायद्याच्या दृष्टीने महत्त्वाचे नाहीत.

९) वचन चिठ्ठीचा नमूना :

कायद्याने वचन चिठ्ठीसाठी ठराविक नमूना दिलेला नाही. त्याचे स्वरुप किंवा शब्द रचना कोणतीही असली तरी चालते. परंतु वरील सर्व अटींची मात्र पूर्तता होणे आवश्यक आहे देय रक्कम निश्चित असावी. उदा. 'मी वचन देतो की केतनला रु. १२,०००/- व त्याची इतर सर्व देणी देण्याचे वचन देतो"ही वैध वचन चिठ्ठी ठरत नाही कारण रक्कम निश्चित नाही.

१०) योग्य मुद्रांकन व तारीख :

वचन चिठ्ठीवर नियमानुसार मुद्रांकन लावून तो तयार करण्याआधी किंवा नंतर त्यावर फुली मारुन मुद्रांकन रद्द करणे आवश्यक आहे. वचन चिठ्ठीवर जर तारीख नसेल तर ज्या दिवशी ती दिली जाते. त्याच दिवशी तयार केली गेली आहे असे समजण्यात येते.

१७.३ हुंडी (BILL OF EXCHANGE) (कलम ५)

१७.३.१ अर्थ

याची व्याख्या कलम क्रमांक ५ मध्ये पुढीलप्रमाणे देण्यात आलेली आहे. हुंडी ही

- लेखी असावी.
- त्यात विनाअट आज्ञा असावी.
- त्यावर तयार करणाऱ्याची सही असावी.
- ठराविक व्यक्तीला किंवा तो सांगेल त्याला पैसे देण्याबद्दल त्यात आदेश असावा.
- देय रक्कम निश्चित असावी व फक्त रोखरक्कम देय असावी.
- पैसे ठराविक व्यक्तीस किंवा तो सांगेल त्याला देय असावी किंवा वाहकाला (Bearer) पैसे देय असावेत.

हुंडीमध्ये तीन पक्ष असतात.

- हुंडी काढणारा (सावकार)(धनको) (Drawer)
- ज्याला पैसे देण्याचे आदेश देण्यात येत आहेत (ऋणको) (Drawee)
- ज्याला रक्कम देण्यात येणार आहे (Payee)

१७.३.२ हुंडीमध्ये आवश्यक गोष्टी

१) हुंडी ही लेखी स्वरुपातच असावी.

२) त्यात पैसे देण्याबद्दल स्पष्ट आदेश असावा.

३) तयार करणार्यांनी त्यावर आपली सही करावी.

४) त्यातील आदेश हा विनाअट असावा.

५) यात तीन पक्ष असतात.

६) सर्व पक्ष निश्चित असावेत.

७) आदेश हा पैसे देण्यासंबंधीचा असावा. देय रक्कम निश्चित असावी.

८) आदेश हा फक्त पैसे देण्याबाबतच असावा.

९) त्यावर कायद्याप्रमाणे योग्य रकमेच मुद्रांकन (Stamp) असावे.

हुंडीचा नमूना

श्रीकांत — मुंबई

रु. १०,०००/- — १ एप्रिल २०१५,

या तारखेपासून ठीक तीन महिन्यांनी मला किंवा मी आदेश देईन त्याला रु. ९०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) आपणास मिळालेल्या मोबदल्याच्या बदल्यात देणे.

स्वीकारली	सही
सही	श्रीकांत
गायत्री	स्वरुप ५६/२८६
१-०४-२०१५	भलाभाई रस्ता
पवई विहार ६५/५६९	मुंबई ४०००७२
मुंबई- ४०००६८	

प्रति,

गायत्री देवी

मुंबई ४०००६८

१७.४ चेक किंवा धनादेश (कलम ६)

१७.४.१ अर्थ :

धनादेश हा एक महत्त्वाचा दस्तऐवज आहे. त्याच्या मदतीने सहजपणे दुसऱ्याला पैसे देता येतात. धनादेश म्हणजे बँकेच्या ग्राहकांनी बँकेला केलेली लेखी स्वरुपातील आदेश असतो. ग्राहक असा आदेश आपल्याच बँकेला देऊ शकतो. त्यात त्याला किंवा तो सांगेल त्याला किंवा वाहकाला ठरलेली निश्चित रक्कम देण्याचा आदेश असतो. बँकेतील आपल्या खात्यातील पैसे काढण्यासाठी त्याचा जास्त करुन वापर केला जातो. हंुडीची सर्व वैशिष्टये चेक मध्ये असणे आवश्यक आहे.

चेकचा नमूना

बँकेच नांव व पूर्ण पत्ता

तारीखः-

- - - - - - - (व्यक्तील नांव) यांना किंवा ते आदेश देतील त्यांना /किंवा वाहकाला रु (अक्षरी) देणे

(रु. आकडयात)

खाते क्रमांक

ग्राहकाची सही

ग्राहकाचे नांव छापलेल असते

१७.४.२ धनादेशाची वैशिष्टये :

१) विनाअट आज्ञा.

धनादेश लिहिणाऱ्या ग्राहकांनी धनादेशामध्ये कोणतीही अट घालू नये.

२) ठरलेल्या बँकेवर काढलेला असतो.

ग्राहक ठरलेल्या बँकेला (जिथे त्याचे पैसे म्हणजे खाते असत) आदेश देतो की धनादेशाची रक्कम अदा करावी.

३) ग्राहकाची सही

बँकेच्या ग्राहकांनी धनादेशावर सही करणे आवश्यक आहे. ही सही त्यांनी बँकेकडे दिलेल्या नमूना सही प्रमाणेच असावी.

४) रक्कम आकड्यात व अक्षरात

धनादेशाची रक्कम आकड्यात तसेच अक्षरात लिहिलेली असते.

५) पैसे मागणी केल्यावर देणे

बँकेनी धनादेशाचे पैसे धनादेश बँकेत हजर केल्याबरोबर दिले पाहिजे.

६) त्यात बँकेला स्पष्ट शब्दात आदेश दिलेला असावा.

७) दस्तऐवजातील रक्कम निश्चित असावी.

१७.४.३ धनादेशाचे रेखांकन (Crossing of a cheque) (कलम १२३) :

धनादेशावर जेव्हा दोन समांतर रेषा मारलेल्या असतात तेव्हा त्याला रेखांकित धनादेशा म्हणतात. त्या दोन रेषांमध्ये चलनक्षम नाही (Not Negotiable) किंवा देणे असलेल्या व्यक्तीच्या खात्यात A/c Payee असे शब्द लिहिण्याची ही पद्धत आहे.

अशा प्रकारे धनादेशाचे दोन प्रकार असतात.

१) खुला धनादेश - ज्याचे पैसे बँकेच्या कौंटरवर दिले जातात व

२) रेखांकित धनादेश - ज्यातील पैसे फक्त संबंधिताच्या खात्यात जमा होतात. रोख रक्कम दिली जात नाही. या दोन समांतर रेषा म्हणजे बँकेला केलेली सूचना किंवा दिलेला आदेश की या चेकचे पैसे रोखीने देऊ नये. रेखांकन केल्यामुळे चेकची चलनक्षमता नष्ट होत नाही. परंतू जेव्हा 'चलनक्षम नाही " किंवा देणे असलेल्या व्यक्तीच्या खात्यात (Not Negotiable व A/c Payee) असे शब्द असतील तर अशा धनादेशाच्या चलन क्षमतेवर काही बंधने येतात.

१७.४.४ धनादेशामधील पक्ष :

१) चेक काढणारा (Drawer) जो बँकेचा खातेदार असतो व

२) ज्याच्यावर धनादेश काढण्यात आलेला आहे (Drawee) ती बँक.

या शिवाय इतर पक्ष म्हणजे पृष्ठांकन करणारा (Endorser),ज्याला पृष्ठांकन केलेला आहे (Endorsee) तो, ज्याला पैसे मिळायचे आहेत (Payee) व धारक (Holder) या सर्वांची भूमिका हुंडीतील पक्षा सारखीच असते.

१७.४.५ धनादेशाचे प्रकार.

१) खुला धनादेश किंवा वाहक धनादेश (Bearer)

२) रेखांकित धनादेश (Crossed)

१) खुला किंवा वाहक धनादेश :

म्हणजे ज्याच्या हातात धनादेश असेल त्याला बँक पैसे देते. असा धनादेश जर हरवला तर चोराचा शोध लावणे अवघड जाते. पैसे बुडण्याची भीती असते. म्हणून धनादेशाच्या रेखांकनाची पद्धत अमलात आली.

२) रेखांकित धनादेश :

रेखांकित धनादेशाचे पैसे खात्यात जमा होतात व बँके मार्फतच दिले जातात. काऊंटरवर पैसे दिले जात नाहीत. त्यामुळे धनादेशाला सुरक्षितता प्राप्त होते. धनादेश हरवून पैसे बुडण्याची भीती नष्ट होते.

- रेखांकनामुळे चेकची चलनक्षमता नष्ट होत नाही.
- इतर दस्तऐवजा प्रमाणेच त्याचही हस्तांतर होऊ शकते.

थोडक्यात रेखांकित धनादेश म्हणजे बँकेच्या काऊंटरवर पैसे न मिळणारा धनादेश. बँक पैसे संबंधिताच्या खात्यात जमा करते. रेखांकनाचे विविध प्रकार आहेत.

१७.५ धनादेशाचे रेखांकन

धनादेश रेखांकनाचे विविध प्रकार

१) सर्वसाधारण रेखांकन :

सर्वसाधारण रेखांकन म्हणजे धनादेशावर दोन समांतर रेषा काढल्या जातात. आणि त्यात 'व कंपनी" असे शब्द लिहिले जातात. किंवा त्या रेषांमध्ये चलनक्षम नाही 'किंवा " फक्त देय व्यक्तीसाठी (A/c Payee) असे लिहिले जाते.

अशा प्रकारे सर्व साधारण रेखांकनामुळे धनादेशाची चलन क्षमता नष्ट होत नाही. धनादेशाचे पैसे गोळा करणारी बँक खातेदाराच्या वतीने संबंधित बँकेकडून पैसे घेऊन आपल्या ग्राहकाच्या खात्यात जमा करते. रेखांकित धनादेश हा वाहक धनादेश बनवता येतो. त्या साठी रेखांकन रद्द 'असे लिहून धनादेश काढणारा त्या खाली आपली सही करतो.

रेखांकनाचा नमूना. सर्वसाधारण रेखांकन



सर्व साधारण रेखांकनाचे परिणाम

1) इथे रेखांकन म्हणजे बँकेला दिलेला आदेश की 'या धनादेशाचे पैसे काऊंटरवर देऊ नये"

तो धनादेश ज्या बँकेवर काढलेला आहे. त्या बँकेला सादर करुन पैसे वसूल करुन ग्राहकाच्या खात्यात जमा करण्यात येतात.

२) खास रेखांकन (एजम्ग्[aत् ण्rदेग्हु) (कलम १२४) :

खास रेखांकन म्हणजे दोन समांतर रेषांच्या मध्ये बँकेचे नांव लिहलेल असत. याचा अर्थ त्या बँकेमार्फतच धनादेशाचे पैसे गोळा करण्यात यावेत असा आदेश बँकेला दिलेला असतो. एकदा खास रेखांकन केलेला धनादेश परत सर्व साधारण रेखांकनाचा धनादेश करता येत नाही.

खास रेखांकनाचा नमुना



खास रेखांकानासाठी आवश्यक गोष्टी

अ) इथे समांतर रेषा असल्याच पाहिजेत असा काही नियम नाही

ब) संबंधित बँकेच नांव मात्र लिहिण आवश्यक आहे.

क) सर्वसाधारणपणे रेखांकनाच्या रेषा धनादेशाच्या डाव्या बाजूच्या कोपर्यात मारल्या जातात.

ड) इथेही 'चलनक्षम “ किंवा व कंपनी असे शब्द लिहिले तरी चालते. त्यांना तसा काही खास अर्थ नाही. लोक सवयीने हे शब्द लिहितात.

थोडक्यात सांगायचे म्हणजे खास रेखांकन हे सर्व साधारण रेखांकनापेक्षा धनादेशाला अधिक सुरिक्षितता प्राप्त करुन देते.

दोनदा रेखांकन दुहेरी रेखांकन,

धनादेशावर जर दोन बँकाची नावे असतील तर त्याला दुहेरी रेखांकन म्हणतात. अशावेळी पैसे देणारी बँक या दोनमधील एक बँक पहिल्या बँकेचा प्रतिनिधी म्हणून म्हणजे पहिल्या बँकेच्यावतीने पैसे घेत असेल तरच धनादेशाचे पैसे अदा करते.

१७.५.२ धनादेश काढल्यानंतरच रेखांकन.(कलम १२५)

या कलमात पुढील नियमांचा समावेश आहे.

- धनादेशाचा धारक धनादेश आधी रेखाकित नसेल तर त्याच सर्व साधारण किवा खास रेखांकन करु शकतो.
- धनादेश जर आधी सर्वसाधारण रेखांकित असेल तर धारक तो धनादेशाच खास रेखांकन करु शकतो. म्हणजेच त्यामध्ये बँकेच नांव लिहू शकतो.
- धारक रेखांकनात 'चलनक्षम नाही " असे शब्द लिहू शकतो.
- धनादेश जर एका बँकेच्या नांवे खास रेखांकित असेल तर ती बँक त्यावर आणखीन एका बँकेच नाव लिहू शकते व त्यातील दुसरी बँक पहिल्या बँकेच्या वतीने चेकचे पैसे वसूल करु शकते.

थोडक्यात रेखांकन हे धनादेशमधील पैशाच्या सुरक्षिततेसाठीचा उपाय आहे. हे काम धनादेश तयार करणाऱ्यानीच केले पाहिजे असे नाही. चेकचा नंतरचा धारक सुद्धा ते काम करु शकतो.

१७.५.३ सर्वसाधारण व खास रेखांकित धनादेशाचे पैसे अदा करणे (कलम १२६ व १२७)

- धनादेशजर सर्वसाधारण रेखांकित चेक असेल तर त्याचे पैसे बँके मार्फतच दिले जातात. काउंटरवर रोख रक्कम दिली जात नाही.
- धनादेश खास रेखांकित असेल तर त्यावर नांव असलेल्या बँकेलाच पैसे दिले जातात.
- रेखांकन एकापेक्षा अधिक बँकांच्या नावे असेल तर इतर बँका मूळ नाव असलेल्या पहिल्या बँकेच्यावतीने पैसे गोळा करतात.

१७.५.४ रेखांकित धनादेशाचे पैसे यथाविधी (payment in due Course) अदा करणे:-

ज्या बँकेच्या नांवे धनादेश रेखाकित आहे त्याचे पैसे नियमाप्रमाणे (यथाविधी) दिले तर अस गृहीत धरल जात की धनादेश ज्याच्या नांवे आहे (Paबा) त्याला पैसे अदा केलेले आहेत. प्रत्यक्षात ते पैसे अदा केलेले आहेत. प्रत्यक्षात ते पैसे त्याला पोहचो अथवा न पोहचो. म्हणजेच नियमांचे काटाकोर पालन करुन धनादेशाचे पैसे अदा करणाऱ्यास कायद्याने संरक्षण दिलेले आहे.

१७.५.५ नियमांचे पालन न करता बँकेने पैसे दिले तर? (कलम १२९)

जर रेखांकित धनादेशाचे पैसे संबंधित बँकेनी नियमांचे काटेकोरपणे पालन न करता अदा केले व धनादेशाच्या खर्या मालकाचा त्यामुळे काही तोटा झाला तर तो तोटा बँकेला भरुन द्यावा लागतो.

१७.६ धनादेशा अनादर (कलम १३७ - १३८)

१७.६.१ अर्थ :

धनादेशाचा अनादर म्हणजे धनादेशाचे पैसे देण्यास बँकेनी असमर्थता दर्शविणे. हा भारतीय दंड विधानाच्या कलम ४२० खाली फौजदारी गुन्हा ठरतो. व त्या शिवाय या कायद्याच्या कलम १३८ प्रमाणेही तो गुन्हा ठरतो. दोनही कायद्याखालील गुन्हयाचे स्वरुप वेगवेगळं आहे. त्यामुळे एकाच वेळी दोनही कायद्याखाली संबंधिताविरुद्ध कोर्टात खटला दाखल करता येतो.

१८८८ मध्ये चलनक्षम दस्तएवजाचा कायदा पास झाला. हा कायदा पास होण्यापूर्वी बँकेत पैसे नसताना खोटा धनादेश देण्याचे प्रकार सर्रास व्हायचे. त्या विरुद्ध सहज करता जोग उपाय नव्हता. धनादेशाचे पैसे नाही मिळाले तर असा धनादेश देणाऱ्याला फारशा कडक शिक्षा किंवा दंडाची तरतूद नव्हती. धनादेशाचा अनादर हा मुलकी (Civil) गुन्हा होता.

मुलकी स्वरुपाचा गुन्हा नोंदवून न्याय मिळायला दीर्घ मुदतीच्या प्रक्रियेतून जावे लागते.धनादेशाचा व्यवहारातील महत्त्व लक्षात घेऊन १९८८ मध्ये या संबंधी कायद्यात दुरुस्ती करण्यात आली व सुलभ व अल्प मुदतीत न्याय मिळण्याची तरतूद करण्यात आली. यांत परत २००२ साली आणखीन कायद्यात सुधारणा करण्यात आली.

- गुन्हा घडल्यावर काय होते?
- धनादेशाचा धारक त्यासाठी कोणाला जबाबदार धरु शकतो?
- त्यासाठी कायदेशीर प्रक्रिया कोणती अवलंबावी?

१८८१ सालीच्या चलनक्षम दस्तएवजाच्या कायद्यात १९८८ मध्ये सुधारणा करताना चेक अनादराच्या गुन्हयाला फौजदारी गुन्हा ठरविण्यात आला. त्यामुळे बँकेत पैसे नसताना धनादेश देणं हा फौजदारी गुन्हा ठरला.

चलनक्षम दस्तएवजाच्या कायद्यातील कलम १३८ प्रमाणे खात्यात पुरेसे पैसे नाहीत या कारणास्तव जर बँकेनी धनादेश परत केला तर या गुन्हयासाठी दोन वर्षापर्यंत शिक्षा व धनादेशाच्या दुप्पट रकमेपर्यंतचा दंड किंवा दोनही होऊ शकतात.

अशी शिक्षा व दंड होण्यासाठी धनादेशाच्या धारकांनी पुढील नियमांचे पालन केले पाहिजे.

अ) धनादेश काढल्यापासून सहा महिन्याच्या आत किंवा धनादेश वैध असे पर्यंत तो बँकेत दाखल केला पाहिजे.

ब) धनादेश बँकेकडून परत आल्यानंतर ३० दिवसाच्या आत त्याची सूचना धनादेश काढणाऱ्याला दिली पाहिजे.

क) संबंधित पक्षानी धनादेशाच्या अनादराची सूचना मिळूनही धनादेश धारकाला त्याचे पैसे दिले गेलेले नसावेत.

१७.६.२ कलम १३८ खाली अत्यावश्यक गोष्टी.

1) धनादेश काढणाऱ्याच संबंधित बँकेत खात असल पाहिजे.

2) देणी देण्यासाठीच धनादेश दिलेला असावा.

3) देणी पूर्णपणे किंवा अशत: दिलेली असावी.

4) पैसे न देता बँकेने धनादेश परत केलेला असावा.

5) परत करण्याचे कारण पुढीलपैकी एक असाव.

- खात्यात पुरेसे पैसे नसणे किंवा
- अधिकोषासाठी (Overdradt) केलेली व्यवस्था पुरेशा रकमेसाठी नसणे.

6) धनादेश बँकेत वेळत म्हणजेच काढल्यापासून सहा महिन्याच्या आत भरलेला असावा. काही बँकाचे धनादेश हल्ली ३ च महिने वैध असतात. अशावेळी चेक तीन महिन्याच्या आत भरणे आवश्यक आहे. चेकच्या वैधतेच्या मुदतीचा उल्लेख धनादेशावर असतो.

7) चेक परत आल्याची सूचना धनादेश परत आल्या पासून ३० दिवसाच्या आंत धनादेश काढणाऱ्याला दिली पाहिजे.

8) अशी सूचना मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत त्यांनी धनादेशाचे पैसे धारकाला अदा केले पाहिजेत.

9) सोळाव्या दिवशी गुन्हा घडला अस समजण्यात येत.

वरील अटी पूर्ण झाल्यास सक्षम न्यायाधीश गुन्हयाची नोंद करुन घेतो.

१७.६.३ शिक्षा

- जास्तीत जास्त शिक्षा दोन वर्षाची (ही मर्यादा पूर्वी एकच वर्षाची होती. परंतु २००३ साली कायद्यात दुरुस्ती करताना कायदा अधिक कडक करण्यासाठी मुदत वाढवून २ वर्षे करण्यात आली.)

- धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट रकमेपर्यंतचा दंड.

१७.७ चलनक्षम दस्तऐवजाचा धारक

१७.७.१ अर्थ

धारक याचा अर्थ ज्याच्या हातात तो दस्तऐवज आहे व तो त्याच्या नांवे असून त्यातील पैसे त्याला मिळावयाचे आहेत. संबंधित पक्षाकडून वसूल करण्याचे त्याला अधिकार आहेत.

१७.७.२ धारकांनी पुढील अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

धारक ठरण्यासाठी त्याला पुढील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे (कलम ८)

1) त्याला तो दस्तऐवज स्वत:च्या नांवे धारण करण्याचा अधिकार असावा. कागद पत्राचा प्रत्यक्ष ताबा आवश्यक नाही, त्याला तो स्वत:च्या नांवाने धारण करण्याचा अधिकार असावा. आणि त्याची मालकी त्याच्याकडे असावी. म्हणजेच त्या कागद पत्रात त्याच नांव पैसे मिळणारा म्हणून नमूद केलेल असाव. किंवा वाहकाला पैसे मिळणार असतील तर तो त्याच्या ताब्यात असावा.

2) धारणाच्या अधिकाराशिवाय जर कागद पत्र एखाद्याच्या ताब्यात असेल तर त्याला धारक म्हणत नाहीत. म्हणून जर एखाद्याला ते कागदपत्र रस्त्यावर सापडल किंवा त्यांनी चोरुन आणल. किंवा खोटी सही करुन आपल्या ताब्यात घेतली तर कागद त्याच्या हातात असूनही तो धारक ठरत नाही. कारण त्याच धारण करण्याचा त्याला कायदेशीर अधिकार नाही. त्यांनी तो कागद वैध पद्धतीने म्हणजे कायद्यातील अटींच पालन करुन ताब्यात घेतलेल नाही.

१७.८ यथाविधि धारक (HOLDER DUE COURSE)

१७.८.१ अर्थ :

चलनक्षम दस्तऐवजाचा मूळ उद्देश म्हणजे जो योग्य मोबदला देऊन त्यातील दोषांची प्रामाणिकपणे कोणतीही कल्पना नसताना घेतो तो त्याचा खरा मालक बनतो. त्याला दस्तऐवज देणारा खरा मालक नसला तरीही त्याच्या मालकीतील दोषाची कल्पना नसल्याने जर योग्य मोबदला देऊन दस्तऐवज घेतलेत असेल तर तो त्याचा खराखुरा मालक बनतो. अशा व्यक्तीला कायद्यात यथाविधी धारक (Holder in due course) म्हणतात.

कलम ९ प्रमाणे जो वचन चिठ्ठी हुंडी किंवा धनादेशाचा योग्य तो मोबदला देऊन स्वीकार करतो व हस्तांतर करणाऱ्याच्या मालकीतील दोषांचा ज्याला प्रामाणिकपणे कल्पना किंवा माहिती नसते तो त्या दस्तऐवजाचा मालक किंवा तथाविधी धारक बनतो.

१७.८.२ यथाविधी धारकामध्ये आवश्यक असलेले गुण :

यथाविधी धारकामध्ये पुढील गोष्टी असणे आवश्यक आहेत.

- त्यांनी त्या दस्तऐवजासाठी योग्य मोबदला दिलेला आहे.
- दस्तऐवजाचे पैसे देय झाल्यानंतर जर एखाद्यानी मिळवल तर तो यथाविधी धारक बनू शकत नाही. म्हणजेच त्यातील पैसे देय होण्याच्या तारखे पूर्वी त्यानी ते ताब्यात घेणं आवश्यक आहे
- दस्तएवजावर प्रथम दर्शनी कुठल्याही चुका असू नयेत.म्हणजेच ते योग्य प्रकारे बनविलेल असावे. त्यावर नेहमीच्या सर्व गोष्टी असाव्यात.
- शेवटची परंतु महत्त्वाची अट म्हणजे त्यानी ते स्वीकारताना त्यात कोणतीही कमतरता नाही असे त्याचे प्रामाणिक मत असावे. (Good Faith) म्हणजेच त्याच्यातील दोषांची त्याला कल्पना नसावी.

१७.९ हस्तांतर (NEGOTIATION)

१७.९.१ : हस्तांतर म्हणजेच एक प्रक्रिया ज्याद्वारे दुसरी व्यक्ती त्या दस्तऐवजाची मालक बनते. दस्तऐवज त्याच्या नांवे होते व त्याचे पैसे त्याला मिळू शकतात. कलम १४ प्रमाणे ज्यावेळी वचन चिठ्ठी किंवा हुंडीची मालकी दुसऱ्याला बहाल करण्यात येते तेव्हा त्याला हस्तांतर म्हणतात. हस्तांतराचा उद्देश त्या दुसऱ्या व्यक्तीला दस्तऐवजाचा धारक व मालक बनविणे होय. त्यासाठी पुढील दोन अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे.

१) दस्तऐवज दुसऱ्याला हस्तांतर केल पाहिजे

२) हस्तांतर अशा प्रकारे करावे की ती दुसरी व्यक्ती त्याची मालक बनते.

१७.९.२ चलनक्षमतेचे प्रकार :

दस्तऐवजा**ची चलनक्षमता पुढील दोन पद्धतीने करता येते.**

१) हस्तांतर करुन (कलम ४७) :

जेव्हा वचन चिठ्ठी, हुंडी किंवा धनादेशाचे पैसे वाहकाला (Bearer) मिळणार असतात तेव्हा फक्त दस्तऐवजाचे हस्तांतर करुन ते दुसऱ्याला देता येते. उदा. अ एक वाहक दस्तऐवजाचा धारक आहे. त्यांनी ते ब ला दिले. म्हणजेच ब आता त्याचा मालक झाला आणि त्याचे पैसे ब ला मिळतील.

२) पृष्ठांकन करुन हस्तांतर (Endorsement and delivery) :

जे दस्तऐवज ठराविक व्यक्तीला किंवा तो सांगेल त्याला (or order) पैसे मिळतील असे (order instrument) असते त्याच्या पाठीमागे पृष्ठांकन करुनच म्हणजे दुसऱ्या व्यक्तीच नांव लिहून खाली सही करुनच ज्याच हस्तांतर केले जाते. पाठीमागे सही न करता दस्तऐवज फक्त दुसऱ्याकडे दिले तर अशावेळी त्या व्यक्तीकडे मालकी जात नाही.

दस्तऐवज जर एकाहून अधिक व्यक्तीच्या नांवे असेल तर त्या सर्वांनी पाठीमागे सही करणे आवश्यक आहे.

१७.१० पृष्ठांकन (कलम १५ व १६)

१७.१०.१ अर्थ :

पृष्ठांकन म्हणजे फक्त पाठीमागे लिहिणे. परंतु चलनक्षम दस्तऐवजाच्या कायद्याखाली पृष्ठांकन म्हणजे दस्तऐवजाच्या पाठीमागे दुसऱ्याच नांव लिहून सही करुन त्या माणसाकडे दस्तऐवज सोपविणे. आता तो त्याचा मालक बनतो. म्हणजेच पृष्ठांकन याचा अर्थ मालकी हस्तांतर करण्यासाठी त्याच नांव लिहून सही करुन देणे. जो पृष्ठांकन करतो त्याला पृष्ठांकनकार (Endorser) म्हणतात व ज्याला पृष्ठांकन करण्यात येते त्याला पृष्ठांकित व्यक्ती (Endorsee) म्हणतात.

१७.१०.२ पृष्ठांकनासाठी आवश्यक गोष्टी

वैध पृष्ठांकनात पुढील गोष्टी असणे आवश्यक आहे.

1) पृष्ठांकन हे दस्तऐवजाच्या मुखपृष्ठांवर किंवा पाठीमागे जागा नसेल तर त्याला एक कागद जोडून त्यावर केले जाते. पृष्ठांकन ही गोष्ट महत्त्वाची असल्यामुळे त्यासाठी सर्वसाधारणपणे शाईचे पेन वापरण्यात येते ज्यात सहज बदल करता येत नाही.

2) पृष्ठांकन हे दस्तऐवजाच्या मालकाने किंवा धारकानेच केले पाहिजे. कोणीतरी नाही.

3) पृष्ठाकंन करणार्यांनी त्याची सही केली पाहिजे पूर्ण नांव लिहिण्याची आवश्यकता नाही. अद्याक्षरे (Initials) असतील तरीही चालतात अंगठा उठविलेला असेल तर त्यासाठी साक्षीदाराची आवश्यकता आहे. दस्तऐवजावर सही कुठेही केली तरी चालते. परंतु फक्त रबरी शिक्का चालत नाही. सही केल्यानंतर सही करणाऱ्याच पद सिध्द करण्यासाठी रबरी शिक्का वापरला जातो.

१७.१०.३ पृष्ठांकनाचे प्रकार (कलम १६,५०,५२ व ५६) :

१) सर्वसाधारण किंवा कोरे पृष्ठांकन (कलम १६ व ५४) :

इथे पृष्ठांकन करणारा दुसऱ्या व्यक्तीच नांव न लिहिता फक्त पाठीमागे सही करतो. ज्याला पृष्ठांकन केले त्याचे नांव लिहिलेल नसते. अशा पृष्ठांकनामुळे ज्या दस्तऐवजाचे पैसे त्यातील व्यक्ती सांगेल त्याला (or order) असे असते त्याचे वाहक (Bearer) दस्तऐवजात रुपांतर होत. त्यामुळे नंतर ते सहज दुसऱ्याला तिसऱ्याला असे हव त्याला देता येते. परंतु आवश्यक तेव्हा हे पृष्ठांकन विशेष किंवा पूर्ण पृष्ठांकन करता येत. उदा. एक हुंडीचे पैसे अ ला मिळावयाचे आहेत. अ पाठीमागे सही करुन त्याच पृष्ठांकन करतो. याला कोरे पृष्ठांकन म्हणतात. आता बिलाचे पैसे कोणालाही म्हऩजे वाहकाला मिळू शकतात.

२) खास किंवा पूर्ण पृष्ठांकन :

जेव्हा पृष्ठांकन करताना फक्त सही न करता ज्याला पृष्ठांकन करावयाचे आहे त्याचे नांव ही लिहिलेले असते, तेव्हा त्याला खास किंवा पूर्ण (Special or full endorsement) पृष्ठांकन म्हणतात. उदा. 'अ ला किंवा तो सांगेल त्याला पैसे देणे" असे लिहून धारक सही करतो. त्याला पूर्ण पृष्ठांकन म्हणतात. अशावेळी या पुढे तो दस्तएवज फक्त अ च पृष्ठांकन करु शकतो.

३) काही भागाचे पृष्ठांकन :

काहीवेळा पृष्ठांकन करणारा दस्तऐवजाचा पूर्ण पृष्ठांकन न करता त्यातील फक्त काही भागाच पृष्ठांकन करतो. उदा. समजा अ नी ब वर रु. १०००/- ची हुंडी काढलेली आहे. तो अ त्यातील फक्त 'रु ५०० क ला देणे " अशा प्रकारे त्याच पृष्ठाकन करतो परंतु अस करुन चालत नाही, हे पृष्ठांकन अवैध ठरत.

४) मर्यादित पृष्ठांकन (कलम ५०) (Restrictive Endorsement) :

नांवा प्रमाणे अशा प्रकारच्या पृष्ठांकनामध्ये भविष्यातील पृष्ठांकनावर काही मर्यादा किंवा बंधने असतात. म्हणजेच ज्या पृष्ठाकनामध्ये भविष्यातील पृष्ठांकनावर मर्यादा घालणारे शब्द आहेत त्याला मर्यादित पृष्ठांकन म्हणतात. उदा. 'फक्त क लाच पैसे देणे "किंवा 'माPया वापरासाठी फक्त क लाच पैसे द्यावेत" वगैरे ज्याला दस्तऐवज पृष्ठांकन केले जाते त्याला इतर सर्व अधिकार नेहमी प्रमाणे मिळतात. परंतु फक्त त्या दस्तऐवजाचे परत पृष्ठांकन मात्र करता येत नाही.

५) सशर्त पृष्ठांकन (Condition Endorsement) :

पृष्ठांकन कर्ता पृष्ठाकंन करताना त्यात काही अटी घालू शकतो. अशी जर काही अट असेल तर त्याला सशर्त पृष्ठांकान म्हणतात.

अटीची पूर्तता आधी करावयाची असू शकते (Precedent) किंवा नंतर (Subsequent) पुरी करावयाची असू शकते. पृष्ठांकनात पुढील प्रकारच्या अटी असू शकतात.

1) सान्स रिकोर्स (Sanse recourse) म्हणजे पृष्ठांकन कर्ता जबाबदार राहणार नाही. उदा. अ ला किंवा तो आदेश देईल त्याला पैसे देणे. Sans recourse. माझी काही जबाबदारी नाही. किंवा मी जामीन म्हणून राहणार नाही. अशावेळी जर हुंडी वगैरेचे पैसे न मिळाल्यास ते पैसे पृष्ठांकन करणाऱ्याकडून वसूल करता येणार नाहीत. इतर वेळी पृष्ठांकन कर्ता हा जामीनदार समजला जातो व धारकाला जर देणेकऱ्याकडून पैसे नाही मिळाले तर तो पृष्ठांकन करणाऱ्या कडून ते पैसे वसूल करुन घेऊ शकतो.

2) अनादराची सूचना नको पृष्ठांकन (Facultative Endorsement) :

हे Sans recourse च्या विरुद्ध आहे. त्या मध्ये पृष्ठांकनकार आपली जबाबदारी झटकतो तर इथे तो स्वत:वर अधिक जबाबदारी घेतो. एरवी दस्तऐवजाचा अनादर

झाला तर पृष्ठांकनकराला त्याची सूचना देणे आवश्यक आहे. तशी जर सूचना दिली नाही तर त्याला नंतर जबाबदार धरता येणार नाही. परंतु Facultative Endorsement मध्ये पृष्ठांकन कार त्याला हा सूचना प्राप्त होण्याच्या अधिकाराचा त्याग करतो. म्हणजेच स्वेच्छेने अधिक जबाबदारी स्वीकारतो. उदा. अ ला किंवा तो सांगेल त्याला पैसे देणे. अनादराची सूचना नको.

3) Sensfais Endorsement :

असाही एक प्रकार आहे. इथे पृष्ठांकन करता नंतरच्या पक्षांनी दस्तऐवजावर काही खर्च करु नये असे लिहून देतो.

६) दस्तऐवज **परत घेणे किंवा परत येणे :**

इथे पृष्ठांकनकाराकडेच दस्तएवज परत येते. उदा. अ ब ला पृष्ठांकन करतो ब क ला व क ड ला नंतर ड तेच दस्तऐवज परत अ ला पृष्ठांकन करतो. याला दस्तऐवज परत येणे (Negotitation Back) म्हणतात. अशावेळी मधल्या सर्व पक्षांची जबाबदारीतून मुक्तता होते. वरील उदारहणात ब, क, ड, तिघांचीही जबाबदारी संपुष्टात येते.

१७.११ अनादराची नोंदणी व अनादाराचा दाखला (NOTING AND PROTESTING) (कलम ९९ ते १०४ अ)

जेव्हा एखाद्या चलनक्षम दस्तऐवजाचा अनादर होतो तेव्हा धारक दस्तऐवजा कर्ता व पृष्ठांकनकार यांना योग्य पूर्व सूचना देऊन दस्तऐवजाचे पैसे त्यांच्याकडून वसूल करु शकतो.तो यासाठी संबंधिता विरुद्ध कोर्टात दावा लावू शकतो. कोर्टात जाण्यासाठी त्याला दस्तऐवजाचा अनादर झाल्याचा पुरावा लागतो. बँकेनी जर धनादेशाचा अनादर केला तर तो धनादेश त्या पक्षाला परत करते व सोबत त्याचा अनादार का झाला याची कारणे देते.

कलम ९९ व १०० मध्ये वचन चिठ्ठी किंवा हुंडीचा अनादर झाल्यास अवलंबिण्यास लागणाऱ्या कार्य पद्धतीचा उल्लेख आहे. त्यासाठी अनादराची नोंदणी व त्याचा दाखला (Noting and Protesting) आवश्यक आहे.

१७.११.१ नोंदणी (Noting) :

जेव्हा हुंडी किंवा वचन चिठ्ठीचा अनादर होतो तेव्हा धारक योग्य सूचना देऊन संबंधित पक्षावर खटला भरु शकतो. दस्तऐवजाचा खरोखर अनादर झाला हे सिद्ध करण्याच्या कार्य पद्धतीचा उल्लेख कलम ९९ मध्ये आहे. त्या साठी दस्तऐवजावर तशी लेखी नोंद करावी लागते. यासाठी सरकारने काही व वकीलांची नोटरी म्हणून नेमणूक करते. त्यांनी अशी नोंद करावयाची असते.

जेव्हा दस्तऐवजाचा अनादर होतो तेव्हा धारक नोटरीकडे जातो. नोटरी स्वत: तो दस्तऐवज संबंधित पक्षाला पुन: सादर करतो. व त्यांनी त्याचे पैसे दिले नाही तर नोटरी या गोष्टीची नोंद दस्तऐवजावर करतो. त्यात त्यांनी पुढील गोष्टीची नोंद करणे आवश्यक आहे.

- दस्तऐवजाचा अनादर झाला
- अनादराची तारीख
- अनादरासाठीचे कारण (असल्यास)
- नोटरी सेवेसाठी वहीचा संदर्भ (पान नंबर वगैरे)

वरील प्रकारची नोंदणी, धारकानी योग्य मुदतीत करुन घेणे आवश्यक आहे. देशांतर्गत हुंडयांच्या बाबतीत नोंदणी सक्तीची नाही. परंतु तसे करुन घेणे धारकाच्या हिताचे ठरते. परदेशी हुंडयांच्या बाबतीत मात्र नोंदणी व त्याचा दाखला घेणे सक्तीचे आहे.

१७.११.२ नोंदणीचा दाखला (Protest) :

नोंदणी केल्यानंतर नोटरी त्याचा एक वेगळा दाखला तयार करतो ज्यात अनादराची संपूर्ण माहिती असते. अशा प्रकारचा दाखला घेणं धारकाच्या हिताच असत कारण पुढे संबंधितावर खटला दाखल केला तर न्यायालय अनादराचा पुरावा म्हणून अश्या दाखल्याचा लगेच स्वीकार करते.

हुंडीचा स्वीकार करण्यास किंवा त्याचे पैसे देण्यास नकार देणे म्हणजे हुंडीचा अनादर होय. त्यासाठी जसे असा दाखला घेतला जातो तसेच काही वेळा अधिक तारणाची मागणी करण्यासाठीही (Better Security) घेतला जातो. सबंधित धारकाच्यावतीने नोटरी अधिक तारणाची ही मागणी करु शकतो व हुंडी स्वीकारणाऱ्यानी ते दिले नाही तर त्याचीही नोंद करुन दाखला दिला जातो. अशा प्रकारे केलेल्या नोंदणी व नोंदणीच्या दाखल्याची सूचना सर्व आधीच्या पक्षांना दिला जातो. जेव्हा वचन चिठ्ठी किंवा हुंडीच्या अनादराची नोंदणी आवश्यक आहे तेव्हा संबंधिताना अनादराच्या सूचनेएवजी नोंदणी व नोंदणी दाखल्याची सूचना दिली जाते. (कलम १०२)

देशांतर्गत हुंडीच्या अनादराची नोंदणी व दाखला घेण्याची सक्ती नाही. परंतु विदेशी हुंडीच्या बाबतीत ज्या देशात ही हुंडी तयार केली गेली. त्या देशातील कायद्याप्रमाणे नोंदणी व दाखला सक्तीचा असेल तर हुंडीच्या अनादराची नोंदणी केलीच पाहिजे व त्याचा दाखला घेतला पाहिजे. म्हणजेच विदेशी हुंडयांच्या बाबतीत संबंधित देशातील या संबंधातील कायद्यांचे पालन केल पाहिजे (कलम १०४)

१७.१२ प्रश्न

1) चलनक्षम दस्तऐवजाची वैशिष्टये विशद करा.
2) चलनक्षम दस्तऐवजाच्या कायद्यात त्यांच्या विषयी कोणत्या गोष्टी गृहीत धरल्या जातात?
3) वचन चिठ्ठीची व्याख्या द्या व त्याची वैशिष्टये विशद करा.
4) हुंडीची व्याख्या द्या व त्याच्या वैशिष्ट्यांची चर्चा करा.
5) चेक (धनादेश) म्हणजे काय? त्याची खास वैशिष्टये सांगा. धनादेश रेखांकनाच्या विविध पद्धती विशद करा.
6) कोणत्या परिस्थितीत बँक धनादेशाचा अनादर करु शकते?
7) चलनक्षम दस्तऐवजाच्या कायद्यातील धनादेश अनादराविषयीच्या दंडात्मक तरतुदी विशद करा.
8) धारक व यथाविधी धारक यातील फरक स्पष्ट करा.
9) यथाविधी धारकाची वैशिष्टये कोणती?
10) चलनक्षमता म्हणजे काय?
11) पृष्ठांकन म्हणजे काय? त्याचे विविध प्रकार विशद करा.
12) संक्षिप्त टीपा लिहा.
    1) अनादराची नोंदणी व नोंदणी दाखल
    2) दस्तऐवज परत येणे.
13) पुढील शब्दांची व्याख्या द्या.
    1) हुंडी.
    2) कालावधी दस्तएवज.
    3) वाहक दस्तऐवज.
    4) देशांतर्गत दस्तऐवज.
    5) चलन क्षम दस्तऐवज.
    6) रेखांकित धनादेश.
    7) वाहक धनादेश.
    8) दुहेरी रेखांकन.
    9) मर्यादित रेखांकन.
    10) नोंदणी.
    11) नोंदणीचा दाखला.
    12) पृष्ठांकन.

❖❖❖❖